Impact Factor
5.604
www.sjifactor.com

p-ISSN 2454-7409
e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष सहावे अंक तिसरा जानेवारी २०२१
Vol. 6 Issue 3
Jan. 2021
Regular Issue

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## MPSP

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Annual National Indexed Research Journal
in Marathi
Published as per UGC (India) Guidelines

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Impact Factor 5.604 p-ISSN 2454-7409 **e-**ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 6 ISSUE 3 January 2021
वर्ष सहावे, अंक तिसरा, जानेवारी २०२१
URL https://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=604

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ **Editorial Board**

डॉ. राजू आदे, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे

**1. Dr. R.T. Ade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rajuade2512@gmail.com Mobile No.: +91-9422608715
**2. Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
**3. Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: +91-9765034097
**4. Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
**5. Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479

## Invited Editors

**1. Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
**2. Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**3. Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
**4. Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Shashikant Sawant**, Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
6. **Prof. Dineshkumar Joshi**, Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. Santoh Thakre**, Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
8. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
9. **Dr. R.A. Mishra**, Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
10. **Dr. U.V. Navalekar**, Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
11. **Dr. J.M. Chatur**, Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
12. **Dr. Dhanaji Gurav**, Principal, Dr.Babasaheb Ambedkar College, Mahad, Dist. Raigarh,
13. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
14. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra
15. **Dr. Kisan Patil**, M.J. College, Jalgaon, Khandesh, Maharashtra



**मुद्रक** : सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक** : डॉ. पवन मांडवकर

Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** 1) www.researchjournal.net.in 2) www.indiramahavidyalaya.com

**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-**
by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001


(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | आंबेडकरवादी गझल : सर्जनसौंदर्याचे आकलन | डॉ. युवराज श्री. मानकर | ५–८ |
| २ | संशोधन क्षेत्रातील स्थित्यंतरे : बदलता काळ | डॉ. मीनाक्षी सुरेश बऱ्हाटे | ९–११ |
| ३ | राजकवी भा. रा. तांबे यांचे प्रेम आणि महाप्रस्थान काव्य | डॉ. शरद जे. मेश्राम | १२–१५ |
| ४ | शंकरराव खरात यांची कथा | प्रा. डॉ. कैलास वानखडे | १६–१९ |
| ५ | त्र्यं. वि. सरदेशमुख : मानवी अस्तित्त्वाचा शोध घेणारा लेखक | प्रा. डॉ. विनोद राठोड | २०–२५ |
| ६ | कुसुमाग्रजांचा प्रेमविषयक दृष्टिकोन | प्रा.डॉ. सविता माधवराव पवार | २६–२८ |
| ७ | दलित कवयित्रींच्या कवितेतील आत्मभान | डॉ. प्रेमा लेकुरवाळे | २९–३३ |
| ८ | महानुभावांचे पद्यवाङ्मय | प्रा. डॉ. मीना जुनघरे | ३४–३९ |
| ९ | आदिवासी साहित्यात आविष्कृत होणारे महत्त्वपूर्ण घटक :– (निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे इ.) | डॉ. अनीता अ. कांबळे | ४०–४५ |
| १० | नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथा साहित्यातील पृथगात्मता | डॉ. अशोक भक्ते | ४६–५० |
| ११ | साहित्य प्रेरणा : संकल्पना व स्वरूप | प्रा.डॉ. नकुल जनार्दन धरमकर | ५१–५४ |
| १२ | पर्यावरण संतुलन एक लोकचळवळ व्हावी | डॉ. रवींद्र मुरमाडे | ५५–५७ |
| १३ | रवींद्रनाथ टागोरांची कविता | प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे | ५८–६२ |
| १४ | उच्च शिक्षणाच्या बदलत्या संकल्पनेत शिक्षकांची भूमिका | डॉ. सुवर्णा रा. गाडगे | ६३–६६ |
| १५ | भारतीय भटक्या–विमुक्त जमातींचा इतिहास | डॉ. विजयकुमार खंदारे | ६७–७० |
| १६ | डॉ. बाबासाहेबांचे साहित्यविषयक विचार | प्रा. भारती दि. रत्नपारखी / चिमुरकर | ७१–७३ |
| १७ | लोकसाहित्य व वर्तमानकाळ | प्रा. शरद वाघोळे | ७४–७७ |
| १८ | कवयित्री बहिणाबाई चौधरी | प्रा. डॉ. प्रियदर्शनी वसंतराव देशमुख | ७८–८१ |
| १९ | कोरोना आणि साहित्य | डॉ. सौ. वीरा मांडवकर | ८२–८६ |
| २० | संत चोखामेळा कुटुंबकवींचे वाङ्मयीन योगदान | डॉ. प्रवीण घारपुरे | ८७–९० |

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा हा सहाव्या वर्षीचा तिसरा अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संशोधकांनी विविध विषयांवरील उत्तमोत्तम शोधनिबंध प्रकाशनार्थ पाठविले व पीअर रिव्ह्यू समितीकडून झालेल्या छाननीतून प्रकाशनयोग्य अशा निबंधांना हिरवी झेंडी मिळाल्यावर हा अंक तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार शोधनिबंध प्रकाशित करण्यासंदर्भात सर्व संशोधक, अभ्यासक लेखकांना आम्ही सतत आवाहन करतो आणि त्याला शोधनिबंधलेखकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो. यूजीसीचा नियतकालिकांसदर्भात जी नियमावली आहे, तिचे तंतोतंत पालन 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' करते. हे नियतकालिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या मार्गदर्शनात प्रकाशित होते. पी–आयएसएसएन व इ–आयएसएसएन प्राप्त या नियतकालिकाचा इम्पॅक्ट फॅक्टरही पाचच्या वर आहे.

शोधनिबंध लेखकांनी शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळावा, ही आमची अपेक्षा असते. त्यात गोषवारा अथवा सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भ यांचा समावेश अनिवार्यपणे करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात. शोधनिबंध पूर्णत: तपासूनच पाठवावा. जर्नल हे गूगल, एसएसआरएन, रिसर्च गेट यांच्याशी लिंक केले असल्याने आपल्या निबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव व गोषवारा युनिकोड फॉन्टमध्ये मराठीत व त्याखाली इंग्रजीत अनुवाद टाईम्स न्यू रोमन मध्ये पाठविल्यास त्याचा आपल्याला फार मोठा फायदा होतो.

हे जर्नल गूग ल कनेक्ट असलेल्या www.researchjournal.net.in या व इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवर Research Journal या हेडमध्येही ठेवले जाते. त्यामुळे आपल्या निबंधाचे शीर्षक, विषय किंवा लेखकाचे नाव गूगलवर सर्च करताच आपल्यापुढे आपला निबंध किंवा त्यासंदर्भातील माहिती निबंध प्रकाशित झाल्यावर ओपन होते. गुगल स्कॉलर, रिसर्च गेट, एसएसआरएनवर आपण असल्यास, आपला शोधनिबंध दर्जेदार असल्यास, सायटेशन मिळाल्यास आपोआप तिथे नोंद होते. 'नॅक'मध्ये हे शोधनिबंध दाखवता येतात. आपल्याला दिलेली लिंक आपण नॅक SSR मध्ये, आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील आपल्या रिसर्च पेपर्समध्ये तसेच आपल्या बायोडाटातील रिसर्च पेपर्ससह विविध ठिकाणी नमूद करू शकता. Peer Reviewed जर्नल असल्याने यातील शोधनिबंध विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विविध प्राधिकरणांवरील नॉमिनेशन/को ऑपसाठी ग्राह्य धरले जातात. तसेच एपीआयसाठी Peer Reviewed जर्नलमधील शोधनिबंधांचे गुण ग्राह्य धरता येतात. हे १८ जुलै २०१८ रोजी यूजीसीच्या नियुक्ती व पदोन्नतीसंदर्भात प्रकाशित 'द गॅझेट ऑफ इंडिया' मधील गाइडलाइन्समध्ये पृ. क्र. १०५ वर टेबल क्र. २ मध्ये पहिल्याच क्रमांकावर आहे. हे बघण्यासाठी त्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.

https://www.ugc.ac.in/pdfnews/4033931_UGC-Regulation_min_Qualification_Jul2018.pdf

यूजीसीच्या नोटिफाईड जर्नल्स यादीत येण्यासाठी विहित मार्गाने नियतकालिकाने अर्ज दाखल केलेला आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक दर्जेदार शोधनिबंध ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशित करण्याची संधी 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'ला मिळत राहील, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# आंबेडकरवादी गझल : सर्जनसौंदर्याचे आकलन

डॉ. युवराज श्री. मानकर
सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
शिवशक्ती कला, वाणिज्य महाविद्यालय,
बाभुळगाव, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
निवास — प्लॉट नं.११, गुल्हाणे ले—आऊट, सुरेश नगर, धामणगाव रोड, यवतमाळ
ई—मेल drysmankar@gmail.com भ्रमणध्वनी ९८९०४६७६१३

## गोषवारा (Abstract) :—

प्रस्तुत लेखात आजपर्यत मराठी गझल विश्र्वात व आंबेडकरवादी साहित्यात दुर्लक्षीत ठेवलेली आंबेडकरवादी गझल यासंबंधीची चर्चा होऊ लागली आहे. ही चर्चा साहित्याच्या प्रवाहीतपणाकरिता खुप हिंताची आहे. यादृष्टीने सदर आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य या लेखात गझलच्या सर्जन सौंदर्यासंबंधी विचार मंथन केले आहे. यात गझलचे आशय, रूप, रुपरचनेचे रदीफ, काफिया, यती, अलामत आणि गझलियत आणि एकूणच गझलच्या सर्जन सौदर्याच्या प्रक्रियेत समाविष्ठ घटकांचा विचार केला गेला आहे.

बीजशब्द :— आंबेडकरवादी गझल, सर्जन सौंदर्य, रदीफ, काफिया, यती, अलामत आणि गझलियत

## प्रस्तावना :—

गझल ही अरबी,फारसी आणि उर्दू भाषेतून ती हिंदी आणि अन्य भारतीय भाषेत दाखल झाली आहे . मराठी भाषेत गझल ही माधवराव पटर्वधन यांच्या विशेष प्रयत्नातून प्रविष्ठ झाली .माधवराव पटवर्धना पूर्वी गझल मराठीत होती. तिचा शोध मोरोपंताच्या साहित्यातही घेतला गेला. मराठी गझलेला लोकप्रिय करण्यात सुरेश भट यांचा सिंहाचा वाटा आहे .त्यांच्या गझलने मराठी मन गझलमय केले. परंतु सुरेश भटांपूर्वी वामनदादा कर्डक सुद्धा गझल लिहित होते आणि गात होते. परंतु वामनदादा कर्डकांच्या गझलकडे मराठी गझलने पाठ फिरवली. त्यांची दखल कोणीच घेतली नाही. परंतु आज आंबेडकरवादी गझलचे जनक म्हणून वामनदादा कर्डकाना सिद्ध केले आहे. त्यांच्यावर संशोधन झाले आहे. आणि आंबेडकरवादी गझल आज चर्चा आणि चिंतनाचा विषय बनली आहे. या आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य नेमके कशात आहे. या मुलभूत प्रश्र्नांची चर्चा करण्यासाठी या लेखाचा हा प्रपंच आहे .

आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य हे साप्ताहिक सदर मराठी साहित्य वार्ता च्या वाचकांसाठी सुरू केलेले आहे. यात दर रविवारी प्रसिद्ध होणाऱ्या सदरांमधून ज्येष्ठ आंबेडकरवादी गझलकार प्रमोद वाळके 'युगंधर' आणि आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. प्रकाश राठोड हे आंबेडकरवादी गझलेच्या संदर्भाने भूमिका मांडत आहेत. या साप्ताहिक सदरांमधून 'आंबेडकरवादी गझलेचे सर्जनसौंदर्य', 'आंबेडकरवादी गझल समजून घेताना', 'आंबेडकरवादी गझलेचा आकृतिबंध', 'आंबेडकरवादी गझल: संकल्पना आणि स्वरूप', आंबेडकरवादी गझलमध्ये येणारे रदीफ आणि आंबेडकरवादी गझलमधून येणारे काफिया', 'स्वर काफिया' इत्यादी लेख प्रकाशित झाले आहेत. साधारणत: आजपर्यंत मुख्य विषयाच्या अनुषंगाने आठ भाग प्रकाशित झाले आहेत. या लेखमालेच्या संदर्भात महाराष्ट्रातील ज्येष्ठ गझलकार अशोक बुरबुरे, विनोद बुरबुरे, मसूद पटेल, रमेश सरकाटे, गझल चिंतक डॉ. युवराज मानकर आदींनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत; ही बाब नाविन्यपूर्ण अशी लेखमालेची पावतीच आहे. अत्यंत अभ्यासपूर्ण अशी लेखमाला या साप्ताहिक सदरातून प्रकाशित होत आहे. विशेषता संशोधन व चिंतनकक्षेच्या बाहेर दुर्लक्षित ठेवलेले 'आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य' प्रकाशित होत असल्यामुळे या सदराचे सौंदर्य अधिकच वाढले आहे.

आंबेडकरवादी गझलच्या सौंदर्याचा विचार करताना या गझलचे सर्जनसौंदर्य नेमके कशात आहे असा प्रश्र्न निर्माण होतो. या प्रश्र्नांच्या अनुषंगाने विचार करताना माझ्यापुढे गझलेतून व्यक्त होणाऱ्या आंबेडकरवादी जीवनदृष्टीचा भावाशय आणि आंबेडकरवादी भावाशयाचे अभिव्यक्ती रूप उभे राहते. या दोन घटकातून आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य जन्माला येते. गझलेतील आंबेडकरवादी जीवनदृष्टीचा भावाशय, विचाराशय

आणि त्याच्या अभिव्यक्तीचे रूप एकजीव झाल्याशिवाय सर्जन होत नाही आणि या सर्जनातून सौंदर्याची निर्मितीही होत नाही. तसेच गझलचे स्वतंत्र, स्वयंभू अस्तित्वही सिद्ध होत नाही. जीवन हे गझलकाराची इंधनभूमीच असते. या इंधनभूमीतून गझलकार, कवी संवेदनशील मनाने व आंबेडकरवादी जीवनदृष्टीने इंधन भरून घेतो आणि आहे त्या जीवनापेक्षा हवे ते सुंदर, आदर्श जीवन मांडण्याचा प्रयत्न करतो. आंबेडकरवादी गझल आदर्श जीवनाचा महाप्रकल्प आहे. ही गझल नको त्या जीवनाचा त्याग आणि हव्या त्या जीवनाची पुनर्रचना करते. जीवनाच्या पुनर्रचनेचे दुसरे नाव आंबेडकरवादी गझल असेच आहे. जीवन ही आंबेडकरवादी गझलची सर्जनशील सौंदर्याची जमीन आहे आणि तिचे अभिव्यक्ती रूप हे त्या जमिनीचे आकार रूप आहे. यांच्या एकजीव रसायनातूनच गझल जिवंत होते. ती सौंदर्यसंपन्न होते आणि सौंदर्य या तत्त्वाचा उजेड साहित्यव्यवहारात वाटत राहते. गझलेतील आंबेडकरवादी जीवनदृष्टीच्या भावाशयाचा आणि तो व्यक्त होणाऱ्या रचना रूपाचा सुटा सुटा विचार करणे आणि गझलेचे सर्जनसौंदर्य विशद करणे ही बाब अर्ध्या सौंदर्याचा विस्तार करणारी आहे. गझलेतील केवळ आंबेडकरवादी जीवनाशयाचा सुटा विचार केल्याने गझलेचे संपूर्ण सर्जनसौंदर्य विशद होऊ शकत नाही. म्हणून गझलेतील भावाशयासहच त्या भावाशयाच्या अभिव्यक्ती रूपाचा एकत्रित विचार करावा लागतो. कारण आशय गझलेच्या तंत्ररूपात बसवावा लागतो. आशयाविना तंत्राला किंमत नसते आणि तंत्ररूपाशिवाय आशयाला किंमत नसते. गझलेतील अभिव्यक्तीसाठी तंत्ररूपाची निर्मिती झाली आणि तंत्ररूप आशयाभिव्यक्तीसाठी निर्माण झाले आहे. तंत्राची निर्मिती करणाराही माणूसच आहे आणि आशयाच्या मध्यवर्तीही माणूसच आहे.

माणूस हा जीवनाच्या केंद्रभागी आहे. माणूस पुनर्रचनाशील आहे. माणूस हा अभ्यासाचा भाग आहे. तो गझलेतील जीवनाच्या केंद्रभागी आहे. माणूस हे विज्ञान आहे. तसेच माणसाने निर्माण केलेली भाषा, भाषेत निर्माण केलेली गझल हे देखील विज्ञान आहे. विज्ञान हे नव्या सर्जनशील सौंदर्याला जन्मास घालते. विज्ञान म्हणजे शास्त्र याचा अर्थ मानव हे एक शास्त्र आहे. भाषा हेही एक शास्त्र आहे. तसेच गझल देखील एक शास्त्र आहे. जिथे शास्त्र, विज्ञान येते तिथे नियमांची, शिस्तीची, आकाररूपाची चौकट येते. स्वातंत्र्याशिवाय विज्ञान आणि शास्त्र शक्य नाही. शास्त्राच्या नियमात स्वातंत्र्य अंतर्भूत असते. पण ते स्वातंत्र्य नियमांनी, तंत्रांनी बद्ध असते. गझल हे शास्त्र आहे आणि हे शास्त्र गझलेचा अविभाज्य असा भाग आहे. गझलेचे शास्त्र गझलेला गझल होण्यासाठी नियमांनी, तंत्रांनी चालायला सांगते. हा गझलेच्या देहरचनारूपाचा अटळ भाग आहे. हा भाग गझलेचे सौंदर्य वाढविणारा आहे.

आंबेडकरवादी गझलेचे शास्त्र गझलच्या देहासंबंधी काय सांगते..? आंबेडकरवादी गझलेच्या देहरचनेचा विचार करताना मानवी देहात कान, नाक, डोळे, जीभ आणि त्वचा ही पंचेंद्रिये आहेत. या पंचेंद्रियांपैकी एक जरी इंद्रिय नसेल तर मानवापुढे विशेष असे विशेषण लागते. तो संपूर्ण माणूस होऊ शकत नाही. तसेच गझलेच्या बाबतीतही आहे. गझलेच्या देहात रदीफ, काफिया, अलामत, यती आणि गझलियत ही पंचशील तत्त्वेंद्रिये आहेत. या पंचशील तत्त्वांवर गझलची देहरचना उभी झालेली आहे. गझलचे हे देहरूप भाषेतून होते. भाषा गझलेचा अनन्यसाधारण असा मूलभूत घटक आहे. भाषा आणि त्या भाषेतील शब्द हे विज्ञान आहे. या शब्दरूपातून गझलच्या देहरचनावयवांचा आविष्कार होतो. शब्द आणि त्या शब्दातील अक्षरे या अवयवांचे आश्रयस्थान आहेत. मानवी मुखातून उच्चारल्या जाणाऱ्या आणि जीवनव्यवहारात उपयोग केल्या जाणाऱ्या ध्वनीच्या चिन्हांकनाकरिता भाषेच्या शास्त्राने चिन्हव्यवस्था निर्माण केली. ती चिन्हव्यवस्था म्हणजे वर्ण आहेत. त्यालाच आपण अक्षर देखील म्हणतो. ज्या अक्षरांचा उच्चार लांबवता येतो त्याला स्वर या नामसंज्ञेने संबोधले गेले आणि ज्या अक्षरांचा व वर्णाचा उच्चार लांबवता येत नाही अशांना व्यंजने या नामसंज्ञेने संबोधले गेले. व्यंजने ही परजीवी असतात तर स्वर हे स्वयंभू असतात. स्वरांच्या सहाय्याशिवाय व्यंजनाला पूर्णत्व येत नाही. स्वर हे व्यंजनाच्या संपूर्ण अस्तित्वाचे सौंदर्य वाढवितात. स्वरांशिवाय व्यंजने ही पोरकी, लंगडी असतात. स्वर आणि व्यंजन याच्या सहगमनातून भाषेच्या जीवनात अर्थपूर्ण अशा अक्षर, वर्णसंकरातून शब्दांची निर्मिती होते. या शब्दांना सामाजिक अधिमान्यता आणि व्यवहारिक उपयोजनामुळे ते लोकप्रिय आणि रूढ शब्द बनतात. भाषेच्या जीवनात आणि व्यवहारात शब्द आदान–प्रदानाचे साधन म्हणून काम करतात. ते भाषेचे आणि व्यवहाराचेही सौंदर्य वाढवितात. या शब्दांमध्ये स्वर आणि व्यंजने ही सहोदरच असतात. या स्वर आणि व्यंजनांच्या नियोजनातून निर्माण झालेले शब्द भाषेलाही आणि यासोबतच जीवनव्यवहाराला ही सौंदर्य प्रदान करीत असतात.

आंबेडकरवादी गझलेच्या देहरचनेचे अवयव या शब्दबंधावर आधारलेले आहेत. गझलशास्त्र शब्दाला डावलून विचार करू शकत नाही. गझलच्या जीवनव्यवहारात रदीफ, काफिया, यती, अलामत आणि गझलियत ही

पंचशीले आधारभूत अशा भाषेतील शब्दांवर डौलाने उभी आहेत. आंबेडकरवादी गझलचे जीवन नियमाधिष्ठित आहे. गझलचे शास्त्र गझलेला नेहमी नियमांनी चालायला सांगते आहे. एकाच वृत्तात लिहिलेल्या पाच आणि त्यापेक्षा अधिक द्विपदीला गझलपण प्राप्त होते. या गझलेतील पहिली द्विपदी म्हणजे या गझलेचा मथळा (मतला) होय. या पहिल्या शेरातच गझलची पुढील वाटचाल कशी होणार आहे हे अंतर्भूत केलेले असते. त्या आकाररूपालाच जमीन असे म्हटले जाते. गझलेची जमीन म्हणजे नियमांची पायवाट. या ठरवून दिलेल्या पायवाटेने यमकाची, अन्त्ययमकाची, थांब्याची, सारख्या स्वराची, दोन शब्दातील पोकळीची आणि वृत्ताची दिशा निर्देशित केलेली असते. आंबेडकरवादी गझल ही गझलशास्त्राने सांगितलेल्या पायवाटेने जाणारी गझल आहे. या गझलेत अन्त्ययमक म्हणजेच रदीफ आहे. हा रदीफ गझलेतील क्रियापदात, नाम, सर्वनामात आढळतो. तो गझलेतील दोन चरणांच्या शेवटी आणि त्यानंतरच्या प्रत्येक शेरातील दुसर् या चरणाच्या शेवटी येणारा सारखा वर्ण, अक्षर, शब्द किंवा शब्दसमूह असतो तर गझलच्या देहरचनेचा वैशिष्ट्यपूर्ण घटक अवयव म्हणजे या रदीफच्या मागे मागे चालणारा शब्द म्हणजे काफिया होय. या काफियालाच यमक असे म्हणतात. हा काफिया रदीफपूर्वीचा शब्द असतो. या शब्दातील शेवटचे एक किंवा अधिक अक्षरे ही सारखी असतात. त्या शब्दालाच आपण काफिया असे म्हणतो. गझलच्या सर्जनसौंदर्यात भर घालणारा आणि गझलेचा घटक असणारा घटक म्हणजे अलामत होय. ही अलामत यमकमधल्या सारख्या अक्षर किंवा अक्षरसमूहाच्या आधी येणारा सामान्य स्वरूपाचा स्वर असतो. व्यंजने बदलत असतात. पण स्वर कायम असतो. त्याला आपण अलामत असे म्हणतो. गझल चालीवर म्हणताना एखादे अक्षर उचारल्यानंतर किंचित थांबावे लागत असते त्या थांब्याला यती असे संबोधले जाते. आणि शेवटचा महत्त्वाचा घटक म्हणजे गझलियत. ही गझलियत गझलेतील दोन शब्दांमधील पोकळी होय. ही काही तरी अर्थ सूचित करणारी असते. गझल म्हटल्यावर किंवा वाचल्यावर श्रोत्यांना किंवा वाचकाला व्वा व्वा अशा प्रतिक्रिया देण्यास भाग पाडणारी अशी ती जागा असते. ही सर्व गझलदेहाची पंचशील तत्त्वे आहेत. ही तत्त्वेच सर्जनाचे सौंदर्य निर्माण करणारी आहेत. ही तत्त्वे भाषेतील शब्दसमूहावर आधारलेली आहेत. भाषेतील शब्दसिद्धी ही व्यंजन आणि स्वरांच्या सहगमनातून जशी होते तसेच गझलेतील रदीफ आणि काफिया यांचे सुद्धा आपापसात फ्युजन असते. यांच्या फ्युजनमधून तयार झालेली गझल उत्कट भावसौंदर्याचा आविष्कार करते. गझलेतील रदीफच्या पाठीमागे सतत काफियाला धावावे लागते. रदीफ आणि काफिया हे गझलेत सहगमनाचे काम करतात. गझलेचे सौंदर्य रदीफ आणि काफियांच्या सहअस्तित्त्वावर अवलंबून असते. रदीफ, काफिया यांच्या देहरूपाच्या रचनेत स्वर आणि व्यंजने अस्तित्वातच असतात. गझलेत जेव्हा रदीफ येतो, काफिया येतो तेव्हा तो एकाच स्वरूपाच्या देहाचा नसतो ; तर तो अनेकविध स्वरूपाचा असतो. मराठी भाषेत एकूण बारा स्वर सांगितले आहेत. हे स्वर तीन प्रकारचे आहेत. ऱ्हस्व स्वर यात अ,इ,उ,ऋ **ऌ**, दीर्घ स्वर यात आ, ई, ऊ आणि संयुक्त स्वर यात ए, ऐ, ओ, औ अशी आहेत. हे स्वर गझलेतील जो काफीया असतो त्या काफियातील शेवटच्या अक्षरात दबलेला असतो. त्याच्या उच्चारणावरून त्या काफियातील ऱ्हस्व, दीर्घ आणि संयुक्त असे स्वर ठरवले जातात. यावरून गझलेच्या शब्दसमूहातील शेवटच्या अक्षरांचा उच्चार हा अकरांत, आकारांत, इकारांत, ईकारांत, उकारान्त, ऊकारान्त एकारान्त होत असेल तर या रीतीने स्वरकाफियाचे प्रकार पडलेले दिसतात. गझलचे सौंदर्य वाढविण्याच्या प्रक्रियेत रदीफ, काफिया आणि इतर घटकांचे महत्त्वाचे कार्य आहे. परंतु नीट रदीफ आणि काफियाचे उपयोजन कसे करावे आणि ते विविध प्रकारे कसे करता येईल हे कळीचे प्रश्र्न आहेत.

या प्रश्नांचा विचार करताना गझलेतील एखाद्या द्विपदीत पहिल्या ओळीतील शब्दसमूहातील शेवटचे अक्षर काफिया असेल आणि त्याचा अंत्यस्वर 'हा' असेल आणि त्याचा अंत्यस्वर 'आ' असेल तर दुसऱ्या ओळीतही शब्दसमूहातील काफियाच्या शेवटच्या अक्षराचा स्वरदेखील 'आ' येणे आवश्यक आहे. या दोन्ही ओळीतील काफियाच्या उच्चारणात साम्यता नसेल तर गझलेच्या देहरचनेतून हार्ट वजा केल्यासारखे वाटू लागते. म्हणून द्विपदीतील पहिल्या व दुसऱ्या ओळीतील काफियाचे तसेच रदीफचे उच्चारण एकसारखे होत असेल तर काफिया आणि रदीफ गझलच्या देहाचे सौंदर्य वाढवितो आणि काफियातील अंत्यपूर्व उपांत्य अक्षरेही भिन्न असल्याने त्यातून जीवनार्थालंकार निर्माण होऊन गझलचे आशयसौंदर्य आणि देहरूप जमिनीचे सौंदर्य वाढविण्यास मदत होते आणि गझल ही देहिक आणि आशयात्मकदृष्ट्या सौंदर्यसंपन्न बनते. यासोबतच गझलेतील प्रतीके, प्रतिमांचे उपयोजनही गझलचे सर्जनसौंदर्य वाढण्यास अधिक मदत होते. हेच गझलचे विज्ञान वा शास्त्र गझलसंबंधी आणि तिच्या सर्जनसौंदर्यासंबंधी अपेक्षा आणि स्वप्न पाहते. त्यासाठी विज्ञानाने सांगितलेली प्रयोगशीलता गझलमध्ये करीत राहणे हे गझलच्या अस्तित्वासाठी, तिच्या प्रवाहीततेच्या गतीशील संवर्धनासाठी आवश्यक आहे. आपणाकडे खूप

शब्दसाधने असतातही पण त्याचा नीटनेटका वापर कसा करायचा याचे अज्ञान असते. हे अज्ञान दूर करणारे उपयोजित लेखन माननीय प्रमोद वाळके 'युगंधर' आणि आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. प्रकाश राठोड यांच्या प्रकाशित होणाऱ्या या साप्ताहिक सदरामधून घेणे आणि स्वत:ला अपडेट ठेवण्यासाठी प्रत्येक जिज्ञासकांकडून माझ्यासारख्या गझलचिंतकाने नम्र अपेक्षा धरणे यात काहीच गैर नाही असे मला वाटते.

## निष्कर्ष :—

आंबेडकरवादी गझलने मराठी गझलेत हस्तक्षेप केला आहे .त्यामुळे मराठी गझलच्या सर्व कक्षा रुंदावणार आहे .मराठी गझलाची सर्वांगाने व्याप्ती वाढणार आहे .आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य हे या गझलच्या भावाशयात आणि या गझलच्या देहरूपरचना तंत्रात आहे .गझल ही एक विज्ञान वा शास्त्र आहे .ती नियमांनी चालते .तिची स्वत:ची एक चौकट आहे .या चौकटीत गझलच्या देहरचनेचे रदीफ, काफिया , यती, अलामत आणि गझलियत ही पंचशीले आहेत. भाषा आणि भाषेतील शब्द, शब्दातील वर्ण वा अक्षर यांचे उत्तम ज्ञान नव्या गझल लिहू पाहणाऱ्या प्रत्येकांना असणे अपेक्षित आहे .आंबेडकरवादी जीवनदृष्टीचा भावाशय आणि गझलचे तंत्र हे आंबेडकरवादी गझलचे सर्जनसौंदर्य वाढवितात.

## संदर्भग्रंथ सूची :

१. संपादक : प्रमोद वाळके 'युगंधर', संग्रामपिटक, युगसाक्षी प्रकाशन,१४/१०/२०१२
२. संपादक : प्रमोद वाळके 'युगंधर' शरद शेजवळ, आंबेडकरवादी गझलवेध, युगसाक्षी प्रकाशन, फेब्रुवारी २०१८.
३. कपिल पालिया 'सूफी', ग़ज़ल के बारे मे,
४. माधवराव त्रि. पटवर्धन. छंदोरचना, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुम्बई, ख्रिस्त शके १९७३.
५. संपादक : रंगनाथ चोरमुले, आकंठ दिवाळी विशेषांक, २००२.
६. प्रमोद वाळके 'युगंधर', वामनदादा कर्डक : आंबेडकरवादी गझलेचा आकृतिबंध, संवेदना प्रकाशन, जुलै २०१९.

❖❖❖

# संशोधन क्षेत्रातील स्थित्यंतरे : बदलता काळ

डॉ. मीनाक्षी सुरेश बऱ्हाटे
मराठी विभाग, केन्द्रीय संस्कृत विश्वविद्यालय, क.जे. सोमैया परिसर, विद्याविहार, मुंबई -७७, महाराष्ट्र (India)
barhate2k@gmail.com भ्रमणध्वनी ९९६७०९५४५१

## प्रास्ताविक :

संशोधन म्हणजे 'रिसर्च'अशा वेगवेगळ्या शब्दप्रयोगामुळे आपण सर्व परिचित आहेत. शुद्धतेने शोध घेतलेल्या नव्या जाणिवांचा वेध म्हणजे संशोधन होय. ज्यामध्ये नव्या विचार प्रणालीचा पुरस्कार अभिप्रेत असतो. संशोधन या शब्दप्रयोग साहित्याच्या अनेक कक्षा अधिक विस्तारित झाल्या आहेत. मूलतःसाहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक शास्त्रांचा समावेश असतो.या सर्व नव्या विचार प्रणालीतून मराठी साहित्याच्या संशोधनाला सुरुवात होते. तेव्हा संशोधकाच्या मनामध्ये असंख्य प्रश्न निर्माण होतात. संशोधनाची प्रथम पायरी म्हणजे विषय निश्चिती होय. पण संशोधनासाठी कोणत्या स्वरूपाचा विषय निवडावा. त्यानुसार विषयाची मांडणी कशी करावी.या संदर्भात अनेक अडचणी येतात.या शंकाचा शोधात घेत असताना संशोधकांच्या मनामध्ये सतत प्रश्न निर्माण होत असतात. त्यावेळी यथोचित मार्गदर्शन होणे अत्यंत महत्त्वाचे असते.अभ्यास विषय निश्चित झाल्यानंतर कोणत्या प्रकारच्या संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहेत.हे प्रथमतः ठरवावे लागते. कारण साहित्याचे संशोधन आणि समीक्षा विचार हे दोन्ही वेगवेगळ्या बाबी आहेत. या दोन्ही विषयात गल्लत करता कामा नये.कारण संशोधन हे नाविन्यपूर्णतेचा शोध असतो. आपल्या अभ्यास विषय मर्यादा लक्षात घेऊन काही अवधान पाळावे लागतात.त्यामुळे आपण बरेच दोष स्थळे टाळू शकतो. या विचारप्रणालीतून आपले विचार ठामपणे व्यक्त होतात. यासाठी सूक्ष्म निरीक्षण व परीक्षणे करण्याचे धाडस करावे लागते.मुद्दाम वरील सर्व विषयावर प्रकाश टाकला आहे.कदाचित या विचारातून एक स्वतंत्र शैली आकारली जाऊ शकते.हा संशोधानासाठी खूप महत्त्वाचा विचार आहे.थोडक्यात असे काही निष्कर्ष हाती येतात. नव विचार धारेची संशोधन क्षेत्राला खूप गरज असते.

मराठी साहित्याच्या संदर्भात संशोधन करणाऱ्या व्यक्तीच्या मनामध्ये देखील विषय निश्चितीच्या वेळी बऱ्याच अडचणींना लढा द्यावा लागतो.या समस्यांमधून अनेक प्रश्न उद्भवतात. तेव्हा असंख्य प्रश्नांमधून व्यक्ती विचार करण्यास प्रवृत्त होतो. या प्रक्रियेतून डोळ्यासमोर काही उपविषय दृष्टीसमोर येतात.पण संशोधन तेवढ्यावर थांबत नाही. तर ही निरंतर ,अखंड चालणारी दीर्घकाळ अशी प्रक्रिया असल्याने ज्या विषयामध्ये आपणास संशोधन करणार आहोत .त्या प्रकारचा विषय निश्चिती मध्ये संशोधक हा गुरफटलेला असतो. ज्या अभ्यासामुळे पुढील काळातील त्याच्या ज्ञानाच्या दिशा अधिक दृढ होतात.असे अभ्यासक म्हणून ठाम मत आहे.

एका नव्या पर्वाचा शोध घेण्यासाठी संशोधकाला नेहमी तत्पर रहावे लागते. संशोधन करणाऱ्या व्यक्तीच्या मनामध्ये अडचणी येतात.तेव्हा त्यासाठी द्यावा लागणारा वेळ,अथक परिश्रमांच्या लढा, संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे रीतसर केलेले वर्गीकरण इत्यादि सर्व बाबी संशोधनाच्या पायऱ्या समजल्या जातात. म्हणून संशोधनाला प्रारंभ करण्याअगोदर विद्यापीठातील संशोधन विभागांमध्ये जाऊन यापूर्वी होऊन गेलेल्या विद्यापीठ स्तरीय निवडल्या गेलेल्या विषयाच्या यादीतील विषयाची नोंद वगळता आपल्याला योग्य वाटेल, असा विषय संशोधकाने निवडला पाहिजे. त्या विषयावर आजपर्यंत संशोधन झालेले नसावे. आजच्या काळाला ह्या विषयाची गरज लक्षात घेऊन त्या विषयाचे महत्त्व शोधणे हे देखील तितकेच महत्त्वाचे असते.नवीन विषयाचा विषयाचा अभ्यास साहित्याला अतिशय पोषक असा ठरतो.त्यामुळे संशोधकाने पूर्णतः नवीन अभ्यास विषयाची निवड केल्यास भावी आयुष्यातील संशोधकाची वाटचाल ही अधिक प्रेरक आणि अतिशय महत्त्वाची ची घटना मानावी लागेल. त्यामुळे विषय निश्चिती या घटनेला अधिक प्राधान्य दिले पाहिजे .

संशोधन हे मूलतः एक शास्त्रीय समीक्षा पद्धती असल्यामुळे यातील विचारधन ज्ञानावर आधारित तात्त्विक स्वरूपाचे लेखन असते.या विचार पद्धतींचा पुरस्कार करणारा जॉन ड्युई या विचारवंताने काही महत्त्वाच्या पायऱ्या मानून संशोधन

पद्धतीचा अभ्यास केला आहे. त्यामधून मानवी मनाला पडणाऱ्या शंका आणि या शंकांचे निरसन होण्यासाठी संशोधक त्या विषयाचा पाठपुरावा घेतो असतो. हे त्या संशोधनातील नाविन्यपूर्ण शोधण्याचा पहिला पण लहानसा प्रयत्न पुढील अभ्यासकासाठी दिशा दर्शवण्यासाठी हा अनुभव खूप आवश्यक असतो. साधारणतः कोणताही अभ्यास पहिल्यांदा संशोधनाचा विषय निश्चित करण्यासाठी काही लहान लहान उपविषय शोधून आपल्या आवडीचा विषय ग्राह्य धरावा लागतो.त्यातून विषयाला प्राधान्य देऊन विषयाचे अनेक प्रकारे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येते.

1. एखाद्या लेखकाच्या साहित्यकृतीवर केलेले संशोधन.
2. एखादा विशिष्ट लेखक व्यक्ती आणि वाड्मय या गटात मोडणारे संशोधन
3. दोन विशिष्ट कालखंडातील निवडक साहित्य प्रकारांवर
4. निवडक साहित्य प्रकारांच्या कादंबरीवर देखील संशोधन करता येऊ शकते.
5. साहित्य प्रवाहातील विविध घटकांवर देखील आपण संशोधनाचा विषय करू शकतो.
6. मिडिया आणि संगणक, महाजाल,ऑनलाईन शिक्षण आणि शाळा, महाविद्यालय □

अशा अनेक माध्यमातून संशोधनाच्या कक्षा या अतिशय व्यापक असतात. या कल्पना प्रत्येक व्यक्तीच्या मनावर अवलंबून असतात. त्या व्यक्तीच्या आवडीचा प्रांत ती व्यक्ती निवडत असते.या निवडलेल्या प्रांतांमध्ये आपल्याला काय करता येऊ शकते. याचा शोध म्हणजे संशोधन असते. तर हा शोधाला जेव्हा प्रारंभ होतो तेव्हा मानवी मनाला असंख्य प्रश्न पडतात आणि ह्या प्रश्नांचे निरसन होण्यासाठी वेळोवेळी त्याला योग्य मार्ग मार्गदर्शक किंवा गाईडलाईन किंवा तज्ञांचे मत मिळणं अतिशय आवश्यक असते. या सर्व गोष्टी संशोधनाच्या स्वरूपाशी निगडित असतात.

अलीकडच्या कालखंडातील संशोधकांच्या संशोधन करण्याच्या वृत्तीमध्ये बदल झालेला दिसतो. हा काळानुरूप बदल या शोधनिबंधाचा प्रस्तुत विषय आहे. या विषयाकडे पदवी प्राप्तीसाठी केले संशोधन , असा हल्ली अभ्यास विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण **,** विद्यापीठस्तरीय होणाऱ्या संशोधनाचा कल कमीत कमी वेळात साधता येणारे संशोधन म्हणून याकडे संशोधक मोठ्या प्रमाणात पाहताना दिसतो .अशा पळवाटा शोधल्या संशोधन पूर्णत्वाला जाऊ शकत नाही**.** संशोधन हे पदवी पुरते मर्यादित राहत नाही, तर पीएच.डी पदवी नंतर खऱ्या अर्थाने विचारांच्या कक्षा अधिक विस्तारित होतात. आपल्या अभिरुची मध्ये वेगवेगळ्या विषयाची आवड निर्माण होऊन नाविन्यपूर्ण तर शोधण्याचा प्रयत्न केला जातो .याला प्रारंभ त्या परिस्थितीला आपण संशोधन असे म्हणता येईल. या अभ्यास प्रक्रिया व्यक्तीच्या मरेपर्यंत निरंतर सुरु असते. तात्पर्य ,संशोधनाची प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया आहे .हे आपणास मान्य करावे लागते. जेव्हा मानवी मनाला असंख्य प्रश्न भेडसावतात तेव्हा शोधण्याच्या प्रक्रियेतून जिज्ञासा निर्माण होऊन उच्चकोटीच्या आनंदाचा स्वानुभव प्राप्त होतो. हा अनुभव संशोधन कार्यासाठी अतिशय अवर्णनीय असतो .

आजच्या कालखंडातील संशोधकांची प्रवृत्ती आणि मार्गदर्शकांच्या नातेसंबंधातील काही प्रश्ना विचार करण्यास भाग पडतात. कदाचित ह्या भूमिका लक्षात घेतल्यास अलीकडे संशोधक आणि मार्गदर्शकाच्या संख्येत भरपूर वाढ झाल्यामुळे दर्जेदार संशोधन होऊ शकत नाही .असा प्रश्न नेहमीच चर्चासत्रामध्ये उद्भवला जातो. आपल्या विषयाबद्दलची असलेली अनास्था मोठ्या प्रमाणात निदर्शनास येते .कदाचित पदवी प्राप्तीच्या उद्देशासाठी किंवा पदोन्नतीसाठी केलेल्या संशोधनात असे काही दोष स्थळे आढळतात. ही बाब टाळण्यासाठी काही विषयाची दक्षता घेतली पाहिजे. कारण संशोधनामुळे आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिक विस्तारित होतात. अनेक नवनवीन विषयाची माहिती आपणास संशोधकांना पुढे उपलब्ध करता येतात.साहित्यविश्वात बऱ्याच ज्ञानकक्षा आकारून येऊन त्या अंगाने अभ्यास क्षेत्र निर्माण होण्यास मदत होते . म्हणून संशोधन लेखनात आणि बारकाव्यांसह शोधण्यावर भर दिला पाहिजे. थोडक्यात यातून संशोधकाची चिकित्सक वृत्ती त्याच्या संशोधनाला त्याच्या पोतावर आधारित असते. अभ्यासात जेवढे आपले विचार प्रकल्प करणार तेवढे लेखन अधिक जोरदार धारदार आणि उत्कृष्ट होणार यात शंका राहत नाही**.**

## समारोप :

संशोधन म्हणजे रिसर्च, अशा वेगवेगळया शब्दप्रयोगामुळे सार्वत्रिक ठिकाणी ओळखले जाते. पण हल्लीच्या काळामध्ये संशोधकांनी संशोधन करण्याच्या वृत्तीमध्ये बदल केला पाहिजे. विद्यापीठस्तरीय संशोधनामध्ये कमी वेळात

सांगता येणाऱ्या पळवाटा शोधल्या जातात .त्याला पण संशोधनाद्वारे सहज म्हणू शकत नाही .संशोधनाची प्रक्रिया ही सतत चालणारी शोध प्रक्रिया असते. जेव्हा आपण संशोधनाला सुरुवात करतो .तेव्हा असंख्य प्रश्न मनाला भेडसावत असतात .त्यातून संशोधनाला प्रारंभ होतो. शोध घेणे ही संशोधनाची प्रथम पायरी, विषय निश्चिती दुसरी पायरी मानली पाहिजे. पण विषय कोणत्या स्वरूपात आणि कशा ? कसा घ्यायचा शंका संशोधकांच्या मनामध्ये सतत असते. त्यावेळी यथोचित मार्गदर्शन होणे महत्त्वाचे असते .पण अलीकडे मार्गदर्शक आणि संशोधकांच्या संख्येत भरपूर वाढ झाल्यामुळे त्या पद्धतीने कसदारपणे संशोधन होताना दिसत नाही. या विषयाबद्दल असलेली अनास्था असल्यामुळे फक्त पदवी प्राप्तीसाठी किंवा प्राध्यापक क्षेत्रात पदोन्नतीसाठी संशोधन मोठ्या प्रमाणात पहिले जाते. खऱ्या अर्थाने संशोधन अधिक जिद्दीचे चिकाटीचे करावे. संशोधनामुळे आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिक विस्तारित होतात.त्या विषयाबद्दल अधिक माहिती मिळते. कोणत्याही ज्ञानशाखेत नव्या विषयांचा शोध लावण्यात हे काम जिकिरीचे असते. यासाठी अभ्यासाबद्दलची तत्वे वापरली जाणारी संशोधन पद्धती संशोधन लेखनात येणारी चिकित्सक वृत्ती या सर्वांवर आपल्या संशोधनाचा पोत अवलंबून असतो. संशोधनाच्या उत्पत्तीबद्दल विचार करताना संशोधन प्रक्रियेची मूळ शोधताना त्यांच्या अंगावर प्रकाश टाकणारे लेखन अत्यंत महत्त्वाचे म्हणावे लागेल .

## निष्कर्ष :

1. संशोधनामध्ये नाविन्यपूर्ण शोधण्यावर भर दिला पाहिजे.
2. शोध घेताताना नवीन विषयाला प्राधान्य दिले तर साहित्याच्या अभिवृद्धीमध्ये मोलाची भर पडते.त्यामुळे ही बाब संशोधनासाठी अतिशय महत्त्वाची मानवी.
3. मूलतः संशोधन ही प्रक्रिया दीर्घ काळ चालणारी असल्याने सूक्ष्म निरीक्षणे ठोस पणे नमूद करावे.
4. अभ्यासकाच्या चिकित्सक वृत्तीवर संशोधनाचा पोत अवलंबून असतो.

## संदर्भग्रंथ :


1) कऱ्हाडे सदा; संशोधन स्वरूप आणि पद्धती, लोकवाड्मय गृह, मुंबई.१९९७
2) कुलकर्णी वसंत विष्णू ; मराठी प्रबंध सूची , साहित्य प्रसार केंद्र ,नागपूर .प्रथमावृत्ती १९९१.
3) जोशी वसंत (संपा.) ; भाषा व साहित्य : संशोधन- खंड -१, महाराष्ट्र साहित्य पत्रिका , पुणे १९८२.
4) तत्रैव; भाषा व साहित्य : संशोधन- खंड -१, महाराष्ट्र साहित्य पत्रिका , पुणे १९८५.
5) दावतर वसंत ; संहितासमीक्षा आणि पारिभाषिक संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृती मंडळ, मुंबई. प्रथमावृत्ती १९८७.
6) देशमुख उषा ; मराठी संशोधनविद्या, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे .प्रथमावृत्ती १९९४
7) तत्रैव ; साहित्य शोधणी ,नीहारा प्रकाशन ,पुणे .प्रथमावृत्ती १९८९.
8) संत, दु. का. ; शोधविज्ञानकोश, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन १९८५
9) संत दु. का. ; संशोधन पध्दती : प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन


❖❖❖

# राजकवी भा. रा. तांबे यांचे प्रेम आणि महाप्रस्थान काव्य

डॉ. शरद जे. मेश्राम
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया ४४१७०१, महाराष्ट्र (India)
इ मेल sweetsharad123@gmail.com भ्रमणध्वनी 9404279799

राजकवी भास्कर रामचंद्र तांबे (जन्म दि. २७ ऑक्टोबर १८७३ मृत्यू दि. ७ डिसेंबर १९४१) हे सुप्रसिद्ध मराठी कवी. मध्य भारतातील मंगावली येथे त्यांचा जन्म झाला. शिक्षण झांशी आणि देवास येथे झाले. सन १८९३ मध्ये प्रवेश परीक्षा त्यांनी पहिल्या वर्गात उत्तीर्ण केली. परंतु आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने त्यांना उच्च शिक्षण घेता आले नाही. मध्य भारतातच त्यांनी अनेक लहान मोठ्या नोकऱ्या केल्या. दिवाण, पोलिस सुपरिंटेंडेंट, सरकारी वकील, न्यायाधीश, शिक्षण खात्यामध्ये परीक्षा विभागाचे रजिस्टार इ विविध नोकऱ्या त्यांनी केल्या. १९३७ मध्ये ते ग्वाल्हेर संस्थानाचे राजकवी झाले. त्यांना आधुनिक गीतकाव्याचे प्रवर्तक मानले जाते. भा. रा. तांबे हे मराठी काव्य सृष्टीमध्ये फुललेले व रसिकतेला आपल्या हजारो नवकल्पनांच्या पाकळ्यांनी भुरळ पाडणारे विलोभलीय व सप्तरंगी कमळ होते. त्यांच्या प्रेमकविता अतिशय मनोवेधक आणि वाचकांना आकर्षूण घेणाऱ्या अशा आहेत. त्यांच्या प्रेमकवितांमध्ये जे माधुर्य, निरागसता, हळवेपणा दिसून येतो तशाच त्यांच्या मृत्यूपर गीतांमध्ये धीरगंभीरपणा, अथांगता दिसून येते. मृत्यूसारख्या खोल विषयाला आपल्या कल्पक शब्दरचनांच्या शृंखलांमध्ये बांधण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

कवी भा. रा. तांबे यांनी ज्या अनेक कविता लिहिल्या आहेत त्यामध्ये बऱ्याच कवितांमधून त्यांनी प्रेमाच्या विविध छटा आविष्कृत केलेल्या आहेत. त्यांच्या काव्यामध्ये प्रेमकाव्य हे अतिशय भाव रमणीय आहेत. आपली सर्व प्रेमगीते ही आपल्या पत्नीवरील प्रेमातून लिहिली गेली आहेत. तिच्या अनुपस्थितीमध्ये आपण प्रेमाची एक ओळही लिहू शकलो नसतो असे तांब्यांनी म्हटले आहे. कवी तांबे हे प्रेमाच्या बाबतीत जितके अंतर्मुख तितकेच किंबहुना अधिकच बहिर्मुख असल्याने त्यांच्या या कवितेतील प्रेमवर्णनात विविधता आली असल्याचे दिसते.

कवी तांबे यांच्या जवळजवळ अडीचशे कविता उपलब्ध आहेत. काव्य व संगीत एकमेकांस पूरक आहेत, असे ते मानत. गायनातील नोटेशन्सचा त्यांनी अभ्यास केला होता. आपल्या कवितांना ते 'साँग' म्हणत. खंडकाव्य, स्फुटकाव्य, लेखन, भाषणे, अभिप्राय, प्रस्तावना, नाटक अशी त्यांची विपुल आणि विविधांगी साहित्यसंपदा आहे. त्यांनी कविता कोठे लिहिली व कोणत्या काळात लिहिली याचे संदर्भ त्यांच्या पुस्तकांतून मिळतात. म्हणजे— 'मधुघट' (लष्करे ग्वाल्हेर,१९३३ ), 'डोळे हे जुलमी गडे' (देवास, १८९१), 'तिन्ही सांजा' (इंदूर, १९२०), 'ते दूध तुझ्या त्या घटातले' (प्रतापगढ, १९२०, 'रुद्रास आवाहन' (इंदूर, १९२०), 'निजल्या तान्ह्यावरी' (अजमेर, १९२१), 'कळा ज्या लागल्या जीवा' (अजमेर, १९२२) अशी माहिती उपलब्ध आहे. त्यांची कविता सुरांसकट जन्माला येते. संगीताचा प्रभाव त्यांच्यावर जाणवतो. उदा. 'नाद जसा वेणूत..', 'दिसशील तू भैरवी रागिणी..', 'ताना या परि पावल्या..', 'संसार सतारीवरी वारा..'. तांबे यांच्या काव्यावरून, काव्याच्या आधारे सिद्ध होणाऱ्या जातींना माधवराव पटवर्धन यांनी नावे दिली. 'सुखराशी', 'मदन रंग', 'प्रीतिखोल', 'नववधू', 'महाकाली', 'शुभवदना', 'कुसुमबाण', 'वीरभद्र' ही ती नावे. तांबे यांच्या काव्याबद्दल रा. श्री. जोग यांनी म्हटले आहे— 'वर्णन करताना तपशिलाचा भरणा करण्याचे तांबे यांना जणू व्यसनच होते.'

## भा.रा. तांबे यांच्या प्रेमकविता

''एका सखीच्या ह्रदयी पुर्णत: लाभे मज संसारी'' ही राजकवी तांबे यांच्या प्रेमकाव्याची मध्यवर्ती कल्पना आहे किंवा असे म्हणता येईल की, याच एकमेव कल्पनेच्या आधारे त्यांनी आपल्या प्रेमकाव्याची प्रेरणा घेतलेली आहे. केवळ या एकमेव सखीमुळे पुर्णत्व प्राप्त झाल्याने कवी म्हणतो, 'कशास वणवण करू वृथा मी, हिंडूनी दारोदारी' सखीच्या सहवासापुढे सर्व काही व्यर्थ वाटते. राजकवी भा. रा. तांबे यांनी जी काव्ये लिहिली आहेत. त्यात प्रणयरंग अधिक आलेला दिसतो. त्यांच्या काव्याची प्रमुख कल्पना ही आत्मवृत्ती आणि प्रेमसाफल्यातून

निर्माण झाली आहे. या संसारामध्ये प्रियेच्या पूर्ण प्रेमाचा लाभ झालेला असल्यामुळे अन्य संपदेला कशाला महत्त्व द्यावे. यामधून प्रेमाचा रंग पूर्णत्वाप्रद पोहोचला आहे. त्यांच्या कवितांमधून नैराश्य, वैफल्य कुठेच आढळत नाही.

कवीचे मन पत्नीप्रेमामध्ये आकंठ, तृप्त झालेले आहे. त्याचमुळे कदाचित त्यांच्या अंत:करणात स्त्री बद्दल आदर, सन्मान, भक्ती, करूणा इ. भावना रूजलेल्या आहेत. त्या सर्व त्यांच्या काव्यातून प्रकट झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रेमकाव्याला अश्लिलतेपासून दूर ठेवलेले आहे. या प्रेमगीतांमध्ये स्त्रीसौंदर्याचे वर्णनही दिसते, प्रेमाची आसक्ती, मिलनाची इच्छा, परिपूर्ती हे सर्व भाव जागोजागी दिसतात परंतु कोठेही भावनांनी मर्यादा सोडलेली दिसत नाही आणि म्हणूनच त्यांची भावना तृप्त आहे. ''अगाध दुर्मिळ जगी दिसे, मजकाही तुझ्या लोचनी'' या विश्वामध्ये मिळण्यास कठीण जे काही असेल ते सर्व मला तुझ्या डोळ्यात मिळालेले आहे. पुढे जाऊन ते असे म्हणतात, ''मिळे हे नयना नयन जरी, नयनमोहिनी मनी उसळती लहरींवर लहरी'' डोळ्यांचे आकर्षण व्यक्त करताना त्यामधून अंत:करणात प्रेमाच्या लहरी कशा उसळतात याचे चित्र केवळ दोन ओळींतून कवी तांबे यांनी रेखाटलेले आहे.

संसारातील स्त्रीचे स्थान कवी भा. रा. तांबे यांच्या कवितेमध्ये श्रेष्ठ असलेले दिसून येते. त्यामुळे स्त्रीत्वाचा अपमान ते सहज करू शकत नाही. ''संसार सतारीवर तारा, तुम्हीही मदन वाजविणारा'' ही आंतरिक ओळ ते व्यक्त करतात. तिला कोणी सावळे म्हणून हिणवलेले त्यांना आवडत नाही. त्या लोकांची ते कीव करतात आणि म्हणतात, ''जन म्हणती सावळी तुज सगळे, करूणार्ह बिचारे आंधळे'' जे लोक त्यांच्या पत्नीला सावळी असल्याने तुच्छ लेखतात त्यांची दृष्टी 'मळे खरे' आहे असे त्यांना वाटते आणि म्हणून त्यांच्या दृष्टीला माझ्या निलकमलेचे सौंदर्य कसे आढळणार असा सवाल ते करतात. ''अगाध सुंदर यमुना काठी, वेडा झाला तो वनमाळी' म्हणूनच माझी प्रिय सखी सावळी असली तरीही मला फार प्रिय आहे. तिच्याबद्दल त्यांना नुसतच प्रेम वाटते असे नाही तर तिचा त्यांना अभिमानही वाटत असल्याचे कवी सांगतात. ते तिचा उल्लेख एक अपूर्व शक्ती म्हणून करतात.

> 'ही अपूर्व शक्ती सगुण,
> झाडीत असे मम अंगण',
> 'हे माझे भाग्य बघून
> जळफळतील देवते'

स्वर्गाच्या देवांनाही मत्सर वाटावा असे प्रेमसाफल्य कवीला भूलोकी प्राप्त झालेले आहे.

ही चैतन्यशक्ती जर आपल्या जीवनात नसेल तर आपले जीवन एकाकी होईल. आपणास आपल्या सखीचा अभाव हा सतत जाणवत राहील. 'वेणूत नाद सम नित्य सखे, अशी तू माझ्या जीवनी विहरत असे' ज्याप्रमाणे बासरी आणि तिचा नाद यांचा एकोपा असतो त्याचप्रमाणे तू माझ्या जीवनात सामावलेली आहेस. 'रस जसा भरे जीवसा मधूर कवणात, त्यावरी विहरसी सखे सदा हृदयात' ज्याप्रमाणे काव्यामध्ये रस भरून राहतो, रसाशिवाय काव्य अचेतन असते. त्याचप्रमाणे कवीची प्रिय सखी सदैव त्यांच्या अंत:करणात निवास करते. ते पुन्हा पुन्हा तिला विनवणी करतात की, तू कुठेही जाऊ नकोस. अतिशय आर्त सवरांनी ते तिला बोलावतात. तू आलीस तरच माझे घर सजणार आहे. तुझ्यामुळे माझ्या जीवनाला , घराला, सर्वत्र शोभा येणार आहे. तुझ्याशिवाय कशातही रमणीयता वाटत नाही.

> 'विशाल माझे मंदीर अभिनव,
> गजांत लक्ष्मी अपार वैभव,
> जो न रूणझुणे तव कंकणरव
> करविहीन जणू कंकण वलये'

भा. रा. तांबे यांनी स्त्री हृदयाच्या प्रेमछटांचे आविष्करण इतके सुंदर रेखाटले आहे की जणू कुंचल्याच्या चार फटकाऱ्यात कुशल चित्रकाराने सुंदर चित्र काढावे. याचप्रमाणे भा.रा. तांबे यांच्या भक्तीभावनेच्या कविताही प्रेमरसात बुडलेल्या असतात. त्यांनी एकठिकाणी आपले मत व्यक्त केले आहे 'भक्तीची उत्कटता, एकतानता, मोहिनी ही लक्षणे अगदी अंधुक जरी येथे उमटू शकतील अशी एकच भावना मला दिसते आणि ती म्हणजे प्रेमाची ओढ हीच भावना होय. म्हणून भक्तीरसपूर्ण काव्यातही प्रेमाचा रंग उसळलेला दिसतो.

## राजकवी तांबे यांची महाप्रस्थान कविता

मृत्यू या शब्दाबद्दल त्यांना पहिल्यापासून कसले तरी सुप्त आकर्षण होते. मृत्यूविषयी आतुरता, असहायता, निराशा, वात्सल्य, भय, साशंकता, अनामिक खिन्नता अशा विविध भावनांची चित्रे शब्दकुचल्याने रंगवित तांबे मृत्यूच्या स्वागतासाठी स्वत:ला तयार करत गेलेले दिसतात. मृत्यूविषयीच्या त्यांच्या कविता इतक्या करूण सुंदर आहेत की प्रत्यक्ष मृत्यूलाही पाझर फुटावा. मृत्यू म्हणजे परमेश्वर भेटीचे एक माध्यम असल्याचे त्यांनी मानले. आजचा दिवस हा आपल्या आयुष्यातला शेवटचा दिवस आहे असे समजून स्वत:चा आणि इतरांचा प्रवास सुखकर कसा होईल या साठी आपण प्रयत्न करावा असे त्यांनी मानले.

काव्य हे जीवनावर केलेली टिका आहे. या सत्याचा अनुभव तांब्यांच्या महाप्रस्थान गीतांतून येतो.

''घन तमी शुक्र बघ राज्य करी
रे खिन्न मना बघ जरा तरी
फुल गळे, फळ गोड जाहले,
बीज नुरे  डौलात तरू डुले
तेल जळे बघ ज्योत पाजळे
का मरणी अमरता ही न खरी''

या विश्वचालयाच्या विश्वामधील उदात्तता काव्यामध्ये उभी करते वेळी पल्याड नेत्र लागलेल्या कवीला मृत्यूचे जे भव्य दिव्य स्वरूप दिसते. ते या महाप्रस्थानपर कवितेतमध्ये दिसून येते. इहलोकी असताना परलोकीची लागलेली आस, परलोकी जाताना जीवाची होणारी तगमग, हे जग सोडताना मनाची होणारी तळमळ, तरीही परलोकी जाण्याचे आकर्षण या साऱ्या भावनांचे रंग आणि त्यातील सुक्ष्मातिसुक्ष्म रंगछटा या महाप्रस्थान गीतांमधून रंगविलेल्या आहेत. या कवीने मृत्यूचे इतके मोहक आणि आकर्षक रूप आपल्या समोर उभे केले आहे की त्यामधून मरणाचे पावित्र्य, मांगल्य आणि अतिशय रमणीय रूप आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. या काव्यामध्ये अतिशय सुंदर भाव तरंग उमटलेले आहेत.

'चल जीवा चालणे आले
का उगा बघशी माघारी'

असे म्हणून जात्या जीवाला पुढील मार्गावर जाण्यासाठी धीर दिलेला आहे. तुझ्या सोबतीला जगाचा राणा आहे, तुला भयभीत होण्याचे कारण नाही असे ते म्हणतात. तू धीर धरला पाहिजे, आणि कुठलिही भीती न बाळगता पुढे निघाले पाहिजेस कारण प्रसंग फार तातडीचा आहे. इथला सगळा सहवास सोडायची इच्छा होत नाही हे खरे असले तरी या नव्या जगाची ओळख करून घेतली पाहिजे. तू जाण्यामुळे या जगाचे काहीही अडणार नाही आहे. किंबहुना काही काळाने या जगाला तुझा विसर पडेल आणि ते आपल्या दैनंदिन कार्यामध्ये रंगून जातील. 'मी जाता राहिल काय काय?' हा प्रश्न कवीला पडलेला आहे.

मृत्यूबद्दल एवढ्या प्रेमाने कविता लिहीणारे तांबेच असतील. अतिशय हळव्या आणि तितक्याच आर्त अशा या कविता आहेत. वाचकांना मरणाची ओढ लागावी एवढी ताकत त्या कवितांमध्ये आहे.

कळा ज्या लागल्या जीवा मला की ईश्वर ठाव्या
कुणाला काय हो त्याचे कुणाला काय सांगाव्या
नदीला पूर हा लोटे न सेतू ना कुठे नावा
भुतांची झुंज ही मागे धडाडे चौंकडे दावा

आपले सर्व सखे सोबती आपल्याला मागे टाकून पुढे निघून गेले आहेत. त्यांची हाक आपल्या कानापर्यंत येते आहे. कितीदा तरी हाक देऊन ते आपल्याला बोलावित आहेत असा कवीला भास होत आहे. त्यांनाही आपल्या सोबत्यांकडे जावेसे वाटत आहे. त्यांचे मन स्थिर नाही, काय करावे सूचत नाही. कुठेच मन लागत नाही अशी त्यांची अवस्था झाली आहे.

मधू मागशी माझ्या सख्या परी
मधुघटची रिकामे पडती घरी
ढळला ढळला दीन सखया
संध्या छाया भिवविती ह्दया

आता मधूचे नाव कासया
लागले नेत्र रे पैलतिरी

या जीवनाचा हा एक घट आहे. आणि तो वेगवेगळ्या प्रसंगानी, अनुभवांनी, भावभावनांनी भरलेला आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, हा जीवनघट क्षणाक्षणाला आणि कणाकणाने सातत्याने भरत असतो. एका क्षणी हा जीवनघट मृत्यच्या चरणी अर्पण करावा लागतो. जीवन ही केवळ अर्पण करण्याची कृती आहे. ही कृती समर्पित करतेवेळी शोक करू नये. आनंदाने हा सोहळा साजरा करावा. कारण हे जीवनाचे पूर्णत्व आहे असे कवी म्हणतात.

'कोणी आणू नका आसवे हे लोचनि,
छे! न ही शुन्यता , पूर्णता सद्‌गती'

हे विश्व म्हणजे परम्यात्म्याचे कर्तृत्व असते. त्याच्या समोर माझे अस्तित्व म्हणजे नाहीच्या बरोबर आहे. माझ्या असण्यावर किंवा नसण्यावर जगाचे काहीच अवलंबून नाही.

कवी भा. रा. तांबे यांनी निश्चितच आपल्या काव्यप्रतिभेला उद्देशून ही कविता लिहिली आहे. किंवा हे प्रेमगीत आहे म्हणा, भक्तिगीत आहे म्हणा, इतके नक्की की, मानवी जीवनातल्या सर्व जाणिवांनी आपण या कवितेकडे पाहू शकतो. म्हणून ही कविता श्रेष्ठ आहे. ही कविता अनेक पैलूंमधून प्रकट होते. कवितेतील नायिका सख्याला सांगते, 'हे मधुघट मी तुझ्यासाठी रिकामे केले आहेत. तुला आयुष्यातील सर्व दिले. तुला कमळांच्या द्रोणामधून भरभरून मध पाजला. ही माझी सेवा पाहा आणि रोष करू नकोस. माझ्यासाठी हे प्रेमाचे अंतिम टोक आहे. आता फक्त नैवेद्याची वाटीच शिल्लक आहे. माझ्या स्मृती मी माझ्यापाशीच जपेन. जो प्रेमात पडतो तो कधी तक्रार करत नाही. देवालासुद्धा आपण लडिवाळपणे मागणे मागतो. पण सख्या तू आता काही मागू नकोस. आता मी हरीभेटीसाठी तळमळते आहे..' हा या कवितेत स्थायिभाव आहे. द्रोण भरभरून मध दिलंय ही तक्रार नाही, तो गतस्मृतींचा झंकार आहे.

## संदर्भ सूची

१ कविवर्य भा. रा तांबे – एक चिकित्सक अभ्यास, डॉ. सौ आशा सावदेकर
२ निवडक भा. रा. तांबे – वामन देशपांडे
३ विनायक जोशी, दै. लोकसत्ता दि. १५ ऑक्टो. २०१७

❖❖❖

# शंकरराव खरात यांची कथा

प्रा. डॉ. कैलास वानखडे
प्राध्यापक, मराठी विभाग
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र (India)
इ मेल kailasswankhade@gmail.com भ्रमणध्वनी 9421792833

## गोषवारा (Abstract)

शंकरराव खरात यांनी कथालेखनासोबतच वैचारिक लेखन, कादंबरी, व्यक्तिचित्रे अश विविध प्रकारांमध्येही लेखन केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले हे लेखक आहेत. यांच्या कथांचा प्रवास पहिल्या दशकापासून सुरू झाला आणि 1990 नंतरही त्याची कथानिर्मिती सुरूच होती. बलुतेदार कोण तर महार, मांग, चांभार, कुंभार, परिट, न्हावी, सुतार, लोहार इत्यादी होत. यांच्या जीवनतील वेदनांचा हुंकार या संग्रहातील कथांमधून व्यक्त झालेला आहे. महार वगळता इतर सर्व वतनदारांची कामे ठरलेली होती पण महार हा गावाचा नोकर होता. या महार वतनदाराचे दुःख कथेचे केंद्र मानून लिहिलेली 'रामा महार' ही कथा वाचताना वाचकाच्या अंगावर काटा उभा राहतो. त्याच्या जीवनाचे विदारक चित्र हुबेहुब रेखाटले आहे. गावातील सवर्ण लोक महारांना आपला गुलामच मानतात. एकेका बलुतेदाराचे जीवनचित्र रेखाटून, त्या समाजाला कसे पिळले जाते, कसे उपेक्षित ठेवले जाते याचे चित्रण शंकरराव खरात यांच्या कथेमधून येते. शोषित असलेले हे बलुतेदार आपापल्या व्यवसायातून सुटू इच्छितात, त्यासाठी त्यांची धडपडही चाललेली असते. परंपरेच्या विराधात ते उभे राहतात, नवे नवे व्यवसाय स्वीकारतात. त्यांचे असे वागणे म्हणजे बलुतेदारी पध्दतीच्या विरूध्द एक बंडच आहे. शंकरराव खरात हे व्यवसायाने वकील असल्यामुळे भटक्या विमुक्तांची जवळीक वाढली, त्यांचे जीवन, त्यांचे प्रश्न जवळून अनुभवता आले, त्यांच्या जीवनाची होणारी ससेहोलपट शंकरराव खरात यांनी जवळून पाहिली आणि ती आपल्या कथेतून मांडली. माळरानातील, डोंगरदऱ्यातील भटक्यांच्या जीवनाला साहित्यातून मांडणारे लेखक म्हणून पहिला उल्लेख शंकरराव खरात यांचा करावा लागतो. आरादी, धिसाडी, बहुरूपी, कुडमुड्या जोशी, गोंधळी, फासे पारधी, कैकाडी, बंजारा, भामटे, होलार इत्यादी समुहांच्या जीवनावर कथा लिहिणारे पहिलेच लेखक म्हणून प्रा. अविनाश डोळस यांनी 'मराठी दलित कथा' या ग्रंथामध्ये शंकरराव खरात यांचा उल्लेख केला आहे. गावाच्या बाहेर असलेल्या अस्पृष्यांचे दुःख तर भयंकर होतेच पण ज्यांना गावही नाही 'आज इथे तर उद्या तिथे' अशा माणसांना साहित्यातून मांडणारे कथालेखक शंकरराव खरात आहेत. यांच्या कथेमुळे मराठी कथेच्या कक्षा अधिक विस्तारल्या आहेत. एखाद्या समस्येचा शोध घेताना एक संशोधक जसा शोध घेतो तशी यांची कथा शोध घेते. खरातांची कथा ही निखळ सामाजिक जाणिवेची कथा आहे. शंकरराव खरात हे मूळातच गंभीर प्रकृतीचे लेखक आहेत. भटक्यांच्या जीवनावरील कथा या जणू त्यांचा इतिहास लिहिल्यासारख्याच वाटतात. यामुळेच इरावती कर्वे यांनी त्यांच्या कथेला 'सामाजिक शास्त्राला पूरक अशी कथा आहे' असे प्रमाणितच केले होत. दलित कथेला मूल्याच्या पातळीवर नेण्यासाठी खरातांच्या कथेत मोलाचा वाटा उचलला म्हणून ते या कथेचे मूलाधार ठरतात.

## प्रस्तावना

शंकरराव खरात हे बंधुमाधव, अण्णाभाऊ साठे यांच्या समकालीन लेखक आहेत. त्यांनी सातत्याने कथालेखन केलेले आहे. शंकरराव खरात हे आंबेडकरी चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते होते. त्यांच्यावर संघटनेची मोठी जबाबदारी तर होतीच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्राच्या कार्यकारी संपादक पदीची जबाबदारीही सोपविली होती. शंकरराव खरात यांनी कथालेखनासोबतच वैचारिक लेखन, कादंबरी, व्यक्तिचित्रे अशा विविध प्रकारांमध्येही लेखन केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले

हे लेखक आहेत. यांच्या कथाचा प्रवास पहिल्या दशकापासून सुरू झाला आणि १९९० नंतरही त्याची कथानिर्मिती सुरूच होती. त्यामुळे यांच्या कथांचा अभ्यास व्यापक आहे. हे मराठी लेखक, कादंबरीकार व इतिहासकार होते. ते आंबेडकरी चळवळीतील एक प्रमुख लेखक होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून सुद्धा कार्यरत होते. खरातांचा जन्म आटपाडी येथे झाला. 'तराळ–अंतराळ' हे त्यांचे आत्मचरित्र आहे. 'मी स्वतः महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा शिष्य आहे' असे ते नेहमी म्हणत. इ.स. १९५८ ते १९६१ या काळात प्रबुद्ध भारत या नियतकालिकाचे त्यांनी संपादनही केले. इ.स. १९८४ साली जळगाव येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष होते.

'शंकराण्णा तुम्ही असाच साहित्य लेखनात जोर केला पाहिजे. आपण पुढं एकदा माडगूळलाच साहित्य संमेलन घेऊ.' असे माडगूळकर यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांच्याप्रमाणेच गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, शंकर पाटील, द.मा. मिरासदार यांच्यासोबत आचार्य प्र.के. अत्रे, शिरीष पै यांनी त्यांना लेखनासाठी उत्तेजन दिले. इ.स. १९५७ साली त्यांची नवयुग दिवाळी अंकात, वयाच्या पस्तीसाव्या वर्षी 'सत्तूची पडीक जमीन' नावाची पहिली कथा प्रकाशित झाली. त्यांनतर रामा महार, बंडा मांग अशा बलुतेदारांच्या बारा कथा त्यांनी नवयुगमध्येच लिहिल्या. इ.स. १९५७–५८ मध्ये शंकरराव खरातांची 'माणुसकीची हाक' ही महार बलुतेदारावर लिहिलेली कादंबरी गाजली. त्यामुळे ते पुढे लेखक म्हणून उदयाला आले. साहित्याच्या ओढीने त्यांनी राजकारणही सोडले.

## कथासंग्रह

शंकरराव खरात हे व्यवसायाने वकील असल्यामुळे तऱ्हेतऱ्हेचे लोक त्यांना भेटलेले आहेत. स्वतः त्यांनी दलित जीवनाचे अनुभव घेतलेले आहेत. शंकरराव खरात यांचे पुढीलप्रमाणे कथासंग्रह प्रकाशित आहेत. बारा बलुतेदार –१९५९, तडीपार –१९६१, सांगावा १९६२, टिटवीचा फेरा –१९६३, सुटका –१९६४, दौंडी –१९६५, आडगावचं पाणी –१९७०, गावशिव –१९७०, मुलाखत –१९७८, माझे नाव –१९८०, लीलाव –१९८४, जागल्या –१९८९, माझा काय दोष (देवदासींच्या कथा) –१९९६, 'स्वातंत्र्य कुणाच्या दारी'. या कथासंग्रहांच्या शिर्षकांवरूनच त्यांच्या विविधांगी समाजचिंतनाचा अंदाज येतो.

१९५९ साली 'बारा बलुतेदार' हा कथासंग्रह प्रकाशित झाला असला तरी त्यातून प्रकाशित झालेल्या कथांची बींज मात्र स्वातंत्र्यपूर्व काळातच रूजलेली आहेत. गावगाड्यातील बलुतेदारांच्या जीवनातील दु:खाचे चित्रण या कथासंग्रहामध्ये आले असावे असा शिर्षकावरूनच अंदाज येतो. हे बलुतेदार कोण तर महार, मांग, चांभार, कुंभार, परिट, न्हावी, सुतार, लोहार इत्यादी होत. यांच्या जीवनतील वेदनांचा हुंकार या संग्रहातील कथांमधून व्यक्त झालेला आहे. महार वगळता इतर सर्व वतनदारांची कामे ठरलेली होती पण महार हा गावाचा नोकर होता. या महार वतनदाराचे दु:ख कथेचे केंद्र मानून लिहिलेली 'रामा महार' ही कथा वाचताना वाचकाच्या अंगावर काटा उभा राहतो. त्याच्या जीवनाचे विदारक चित्र हुबेहुब रेखाटले आहे. गावातील सवर्ण लोक महारांना आपला गुलामच मानतात. त्याला जीव आहे, त्याला कुटुंब आहे, त्याला समस्या आहेत, दु:ख आहे याचा काहीही विचार न करता त्याला सारखे कामाला जुंपतात. रामा महाराचा मुलगा आजारी पडून मरण पावतो अशाही प्रसंगात रामाला सांगावा घेऊन जावेच लागते. किती ही जीवघेणी वेदना आहे. अशा अनेक वेदना शंकरराव खरात यांच्या कथेतून व्यक्त होतात. हे दलितांचे दु:ख कलावादी कथेने यापूर्वी कधीही व्यक्त केले नाही.

तुटपुंज्या मोबदल्यात आयुष्यभर गावाची वाटेल ती कामे करीत राबायचे, असे ज्यांचे जीवन आहे त्यांच्या जीवनाची कथा शंकरराव खरातांनी लिहिली आहे. या शोषित समाजाचे दु:ख, त्यांची लाचारी, दैन्य याचे चित्र रेखाटले आहे. ,का अर्थाने या कथा म्हणजे दलित समाजातील ,केक व्यक्तिचित्र आहे. ,केका बलुतेदाराचे जीवनचित्र रेखाटून, त्या समाजाला कसे पिळले जाते, कसे उपेक्षित ठेवले जाते याचे चित्रण शंकरराव खरात यांच्या कथेमधून येते. शोषित असलेले हे बलुतेदार आपापल्या व्यवसायातून सुटू इच्छितात, त्यासाठी त्यांची धडपडही चाललेली असते. परंपरेच्या विराधात ते उभे राहतात, नवे नवे व्यवसाय स्वीकारतात. त्यांचे असे वागणे म्हणजे बलुतेदारी पध्दतीच्या विरूध्द ,क बंडच आहे. 'बारा बलुतेदार' या संग्रहातील कथा ग्रामीण भागातील दलित जीवनावर, प्रथांवर प्रकाश टाकतात, त्या प्रथांचा निषेध करतात, तो त्यांचा विद्रोहच मानला पाहिजे.

बारा बलुतेदारांनंतर शंकरराव खरात यांनी कोर्टाच्या कथा लिहिल्या. ह्या कथा 'नवयुग'मधून प्रकाशितही झाल्या होत्या. बहुजन समाजातील जनतेची होणारी पिळवणूक आणि त्यातून निर्माण होणारी गुन्हेगारीची समस्या या प्रश्नाला केंद्र मानून शंकरराव खरात यांनी कथा लिहिली आहे. या माणसांचे दु:ख, त्यांच्या वेदना शंकरराव खरात

यांनी कथेव्दारे मांडल्या आहेत. हे व्यक्ती समाजाचे त्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात. त्याचे दु:ख, वेदना या ,का व्यक्तिीच्या नसून त्या समुहाच्या होतात. शंकरराव खरात हे व्यवसायाने वकील असल्यामुळे भटक्या विमुक्तांची जवळीक वाढली, त्यांचे जीवन, त्यांचे प्रश्न जवळून अनुभवता आले, त्यांच्या जीवनाची होणारी ससेहोलपट शंकरराव खरात यांनी जवळून पाहिली आणि ती आपल्या कथेतून मांडली. माळरानातील, डोंगरदऱ्यातील भटक्यांच्या जीवनाला साहित्यातून मांडणारे लेखक म्हणून पहिला उल्लेख शंकरराव खरात यांचा करावा लागतो.

शंकरराव खरात हे भटक्यांच्या वसतीमध्ये, तांड्यामध्ये, डोंगरदऱ्यांमध्ये स्वत: फिरले. ,कीकडे समाजाने केलेली कोंडी आणि दुसरीकडे सरकारने केलेली कोंडी यामध्ये सापडलेल्या समाजाचे दु:ख शंकरराव खरात यांच्या कथेमधून व्यक्त झाले आहे. आरादी, धिसाडी, बहुरूपी, कुडमुड्या जोशी, गोंधळी, फासे पारधी, कैकाडी, बंजारा, भामटे, होलार इत्यादी समुहांच्या जीवनावर कथा लिहिणारे पहिलेच लेखक म्हणून प्रा. अविनाश डोळस यांनी 'मराठी दलित कथा' या ग्रंथामध्ये शंकरराव खरात यांचा उल्लेख केला आहे. गावाच्या बाहेर असलेल्या अस्पृश्यांचे दु:ख तर भयंकर होतेच पण ज्यांना गावही नाही 'आज इथे तर उद्या तिथे' अशा माणसांना साहित्यातून मांडणारे कथालेखक शंकरराव खरात आहेत. यांच्या कथेमुळे मराठी कथेच्या कक्षा अधिक विस्तारल्या आहेत.

शंकरराव खरात यांनी आपल्या समकालीन लेखकांपेक्षा वेगळी कथा लिहिली आहे. शंकरराव खरात यांची जाणीव आंबेडकरी विचसरधारेची आहे. परंपरेमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे ते चित्रण करतात. पारंपरिकतेमध्ये माणसाची होणारी जीवघेणी कोंडी ते नव्या जाणिवेतून मांडतात. 'तडीपार', 'सांगावा', 'टिटवीचा फेरा', 'सुटका', 'गावशिव', 'दौंडी' असे अनेक कथासंग्रह शंकरराव खरात यांनी निर्माण केले आहेत. उपेक्षितांच्या दु:खाचा डोंगर म्हणजे त्यांची कथा होय. त्यांची कथा सजण्या—नटण्यामध्ये अडकत नाही. सहज—सरळ—थेट निर्माण होत. त्यातील व्यक्ती वाचकाला प्रभावित तर करतातच सोबत अंतर्मखही करतात. वाचकाच्या काळजाला पीळ पाडणारे चित्रण शंकरराव खरात यांच्या कथेतून येते.

समाजिक जाणिवेच्या अंगाने लिहिलेल्या या कथा भटक्या—विमुक्तांचे विश्व घेऊन मराठी साहित्यामध्ये नव्याने दाखल झाल्या आहेत. शंकरराव खरात हे कथालेखकाच्या पलिकडे जाऊन ,का संशोधकाची भूमिका घेतात, असे त्यांच्या कथेतून जाणवते. ,खाद्या समस्येचा शोध घेताना ,क संशोधक जसा शोध घेतो तशी यांची कथा शोध घेते. खरातांची कथा ही निखळ सामाजिक जाणिवेची कथा आहे. शंकरराव खरात हे मूळातच गंभीर प्रकृतीचे लेखक आहेत. भटक्यांच्या जीवनावरील कथा या जणू त्यांचा इतिहास लिहिल्यासारख्याच वाटतात. यामुळेच इरावती कर्वे यांनी त्यांच्या कथेला 'सामाजिक शास्त्राला पूरक अशी कथा आहे' असे प्रमाणितच केले होत.

शंकरराव खरात यांचा १९५९ पासून कथालेखनाचा सुरू झालेला प्रवास १९९९ साली प्रकाशित झालेल्या 'स्वातंत्र्य कुणाच्या दारी' या संग्रहापर्यंत अखंड सुरू होता. शंकरराव खरात यांच्या कथेने दलित माणसाचे दु:ख अधोरेखित केले आहे. अस्पृश्यतेमुळे या समाजात ेक्यभाव नांदत नाही. सवर्ण हिंदू या दलित समाजाला सर्व बाजूंनी कसे दडपून टाकतात, त्यांचे सर्व बाजूंनी कसे शोषण करतात याचे वर्णन शंकरराव खरात यांच्या कथेतून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे जे दलित सुधारले, ज्यांचे जीवनमान बदलले त्यांचा सवर्णांनी कसा छळ केला याचेही वर्णन शंकररावांच्या कथेतून आले आहे. भटक्या जमाती, गुन्हेगार जमाती, धंदेवाल्या घटकांचे चित्रण करणारा 'तडीपार' हा कथासंग्रह यादृष्टिने महत्वाचा आहे.

## समारोप

स्वातंत्र्योत्तर काळात बदललेल्या गावखेडयातील जीवनाचे चित्रण करणारा 'आडगावचे पाणी' हा कथासंग्रह आणि आपल्या पारंपरिक कलागुणांच्या आधारावरच कशीबशी गुजरान करणारा समाज अधोरेखित करणारा 'गावशिव' हा कथासंग्रह शंकरराव खरातांच्या अनुभवविश्वाचा परिचय तर करून देतेच पण दलित कथेतील त्यांचे स्थानही निश्चित करते. शंकरराव खरात यांची कथा ही सहज व्यक्त होणारी आहे, ती पोज घेत नाही. दलित जीवनातील दु:ख, त्यांना भोगावी लागणारी यातना यांना वाचा फोडण्याची नांदीच जणूकाही शंकरराव खरात यांच्या कथांनी सुरू करून दिलेली आहे. त्यांची कथा तशी रचनेच्या दृष्टिने पारंपरिक कथेच्या वळणाने जाताना दिसते पण दलितांची वेदना मात्र तठस्थ भूमिकेतून व्यक्त करते. समाजातील जे वास्तव आहे, ते सरळसरळ कथेतून व्यक्त करतात. अनुभवाचे अस्सलपण त्यांच्या कथेत जागोजाग दिसते. दलित कथेला मूल्याच्या पातळीवर नेण्यासाठी खरातांच्या कथेत मोलाचा वाटा उचलला म्हणून ते या कथेचे मूलाधार ठरतात.

## निष्कर्ष

- भटक्यांच्या जीवनाला साहित्यातून मांडणारे पहिले लेखक म्हणून उल्लेख होतो.
- उपेक्षितांच्या दु:खाचा डोंगर म्हणजे त्यांची कथा होय.
- त्यांची कथा सजण्या—नटण्यामध्ये अडकत नाही. सहज—सरळ—थेट निर्माण होत.
- कथेतील व्यक्ती वाचकाला प्रभावित तर करतातच सोबत अंतर्मखही करतात.
- वाचकाच्या काळजाला पीळ पाडणारे चित्रण शंकरराव खरात यांच्या कथेतून येते.
- दलित कथेला मूल्याच्या पातळीवर नेण्यासाठी खरातांच्या कथेचा मोलाचा वाटा आहे.

## संदर्भग्रंथ


- खरात प्रकाश ओंकार, दलित कथा : उगम आणि विकास, कालखंड १९३३ ते १९८१
  पहिली आवृत्ती पुणे : सुगावा प्रकाशन, १९९२
- फडके भालचन्द्र, दलित—साहित्य : वेदना आणि विद्रोह
  तिसरी आवृत्ती पुणे : श्रीविद्या प्रकाशन, २०००
- पानतावणे गंगाधर, दलित कथा : समन्वय प्रकाशन


❖❖❖

# त्र्यं. वि. सरदेशमुख
# मानवी अस्तित्त्वाचा शोध घेणारा लेखक

प्रा. डॉ. विनोद राठोड
सहयोगी प्राध्यापक
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, जि. सांगली
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महाराष्ट्र (India)
इ मेल rvinod2404@gmail.com  भ्रमणध्वनी ९४२३२७२४०४

## गोषवारा

त्र्यंबक विनायक सरदेशमुख यांचे वाङ्मयीन कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी मराठी साहित्याला सर्वांगाने स्पर्श केला आहे. त्यांची प्रतिभा कादंबरी आणि समीक्षेतच रमली असली तरी त्यांनी कथा, कविता, नाटक, अनुवादित साहित्य, काही आत्मपर लेखन या स्वरूपाचेही लेखन केले आहे. त्यामुळे त्यांची साहित्यसंपदा भरघोस आणि प्रभावशाली आहे. तशीच ती वैशिट्यपूर्ण आहे. त्यांच्या समग्र साहित्याचा सूर, दु:ख, आगतिकता आणि एकाकीपण यात मिसळून गेला आहे. सामान्य माणसाच्या दु:खापेक्षा एखाद्या विचारवंताचं दु:ख अधिक खोल उत्कट असतं, याचा प्रत्यय त्यांच्या साहित्यातून येतो. जीवनाच निरिक्षण करतांना त्यांना जी शल्ये जाणवत होती त्याचं चित्रण त्यांनी साहित्यात मांडले आहे. सरदेशमुख केवळ दु:ख व्यक्त करणारे विचारवंत नव्हते तर दु:खाचं अस्तित्व समजून घेणारे आणि मानवी जीवनातील दु:खाचा स्वर शोधणारे प्रतिभावंत होते. जीवनाचा अर्थ शोधत असतांना त्यांना जे भावले, त्यांच्या मनाला सतत जाणवत गेले त्यांच प्रगटीकरण करणारे त्यांचे साहित्य आहे. या अनुषंगाने मानवी अस्तित्त्वाचा शोध घेणारा लेखक म्हणून त्यांच्या साहित्याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

## बीजशब्द

मानवी अस्तित्त्व, दु:खाचा स्वर, विचारवंताचे दु:ख, जीवनाचे प्रकटीकरण, जीवनाचे निरिक्षण, जीवनशल्ये

## विषय विवेचन

कविता, कादंबरी, नाटक, अनुवाद, समीक्षा या वाङ्मयक्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून त्र्यं.वि.सरदेशमुख यांचा मराठी साहित्य क्षेत्राला परिचय आहे. 'बखर एका राजाची' ही महत्त्वपूर्ण कादंबरी १९७२ साली प्रसिद्ध झाल्यानंतर ते एक कादंबरीकार म्हणून परिचित झाले. पण त्यापूर्वीच इ.स.१९४४ साली 'ससेमिरा' कादंबरीने त्यांनी साहित्याला सुरूवात केली होती. त्यानंतर त्यांचे कविता, कादंबरी, नाटक, अनुवाद, समीक्षा क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

त्र्यंबक विनायक सरदेशमुख यांचा जन्म २२ नोव्हेंबर १९१९ रोजी अक्कलकोट जि. सोलापूर येथे झाला. सरदेशमुख कुटुंब मुळचे अक्कलकोटचे. वडील विनायक सरदेशमुख अक्कलकोटच्या संस्थानात राजाचे खाजगी चिटणीस म्हणून काम पाहत होते. त्यामुळे संस्थानाशी सरदेशमुखांची नाळ जुळलेली होती.

सरदेशमुखांनी वयाच्या चौदा–पंधराव्या वर्षीच लिहायला सुरूवात केली होती. सुरूवातीला त्यांनी मासिकांतून बरेचसे लिखाणं केले. 'मार्च १९४० च्या ज्योत्स्ना' मध्ये 'वेडापीर', 'एप्रिल १९४१ च्या यशवंत' मध्ये 'मनपापी', 'जून १९४२ च्या समीक्षक' मध्ये 'बुरूजावरची पाखरं', 'नोव्हेंबर १९४३ च्या नवयुग' मध्ये 'स्वातंत्र्यगीत', 'नोव्हेंबर १९४३ च्या वाङ्मयशोभा' मध्ये 'विषानं माखलेले पोलाद', 'डिसेंबर १९४३ च्या ध्रुव' मध्ये 'ग्रीक बेटे', 'आक्टोंबर १९४४ च्या धनुर्धारी' मध्ये 'एकेकाचं दैन्य', नोव्हेंबर १९४५ च्या वाङ्मयशोभा' मध्ये 'येरझारा', 'नोव्हेंबर १९४६ च्या समीक्षक' मध्ये 'एक सावळी संगत', 'नोव्हेंबर १९४६ च्या वाङ्मयशोभा' मध्ये 'मनोरथाची देशान्तरे', 'दिवाळी १९४७ च्या वाङ्मयशोभा' मध्ये 'ओळखीचे रहस्य' हे ललित लेख प्रसिद्ध झाले होते. सरदेशमुखांचा स्वतंत्र कथा संग्रह प्रकाशित झाला नसला तरी सुरूवातीच्या काळात बऱ्याच मासिकातून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या. 'फेब्रुवारी १९४५ च्या धनुर्धारी' मध्ये 'सावल्यांचे स्वप्न', बेळगावच्या 'निर्झर' मासिकात सप्टेंबर १९४५ च्या अंकात 'अपरात्रीचा पाऊस', 'नोव्हेंबर १९४८ च्या वाङ्मयशोभा' मध्ये 'पामरांची दुनिया' या कथा प्रसिद्ध झाल्या होत्या. इंग्रजी साहित्याचा प्रभाव सरदेशमुखांवर असल्यामुळे काही इंग्रजी कथांचे

त्यांनी अनुवादही केले. व्हिक्टर ह्युगोच्या 'जेनी' कथेचा अनुवाद आक्टोंबर १९४० च्या वाङ्मयशोभा'त, मोपासॉ यांच्या कथेचा 'चोर लेकाचे' हा अनुवाद फेब्रुवारी १९४२ च्या वाङ्मयशोभा' मध्ये तर अल्फान्स दोदे यांच्या एका कथेचा अनुवाद 'बर्लिनचा वेढा' या नावाने जून १९४३ च्या वाङ्मयशोभा' च्या अंकातून प्रसिद्ध झाला होता. पण सरदेशमुखांचे हे सगळे उमेदीतले लिखाण असंग्रहितच राहिले.

कविता, कादंबरी, नाटक, अनुवाद, समीक्षा या वाङ्मयक्षेत्रात आपला ठसा उमटविणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून सरदेशमुखांचा मराठी साहित्यक्षेत्रात विचार करावा लागतो. त्यांचे लौकिक जीवन आणि त्यांची साहित्यनिर्मिती यांच्यात आत्मिक सलगता आहे. मानवी अस्तित्वाशी निगडित असलेली अटळ दु:खमूलता, शोकात्मता यांचा शोध हे त्यांच्या साहित्याचे अधिष्ठान आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी केवळ दु:ख व्यक्त केले नाही तर दु:खाचे अस्तित्व समजून घेऊन मानवी जीवनातील दु:खाचा स्वर त्यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. शांत आणि सौम्य स्वभावाच्या सरदेशमुखांनी अध्यात्माची उंच पातळी गाठली होती. मानवी अस्तित्त्वाचा शोध घेणारा लेखक म्हणून त्यांच्या साहित्याचा विचार करणे महत्वाचे ठरेल.

## त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे आत्मपरलेखन

सरदेशमुखांनी कविता, कादंबरी, नाटक, अनुवाद, समीक्षा या विविधांगाने साहित्यनिर्मिती केली असली तरी 'आत्मचरित्र' लिहिण्याच्या उपद्व्यापात ते पडले नाहीत. त्यांनी जे काही लिहिले त्यात त्यांचे जीवन या ना त्या प्रकारे आलेले आहे. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र आत्मचरित्र लिहिण्याचा कधी विचार केला नसावा. सरदेशमुखांनी आत्मपर जे लिखाण केले त्यामध्ये १९८६ साली 'अबकडई' च्या दिवाळी अंकासाठी चंद्रकांत खोत यांनी आठवणीपर लेख सरदेशमुखांकडून मागवून घेतला होता. म्हणून सरदेशमुखांनी 'उन्हाचे दिवस आणि सावलीच्या जागा' हा लेख लिहिला. कौटुंबिक कलहाच्या मानसिकतेत वावरत असतांना त्या विपत्काळात ज्यांनी त्यांना सुसंगती दिली त्यांचे ऋण यात व्यक्त केले आहेत. मार्च १९९४ च्या 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये 'ग्रंथांच्या सहवासात' हा आत्मपर लेख त्यांनी लिहिला. यामध्ये लेखक, साहित्यिक, विचारवंतांचा आपल्यावरील प्रभाव त्यांनी व्यक्त केला आहे. बालपणीच्या काही आठवणी 'मिरामधुरा १९९५' च्या दिवाळी अंकात 'जन्मगावचे दिवस' या नावाने लिहिल्या आहेत. 'आशय १९९८' च्या दिवाळी अंकात 'बखर उच्छाद डांगोरा—एक भूमिका' मध्ये त्यांनी या कादंबरी त्रयी लिहिण्यामागची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. 'ऋतुरंग १९९९' च्या दिवाळी अंकात 'सिनेमा एके सिनेमा' मध्ये त्यांनी आपले अनुभव मांडले आहेत. 'आशय २०००'च्या दिवाळी अंकात 'जीए च्या पत्रभेटी' मध्ये जी.ए.कुलकर्णी यांच्याविषयीच्या आठवणी सांगितल्या आहेत. 'आशय२००१' च्या दिवाळी अंकात 'शाळेचे दिवस' मध्ये गुरूचे आपल्या आयुष्यातील स्थान सांगून सरदेशमुखांनी माझ्या आईवडिलांशिवाय माझा दुसरा कोणी गुरू नसल्याचे स्पष्ट केले आहे. सरदेशमुखांचे स्वतंत्र आत्मचरित्र नसले तरी त्यांनी जे थोडेफार आत्मपर लिखाण केले आहे ते महत्वपूर्ण आहे.

## त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे कवितालेखन

१९५५ साली सरदेशमुखांचा 'उत्तररात्र' काव्यसंग्रह प्रकाशित झाला. १९९९ साली प्रसिद्ध झालेल्या 'कविता चंद्रकेतूची आणि उत्तररात्र' या काव्यसंग्रहात 'कविता चंद्रकेतूची' ही दीर्घकविता आणि ४१ लघुकविता प्रसिद्ध झाल्या. सरदेशमुखांनी 'वैशाख' या टोपण नावाने कविता लेखन केले. त्यांनी 'वैशाख' हे कविनाम का धारण केले होते याविषयी ते स्वत: म्हणतात, 'का कुणास ठाऊक, कळू लागलं तेव्हापासून वैशाख आणि आश्विन हे महिने मला फार प्रिय वाटतात. वैशाख ही संवत्सराची किशोर—यौवनावस्था.' सरदेशमुखांनी जीवनानुभवाची दाहकता जवळून अनुभवली आहे. जीवनातील निराशा, अर्थशून्यता ही कवी हृदयात रात्रीचा काळोख निर्माण करणारी आहे. काट्याचा किरिट भाळी रुतलेला असतांनाही असल्या कुदशेत सेवेची, स्नेहाची, सख्याची प्रीतीची मुसमुसणारी स्वप्ने कवी पाहतो आहे. एवढे त्रुटित, खंडित जीवन पदरी आले असल्याने त्यांनी 'मी' चा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्वत:च्या सुखदु:खांपलिकडे जाऊन व्यास, कालिदास आणि ज्ञानदेवांच्या अंगी असणाऱ्या विद्वत्तेचा प्रत्यय त्यांनी घेण्याचा प्रयत्न केला.

'उत्तररात्र' या कवितासंग्रहाला श्री.द.रा.बेंद्रे यांनी प्रस्तावना लिहिली. त्यावेळी बेंद्रे त्यांना म्हणाले, 'तुम्ही दीर्घकविता लिहायला पाहिजे. या कवितांमधून तुम्हाला जे काही म्हणायचं आहे, ते पुरेशा व्यापकतेनं येत नाहीय. काय की संकोच झाल्यासारखं वाटतं.' म्हणून सरदेशमुखांनी दीर्घकविता लिहायला घेतली. त्यांनी 'कविता चंद्रकेतूची' या दीर्घकवितेतून मानवी जीवनानुभवाची दाहकता, निराशा, परिस्थितीने नडलेल्या सामान्य माणसाचा अस्तित्त्वाच्या मूलभूत प्रश्नांशी असलेला संघर्ष, स्त्री—पुरूष संबंधातील मधुरता, सत्तेचा भ्रष्टाचार, स्वार्थाचा

भस्मासूर, सज्जनांचा छळवाद, महात्म्याची आहुती यांचे दर्शन घडविले आहे. त्यामुळे या कवितेने मानवी मनाशी आपली पाळेमुळे रोवली आहेत. सरदेशमुखांनी या कवितेद्वारे युगसीमेवर सावध असलेल्या आजच्या अशांत, मनस्वी कलासक्त तरूणांना अभिवादन केले आहे. कवितेची सुरूवात करतांना कवी, चांदणे जाळून अंधार गिळणाऱ्या एका युगाचे हे पहाटगाणे आहे अशी करतो. येथेच एका भयनाट्याचे चित्रण डोळ्यासमोर उभे राहते.

सरदेशमुखांनी जरी 'उत्तररात्र' ची सावली 'चंद्रकेतू' वर पाडली असली तरी चंद्रकेतूचा आवाका स्वतंत्र आहे. दोन्ही चे आशयसूत्र एक असल्यामुळे एकाच झाडाची ती दोन फळं आहेत. ज्यातून प्रेम, सौंदर्य, दुःख, वेदना, नियती, विसंगती, अर्थशून्यता, वासना, कारूण्य, विफलता यांचे अनेक संदर्भ अवतरतात.

## त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे कादंबरीलेखन

सरदेशमुखांनी आयुष्यातील सर्वात अधिक काळ कादंबरीलेखनात घालविला. त्यांनी 'ससेमिरा', 'बखर एका राजाची', 'उच्छाद', 'डांगोरा एका नगरीचा', या चार कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यांची संख्या मोजकीच असली तरी त्या अधिक मूल्ययुक्त आहेत. 'ससेमिरा' ही पहिली कादंबरी श्री.मनोहरपंत केळकर यांनी १९४४ साली प्रकाशित केली. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी या कादंबरीद्वारे एका प्रेमकथेला जन्माला घालून मराठी कादंबरी क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु केवळ एक प्रेमकथा चित्रित करावी एवढीच त्यांची भूमिका जाणवत नसून मनोविश्लेषण आणि प्रेम यांची सांगड घालून साकार झालेली एक छोटेखानी कादंबरी म्हणून 'ससेमिरा' लक्षात राहते.

सरदेशमुखांची 'बखर एका राजाची' ही कादंबरी १९७२ साली प्रकाशित झाली. १९७८ साली 'उच्छाद' तर १९९८ ला 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. या तिनही कादंबऱ्या 'साईखेड' नावाच्या छोट्याशा संस्थानशी निगडित आहेत. या तीन कादंबऱ्यात १९१० ते १९६० एवढा विशाल कालखंड व्यापला आहे. १९१० ते १९२२ हा 'बखर एका राजाची' या कादंबरीचा कालखंड आहे. या कादंबरीचा नायक राजा रघुवीरसिंहाच्या मनोव्यापाराचे चित्रण सरदेशमुखांनी रेखाटले आहे. 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबरीत १९२२ ते १९२९ पर्यंत राजा रघुवीरसिंहानंतर साईखेड संस्थानने भोगलेला अनुभव व्यक्त होतो. 'उच्छाद' मध्ये राजा रघुवीरसिंह यांचे खाजगी सल्लागार माधव देसाई यांचे चिरंजीव श्रीधर देसाई याची १९३० ते १९६० या काळातील जीवनजाणीव व्यक्त होत जाते. ही सरदेशमुखांची कादंबरी मालिका आहे.

'बखर एका राजाची' ही कादंबरी म्हणजे आपल्या देशातील राजघराणी कालपरवा इतिहासात विलीन झाली तसल्या राजकुळातल्या एका स्मृतीशेषाची ही कादंबरीरूप बखर आहे. राजा रघुविरसिंहाच्या जीवनाची ही बखर असली तरी ती ऐतिहासिक कादंबरी नाही. ती संभ्रांत अवस्था चित्रित करणारी आहे. यातील नायक हा उच्चकुलीन (राजा) असूनही एकाकीपण, मानवी अस्तित्त्व, मानवी दुःख, मृत्यूचे चिंतन यांनी ग्रासलेला आहे. मानवी जीवनानुभव उच्चकुलीन माणसाच्या आयुष्यालाही व्यापू शकतो हे सरदेशमुखांनी दाखवून दिले आहे.

'बखर एका राजाची' या कादंबरीत रघुवीरसिंहाची कहाणी संपल्यानंतर 'डांगोरा एका नगरीचा' मध्ये साईखेड नगरीची कहाणी सुरू होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील साईखेड या छोट्याशा संस्थानची ही कहाणी. तेथील राजवंश तर नामशेष झाला पण तेथील रयत कालवश झाली नाही. राजाच्या मृत्यूनंतर साईखेड संस्थानात जी कटकारस्थाने, भ्रष्टाचार, अनीती बोकाळली त्याने त्रस्त झालेल्या साईखेड संस्थानची ही कहाणी आहे. राजा रघुवीरसिंहाच्या मृत्यूनंतर साईखेडमध्ये सज्जन आणि सात्विक अशा प्रजाजनांना सत्तांध आणि मुजोरांचा बळी कसे ठरावे लागते याचे चित्रण लेखकाने केले आहे. लेखकाने केवळ साईखेडचे चित्रण केलेले असले तरी घटना आणि प्रसंगापरत्वे हा विषय अनादीअनंत काळापासून चालत आला आहे आणि आजही त्याचे प्रतिबिंब आजच्या समाज व्यवस्थेत पाहायला मिळत आहे. त्यामुळे कोणत्याही संवेदनशील, चिंतनशील मनाला ग्रासणारा हा विषय आहे. म्हणून ती केवळ 'साईखेडचा डांगोरा' नसून 'एका नगरीचा डांगोरा' आहे.

सरदेशमुखांनी बखर नंतर उच्छाद लिहिली आणि त्यानंतर डांगोरा ची निर्मिती केली असली तरी कथानकदृष्ट्या डांगोरा ही उच्छादचा पूर्वार्ध आहे. 'उच्छाद' मध्ये माधवराव देसाई यांचा मुलगा श्रीधर देसाई याच्या मानसिक विरेचनाचा आलेख आहे. त्याच्या भावविश्वात ज्या घटना घडत जातात, त्यामधून तो जीवनाला कसा सामोरा जातो, याची गुंफण सरदेशमुखांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केली आहे. बखर आणि डांगोरापेक्षा 'उच्छाद' चा काळ आधुनिक आहे. स्वातंत्र्यचळवळीच्या आसपासचा. त्यामुळे राजकीय–सामाजिक जीवनात घडणाऱ्या बदलांचे पडसाद 'उच्छाद'मध्ये आले आहेत. 'बखर...' मधील राजा रघुवीरसिंह आणि 'उच्छाद' मधील श्रीधर दोघांनाही आत्मक्लेश चुकलेले नाहीत. दोघांची वैयक्तिक मुस्कटदाबी समान आहे. मात्र रघुवीरसिंहाला काही

मर्यादा असल्याने तो आत्मनाशाचा मार्ग स्वीकारतो तर श्रीधर आत्मनाशाचा विचार करत करत मुलाचे बोट धरून जीवनक्रमाला सामोरा जातो. अर्थात रघुवीरसिंह आणि श्रीधर एकाच जीवनसंघर्षाचे वाटसरू आहेत याची सतत जाणीव होत जाते.

## त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे नाट्यलेखन

कादंबरीकार म्हणून महत्त्वपूर्ण यश संपादन करणाऱ्या सरदेशमुखांनी नाटक हा वाङ्मयप्रकारही हाताळला आहे. १९८२ साली सरदेशमुखांनी 'बखर' चे स्वतःच नाट्यरूपांतर केले. ते 'टाहो' या नावाने प्रसिद्ध झाले. १९८६ साली 'थैमान' हे दुसरे नाटक प्रकाशित झाले. त्यांनी दोनच नाटके लिहिली. 'टाहो'चे कथानक मांडत असतांना सरदेशमुखांनी एक गोष्ट गृहीत धरलेली जाणवते. ती म्हणजे 'बखर एका राजाची' ही कादंबरी सर्वांनी वाचली असावी. कारण कादंबरीतील अनेक घटनांचे केवळ उल्लेख या नाटकात येतात. सरदेशमुखांनी कादंबरीतील सर्व घटना नाटकामध्ये आणण्याचा प्रयत्न केला असला तरी कादंबरीचा कालखंड १९१० ते १९२२ असा आहे. नाटकाचा कालावधी १९२० ते १९२२ च्या सुमाराचा सव्वा वर्षाहून अधिक नाही. त्यामुळे काटछाटीचा नाटकाच्या तीव्रतेवर बराच परिणाम झाला आहे. नाटकाला एकात्म बंदिस्त रुप देण्याच्या प्रयत्नात कादंबरीतील बरेच काही हरवले आहे. कादंबरी व नाटक यांच्यातील वैधर्म्यामुळे कादंबरीतील काव्यात्मकता नाटकात अवतरली नाही. कादंबरीतील व्यक्तिरेखा मनोविश्लेषणातून, घटना–प्रसंग आणि लेखकाच्या निवेदनातून साकार झाल्या आहेत. त्यामुळे व्यक्तिरेखाटनास भरपूर वाव मिळाला आहे. मात्र नाटकामध्ये निवडक घटना–प्रसंग, संवाद आणि स्वगतांमधूनच त्या साकार होत असल्याने त्या ढोबळ रुप धारण करतात. 'एक संवेदनशील व्यक्ती, एक सत्ताधीश, आणि ब्रिटिश साम्राज्याचा एक अंकित अशा अनेक स्तरांवर जगण्याचे दैव रघुवीरसिंहाच्या वाट्याला आलेले आहे. त्याला तोंड देत देत त्याची जीवनरीत कोणती मजल गाठते याचा आलेख सरदेशमुखांनी उभारला आहे. 'व्यक्तींचे स्वभाव, त्यांची परस्परांशी संयुक्तता व तिच्यातून निर्माण होणाऱ्या ताण–संघर्षाच्या छाया रसिकांपर्यंत पोचवण्यात या नाटकाचे इतिकर्तव्य साठून यावे.' अशी अपेक्षा सरदेशमुखांनी व्यक्त केली आहे.

'थैमान' या दोन अंकी नाटकामध्ये रस्त्यावर खेळ करणाऱ्या एका प्रतिभावान कलावंताची कैफियत सरदेशमुखांनी मांडली आहे. मानवी मनातील सुष्ट–दुष्टतेचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. व्हिक्टर ह्युगो याची 'हसणारा' ('द लाफिंग मॅन') या नावाची एक कादंबरी आहे. तिला सतराव्या शतकातील इंग्लंडची पार्श्वभूमी आहे. राजनीतीची कुटीलता आणि सामान्य जनजीवनाची छळणूक यांची एक नाट्यमय गुंफण या कादंबरीत ह्युगोने केली आहे. तिचा नायक ज्या व्यक्तिपाशी आणि ज्या परिस्थितीत लहानाचा मोठा होतो त्या व्यक्तिचा आणि परिस्थितीचा साम्यांश या नाटकाला आधार झाला आहे. ह्युगोच्या कादंबरीतील मानवी दुःखपीडा शतकाशतकातून आजही वाहत असलेली सरदेशमुखांना जाणवते. राजनीतीची कुटीलता आणि सामान्य जनजीवनाची छळणूक यांची नाट्यमय गुंफण सरदेशमुखांनी या नाटकात केली आहे.

## त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे अनुवादलेखन

१९४२ पासून १९६० पर्यंतचा सरदेशमुखांचा व्यक्तिगत जीवनातील कालखंड अतिशय विपरीत आणि विपर्यस्त परिस्थितीला तोंड देण्यात गेला. या अवधीत रवींद्रनाथ, कालिदास, व्हिक्टर ह्युगो, डॉ.सी.जी.युंग यांचे वाचन त्यांनी केले. त्यातून निर्माण झालेल्या सरदेशमुखांच्या मनोभूमिकेला रशियन तत्ववेत्ता निकोलस, बर्दिएव्ह, स्पॅनिश तत्वज्ञ मिग्युएल युनामुनो, दस्तएव्हस्की, हरमान हेसे, खलील जिब्रान, अलमेर कामू, फ्रान्झ काफ्का यांच्या चरित्र आणि साहित्यातून उभारी मिळाली.

१९२० च्या सुमारास हेसे भारतात दुसऱ्यांदा येऊन गेला. नंतर १९२२ मध्ये त्याने 'सिद्धार्थ' ही चिंतनात्मक अद्भूत कादंबरी लिहिली. १९५४ मध्ये 'इलस्ट्रेटेड वीकली'तून 'सिद्धार्थ' चा अनुवाद क्रमशः प्रसिद्ध झाला. सरदेशमुखांनी त्याचा मराठी अनुवाद केला. तो सुरूवातीला 'नदीपार' या नावाने प्रसिद्ध झाला. दुसऱ्या आवृत्तीला सरदेशमुखांनी परत 'सिद्धार्थ' हे नाव दिले. गौतमबुद्धाच्या काळात उत्पात, विध्वंस करणाऱ्या, द्वेष–हिंसेने जर्जर झालेल्या स्थितीचे मूळ कशात व तिचा निरास कशाने यांविषयीचे मनन हेसेने या कादंबरीतून केले आहे.

हरमान हेसेचे 'द जर्नी टु द ईस्ट' हे पुस्तक १९३२ साली प्रसिद्ध झाले. सरदेशमुखांनी त्याचा मराठी अनुवाद 'पूर्वेची यात्रा' या नावाने प्रकाशित केला. हेसेने आपल्या अध्यात्मसाधनेचा प्रवास एका कल्पकतेने, गांभीर्याने व अत्यंत संयमी शैलीने वर्णन केला आहे. 'एका पाश्चिमात्य श्रद्धावान साधकाचे सहस्यमय आत्मनिवेदन' असे सरदेशमुखांनी या पुस्तकाचे वर्णन केले आहे. काव्यात्म आणि रोमांचकारी एकपात्रात प्रकट

होणारे हे अध्यात्मचिंतन सरदेशमुखांच्या चित्ताला बळ देणारे ठरले. जे देश विध्वंसाला सन्मुख झाले आहेत, त्यांच्यापुढे आत्मविजयाखेरीज तरणोपाय नाही, हाच हेसेचा आक्रोश सरदेशमुखांना आंतरिक समाधान देतो.

खलील जिब्रानच्या 'द प्रॉफेट'चा सरदेशमुखांनी केलेला 'देवदूत' हा अनुवाद जिब्रानच्या अनोख्या शैलीचे स्वागत करणारा मुक्त पडसाद आहे. 'अल्नबी' ही त्याची मूळ अरबी भाषेतील संहिता होती. ती जिब्रानने पुन्हा इंग्रजी भाषेत मांडली. सरदेशमुखांनी या इंग्रजीचा मराठी अनुवाद केला. जिब्रानचा 'देवदूत' आवाहनातून आणि उपदेशातून सनातन सत्याचे आणि शिवतत्त्वाचे जागरण करतो. आध्यात्मिक साधक म्हणून जिब्रानने जे अनुभवले त्याचा अर्क 'द प्रॉफेट' मध्ये उतरला आहे. सरदेशमुख या ग्रंथाला 'वाक्सौंदर्याची ध्रुवचांदणी' असे संबोधतात. 'द प्रॉफेट' मध्ये जिब्रानने ज्या जीवनदर्शनाचे वर्णन केले आहे त्याचाच पुढचा भाग 'द गार्डन ऑफ द प्रॉफेट' (देवदूताचं विहारवन) या ग्रंथात आला आहे. 'द प्रॉफेट' चा तो उत्तरार्ध आहे. सरदेशमुखांनी त्याचा 'देवदूताचं विहारवन' या नावाने मराठी अनुवाद केला आहे. अल्मुस्तफा बारा वर्षांच्या प्रवासानंतर आपली जन्मभूमी असलेल्या बेटावर परततो. त्याच्या स्वागतासाठी आलेले त्याचे शिष्य त्याला ऑरफालीज नगरीत काढलेल्या बारा वर्षांच्या अनुभवाविषयी विचारतात. त्यातून जे विचारमंथन तो मांडतो ते म्हणजे जिब्रानचे 'द गार्डन ऑफ द प्रॉफेट' हा ग्रंथ आहे. यात जिब्रानने मानव आणि निसर्ग यांमधील संबंध सूचित केला आहे. सरदेशमुखांनी जिब्रानच्या संवाद–वचनांना मराठीत उतरवतांना आरती प्रभूंच्या गझल–गीतांची जोड दिली आहे. जिब्रानच्या 'द फोर्‌रनर' चा मराठी अनुवाद सरदेशमुखांनी 'अग्रदूत' या नावाने केला आहे. 'जिब्रानच्या दृष्टान्तकथा आणि कविता' असा त्यांचा उपमथळा आहे. यामध्ये त्याच्या अग्रदूत, देवाचा विदूषक, प्रेम, संत, समीक्षक, पंडित आणि कवी, मूल्ये, माझ्या एकांताच्या पलीकडे, शेवटला पहारा! या कथा–कविता आहेत. यातील दृष्टांतकथा आणि कविता मानवी जीवनावर काही वेगळे भाष्य करतात.

गुस्ताव यानुशच्या 'काफ्काशी संवाद' या पुस्तकातील छळवादी, जुलमी सत्तेच्या थैमानाने केलेल्या, निसर्गलोभी, शांतिप्रिय, सौंदर्योपासक अंत:करणांचा दाह आणि विद्रोह सरदेशमुखांना अत्यंत विचारप्रेरक वाटतो. यानुशने लिहिलेल्या काफ्काच्या आठवणींचा अनुवाद मराठीत करून सरदेशमुखांनी काफ्काच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वावर प्रेम करणाऱ्यांना हा अनमोल ठेवा उपलब्ध करून दिला. माणसाच्या जगात हरवून जाण्यापेक्षा स्वयंप्रेरणेने व बुद्धीने निवडलेला स्वत:चा शोध घेणारा काफ्काचा एकाकीपणा अनुभवतांना 'सत्यासाठी झगडणारा व आत्मिक चैतन्याचे रक्षण करू पाहणारा तपस्वी पुरूष' असे सरदेशमुखांनी काफ्काचे वर्णन केले आहे.

सरदेशमुखांनी अनुवाद करतांना त्या त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्वाचे पैलू शोधण्याचा प्रयत्न केला आहे. हरमान हेसे, खलील जिब्रान, फ्रान्झ काफ्का, या सर्व व्यक्ती वेगवेगळ्या वाटेने जीवन जगले असल्याने सरदेशमुखांनी त्यांचे वैयक्तिक आयुष्य, विवाह, सुखदु:ख यांचा परिचय करून दिला आहे. या प्रतिभावंतांच्या भावविश्वाचे अंतरंग सरदेशमुखांनी उलगडल्यामुळे त्या त्या साहित्यकृतींचा आस्वाद घेतांना मूळ लेखकाच्या भावभावनांशी वाचकाला समरस होता येते.

## त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे समीक्षालेखन

सरदेशमुखांनी केलेले समीक्षालेखन विपुल आहे. त्यांनी 'अंधारयात्रा(१९६८)', 'गडकऱ्यांची संसारनाटके(१९७०)', 'प्रदेश साकल्याचा(१९७९)', 'रामदास : प्रतिमा आणि प्रबोध(१९८४)', 'धुके आणि शिल्प(१९८५)', 'शारदीय चंद्रकळा(१९९२)', 'स्फटिकदिवे(२०००)', या ग्रंथांमधून स्वत:ला पडलेले साहित्यविषयक प्रश्न तपासून पाहिले आहेत. साहित्य व समीक्षा यांची निर्मिती, स्वरूप, आकलन, आस्वाद इ. संबंधाने स्वत:चे एक प्रारूप त्यांनी साकार करून पाहिले आहे. सरदेशमुखांच्या एकूण समीक्षेत कवी, कविता आणि काव्यात्म जीवनदृष्टी यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी आणि मर्ढेकर यांच्या काव्याचे परिशीलन एका चिंतनसूत्राद्वारे त्यांनी 'अंधारयात्रा' मधून घडवले आहे. या कवींच्या मनाच्या आकांक्षा, त्यांच्या भोवतीचे वास्तव यांच्यातील संघर्षाचा–विसंवादाचा काळोख प्रकाशित करणारी ही अंधारयात्रा आहे.

'गडकऱ्यांची संसारनाटके' हे सरदेशमुखांचे महत्त्वाचे समीक्षालेखन. गडकऱ्यांच्या एकूण नाटकाची वैशिष्ट्ये, त्यांचा रोमँटिसिझम, विनोद, गडकऱ्यांच्या नायक–नायिकांचा संसारपट, गडकऱ्यांची नवता हे विषय स्पष्ट केले आहेत. पुढील प्रकरणात प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, भावबंधन आणि एकच प्याला या चार नाटकांचे स्वतंत्र असे विश्लेषण आहे. गडकरी आपल्या नाटकांना संसारनाटके म्हणतात ही गोष्ट सरदेशमुखांना फार अर्थपूर्ण वाटते. गडकऱ्यांची संसारनाटके म्हणजे, जीवनविषयक जाणीव व शोकात्म संवेदन, व्यक्तिमूल अस्तित्व संवेदना, आत्मरूपाचे प्रकटन, तत्त्वगर्भता अशा गुणांचे पाझरते चंद्रकांत आहेत, असा आपल्या समीक्षेचा समारोप सरदेशमुख करतात.

सरदेशमुखांचे 'प्रदेश साकल्याचा' हे साहित्याचे तत्त्व व तत्त्वज्ञान यासंबंधीची सैद्धांतिक मांडणी करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. या ग्रंथातील लेखांमधून सरदेशमुखांनी समाज, संस्कृती, धर्म, इतिहास, तत्त्वज्ञान, अध्यात्म, परिवर्तन, आंदोलन याविषयीचे जे तत्त्वप्रतिपादन केले आहे ते एक वैचारिक ब्रह्मांड आहे. सरदेशमुखांनी 'रामदास : प्रतिमा आणि प्रबोध' या ग्रंथातून रामदासांना वास्तव, वस्तुनिष्ठ स्वरूपात पुन:प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. रामदासांची प्रतिमा विकृत स्वरूपात प्रतिष्ठित झालेली आहे. त्याची कारणे सरदेशमुखांनी ऐतिहासिक परिस्थिती आणि राजवाड्यांसारख्यांच्या एकांगी व हटवादी भूमिकेत शोधण्याचा प्रयत्न केला आहे. रामदासांनी 'दासबोधा'व्यतिरिक्त खूप लिहिले आहे. अभंगगाथा, मनाचे श्लोक, करूणाष्टके, आनंदवनभुवन, स्फुट कविता आणि वैचारिक निबंधरूप प्रकरणे यामधून रामदासांचे अंतरंग, त्यातील समस्या, खळबळी, हताशा, उद्वेग, चिंता, प्रेम, आनंद आणि अनेक अद्भूत बुद्धितरंग व्यक्त झालेले दिसतात. रामदासांची कवी आणि द्रष्टा म्हणून जी वरेण्यता ती इथेच स्पष्ट होईल असे सरदेशमुखांना वाटते. त्यातून रामदासांचा जीवनाशय व त्यांचे व्यक्तिमत्त्व यांचे विविध पैलू त्यांनी या ग्रंथात उलगडून दाखवले आहेत.

'धुके आणि शिल्प' या ग्रंथात गडकरी, नारायण सुर्वे, विद्याधर वैद्य, ग्रेस यांच्यातील कवित्वाचे लेख आहेत. त्याचप्रमाणे दलित कवितेचा मागोवा घेतलेला आहे. गडकऱ्यांच्या साहित्याच्या प्रभावाचे अधिष्ठान कशात आहे हे शोधण्याचा प्रयत्न सरदेशमुखांनी या ग्रंथात केला आहे. मर्ढेकर आपल्या हयातीत ज्या अंधाराचा, भयाचा आणि विफलतेचा प्रत्यय देण्यासाठी झुंजले, त्या अंधाराचा आणि विफलतेचा प्रतिसाद सरदेशमुखांना नारायण सुर्वेंच्या रूपात जाणवतो. विद्याधर वैद्यची विस्कटलेल्या, एकाकी झालेल्या, उदास आणि भग्न मनाची तरूण कविता विलक्षण अशा भेदक प्रतिमांनी भारावलेली सरदेशमुखांना जाणवते. ज्याची छबी काढता येत नाही आणि ज्याचा नकाशा रेखता येत नाही त्या निराकाराचा प्रदेश हा ग्रेस यांचा भावप्रदेश सरदेशमुख आखतात. प्रेम आणि विरह, मरण आणि उद्विग्नता, अमरता आणि अनंतता यांचे जागे विचारमंथन आणि उत्कट भावानुसरण एमिली डिकिन्सन या इंग्रजी कवयित्रीच्या कवितेत सरदेशमुख शोधतात.

'शारदीय चंद्रकळा' या समीक्षा ग्रंथातील नऊ लेखांपैकी पहिला लेख हा तत्त्वचिंतनपर असून उर्वरित आठ लेखांचे विषय देशी–विदेशी प्रतिभावंतांवरील आहेत. साहित्याचे थोरपण आणि समीक्षेची सफलता यासंबंधीचे केलेले विचारचिंतन 'स्व–रूप आणि साहित्य' या लेखात दिल्याचे, तर साहित्यक्षेत्रातील आठ दिग्गजांवरील लेखन हे त्यांच्या वाग्वैभवाचे आपले परिशीलन असल्याचे सरदेशमुख प्रास्ताविकात नमूद करतात. त्यात द.रा.बेंद्रे, जी.ए. कुलकर्णी, शरश्चंद्र मुक्तिबोध, कुसुमाग्रज या एतद्देशीय आणि व्हिक्टर ह्युगो, हरमान हेसे, बर्टोल्ट ब्रेख्त, युजीन आयनेस्को या विदेशस्थ प्रतिभावंतावर लिहिले आहे. समग्र साहित्याचे रूप शब्दांकित करणारे हे लेख नसून त्या त्या दिग्गजांच्या प्रतिभेचे, विशेषत: गुणविवेचनाच्या अंगाने केलेले हे लेखन आहे. सरदेशमुखांच्या प्रगल्भ, मनस्वी व सर्जनशील मनाने शारदीय चंद्रकळेत रमून केलेले हे आत्मचिंतन आहे.

'स्फटिकदिवे' हे सरदेशमुखांचे अलीकडचे समीक्षालेखन. या लेखसंग्रहातील 'साहित्याचे प्राणपंख' हा लेख 'शारदीय चंद्रकळा' मधील 'स्वरूप आणि साहित्य' चा उत्तरार्ध आहे. तर पुढील लेखात म.गांधी, जे. कृष्णमूर्ती, खलील जिब्रान, मर्ढेकर आणि बाबा महाराज आर्वीकर या पाच महापुरूषांवरील आहेत. त्यांच्या चरित्रातून, वागण्या–बोलण्यातून सरदेशमुखांना ते श्रेष्ठ प्रतीचे आत्मनिष्ठ, प्रेमधर्मी आधुनिक पुरूष वाटतात.

सरदेशमुख साहित्यातील आत्मनिष्ठेला महत्त्व देत असले किंवा लेखकाच्या चरित्राला महत्त्व देत असले तरी तथाकथित चरित्रप्रधान समीक्षा ते लिहित नाहीत. केवळ लेखकाच्या अनुभवात सुखदु:खे कशी एकरूप झाली आहेत, लेखकाने किती आणि काय कसे भोगले आहे याची वाचकाला जाणीव व्हावी एवढ्यासाठीच चरित्रज्ञानाचा वापर ते करतात. सरदेशमुखांची व्यक्तिगत आवडनिवड व व्यक्तिगत अशी तत्त्वगर्भ जीवनदृष्टी यातच त्यांची समीक्षा रमते. सिद्धांतातील अवतरणे, दृष्टांत, उदाहरणे, प्रसंग हे सरदेशमुखांच्या समीक्षेचे वैशिष्ट्य आहे.

साहित्य व समीक्षा यांची निर्मिती, स्वरूप, आकलन, आस्वाद व गुणवर्णन यासंबंधीची सरदेशमुखांची स्वतंत्र अशी भूमिका आहे. सत्याचे अनुसंधान व समग्रतेचे भान साहित्य आणि समीक्षा या दोहोंनाही थोरपण प्राप्त करून देतात, ही त्यांची तत्त्वप्रवण भूमिका आहे. साहित्यकृतीच्या व साहित्यिकांच्या आत्मप्रत्ययाचे विश्लेषण सरदेशमुख एका अंत:सूत्रात राखण्याचा प्रयत्न करतात. मानवी अस्तित्वातील अटळ दु:खमूलता, शोकात्मता हे त्यांच्या साहित्य व समीक्षेचे अंत:सूत्र आहे. या अनुषंगाने मानवी अस्तित्त्वाचा शोध घेणारा लेखक म्हणून त्यांच्या साहित्याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

❖❖❖

# कुसुमाग्रजांचा प्रेमविषयक दृष्टिकोन

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय,
मेहकर, जि. बुलडाणा ४४३३०१, महाराष्ट्र (India)
इ मेल savitapawar219@gmail.com भ्रमणध्वनी ९०११५७९०७७

## गोषवारा (Abstract)

कुसुमाग्रजांच्या 'विशाखा 'या काव्यसंग्रहातील प्रेमकविता मोजक्या परंतु वैविध्यपूर्ण आहेत. स्वप्नांची समाप्ती, आस, पृथ्वीचे प्रेमगीत, शेवटचे पान, तू उंच गडी राहासी, प्रीतीविन, प्रतीक्षा, निर्माल्य, आश्वासन या त्यांच्या प्रेमकवितांतून त्यांचा प्रेमविषयक दृष्टिकोन व्यक्त होतो. त्यांच्या प्रेमकवितेत प्रेम साफल्याची भावना दिसत नाही. काही कविता प्रेमाचे महात्म्य वर्णन करणाऱ्या आहेत.

**बीजशब्द -** कुसुमाग्रजांची प्रेमकविता

## प्रस्तावना :

कुसुमाग्रज यांची काव्यसंपदा फार मोठी आहे. विशाखा, स्वगत, किनारा, समिधा, जीवनलहरी, हिमरेषा, वादळवेळ, रसयात्रा इ. त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. नाटक, कादंबरी, कथा, लघुकथा आदी साहित्याच्या प्रांतातही त्यांचे योगदान मोठे आहे.'विशाखा' हा कुसुमाग्रजांचा अतिशय प्रसिध्द असा काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहामध्ये सामाजिक विषयावरच्या कविता आहेत, त्याचबरोबर निसर्गवर्णनपर, ऐतिहासिक संदर्भ असणाऱ्या, देशभक्तीपर, वास्तववादी दृष्टिकोन स्पष्ट करणाऱ्या तसेच आशावादी दृष्टिकोन मांडणाऱ्या कविता आहेत. कुसुमाग्रजांचा प्रेमविषयक दृष्टिकोन अभिव्यक्त होईल अशा अनेक प्रेमकविता 'विशाखा' या काव्यसंग्रहात आहेत. कुसुमाग्रजांच्या प्रेमविषयक दृष्टिकोनाचा विचार करताना,त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहातील प्रेमकवितांचाच तेवढा आधार घेण्यात आला आहे आणि त्या आधारे कुसुमाग्रजांचा प्रेमविषयक दृष्टिकोन प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मांडण्यात आला आहे.

## कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेतील कल्पकता :

कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेचे स्वरूप वैविध्यपूर्ण असे आहे. कुसुमाग्रजांच्या ठिकाणी असलेल्या कल्पकतेचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या प्रेमकवितांमधून येतो ' स्वप्नाची समाप्ती' या कवितेमध्ये 'काढ सखे, गळयातील तुझे चांदण्याचे हात' ही अतिशय सुंदर आणि रम्य कल्पना त्यांनी मांडली आहे. 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेमध्ये पृथ्वीचे सूर्यावर प्रेम आहे आणि तिच्या प्रेमभावनांचे चित्रण त्यांनी केले आहे. पृथ्वी ही सूर्याभोवती फिरते ही एक भौगोलिक घटना आहे पण त्यावर अतिशय कल्पनारम्य शब्दचित्रण त्यांनी केले आहे. युगानुयुगे ही पृथ्वी सूर्याभोवती फिरत आहे.'विझूनी आता यौवनाच्या मशाली उरी राहिले काजळी कोपरे', अशाप्रकारची आज पृथ्वीची अवस्था झाली आहे. परंतु तिचे भास्कराविषयीचे प्रेम थोडेही कमी झाले नाही. अंतरी प्रीतीची ज्योत अविश्रांत जागतीच राहणार आहे याची तिला खात्री आहे.तिने आपली निष्ठा भास्कराला वाहिली आहे आणि त्यामुळेच त्याच्या मूर्तीवाचून तिला विश्व अंधारल्यासारखे वाटते.

सुधांशू म्हणजे चंद्र पृथ्वीला मोहविण्याचा प्रयत्न करतो. त्याने सुध्दा पृथ्वीसाठी उग्र तपाचरण आरंभले आहे. युगानुयुगांपासून चंद्र हा पृथ्वीभोवती फिरतो.त्याला अनुसरून कवीने केलेली ही कल्पना आहे. पहाटे उगवणारा शुक्र हा सुध्दा तिच्याकडे आकृष्ट झाला आहे आणि मंगळ तर तिच्याकडे प्रीतीची याचना करताना लाजून लाल झाला आहे. कुसुमाग्रजांच्या कल्पकतेला या कवितेमध्ये जणू बहर आलेला दिसतो. पृथ्वीच्या प्रेमात धृवाच्या पदरी सुध्दा निराशाच आलेली आहे.धुमकेतूची अवस्था तर अगदी पिसाटासारखी झाली आहे. परंतु सूर्याच्या भव्यतेपुढे या काजव्यांचा अंगिकार करण्याची पृथ्वीची तयारी नाही.

## प्रेमपूर्तीमध्ये आडवे येणारे वास्तवाचे भान :

कवी कुसुमाग्रज जसे मानवतावादी कवी आहेत. त्याचप्रमाणे ते एक वास्तववादी कवी आहेत. त्यांची प्रेमभावना वास्तवाकडे डोळेझाक करीत नाही. त्यांचा प्रियकर आपल्या सखीला म्हणतो,

'' होते म्हणू स्वप्न एक
एक रात्र पाहिलेले
होते म्हणू वेड एक
एक रात्र राहिलेले ''[१]

प्रेमामध्ये हरवून जाणे प्रियकराला मान्य नाही. सूर्याच्या लख्ख प्रकाशात रात्रीच्या अंधारात पाहिलेली स्वप्ने विरून जातात. मनाला झालेल्या जखमा झाकून पुढच्या प्रवासाला लागणे यातच आयुष्याची सार्थकता हा प्रियकर मानतो.

'' वास्तव जगताच्या हेमन्ती
स्वप्नांचा उत्फुल्ल फुलोरा
ढाळि तळाला वादळ– वारा
रात्रीच्या त्या प्रदीप्त तारा
काचेचे कण आता गमती ''[२]

'तू उंच गडी राहसी' ही सुध्दा कुसुमाग्रजांची सुंदर प्रेमकविता आहे. या कवितेतील नायिका एक सुंदर राजकुमारी आहे. उंच प्रासादात तिचे वास्तव्य आहे. तिचा सगळा श्रीमंती थाट आहे. नायक मात्र कष्ट करून जीवन चालवणारा आहे. आपल्यासाठी तिला रूक्ष जीवन जगावे लागू नये, असे त्याला वाटते. वास्तवाचे त्याला भान आहे, त्यामुळेच रवी माथ्यावर आल्यानंतर सारी उभारी संपेल असे त्याला वाटते.

प्रेम आणि त्याग :

कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितांमध्ये त्यागाची भावना विशेषत्वाने जाणवते.ध्येयाच्या आड येणाऱ्या प्रेमाला येथे महत्व नाही. 'आपली कविता ही मुरली नाही, ती तर वार आहे याची योग्य जाणीवही त्यांना आहे. या तरवारीला कल्पकतेच्या सुंदर आणि बळकट मुठीची जोडही सुदैवाने मिळालेली आहे.त्यामुळे अनुभूतीच्या कुठल्याही प्रदेशात त्यांची प्रतिभा रणरागिणीच होईल,'[३] अशा प्रकारची आहे. प्रेमाची पूर्ती कधी होत नाही अशा प्रकारची भावना त्यांच्या अनेक कवितांमधून दिसते. 'तरीही केधवा' या कवितेमध्येही प्रेमात अंतर पडलेले दिसते. त्याची व्यथा आहे पण त्याचबरोबर जीवन हे एक वादळी रण झालेले असताना ,नाजूक भावभावनांचे लालनपालन करणे अशक्य आणि अयोग्य आहे याची जाणीव ही प्रबळ आहे.

प्रेमाचे बंधन सुध्दा कुसुमाग्रजांच्या कवितेतील नायकांना नकोसे होते. 'करि मुक्त विहंगम हा रमणी ' अशी त्याची भावना आहे. त्याला जीवनध्येय हे मोठे वाटते. त्यासाठी प्रेमाचे नाजूक बंध तोडून जाण्याची त्याची तयारी असते. मुक्तपणे आकाशात विहार करणाऱ्या त्याला प्रेमभावना ही सुध्दा पिंजऱ्यासारखी वाटायला लागते.त्याच्या भावना जाणून असणारी त्याची सखी त्याच्यासाठी त्याग करायला तयार असते.

## स्त्री–पुरुष संबंध :

कुसुमाग्रजांच्या कवितेमध्ये दिसणारे स्त्री–पुरुष संबंध समजून घेणे हे, त्यांच्या प्रेमकवितांचा विचार करताना महत्त्वाचे ठरेल. कुसुमाग्रजांच्या कवितेमध्ये दिसणारी स्त्री ही पुरुषांच्या भावना समजून घेऊन प्रसंगी त्याच्या मार्गातून बाजूला होताना दिसते. 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेतील पृथ्वी ही युगायुगापासून भास्कराच्या प्रेमात आहे पण त्याच्याकडून मात्र वंचनाच पदरी पडते. परंतु त्यातही ती कृतार्थ आहे. 'नको शुद्र शृंगार तो दुर्बळांचा, तुझी दूरता त्याहूनी साहवे' अशी तीची भावना आहे. 'शेवटचे पान' या कवितेमध्ये भेटणारी स्त्री ही सुध्दा संयमी आहे. विरहाचे दु:ख सहन करण्याची तिचीही तयारी आहे. प्रियकर आपल्यापासून दूर जात आहे, जणू आपल्या आयुष्यातील पौर्णिमेचे चांदणेच तो घेऊन जात आहे. पुढचे सारे जीवन तिला असहय वाटते, तरीसुध्दा ती त्याच्यासाठी सदिच्छा चिंतताना दिसते. 'सुखेनैव ह्रदयाचे रेशीम धागे' तुटू दे असे म्हणणारी ही स्त्री आहे. पुरुष हा ध्येयवेडा असल्यामुळे कुसुमाग्रजांच्या कवितेतील स्त्रियांच्या वाटयाला दु:ख, विरहाची वेदना आलेली दिसते. पण ते सोसण्याची तिची तयारी आहे. येथे पुरूष स्त्रीला फसवताना दिसत नाही. किंवा स्त्रीलाही तसे वाटत नाही. ती दु:ख व्यक्त करताना दिसते पण त्याचबरोबर आपल्या प्रियकराचे ध्येय त्यापेक्षा मोठे आहे याची जाणीव ती ठेवून आहे. उदात्त प्रेमाची भावना स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही जाणवते. पुरुषाच्या मनात स्त्रीविषयी सन्मानाची भावना

आहे आणि सन्मानाची वागणूकही तो तिला देताना दिसतो. दोघांमधील नातेसंबंधात उदारता दिसते. प्रेमाचे साफल्य त्यांच्या काही अपवादात्मक कवितांमधून जाणवते. 'किनाऱ्यावर'या त्यांच्या कवितेचा उल्लेख करता येईल. 'प्रीतीविण' ही त्यांची कविताही प्रेमाचे महात्म्य वर्णन करणारी आहे. 'प्रीतीस नको तख्त नको ताजमहाल, प्रीतीस हवी प्रीती, वृथा खन्त कशाला?' अशी निखळ प्रेमभावना अपवादाने त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहात जाणवते. पुरुषाचे स्त्रीवर नितांत प्रेम आहे पण त्याच्या दृष्टीने ध्येयवाद महत्वाचा आहे. स्त्रीच्या दृष्टीने मात्र प्रेमाचे साफल्य महत्वाचे आहे. पण पुरुषाच्या ध्येयवादापुढे स्त्री आपल्या प्रेमाचा त्याग करताना दिसते. कुसुमाग्रज प्रेमसाफल्याला महत्व देताना दिसत नाही.

## समारोप :

कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहात त्यांचा मानवतावादी , निसर्गवादी, आशावादी दृष्टिकोन अभिव्यक्त करणाऱ्या कविता जशा आहेत. त्याचप्रमाणे त्यांचा प्रेमविषयक दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्याही कविता आहेत. मोजक्याच असणाऱ्या या कवितांमधून त्यांची प्रेमविषयक उदात्त भावना प्रत्ययाला येते. त्यांचा प्रेमविषयक दृष्टिकोन विशुध्द स्वरूपाचा आहे. नि:स्वार्थ प्रेमभावनेचा प्रत्यय या कविता वाचकाला देतात.व्यवहाराचा स्पर्श त्यांच्या कवितेतील प्रेमभावनेला झालेला नाही. कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितांमध्ये विरहाची तळमळ आहे. आपल्या प्रियजनांकरिता त्यागाची भावना आहे. प्रेमाने ध्येयाच्या आड येवू नये अशी इच्छा त्यांच्या कवितांमध्ये अंतर्भूत दिसते आणि ही भावना प्राधान्याने त्यांच्या कवितांमध्ये दिसते.

## संदर्भ –टिपा :

१) कुसुमाग्रज, विशाखा, पुनर्मुद्रण २००८, पुणे, पृ.क्र. २५
२) तत्रैव, पृ.क्र. ३२
३) तत्रैव, अर्घ्यदान, वि.स.खांडेकर ,पृ.क्र. १८

❖❖❖

# दलित कवयित्रींच्या कवितेतील आत्मभान

डॉ. प्रेमा लेकुरवाळे
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग प्रमुख
रेणुका कॉलेज, नागपूर, महाराष्ट्र (India)
इ मेल premalekurwale@gmail.com भ्रमणध्वनी ९८५०३६२२८६

## प्रस्तावना —

१९६० नंतर ग्रामीण साहित्य चळवळ, स्त्रीवादी साहित्य चळवळ, दलित साहित्य चळवळ, प्रवाहात आलेल्या दिसतात. १९४५ नंतर बहुजन समाजापर्यंत शिक्षण जाऊन पोहोचले त्याचा परिणाम म्हणून या वर्गातील सुशिक्षित पिढी विचार करायला लागली. ग्रामीण भागातील अनेक तरुण या काळात लेखक कवी म्हणून पुढे आले. आंबेडकरी चळवळीचा अपरिहार्य परिणाम म्हणून दलित युवकांनी आपल्या अनेक पिढ्यांचे जीवनविषयक विश्लेषण साहित्यातून विशेषत: आत्मकथनातून मांडले. पुढील कालखंडात अनेक दलित लेखिकांनी आत्मकथा आणि कवितेच्या माध्यमातून स्त्री म्हणून जगताना समोर उभे राहणाऱ्या आव्हानांची मांडणी केली. १९६० नंतर स्त्रिया मोठ्या प्रमाणात लिहू लागल्या. १९७५ पर्यंत बऱ्याच स्त्रिया पुरुषांपेक्षा साहित्य निर्मिती करत होत्या.

स्त्री दशकाच्या निमित्ताने झालेली जनजागृती जगभरातल्या स्त्रियांसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. स्त्रियांमध्ये माणूसपणाची सजग भान १९७५ नंतर विशेषत्वाने जागृत झाले. आयुष्याकडे नव्या दृष्टीकोनातून बघण्याचे आत्मभान जागृत झाले त्यातूनच साहित्यविषयक जाणिवा देखील बदलत गेल्या.

स्त्री पुरुष समानतेचे मूल्य ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याकडे जाते. त्या वेळी सावित्रीबाईनी आपल्या कवितेतून सामाजिक जाणीव आत्मभान याचा सन्मान केला. ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन दलित कविता समृद्ध झालेली दिसते. आज दलित कवितेच्या निर्मितीला प्रारंभ होऊन चार दशके उलटून गेली त्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर दलित कविता लिहिली गेली. त्यामध्ये वेदना, विद्रोह, नकार व मानवतेचा पुरस्कार या कवितेने दिला.

मला पण माझे मत मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. या भूमिकेतून दलित कवयित्रींनी आपल्या कविता लिहिल्या आहेत त्यामुळे दलित स्त्रीवादी काव्य हे स्त्रीवादी काव्यापेक्षा वेगळे आहे. त्यांना झालेल्या वेदना त्यांच्यावर होणारे अत्याचार एक दलित स्त्री म्हणून समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि त्यातून जागृत झालेले आत्मभान त्यांनी वास्तव रूपात तावून सुलाखुन, परखडपणे, निर्भीडपणे मांडण्याचा प्रयत्न केला. त्या मध्ये हिरा बनसोडे यांच्या 'यशोधरा', 'फिर्याद', ज्योती लांजेवार यांची 'तू कधी दिसली नाहीस', किंवा प्रज्ञा लोखंडे यांची 'रूपकुंवर', सीमा साखरे यांच्या 'अल्बम' यांच्या कवितेतून वेगळ्या अस्तित्वाची जाणीव होते.

## ज्योती लांजेवार—

डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि त्यांनी केलेल्या लेखनाचा पगडा त्यांच्या पुरोगामी विचारावर आहे. भारतीय स्त्री बाबत केला जाणारा विचार, तिची समाजातील भूमिका, आजच्या स्त्रिया, त्यांचे सामाजिक चळवळीतील स्थान तसेच चळवळीत भाग घेणाऱ्या स्त्रियांचे संदर्भ, मिल मजदूर चळवळीचे अनुभव त्यांनी आपल्या कवितेतून मांडलेले आहे. आधुनिक काळात स्त्री मुक्त झाली आहे अशा गप्पा आपण ऐकतो पण ज्योती लांजेवार म्हणतात—महाभारत काळापासून सुरू झालेल्या स्त्रियांचे वस्त्रहरण आधुनिक काळातही वेगवेगळया मार्गाने सुरू आहे. तिथे वस्र पुरवणाऱ्या हातांनी जर वस्त्रहरण करणाऱ्यांचे हात वेळीच छाटून टाकले असते तर आधुनिक काळात स्त्रियांचे होणारे शोषण थांबले असते. पण हे वस्त्र पुरवणारे हात संस्कृतीकडे गहाण आहे. त्यामुळे स्त्रियांचे सबलीकरण होऊ घातलेल्या युगात आणि स्त्रीमुक्तीच्या युगातही दलित स्त्रियांचे भर रस्त्यावर वस्त्रहरण करून तिची विटंबना केली जात आहे हे दु:ख हा अन्याय दलित स्त्रियांच्या वाट्याला पदोपदी येत आहे तेव्हा कवयित्री म्हणते—

हर युगात तुझे वस्त्रहरण

निमित्त वेगवेगळे
वस्त्र पुरवणारे हात
संस्कृतीकडे गहाण
तुझी थोरवी स्वर्गाहुन महान।।[१]

ज्योती लांजेवार यांची स्त्रीवादी कविता प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध नुसता आक्रोश करीत नाही तर बंड करून उठते. ज्वलंत आणि वास्तवतेचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यांनी प्रथम दांभिकतेची चिरफाड केली आहे. त्यासंदर्भात त्या म्हणतात—

माझ्या डोळयापुढे सतत उभी असते
कौरवांच्या राज्यसभेत बेअब्रू होणारी पांचाली

स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दु:खाची परिणामकारकता ज्योती लांजेवार यांनी महाभारतातही कशी होती हे द्रौपदी वर झालेल्या अन्यायातून स्पष्ट केलेले आहे. त्या वेळेस श्रीकृष्णाने वस्त्र पुरवून द्रौपदीची बेअब्रू वाचवली हा इतिहास झाला. याही पलीकडे जाऊन कवयित्री श्रीकृष्णाला उद्देश करते की अंगभर वस्त्र पुरवण्यापेक्षा हे वस्त्र फेडणारे हातच का छाटून टाकत नाहीस? ही व्यवस्था दीन—दलित लाचार स्त्रियांच्या बेअब्रूची लक्तरे वेशीवर टांगत असताना दलित स्त्रियांना नग्न करून त्यांची धिंड काढीत असताना हा समाज हे शासन अशा लोकांच्या प्रवृत्तीचे होऊन नष्ट करण्यासाठी का उपाय योजित नाही? असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतात. आजही उदाहरण द्यायचे झाले तर बागबान चित्रपटामध्ये हेमामालिनी आपल्या नातीला द्रौपदीचे उदहारण देते.काळ कितीही बदलला तरी स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन अजुनही पाहिजे त्या प्रमाणात बदललेला दिसून येत नाही.

## डॉ. सीमाताई साखरे—

यांच्याबद्दल म्हणायचं तर विदर्भातील स्त्रीमुक्तीच्या उद्गात्या. स्त्रियांच्या सामाजिक न्यायाची कृतिशील चळवळ सातत्याने चालवून गरीब व सामान्य स्त्रियांसाठी आधारवड बनलेल्या आणि अन्य पुरुषांच्या मनात एक सुप्त दहशत निर्माण करण्याची ताकद बाळगणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासू स्त्रीवादी कार्यकर्ता व स्त्रीवादी कवयित्री म्हणून डॉक्टर सीमा साखरे यांची वेगळी छाप आहे.

स्त्रीमुक्ती चळवळीत घोषणांनी कडाडण्याऱ्या वाघाप्रमाणे अन्यायावर तुटून पडणाऱ्या सीमाताई या एखाद्या गूढ रसायनासारख्या आहेत. डॉक्टर सीमा साखरे त्यांची प्रत्येक कविता ही स्त्री मुक्ती चळवळीकडे घेऊन जाणारी आहे. साधी सरळ असूनही त्यांची भाषा काळजाला भिडणारी आहे. त्यांची कविता प्रत्यक्ष डोळयासमोर चित्रपटासारखी उभी राहते. त्यांच्याच कवितेतून सांगायचं तर बाईमाणूस खरंबोलेल तर संस्कृतीवर फार मोठा आघात होईल म्हणून या मनुवादी कवितेने, संस्कृतीने बाई माणसाचे तोंड बंद करून ठेवले आहे. तेव्हा सीमा साखरे म्हणतात—

''बाई खरी बोलली तर!
तर संस्कृतीचे निघतील वाभाडे
बाई खरं बोलली तर!
नात्यागोत्याचे पितळ पडेल उघडे
बाई खरं बोलली तर!
अधिकाऱ्यांचे निघतील धिंडवडे ।।[२]

स्त्रीला कसे अबोल करता येईल या करीता प्रथम तिच्या घरापासून, नातेवाईकांपासून सुरुवात होते. 'बाई' या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता ही स्त्रीच्या वेदना बोलून दाखवणारी आहे. त्या नुसत्याच वेदना नाहीतर संस्कृतीतील सत्य आणि जळजळीत वास्तव सांगणाऱ्या आहेत.

त्यांच्या 'अल्बम' या दुसऱ्या संग्रहातील स्त्री आजपर्यंत संस्कृतीने जे झाकून ठेवले ते मोकळेपणाने बोलते आहे. लैंगिक शोषणाविरुद्ध यातील स्त्रियांनी आवाज उठविला आहे. आपल्या 'अल्बम' विषयी डॉक्टर सीमा साखरे म्हणतात —

'हा दुसरा अल्बम आम स्त्रियांबद्दल बोलतो
समस्त स्त्रीजीवनाची सल उघडी करतो
त्यांचे दबलेले अंत:करण त्यांच्या शब्दात मांडतो

म्हणूनच मला चळवळीसाठी तो मौल्यवान वाटतो'[३]

'अल्बम' मधील कवितांमधून सीता, सावित्री, यशोधरा, मधुरा, थंवरी, शाहबानो, रुपकुंवर, लिलाबाई, दुर्गा, नलिनी, आनंदी, सुनिता, शाळूबाई, कांचन, मेराम, लोपामुद्रा अशा कितीतरी स्त्रियांचे दु:ख 'अल्बम' या कवितेत पहावयास मिळतात. त्यांच्या वेदना त्यांनी जश्याच्या तश्या आपल्या कवितेत चिरंतन साकार केलेल्या आहेत. त्यामुळे त्या कविता वाचत असताना हृदयद्रावक दृश्य, त्या वेदना, स्त्रियांचा आक्रोश ती दु:खे आपली होऊन जातात.

## हिरा बनसोडे

हिरा बनसोडे या मराठी कवयित्री व समाजसेविका आहेत. त्यांचे 'पौर्णिमा', 'फिर्याद', 'फिनिक्स' हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. बौद्ध स्त्री साहित्यिकांमध्ये त्यांचा विशेष उल्लेख होतो. 'अस्मितादर्श' या नियतकालिकात कविता लिहिणाऱ्यांमध्ये हिरा बनसोडे सुप्रसिद्ध आहेत.

मराठी काव्यातील दलित कवितेने मराठी कवितेला अधिक सशक्त बनविले आहे. धर्म आणि संस्कृतीच्या बुरख्याखाली परंपरांनी आखून दिलेल्या परिघातील स्वयंकोशी मशगूल, बेदरकार नि—वांझ जगणे मराठी कविता आहे त्यामुळे तिने आपल्या अवती भोवतीच उपेक्षित शोषितांचे लाचार, भणंगाचे उघड्या नागड्याचे विस्तारित जग अधोरेखित करण्याचे खुशीने टाळले. याचे प्रभावी व जिवंत चित्रण म्हणजे हिरा बनसोडे यांची कविता आहे.

देशातली स्वातंत्र्य वर्षापूर्वीची जातीयता वेगळी होती, शंभर वर्षांपूर्वीची तर त्याहूनही वेगळी होती अन आताची जातीयता वेगळी आहे, ती कधी मुखवट्याआड आहे, तर कधी कळपाआड आहे तर तिला कधीकधी आरक्षणाचा चडफडाटी सूडाचा राग आहे. कुठल्या न कुठल्या पद्धतीने आजही लोक जातीयतावाद करताना आढळतात. 'अन्यायग्रस्त समाजाची नव्याने उभारणी करायला'हवी'असे या कवयित्रीचे मत असून डॉक्टर बाबासाहेबांच्या संदेशानेच हे कार्य होणार आहे असा आशावादही त्यांची कविता व्यक्त करून सामाजिक क्रांतीची रोखठोक भूमिका घेत आहे 'सूर्योदय' या कवितेत त्या म्हणतात—

'तुमच्या डोळ्यातील वाळवंट पुसून टाका
तिथे पेरायला आणल्यात मी
नव प्रेरणांच्या गिरी बहर कळया
धुवून टाका चेहऱ्यावरला भयग्रस्त अंधार
तुमच्यासाठी मी सूर्योदय आणलेत
प्रकाशमान व्हा, प्रकाशमान व्हा'[४]

अंधाऱ्या प्रदेशात सूर्योदय घेऊन मी जात आहे. तेव्हा मला दिसणारे केविलवाणी सूर्यास्त वळणावळणावर खाली मान घालून उभे आहेत. शरणागतासारखे त्यांना त्या संदेश देतात म्हणतात, आता हे तुमच्या डोळ्यातले वाळवंट पुसून टाका व प्रकाशमान व्हा. हिरा बनसोडे यांच्या कवितेची भाषा विद्रोहाची आग आहे, नवक्रांती आह, संताप आहे व शेवटी मात्र आशावाद आहे.

कुठल्या न कुठल्या पद्धतीने आजही लोक जातीयतावाद करताना आढळतात म्हणूनच हिरा बनसोडे म्हणतात तसे याची पाळेमुळे मनात खोल रुजलेली आहेत, काहीना हे विधान सार्वजनिकरीत्या पटत नाही, पण एकांतात विचार केला तर त्यानाही नक्की यातले मर्म कळते. स्वत: जगलेले दाहक अनुभव हिराताईनी मांडलेले असल्याने अन ते अजूनही कालबाह्य झालेले नसल्याने मला ते अधिक महत्वाचे अन तितकेच क्लेशदायक वाटतात....

सखी, आज प्रथमच तु माझ्याकडे जेवायला आलीस,
नुसतीच आली नाहीस तर तुझी जात विसरून आलीस.
सहसा बायका परंपरेची विषमता विसरत नाहीत
परंतु तु आभाळाचे मन घेऊन आलीस,
माझ्या वीतभर झोपडीत,
वाटले, जातीयतेचा तु कंठच छेदला आहेस,
माणसाला दुभंगणारया दऱ्या तु जोडत आली आहेस.
खरेच सखे, फार फार आनंदले मी

तुला वाढलेल्या ताटात आज पदार्थांचा क्रम चुकला
यात माझा काय दोष, हे मला सांगशील का?
माझा काय दोष मला सांगशील का?[५]

'फिर्याद' या काव्यसंग्रहातली कवयित्री हिराताई बनसोडे यांची ही कविता. जेवायला आलेल्या सवर्ण मैत्रिणीच्या अंतरंगाचे व आपल्याच चालीरीती सर्वोत्कृष्ठ मानण्याच्या अहंकारी प्रवृत्तीवर साध्या तरल शब्दात पण अणकुचीदार असे प्रश्नचिन्ह हिराताईनी उभे केलेत.

खरे तर एक वरवर अगदी सामान्य वाटणारी एक घटना आहे ही, पण त्याला अनेक पदर आहेत. ज्याचे पुनर्विलोकन काही जाती अन् विचारधारा अजूनही करायला तयार नाहीत. एकीकडे पराकोटीचे दैन्य व दारिद्रय भोगून वंचितांच्या समाजगटाचे इतरांच्या खिजगणतीतही नसणारे काही बिंदू आपले सामाजिक, वैयक्तिक अन कौटुंबिक वर्तन जाणीवपुर्वक वेगळे करून, तथाकथित सुधारून वा अनुकरण करून जगण्याचा प्रयत्न करतात तेंव्हादेखील आसपासचे चोच्या मारूनच जातात.

## प्रज्ञा लोखंडे

नव्या जाणिवांची कसदार कविता लिहिणारी कवयित्री म्हणून प्रज्ञा लोखंडे यांना ओळखले जाते. स्त्रीवादी दलित कवयित्री म्हणून त्यांचे स्थान वरचे आहे. 'अंतस्थ' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. डॉ. बि. रा. पारसे यांनी म्हटलेले आहे. 'परंपरेचा चिरेबंदी वाड्याला हात रे ते आंबेडकरी कवितेची वादळ आले.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या कवितेचा पथदीप भवाची क्रांती दिशा दिली होती रुढीचे हे पिंजरे स्त्रीला आणि असंख्य पुरुषांनाही माणूस पणा पासून वंचित करून ठेवतात आंबेडकर वादाने प्रज्ञा लोखंडे यांच्या प्रतिमेला हे अंतस्थ भाव दिले आहेत'

आपल्यातच किती अंतस्थ रूपे
वावरत असतात
एकमेकांना अनोळखी असतात[६]

असे म्हणणारी ही कवयित्री स्त्रीमनाचे हे कप्पे नि त्यांच्या आगळ्या वेगळ्या जाणिवा शब्दातून फुलविण्याचा प्रयत्न करते

त्यांच्या कवितांतून आत्मशोधाची जाणीव शब्दाशब्दातून व्यक्त होते. आत्मशोधाची मशागत हेच तिचे शस्त्र आणि अंधाराला चूड लावणे हेच तिचे ब्रीद ठरते. अशावेळी शब्दबंबाळ भावनेच्या उन्हाळयाचे मुळ ती शोधू पाहते.

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेत एक प्रखर रोखठोकपणा आहे. स्वत:च्या भूमिकेचा अत्यंत थेट आणि स्पष्ट स्वीकार आणि उच्चार करताना त्या जराही अडखळत नाही. या संग्रहाची अर्पणपत्रिकाच या दृष्टीनं बोलकी आहे. या अर्पणपत्रिकेत त्या म्हणतात,'सुधीर, प्रियांका, रोशन आणि सुरेखा भोतमांगे तुमचा संघर्ष पुढे नेण्याच्या निर्धारासह तुमच्या स्मृतींना सविनय अर्पण.' ही अर्पणपत्रिका प्रज्ञाच्या जाणिवेचा प्रदेश कोणत्या संवेदनशीलतेनं व्यापला आहे, याचा थेट प्रत्यय देते. खैरलांजी हत्याकांडावर तिने 'धादांत खैरलांजी' नावाचं नाटकही लिहिलेलं आहे. हे हत्याकांड किती जीवघेणेपणानं त्यांच्या जाणिवेत रुतून बसलेलं आहे, याची साक्ष या अर्पणपत्रिकेतून आणि 'लव्ह इन द टाइम ऑफ खैरलांजी'सारख्या कवितांमधून मिळते.

'किती दूर आहे अजून
जातिअंताचा लढा
किती दूर आहे अजून
रांगेत
उभा असलेला शेवटचा माणूस
किती दूर आहे अजून
रांगेत उभंच नसलेलं बाईमाणूस'[७]

अशा वास्तवातल्या विपरीततेवर त्या नेमकेपणानं बोट ठेवतात. बाईचं जगणं, मरणं हे या कवितांचं केंद्रवर्ती आशयसूत्र आहे, असं म्हणता येईलच की ही कविता 'गळयात मडकं अडकवलेल्या' आणि 'मेंदूत गुलामीची रोपं रोवलेल्या' माणसाविषयी बोलते, पण ही केवळ आणि केवळ दलित जाणिवेची कविता नाही. या

कवितेचा पैस त्याहीपलीकडे माणूसपणापर्यंत पसरलेला आहे. दलितपण, बाईपण, महानगरीपण ओलांडून एका समग्र माणूसपणाची ही कविता बनते, हे या कवितेचं वेगळेपण आहे. पुरुषप्रधान व्यवस्था आणि जातिव्यवस्था या व्यवस्था म्हणून एकच आहेत, याचे भान ही कविता देते. प्रज्ञाची कविता स्त्री—पुरुष संबंधांवर निर्भीडपणे भाष्य करते. इथल्या कुटुंबव्यवस्थेनं, लग्नसंस्थेनं बाईला असं पद्धतशीरपणे शोषण करून अन्यायग्रस्त ठेवलं आहे, भोग्यवस्तू ठरवलं आहे, बाजारात बसवलं आहे, आजही जाहिराती, चित्रपट माध्यमांतून तिला वस्तू म्हणूनच पेश केलं जात आहे, तिचं दुय्यमत्व ठळक करण्याची एकही संधी समाजपुरुष सोडत नाहीये, हे सत्य या कवितांमधून व्यक्त झालं आहे.

येथील अध्यात्मवादी अभिजन संस्कृतीचे बहुजनांनी अर्थात धिंडवडे केले. बहुजनांमध्ये ही दु:खाची सल कमी व्हावी व त्यांनी स्वयंप्रकाशित व्हावे असे कवयत्रीला वाटते.त्या  म्हणतात 'तुझ्या उसाला छावण्यांना आता तरी स्वत:चा प्रकाश दे'

प्रज्ञा लोखंडे यांची कविता 'स्व' आणि 'स्वेतर' अशा दोन्ही स्तरांवरचे अनुभूतीचे क्षेत्र आपल्या कवेत घेऊ पाहते. स्वत:ला बाजूला न ठेवता अत्यंत मोकळेढाकळेपणानं उघड करत, अत्यंत पारदर्शीपणे जगण्याचा अन्वय लावण्याचा ध्यास विलक्षण वेगळा आहे.

## निष्कर्ष :

मराठी दलित कवयित्रींनी केवळ अभिजनांच्या विरोधातच विद्रूप पुकारला नाही तर एकूणच पुरुष संस्कृतीच्या विरोधात म्हणजे दलित पुरुषही स्त्रियांवर अन्याय करतात त्या संपूर्ण व्यवस्थेच्या विरोधात दलित कवयित्रींच्या कविता भाष्य करतात. त्यांच्या कवितांतून आत्मभान, आत्मविश्वास जागृत होतात.
समाजात दलित स्त्रियांवर होणारे अत्याचार, त्यांची विटंबना, सवर्णानी केलेले बलात्कार, त्यांच्या त्या करुण किंकाळयांनी काळजाला आग लागून जाते. स्त्रियांच्या व्यथा, वेदना, तरफड आणि जखमा समाजापुढे मांडल्या. भूमिकानिष्ठ लखलखत्या पात्यासारखी त्यांची कविता आहे.समाजाचा जाणिवेचा परीघ अधिकाधिक व्यापक होत गेलेला दिसतो. भोवतालाचं त्यांच आकलन आणि भान अधिकाधिक तीव्रोत्कट होत गेलेलं दिसून येते.

स्त्रीवादी मानवतावादाचा आणि जीवनानुभूतीचा एक खोल, उत्कट, अस्सल, जिवंत स्पर्श या कवयित्रींच्या कवितेतून दिसून येतो.. माणसांच्या दु:खांना निकटतेनं जाणणारी एक ओली सहृदयता त्यांच्या कवितेत जाणवते. त्या कविता जगण्याच्या कोलाहलात स्वत:ला गळयापर्यंत बुडवून, तळ शोधण्याची जिद्द बाळगणारी आहेत. प्रज्ञा आणि करुणेचा एक ओथंबलेला स्वर या कवितांच्या गाभ्यात वसलेला आहे. एकूणच आजच्या पिढीला या वास्तवतेचे दर्शन आणि विचारकरण्याची क्षमता साहस नकीच या प्रेरणाद्यायी कवयित्रींच्या  कवितेतून मिळेल. त्यांनी हातात घेतलेला निखारा साहित्यातून प्रज्वलित केलेला आहे.

## संदर्भ

१) अक्षरवैदर्भी, दलित कवयित्रींच्या कवितेच्या जाणिवा, जून २०१६. पृ. ३९—४०
२) तत्रैव पृ. ४१
३) तत्रैव पृ. ४२
४) फिर्याद, हिरा बनसोडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १जानेवारी२०१५, तिसरी आवृत्ती, पृ. १०
५) तत्रैव पृ. १४
६) दृश्यांचा ढोबळ समुद्र, प्रज्ञा दया पवार,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,
७) https://divyamarathi.bhaskar.com/news/MAG-pradnya-daya-pawar-poem-and-personality-4326102-NOR.html

❖❖❖

# महानुभावांचे पद्यवाङ्मय

प्रा. डॉ. मीना जुनघरे
शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
इ मेल mmjunghare@gmail.com   भ्रमणध्वनी ९४०५९०७९२९

## प्रस्तावना

बाराव्या शतकातील यादवकालीन समाज धार्मिक कर्मकांडामध्ये मरगळलेल्या अवस्थेत होता. अशा समाज जीवनात महानुभाव, नागपंथ, लिंगायत व वारकरी या पंथानी आपआपल्या वैशिष्ट्यांनी प्रभाव पाडायला सुरूवात केली. याच पार्श्वभूमीवर श्रीचक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना केली आणि गद्य व पद्य या दोन्ही प्रकारातुन चरित्रग्रंथ आणि धर्मग्रंथ मराठीतुन निर्माण केले. या सर्व वाङ्मय निर्मितीची प्रेरणा पंथाचे तत्वज्ञान सांगण्यसाठी करण्यात आली. कोणत्याही पंथाचे सामर्थ्य त्याच्या तत्वज्ञानावर अवलंबून असते. महानुभावांचे गद्यवाङ्मय प्रामुख्याने चारित्रात्मक आणि तत्वज्ञानपर आहे. 'लिळाचरित्र', 'श्रीगोविंद्रप्रभुचरित्र', 'स्मृतिस्थळ', 'वृध्दाचार', 'पूजावसर', 'महापुजावर्णन', 'इतिहास प्रकरण', 'चरित्रअबाब' या ग्रंथाचे मराठी वाङ्मयाला असलेले योगदान वादातीत आहे.

पद्यवाङ्मय प्रवाह 'सातीग्रंथांनी समृध्द केला. केवळ तत्वज्ञावर लेखन हे वाङ्मयप्रवाह निर्माण करू शकत नाही. तत्वज्ञानाची सांगड जेव्हा काव्यगुणांशी घातली जाते 'तत्वज्ञान' आणि 'काव्य' एकरूप होते. केवळ तेव्हाच तो काव्यप्रवाह समृध्द होतो. महानुभवानी आपले लेखन गद्यातुन केले तसेच पद्यातुनही केले आहे. सर्वच गद्यपद्यलेखन निर्मितीमागील प्रेरण विशुध्द भावभक्तीची आहे. पंचकृष्णभक्ती ही महानुभाव पंथाचे वैचारिक नियमन करणारी आहे. महदंबेचे 'धवळे' ही मराठीतील पहिली कविता कृष्णभक्तीच्या प्रेरणेतुन जन्माला आली. नरेन्दाचे 'रूक्मिणी स्वयंवर' कृष्णभक्तीचेच महात्म्य आहे. 'शिशुपाळवध', 'उध्दवगीता' दोन्ही काव्यांचे विषय कृष्णभक्तीच आहे. 'वच्छाहरण', 'ज्ञानप्रबोध' 'मुर्तिप्रकाश' ह्या सर्व ग्रंथाचे मोल अधिक आहे. संस्कृत भाषेशी समांतर असलेली ही काव्यानिर्मीती अनेक वाङ्मयीन पैलूनी श्रेष्ठ आहे.

## पद्यवाङ्मयाचे प्रमुख ग्रंथ

१) महदंबेचे ढवळे २) नरेंद्राचे रूक्मिणीस्वयंवर ३) भास्करभट्टाचे शिशुपालवध व उध्दवगीता ४) दामोदर पंडीताचे वच्छहरण ५) खंडोबासाचे सह्याद्रीवर्णन ६) नारायणव्यास रिध्दिपूरवर्णन ७) विश्वनाथव्यासाचे ज्ञानप्रबोध ८) कोशिराजाचे मूर्तीप्रकाश.  वरील सात ग्रंथांचे वर्गीकरण असे करता येते.

कृष्णचरित्रपर :  रूक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, उध्दवगीता, वच्छहरण

श्रीदतवर्णनपर:  सह्याद्रीवर्णन, रिध्दपूरवर्णन, ज्ञानप्रबोध हे सातही ग्रंथ महानुभाव पंथाच्या स्थापनेनंतर दिडशे वर्षाच्या कालखंडात निर्माण झालेले आहेत.

## १) नरेन्द्र : रूक्मिणीस्वयंवर

नरेन्द्राचे रूक्मिणीस्वयंवर अठराशे ओव्यांचे आहे. यातील शब्द सौंदर्य, अर्थसौंदर्य, व प्रतिभाचापल्य पाहून हा ग्रंथ रामदेवरायांना ते आपल्या नावावर व्हावा असे वाटले आणि त्याने तशी इच्छा व्यक्त केली त्यावर नरेंद्राने दिलेले उत्तर भारतवर्षातील सर्व कवींना भूषणावह आहे. नरेंद्र म्हणाले, "ना राजे हो: आमुचेया कवीकुळा बोलू लागैल" परंतु रामदेवरायाने ग्रंथ आपल्या नावावर करण्याचा हट्ट धरल्यामुळे मुळे हस्तलिखित त्यांना राजाला द्यावे लागले परंतु नरेन्द्राने ग्रंथ देण्यापूर्वी ज्या ८७९ ओव्या मुळ ग्रंथातुन उतरवून घेतल्या त्याच आज उपलब्ध आहे. आज उपलब्ध असलेल्या रूक्मिणीस्वयंवरात केवळ ८७९ ओव्या आहेत. या काव्यग्रंथाची रचना इ.स. १२९२मध्ये पुर्ण झाली. नरेन्द्र हे श्रीकृष्णाचे भक्त होते. त्याकाळात जनमानसावर श्रीकृष्णभक्तीचेच प्रामुख्याने अधिराज्य होते. मराठी वाङ्मयातही कृष्णभक्तीची अभिव्यक्ती झाली तर नवल नाही. श्रीकृष्णभक्ती हे अनेक कविंच्या वाङ्मयनिर्मितीचे स्फुतिस्थान होते. सर्व शास्त्रांपेक्षा कृष्णचरित्र गोड आहे अशी कृष्णाची महती नरेंद्रानी गायली आहे.

उपलब्ध रूक्मिणीस्वयंवर काव्यात संपुर्ण कथा आलेलीच नाही. नरेन्द्राच्या रूक्मिणीस्वयंवराची कथा भागवतातील दहावं स्कंध असल्याचे स्वत: कवीच सांगतो.

तो पुराणांतुल आनंद समुद्रः

तेथ दशमस्कंदु तोचि चंद्रु
ते चांदणे सांधैन म्हणे नरींद्रु
रूक्मिणी–सैवर ।।४९।।

ही कथा मुळ भागवतातून घेतली असली तरी कवीने त्यात अनेक बदल केले. कल्याणकिर्ती भाट वा किन्नर मुळ भागवतात नाही त्याचप्रमाणे रूक्मिणीला विरहावस्था प्राप्त झाल्यानंतर निर्माण केलेले शीतलोपचारगृहही भागवतात नाही. भागवतात विश्वासु ब्राम्हण म्हणून उल्लेख आहे तर नरेन्द्रांनी त्याचे सुदेव असे नामकरण केले आहे.

नरेंद्राच्या ‘रूक्मिणीस्वयंवरांत’ आलेली किन्नराची कथा आपण पद्मपुराणातुन घेतल्याचे ते सांगतात.

भागवता पासौनी पद्मपुराणी:
जै सैंवर बोलिजे रूक्मिणी
तेथ देवाते कींनरू वाखाणी:
ते सांधैल नरींद्रु ।।७५।।

परंतु अभ्यासकांच्या मते हे किन्नरांख्यान नरेन्द्राच्या स्वतंत्र प्रतिभेचा विलास असावा. कारण भागवतात अशा किन्नराचा उल्लेख आढळत नाही. नरेन्द्र पंडीताचा संस्कृतचा अभ्यास चंगला होता तसेच संगीतशास्त्राचा ही अभ्यास होता. मराठी लोककथांमध्ये किन्नराचा उल्लेख आढळतो तसेच महदंबेच्या ‘मातृका स्वयंवर’ या काव्यान नरेन्द्राच्या आधी किन्नराचा उल्लेख आढळतो यावरून नरेन्द्रानी यातूनही किन्नर घेतला असल्याची शक्यता आहे मात्र एवढे खरी की त्यावर आपल्या प्रतिभेने अभूतपूर्व रंग नरेंद्रांनी चढविले आहेत.

‘रूक्मिणीस्वयंवर’ हे महाकाव्यसदृश काव्य आहे यातील कथाही तेवढीच महत्वाची आहे. हे महाकाव्य कोठेही कंटाळवाणे होणार नाही अधिकाअधिक रसाळ करण्याचा प्रयत्न नरेंद्राने केला आहे. त्याने वर्णन केलेले पात्र, निसर्गवर्णन, रूक्मिणीची विरहावस्था, त्यावरील उपाय, महत्वाच्या व्यतिरेखेबरोबरच रूक्मिणी, शिशुपाळ, भीमक इत्यादी दुय्यम व्यक्तिरेखाही वेधक केल्या आहेत. रूक्मिणी दरबारात आली त्यावेळचा प्रसंग कवी वर्णन करतो–

कुमरि आली रायजवळीके:
दोन्ही हाती उललौनी भीमके
उसंगीये बैसविली कवतुके:
आलिंगौनिया।।११०।।

नरेन्द्रानी या ओवीत पितृवात्सल्याचे वेधक चित्रण रेखाटले आहे अमुर्तालाही मूर्त केले आहे. चंद्राच्या कलांचे वर्णन करतांना कवी म्हणतो की चंद्रासारखा कलावंत सापडायचा नाही जो आपल्या नजरेनेच लक्ष लक्ष कमळिर्णीना विकसीत करतो. चंद्राच्या चांदण्यांच्या मद्याचा प्रभाव एवढा असतो की जड समुद्रालाही धुंद करतो आणि भरतीच्या मिषाने त्याची प्रेयसी जी पृथ्वी तीलातो ओली करून टाकतो. आकाशगंगेत दिसणाऱ्या चांदण्या म्हणजे जणू त्या गंगेत विहरणारे सारसपक्षी नरेंद्राच्या वर्णनचातुर्याच्या कितीतरी ओव्या संदर्भादाखल देण्यासारख्या आहेत. नरेद्राने केलेल्या संध्याकाळच्या वनोपवनांच्या आणि वसंतऋतुच्या वर्णनातही त्याची प्रतिभा फुलही आहे त्याचे हे वर्णनचातुर्य, कल्पना वैभव मुळातून वाचण्यासारखे आहे.

नरेंद्राच्या रूक्मिणीस्वयंवरात अलंकारांची सर्वत्र पखरण पहावयास मिळते. प्रत्येक ओवीत अलंकार आलेले आहे उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टांत इत्यादी अलंकारानी हे काव्य नटलेली आहे.

त्यामुळे रूक्मिणीस्वयंवर हे काव्यदृष्ट्या समृध्द झाले आहे. नरेन्द्राचे काव्य वाचत असतांना प्राप्त होणारा आनंद शब्दातील आहे त्याच्या काव्यात कल्पनांचे वैभव, शब्दांची गुंफण, वर्णनातील प्रमाणबध्दता या सर्व गुणांचा समुचित संगम झालेला आहे. त्यामुहे हे काव्य एक आदर्शकाव्य म्हणून ठरले आहे. एक निंतात रमणीय काव्य म्हणुन यादवकाळात रचले गेलेले हे काव्य म्हणूनच महानुभवांच्या साती ग्रंथात मानाचे स्थान मिळवून आहे.

## २) भास्कर : शिशुपाळवध

भास्करभट्ट बोरीकरांनी शिशुपाळवध, उध्दवगीता, चालीसाख्यस्त्रोत नरविलापस्तोत्र, संस्कृत पुजावसर, मूर्तिवर्णन स्तोत्र, मराठी पूजावसर इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत.

भास्कर हे हाडाचे कवी होते. शिशुपाळाच्या वधाची कथा त्यांनी अतिशय प्रतिभेने रंगविली आहे. त्यांचे काव्य अनेक गुणांनी नटलेले आहे. कथा सजविण्यासाठी त्यांनी अनेक सुंदर सुंदर वर्णन केलेली आहेत. सभावर्णन, नजरवर्णन, निसर्गवर्णन, युध्दवर्णन, जलक्रिडावर्णन, विरहवर्णन इत्यादी वर्णने कल्पनारम्य असल्यामुळे तीवाचतांना कंटाळा येत नाही. सुधर्मसभेचे हे वर्णन वाचावेसे वाटते–

जेथे चीतांमणीचे दळवाडे:
उमाणुनि दाधिया सपींडे
उभिले बहुतें कोडे
विश्वकर्मेनि ।।३४६।।

या सभेत गायक, वादक, नर्तक, वक्ते इत्यादी अनेक पंडीत बसलेले आहेत. ही सर्ववर्णने ओघवत्या भाषेत आहेत. नगरवर्णनात मात्र केवळ द्वारकेचेच वर्णन आलेले आहे. धर्मराजाचा निरोप घ्यायला आलेला वीरचुड आणि त्याला दिसलेली द्वारका भास्करभटांनी अत्यंत नयनरम्य शब्दांकीत केली आहे. द्वारकेन आपल्या रूपाने कुबेराच्या अल्पकानगरीला जिंकले होते. चितांमणीची अमरावतीही जिंकली होती तसेच सौदंर्यात वैकुंठाचाही गर्वहरण केला होता.

निसर्गवर्णन करण्याची ही संधी भास्करांनी गमावली नाही. द्वारकेभोवतीची वनेउपवने आणि इंद्रप्रस्थातील श्रीकृष्णाचा निवास असलेले उपवन या दोन्ही ठिकाणी कवीने आपल्या कल्पनाशक्तीचा व प्रतिभाशक्तीचा पुरेपुर उपयोग करून घेतला आहे. बहुविध प्रकारांच्या वृक्षवेलींनी उद्याने तुडुंब भरून गेली आहे. घनदाट छाया देणारे आम्रवृक्ष, चाफ्याच्या ओळीच्या ओळी डोलण्याचे निमित्त करून मालतीच्या वेलीस झोंबणारे कूर्वकू वृक्ष, कामिनींच्या चरणप्रहाराची इच्छा करणारे अशोकवृक्ष इत्यादींनी भास्करांची ही वनसृष्टी गजबजून गेली आहे. शिशुपाळवधात जागोजागी कविच्या कल्पनेचा प्रत्यय येतो युध्दवर्णने, रूक्मिणीच्या विरहाचे वर्णने, श्रीकृष्णाचे व्यक्तिचीत्रण, इतर पात्रांचे स्वभवर्णन ही कवीने मोठ्या कुशलतेने केले आहे.

भास्करभट्ट यांची भाषा अलंकार प्रचुर आहे. आपल्या काव्यात उपमा, उत्प्रेक्षा, रूपक इत्यादी अलंकारांचा सर्वत्र वापर केला आहे. श्रीकृष्णाच्या अंगप्रत्यंगाचे वर्णन करतांना कविने उपमा किती मुळहस्ताने उधळल्या आहेत.

लावण्यसरोवरी
जेवी कमळाचे पाने थरारी
नेवी अधरू कांने भारी:
प्राण कोपाचा ।।१७८।।

श्रीकृष्णाबद्दल स्त्रियांना निर्माण झालेली गोडी युध्दावर निघालेले पांडव सैन्य इत्यादी वर्णनने उपमा अलंकाराने युक्त आहेत. उत्प्रेक्षा हा कविच्या आवडता अलंकार आहे रूपक व्यतिरेक, अतिशयोक्ती, अनुप्रास अलंकार ही जागोजाग दिसून येतात.

'शिशुपाळवध' नावावरून हे काव्य जरी आपल्याला विररसप्रधान वाटत असले तरी प्रत्यक्षात मात्र ते शृंगार प्रधान आहे. मी श्रोत्यांसाठी 'रसरंगाचे पाहाळ' उघडीत अशी जणू त्यांची प्रतिज्ञाच होती. या काव्यात शृंगाररसाला प्राधान्य मिळालेले पाहून त्यांच्या गुरूबंधुने 'हा ग्रंथ संत लोकांसाठी उपयुक्त नुसन तो प्रवृत्त, प्रापंचिक लोकांसाठीच उपयोगी ठरू शकतो.". असा अभिप्राय दिला होता. महानुभावासारख्या निवृत्तीवादी पंथाला या काव्यातील ही शृंगारीकता अशोभनीय वाटणे सहाजिकच आहे.

## ३) भास्कर: उद्धवगीता

'शिशुपाळवध' हा ग्रंथ शृंगारिक झाल्याचा अभिप्राय ऐकल्यानंतर भास्करांना स्वत:च्या साधुत्वाविषयी खंत निर्माण झाली आपण निवृत्ती मार्गाचे भिक्षुक असुनही शृंगारसंपूर्ण काव्य आपल्या हातून निर्माण झाल्याने त्यांना अपराध्यासारखे वाटू लागले. म्हणून त्यांनी 'उध्दवगीता' लिहिली, यात प्रामुख्याने भक्तिरसाला प्राधान्य आहे. भागवताच्या एकादशंस्कधाला मराठीत आणण्याचा पहिला मान भास्करांना द्यावा लागतो.

हे काव्य पूर्णपणे, निवृत्त लोकांसाठी लिहिले असले तरी प्रसंग मिळताच शृंगारसाची झालेली अभिव्यक्तीही त्यात पहावयास मिळते.त्रष्यशृंगाचे आख्यान लिहितांना कवीने संस्कृतील एका श्लोकावर ५२ ओव्यांचा विस्तार केलेला आहे. आपले काव्यप्रयोजन स्पष्ट करतांना कवी म्हणतो.

हे सार सकळ शास्त्रांचे:
रहस्य सर्व धर्माचे :
जीव्हार कैवल्याचे :
निरूपण हे ।।८१४।।

आपले हे काव्य म्हणजे सर्व शास्त्रांचे सार आणि सर्व धर्माचे रहस्य आहे. हे ज्ञानसुध्दा जो सेवन करील त्याचे जन्ममरणाचे फेरे चुकतील असा त्यांचा आत्मविश्वास आहे.

शिशुपाळवद्याची कथा सांगतांना भास्करभटांच्या प्रतिभेला बहर आला आहे. निसर्गातील वृक्षवेली, प्राणी यांची सुंदर सुंदर वर्णने भास्कराने केलेली आहेत. शिशुपाळवधात अलंकारांचा अक्षरशः पाऊस आहे. उपमा, रूपक, उंत्प्रेक्षा अलंकारांनी ते काव्य नटले आहे. भक्तीरसपूर्ण असले तरी उध्दवगीतेतही सुदंर सुदर अलंकार पाहावयास मिळातात. उपमा हा त्यांचा आवडता अलंकार साहित्यरूपी देवालयात शांतरसाच्या मुर्तीची स्थापना करतात आणि आपली पवित्र वाणी कोण ऐकणार नाही? हे सांगण्यासाठी कवी उपमांचा आश्रय घेतो.

तैसे साहित्यांचा राहणी
शांतिरसा अवतरण आणि
तरि माझी पवीत्र वाणीः
कवण नाइके? ।।३।।

## ४) पंडित दामोदर : वच्छहरण

पंडित दामोदर हे भटमार्गीचे म्हणजे महानुभाव पंथाचे श्रावक होते श्रीनागदेवाचार्यापासून उभय पती–पत्नीला श्रवण झाले होते. पंडीत दामोदर अत्यंत विद्वान होते. मराठी व संस्कृत या दोन्ही भाषांवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. केशीराजव्यासांसारख्या एका परमस्नेह्याच्या मृत्युनंतर त्या दुःखातच त्यांनी 'वच्छाहरण' हे काव्य लिहिले. 'वच्छहरण' या काव्याव्यतिरिक्त काही धृवे, चौपद्या व आरत्या त्यांच्या नावावर आहे. ज्या काव्यामुळे पंडित दामोदरांना महानुभाव पंथात अजरामरता प्राप्त झाली ते काव्य म्हणजे 'वच्छहरण'

'वच्छहरण' या काव्याचा आधार भागवताच्या दशमस्कंधातील एककथा प्रसंग आहे. श्रीकृष्णाच्या गायी ब्रम्हदेवाने पळविल्यानंतर श्रीकृष्णाने ब्रम्हदेवाचे केलेले गर्वहरण हि कथा वच्छहरणात गुफलेली आहे. यात अधासुराचा वध, वच्छहरण, ब्रम्हदेवाने केलेले कृष्णस्तुती इत्यादी कथाभाग आहे. या काव्यातील प्रत्येक ओवी श्रीकृष्णाविषयीच्या परमभक्तीने ओथंबलेली आहे. ईश्वरगुणचिंतन करतांना अंतःकरणातून भरभरून आलेला आनंद काव्यरूपाने प्रगट झाला आहे. 'वच्छहरण' या काव्यातुन श्रीचक्रधारोक्त तत्वज्ञान, दामोधर पंडितांनी सर्व सामान्यांना सांगितले जप, तप, तिर्थ,दान, या सर्व गोष्टी ईश्वरप्राप्तीच्या नसून कृष्णमहिमा वर्णन केल्यानेच तो प्राप्त होतो असा कविचा आत्मविश्वास आहे.

सांडा सांडा अन्य भजनेः
काई नाईका वेध पुराणें
मुंचीजे ना आनें कव्हणें
एक श्रीकृष्ण सेवा ।।४०।।

असे कवी म्हणतो. श्रीकृष्णाच्या गुणनुवादाने मोक्ष प्राप्त होतो असे आवर्जनु कवी सांगतो. त्याच बरोबर महानुभाव तत्वज्ञानही या काव्यातुन दामोधर पंडितांनी प्रतीपादन केले आहे. श्रीकृष्णभक्ती हेच काव्यरचनेमार्गात प्रयोजन आहे.

'वच्छहरण' या काव्यात सुमारे पाचशे ओव्या आहेत. भागवती कथेच्या आधारे वच्छहरणाचा अद्‌भुत रम्य प्रसंग वर्णीनेला आहे. या कथेचे यश वर्णनकौशल्यात आहेत. प्रत्येक प्रसंगातील रचनेत चित्रमयता पहावयास मिळते. वृंदावन वर्णन, यमुना वर्णन, इत्यादी वर्णनातील कल्पकता व कलात्मकता मुळातुन वाचण्यासारखी आहे. पंडित दामोधरांच्या वच्छहरण या काव्यातील अलंकार श्रृष्टी हि पाहण्यासारखी आहे यात प्रामुख्याने उपमा, उत्प्रेक्षा रूपक हे अलंकार वापरले असून उपमे वर अधिक भर आहे. 'उपमा' दामोधर पंथांचा आवडता अलंकार आहे. हा अलंकार वच्छहरण काव्यात सर्वत्र दिसतो. प्रसंग कोणताही असो सर्वच प्रसंगी कवीने आध्यात्मीक उपमाने योजीले आहे. उधळलेल्या गायी म्हणजे प्रेम रूपी दुधाने भरलेल्या सरीता आनंद सागराला जावून मिळत होत्या यात गोधणाची ओढ म्हणजे ईश्वरी भेटीची ओढसुंदर शब्दात चित्रीत झालेली आहे. दामोधर पंडितांच्या या काव्यात याशिवाय रूपक, दृष्टांत हेही अलंकार आलेले आहे. त्याच प्रमाणे कवीने रेखाटलेली व्यक्तिचित्रणे सजिव वाटतात. दामोधर पंडितांनी आपल्या अंतःकरणातील कृष्णभक्तीला वच्छहरणाच्या रूपाने वाट करून दिली आहे.

## ५) खळोबास : सह्यादिवर्णन

श्रीदत्तात्रेयप्रभू हे महानुभावांचे आद्यदैवत म्हणून त्यांचे निवासस्थान असलेला सह्याद्री पर्वत. तोही पवित्र व वंदनीय. माहूर येथे श्रीचक्रवाणी राऊळ व श्रीदत्तात्रेय प्रभूंचे निवास व शयनस्थान म्हणून महानुभवांना अत्यंत पुजनीय आहे. याच वंदनीय माहूरच्या सह्याद्री पर्वतावरील श्रीदत्तात्रेय प्रभूच्या लिळांचे वर्णन खळोबासांच्या या काव्यग्रंथात आहे. ते म्हणतात हा सह्याद्री पर्वत सर्वपर्वतामध्ये सुप्रसिध्द आहे. याची बरोबरी वैकुंठ देखील करू शकणार नाही. दत्त ही आपली माता आणि तीचे पुर म्हणजेच ठिकाण म्हणुन मातपुर अश्या माहुरला त्यांनी मातापूर हे नाव दिले.

खडोबासांच्या सह्याद्री वर्णनात अलर्क, परशुराम, सहस्त्रर्जुन आणि श्रीदत्तात्रय यांच्या भेटीचे अतिशय सुंदर वर्णन आहे. आदीदैवी, आदीभौतीक आणि आध्यात्मिक या तिनही नावानी पोळलेला अलर्क यास श्रीदत्तात्रेयांनी केलेला उपदेश श्रीदत्तात्रय आणि श्रीकचक्रधर स्वामी त्यांच्या श्रीमुर्तीवर्णनात कवीचा कल्पनाविलास पहावयास मिळतो.

खडोबासांच्या कल्पनाशक्तीचा प्रतीभेचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या अलंकार सृष्टीतुन दिसून येतो. त्याची अलंकार सृष्टी वैभवशाली आहे. विविध अलंकाराची योजना कवीने केली आहे. या काव्याची सुरूवातच रूपकाने झाली आहे. सह्याद्रीवर्णन हे काव्य श्रध्दाशिल मनाने आळवलेली श्रीदत्तात्रेय प्रभुंची आरती आहे. महानुभावांच्या सातही ग्रंथामध्ये या काव्याचे स्थान वेगळेच आहे. एवढी श्रध्दाशीलवृत्ती इतर कोणत्याही काव्यात पहावयास मिळत नाही.

## ६) नारायण व्यास :रिध्दपुरवर्णन

'रिध्दपुर' हे महानुभव पंथाचे पवित्र महाक्षेत्र आहे. पंचकृष्णापैकी चौथे कृष्ण श्रीगोविंदप्रभु यांचे हे निवासस्थान. शंभर वर्षे त्यांचे वास्तव्य तिथे होते याच रिध्दपुरात महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीकचक्रधरस्वामी यांनी श्रीगोविंदप्रभु पासुन ज्ञानही घेतले आहे. अश्या पवित्र क्षेत्राचे महात्म्य पर्यायाने श्रीगोविंदप्रभुचे भक्तीपर चरीत्र काव्यबध्द केल्याने आपल्या पापांचे क्षालन या भुमिकेनेच नारायण व्यासांनी रिध्दपुर वर्णनाची निर्मीती केली. या काव्यातील प्रत्येक शब्दाला कविच्या सह्दयतेची, आर्ततेची, भक्तीभावाची बैठक लाभली आहे. या काव्यात रिध्दपुरचा परिसर, तेथील देवळं, राजमठ,पडशाळा, रायांगण, महाव्दार ओटा, रंगभावीक इत्यादींची वर्णने कवीच्या प्रतीभाशक्तीचा प्रत्यय देतात. श्री प्रभु रिध्दपुरात नाही या जाणीवेने कवी अस्वथ झाला आहे. नारायण व्यासाच्या भावभक्तीचा अतिशय सुंदर रमणिय आविष्कार म्हणजे त्यांचा 'रिध्दपुरवर्णन' हा ग्रंथ होय.

'रिध्दपुरवर्णन' या काव्याचा विषय वर्णनात्मक असल्याने कवीचे रचनाचातुर्य, वर्णनचातुर्य, सर्वत्र दिसून येते. त्यामुळे हे काव्य रमणीय झाले आहे. रिध्दपुरच्या दर्शनाने मनाला शांती मिळते त्या प्रसन्न मनाचे चित्र कवीने पुढीलप्रमाणे रेखाटले आहे.

रोगीया अमृत पान:
लाहे तान्हैला जीवन
स्वामी जालेया प्रसन्न:
जेवी सेवका होये।।४७।।
सासुवासे सीनली
तीये जेवि भेटे माऊली
असो हें तैसी परी जाली
श्रीरिध्दपुर देखलेया ।।४८।।

नारायण व्यासांच्या रिध्दपुर वर्णनात उपमा उत्प्रेक्षा आणि रूपक अलंकार प्रामुख्याने पहावयास मिळतात. पुढील उपमा अलंकाराचे उदाहरण पाहुया.

चंद्रसुर्येविन जैसी:
तमे दटति आकासीं
ईश्वरविण तैसी
जीवनस्वरूपे ।।७०।।

कवीने आपली श्रीगोविंद्र प्रभु विषयीची उत्कटता व्यक्त केलेली आहे.

## ७) विश्वनाथ व्यास : ज्ञानप्रबोध

'ज्ञानप्रबोध' म्हणजे गितेवरील टिका? ज्ञानप्रबोध या काव्यग्रंथाचा सर्वप्रथम वर्ण्यविषय गितेच्या तेराव्या अध्यायातील सात ते अकरा या श्लोकांतुन श्रीकृष्णाने जे ज्ञान सांगितले आहे तो आहे. गितेतील या पाच श्लोकावर भाष्य आहे त्यामुळे ज्ञान प्रबोध ही गीतटिका असल्याचा समज होतो परंतु तसे नाही. या पाच श्लोकांमधुन जो ज्ञान ठेवा श्रीकृष्णाला सांगायचा होता त्याचे विवरण त्यांनी येथे केले आहे. विरक्ती व ईश्वरभक्ती यांचे रहस्य समजावून सांगितले आहे. ज्ञानी पुरूषांची लक्षणे सांगितली आहे. मोक्ष मार्गाचे निरूपन केले आहे. ज्ञान, भक्ती व वैराग्य यांचेही निरूपन या काव्यग्रंथात आले आहे. 'ज्ञानप्रबोध' या ग्रंथाचा तत्वज्ञानाचे निरूपन करणे हा मुळ हेतु आहे. जड व अनाकल्पनीय वाटणारे तत्व ज्ञान कवीने काव्यातुन मांडले आहे. साहित्यातुन ते मांडल्यामुळे ते तत्वज्ञान समजण्यास सोपे आहे.

यालागी ग्रंथ सुवर्णाची ताटी:

भक्तीरसाची बोणेवाटी
प्रेमपुर्वक देईन गोमटी:
देवा आरोगण ।।५३।।

विश्वनाथ व्यासांच्या मते कोणतेही काव्य भक्तिरसाने परिपुर्ण हवे त्यात आध्यात्मीक सिंध्दांताची आवश्यकता हवी ते काव्यातघोळलेले असल्यामुळे तत्वजड सिध्दांतही समजण्यास सोपे होतात काव्यात भक्ति व भाव हे दोन्ही महत्वाचे आहे. किंबहुना ती काव्याची महत्वाचे लक्षणे होत हे विश्वनाथांचे मत आहे. तत्वज्ञानासारखा बोजड विषय विश्वनाथ व्यासांनी काव्यातुन सोपा करून मांडला अर्थात त्यांच्या वर्णनशैलीमुळे. त्यांची शैली कल्पनाप्रधान अलंकारयुक्त आहे. रेखीव शब्दचित्रे, वक्तृत्वपुर्ण विवेचन, वादपटुता ह्यामुळे हा काव्य ग्रंथ सुरस आणि सरस आहे. ज्ञान प्रबोध हा खरे तर तत्वज्ञानाचा ग्रंथ आहे. परंतु हे तत्वज्ञान त्यांनी काव्यातुन मांडले आहे. काव्य आणि तत्वज्ञान यांची सरेख वाणी ज्ञान प्रबोधात पहावयास मिळते. विश्वनाथाना या ग्रंथातुन तत्वज्ञान मांडायचे असले तरी तत्वज्ञान व काव्य आपण वेगळे करू शकत नाही.

## केशीराज व्यास :– मुर्तीप्रकाश

महानुभव पंथात केशीराज व्यासांचे कर्तुत्व फार मोठे आहे. महंदबेच्या धवळ्यानंतरचे मराठीतले हे दुसरे प्रदिर्घ काव्य म्हणजे 'मुर्तीप्रकाश'. केशीराजाने इ.स. १२८९ मध्ये हा ग्रंथ लिहिला 'मुर्तीप्रकाश' काव्यग्रंथाची निर्मीती हि ज्ञानेश्वरीच्या एक वर्षा आधी झाली. लिळाचरित्राचे संस्कृतमध्ये सर्वप्रथम भाषांतर केशिराजांनीच केले. लिळाचरित्राची संस्कृतमधुन काव्यरूप बांधणी करणाऱ्या व ज्ञानेश्वरी आधीही महाकाव्यासदृश मुर्तीप्रकाशाची रचना करणाऱ्या पंडिताचे 'मुर्तीप्रकाश' हे प्रबंधकाव्य म्हणजे मराठी सारस्वताच्या उद्यानातील फुललेले कमलपुष्प आहे. 'सुत्रपाठ', 'दृष्टांतपाठ', 'रत्नमालास्तोत्र', 'दृष्टांतस्तोत्र', 'ज्ञानकलानिधी' स्तोत्र अशी ग्रंथ संपदा त्यांची आहे. 'मूर्तीप्रकाश' ग्रंथाची ओवी संख्या ३०५१ आहे हा ग्रंथ श्रीचक्रधराच्या मूर्तीचे वर्णन आहे. हे भावमधुर काव्य आहे. प्रस्तुत काव्यात पंचकृष्णनमन, श्रीनागदेवाचार्याना वंदना, शरीरसौंदर्य, मुख, वाचा, स्वामींचा पुजावसर, श्रीनागदेवाचार्याची अवस्था ईत्यादी अनेक विषय आलेले आहेत. स्वामींच्या शरीरसौंदर्याचे वर्णन करतांना तर कवीच्या प्रतीभेला उद्यान आलेले आहे. श्रीचक्रधरस्वामी निघून गेल्यानंतर सर्व परिवाराची झालेली वाईट अवस्था अतिशय करूणामय शब्दांनी वर्णन केलेले आहे. केशीराज हे कवी होते तसेच ते तत्वज्ञानी ही होते. 'मुर्तीप्रकाश' एकीकडे काव्यग्रंथ आहे तर दुसरीकडे तो तत्वज्ञानाचा ही ग्रंथ आहे. किंबहुना 'मुर्तीप्रकाश' महानुभाव तत्वज्ञानाचा काव्यरूप सारग्रंथ आहे. मुर्तीप्रकाश चे अंतरंग शोधल्यावर आपल्या लक्षात येते की, हे काव्य कथाकाव्य नसुन ते वर्णनपर काव्य आहे. परमेश्वराने धारण केलेल्या देहाचे अतिशय सुंदर शब्दात वर्णन केलेले आहे तशी कवीची प्रतीज्ञाच आहे. परंतु असे असले तरीही हे कथा काव्य नाही हा ग्रंथ तत्वज्ञानाचा ग्रंथ आहे. परंतु यातील काव्य व तत्वज्ञान यांची फारकत करता येत नाही. सर्वत्र तत्वज्ञान भरून असलेला हा ग्रंथ दृष्टांत, उपमादी अलंकारामुळे भावमधुर वाटतो असे असले तरी 'मुर्तीप्रकाश' सारख्या ग्रंथाचा महानुभावांच्या 'साती' ग्रंथामध्ये समावेश नाही.

## निष्कर्ष :

महानुभाव वाङ्मयाची प्रेरणा ही पंथनिष्ठ व श्रीचक्रधरांची भक्ती हिच आहे. महानुभावांचे सात पवित्र ग्रंथ समजले जातात. तेही या प्रेरणेला अपवाद नाही. या सातही ग्रंथात महानुभावांच्या पंचकृष्णाची वर्णने आहेत. 'रूक्मिणीस्वयंमवर', 'वच्छहरण', 'शिशुपाळवध' या तिनही आख्यानकाव्यात श्रीकृष्णजीवनातील प्रसंग वर्णन केलेले आहे. तर उध्दवगीतेत प्रामुख्याने महानुभाव तत्वज्ञानाचे, आचारधर्माचे तपशिलवार विवेचन आहे. सह्याद्रीवर्णनात श्रीचक्रधर व दत्तात्रेय, यांचे मुर्तीवर्णनावर जास्त भर आहे. 'ज्ञानप्रबोध' हा भगवत गितेच्या तेराव्या अध्यायातील पाच श्लोकावर आधारलेला आहे. यात पंथीय तत्वज्ञानाची मांडणी आहे. 'मुर्तीप्रकाश' या काव्यग्रंथाचा इतर महानुभावीय कवींवर एवढा प्रचंड प्रभाव होता की, भास्करभट्ट बोरीकर, दामोधर पंडीत यासारख्या कवींनी त्यांचे ऋण मुक्तपणे स्विकारले होते. हे भावमधुरकाव्य मराठी भाषीकांच्या आणि काव्यरसीकांच्या प्रीतीला सहज प्राप्त व्हावे. परंतु असे असुनही हा ग्रंथ महानुभावांच्या सातीग्रंथामध्ये समाविष्ट झालेला नाही. याचे नवल वाटते.

## संदर्भ ग्रंथ

१) तुळपुळे शं. गो. – महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय पुणे, व्हीनस प्रकाशन १९७६
२) देशपांडे कृ.पं. – सातीग्रंथ : स्वरूप आणि समीक्षा पुणे, सन पब्लीकेशन, १९८१
३) आवलकर रमेश – केशिराजव्यास :– व्यक्ती आणि वाङ्मय, औरंगाबाद, धारा प्रकाशन १९८३

❖❖❖

# आदिवासी साहित्यात आविष्कृत होणारे महत्त्वपूर्ण घटक
## :— (निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे इ.)

डॉ. अनीता अ. कांबळे
सहयोगी प्राध्यापक, फु. ना. म. वि. पुसद, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
इ मेल anitakamble3772@gmail.com भ्रमणध्वनी ८१८००७१५८२

## प्रस्तावना :—

आदिवासी साहित्यात निसर्ग हा घटक सजीव स्वरूपात अविष्कृत होतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहूनच आदिवासींनी आपले आयुष्य घालविले आहे. ते निसर्गनिर्भर राहूनच त्यामुळे तो निसर्गाशी भावनिकरित्या जुळला आहे. निसर्गाला आपले हितचिंतक, सखा मानून आयुष्याची सर्व कटूता, दु:ख, भयावह डोंगरासारख्या अडचणी पचवून टाकल्या आहेत. आदिवासींचे सण—उत्सव, विवाह, श्रद्धा—पूजा, कुलचिन्हे ही निसर्गाधिष्ठित असतात. निसर्गावर त्याची श्रद्धा आहे. निसर्गाला आदिवासींनी आपला प्राकृतिक धर्म मानले आहे. निसर्गाचे प्राकृतिक नियम ते स्वीकारतात. म्हणून अकृत्रिम जगण्याशी इतके जवळ आहे. निसर्गाप्रती कृतज्ञ भाव तो जोपासून आहे. तो वृक्षांची, पृथ्वी, सुर्य, चंद्र—तारका, अग्नी, ढग, पाऊस, पेरण्या, रोप, पिकांची पूजा करताना दिसतो. यासंदर्भात डॉ. विनायक तुमराम म्हणतात. “ निसर्ग हे आदिवासींचे जीवन सर्वस्व आहे. तो त्यांचा सखा व पाठीराखाही आहे. कराल दारिद्र्य, दु:ख त्यांच्या घरात ठाण मांडून बसलेले असतात. परंतु निसर्ग देईल त्यावर पोट भरून आपल्या सभोवतालच्या परिसरातील जास्तीत जास्त आनंद पदरात पाडून घेण्याची त्याची मनमौजी प्रवृत्ती आहे. त्यांचा प्रपंच जेमतेम, गरजाही सिमित, कष्टदायी व वेदनादायी जीवन, तरीही त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान व ओठावर तरळणारी लोकगीते. हा आनंद त्यांना त्यांच्या कलांमधून मिळत असतो.”[१] निसर्गाचा संबंध थेट आदिवासींच्या भाव—भावना, आशा—आकांक्षा, जीवनव्यवहार, श्रद्धा अंध:श्रद्धा यांच्याशी जुळलेला असतो.

आदिवासींनी निसर्गालाच आपला धर्म मानले. त्यांना तुमचा धर्म कोणता विचारले तर तो 'प्राकृतिक निसर्ग धर्म','बिरसाई धर्म' वा आदिवासी हाच धर्म सांगतात. परंतु तो स्वत:ला हिंदूधर्मीय मानीत नाही. त्यांच्या श्रद्धा, पूजा, देव परंपरा, कुलदैवते, आचारतत्वे पाहिली की ती स्वतंत्र अशी असलेली दिसतात. त्यांनी हिंदू ठरविणे (शहरी पातळीवर ते हिंदूच्या सण—उत्सव प्रतिमांचे पूजन करतात. म्हणून) चूकीचे आहे. “ त्यांच्या प्रकृती धर्माप्रमाणे त्यांच्या स्वतंत्र अशा प्रतिक रूपदेवता आहे. त्या देवता म्हणजे त्यांच्या रोजच्या जीवनावर जो परिणाम होतो अशाच प्राकृतिक पंचमहाभूता सारख्या आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की प्रत्येक महाभूतामागे एक अदृश्य अशी शक्ती आहे. तसेच पुर्वज, पुजा हेही त्यांच्या धर्माचे वैशिष्ट्य आहे. ह्या पुर्वजांच्या प्रत्येक कौटुंबिक कृत्यावर परिणाम होत असतो. अशी त्यांची भावना आहे. मरणानंतर पुर्वज भूत—पिशाचात रूपांतरीत होतात. असा त्यांचा समज आहे. आपल्या देवाकरता त्यांनी कधी मंदिरे बांधली नाहीत किंवा पूजाही केली नाही. त्यांची पूजा म्हणजे ह्या देवतांना वेगवेळ्या रूपाने नैवेद्य देणे हिच होय.”[२] आदिवासी समाज ज्या अवस्थेत पुर्वापार जगत आलेला आहे. जमातीत कुलदैवत व कुलप्रतिक मानले जाते. त्यावर त्यांची निस्सिम श्रद्धाही असते. त्याची पुजा आराधनाही ते करतात. आपल्या जीवनातील सुखदु:खे, अडचणी, संकटे कुलदैवताच्या संतुष्ट असण्यावर ते निर्धारित करतात.

आदिवासी कविता, कादंबरी, कथासंग्रह विचार करता निसर्ग, धर्म, श्रद्धा याविषयी भाष्य केलेले दिसून येते. तसेच यातुविद्या, कुलदैवतपूजा याविषयीचे चित्रणही एकंदरीत या साहित्यातून झालेले दिसून येते.

## • आदिवासी कवितेतून आविष्कृत होणारे घटक :—

(निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे)

आदिवासी कवितेतून निसर्ग विविधांगी रूपात साकार होताना दिसतो. हा निसर्ग कवितेतून काल्पनिक न वाटता वास्तवपुर्ण असा वाटतो. निसर्गाशी एकरूप असलेले मानवी जीवन अनेक कवितांमधून चित्रित झालेले दिसते. अनेक कवींनी निसर्गविषयक चिंतन कवितेतून प्रकट केलेले आहे. भुजंग मेश्राम यांच्या 'अभूजमाड' या काव्यसंग्रहातील 'जादू' या कवितेत निसर्गाप्रतीचा वास्तव व कृतज्ञ भाव साकार करताना —

“पाखरांना कोण सांगता ।

विखारी दाही दिशा ।
मुक्कामी एक व्हा! ।
कोण सांगता झाडांना ।
फुलवाय पालवी वैशाखात ।
नि भर थंडीत पानझड! ।
सांगता कोण ढगांना ।
ठेवा समुद्र सोबती ।
सामील व्हा या भूमीला.''[३]

दिवसभर अन्नासाठी भटकंती करणारी दाही दिशांना पाखरे हा जीवघेणा प्रवास जाणून असतात आणि म्हणूनच ठरलेल्या मुक्कामी एक होतात. बऱ्याच अंशी मानवी जीवनासाठी संजिवनी ठरलेल्या निसर्गाला कुणी सांगितले असेल. 'नवा करार','उन्हाची फुलं','व्हाईस ऑफ सायलेंट व्हॅली' तसेच 'ऊलगुलान' मधील 'सृजनाचे अरण्यबेट','समुद्रपुत्र','फडफडणारा डोळा','नागपुत्राच्या कविता' या कवितांमधून निसर्गाची कित्येक रूपे, नाना कळा व मानवी जीवनाशी नाते प्रकट करतात.

'ऊलगुलान' मधील अनेक कविता आदिवासींच्या श्रद्धा, धार्मिक, भावना, प्रथा व त्यातून प्रकट होणारा वर्तमानकालीन फोलपणा ते डोळसपणे व्यक्त करतात. 'भेदिक' या कवितेत—

''होलारी भेदिकाले जाले अस्तील हजार पाचशे वर्स....।
भौतेक, देव जलमले तेच दरम्यान ।
गणामनापासून ते म्हाळसा पावतोर ।
इठ्ठल—रूक्माई आन् गौळण गौर.....।
मातर आयुष्यभर जाला नाहे कोणाच्या देवाचा पर्श ।.''[४]

कोलाम जमातीत होलार भेदिकांची कोडी टाकण्याची प्राचीन परंपरा आहे. तो संदर्भ घेत कवीदेव, प्रथा, धर्म, धार्मिक स्थानं मानवजातीने कालखंडानुरूप श्रद्धा, भावनिक गरज यातून निर्माण केलेले दिसून येतात. सर्वसामान्य माणसाला यातून काहीच मिळत नाही. पुण्याच्या नावानेही 'डंडार','गावबांधणी','व 'नागपुत्राच्या कविता' यातून आदिवासींच्या कुलदैवतपूजा व श्रद्धाधर्मतत्वावर भाष्य केलेले दिसेल.

वाहरू सोनवणेची 'देवदासी' कविता महत्त्वाची आहे. देवदासींना 'देवाच्या बकऱ्या' संबोधत दैववादाचे धार्मिक ढोंगही ते उघड करतात. डॉ. विनायक तुमराम 'गोंडवन पेटले आहे' या कवितासंग्रहातील 'युगायुगांचा अनुभव' या कवितेत देवविषयक भावनेवर भाष्य करताना —

''इश्वर नावाच्या गुढ अंधारात ।
तेव्हा नकट्या संस्कृतींनाही ।
शृंगारून मिरवावेसे वाटते ।''[५]

देव इश्वर यांच्या अस्तित्त्वाविषयीच जिथे संभ्रमाचे गुढत्त्वाचे वातावरण निर्माण केल्या जाते. (अस्तित्त्व नसताना) व त्यातूनच विषप्रथा रूजविल्या जातात. नेमके भाष्य कवी करतो. प्रा. माधव सरकुंडे 'मी तोडले तुरूंगाचे दार' या कवितासंग्रहातील 'बंधूनो!' या दिर्घ कवितेत देव—धर्म शोषितांच्या शोषणाचा विषय कसा झाला आहे याविषयी डोळस भान ते या कवितेतून देतात.

''बंधूनो! तुम्ही म्हणता ही सृष्टी देवाने निर्माण केली ।
म्हणून तुम्ही त्याची पूजा करता ।
मला सांगा ।
झाड पण देवानीच निर्माण केली ।
मग झाड का नाही करत देवाची पूजा?''[६]

देवत्वाचे आंधळेपण समाजापर्यंत ते व्यवहारनिष्ठ जीवन प्रश्नातून मांडत जातात. प्रभू राजगडकर यांची 'गोंगलू' (निवडुंगाला आलेली फुलं) ही कविता आदिवासींच्या खऱ्या आंतरिक श्रद्धेला मांडताना (बोलीभाषेतून)

''डमडम डमरू का केनाना ।
चाँद लागे माथे कारो ।
कित्तोरे दादा शिवा दरसन कित्तोरे....।

जाईजुई बाग लावे ।
कित्तोरे । कित्तोरे दादा ।
शिवा दरसन कित्तोरे.'[७]

शिवाला मानणारे, त्याचे दर्शन करणारे आदिवासी लोकांची श्रद्धा प्रकट करतात. दा. सू. सिडाम यांची 'गुरू लिंगोचे तत्त्वज्ञान' शंकर बळी यांची 'हे वाघदेवा' दशरथ मडावी यांची 'देव आंग धुवाले नेजच हाओ' या कविता महत्त्वाच्या आहेत.

## • आदिवासी कादंबरीतून आविष्कृत होणारे महत्त्वपूर्ण घटक :—

(निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे)

आदिवासी कादंबऱ्यातून निसर्गाचे वर्णन कल्पनारम्य व सौंदर्यपूर्ण शब्दात न येता वास्तवरूपात धारण करतो. आदिवासींच्या खडतर जीवनासारखे त्याचे रूप दिसते. तर कधी निसर्गसौंदर्याने ते हरखून गेलेले दिसतात. प्रा. माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' या श्रावण महिण्याचे कादंबरी वर्णन करताना लेखक '' सरावन महिना नुकताच लागला व्हता. सरावन महिण्या आधी बखम पाणी झालं व्हतं. त्याच्यानं वावरं सुद्य व्हतं. वढे काळ्याभोर पाण्यानं भरून वाहत व्हते. धुऱ्या बंधाऱ्यानं ढसढस गवत वाढले व्हते. गायीरान हिरवेगार दिसत व्हते. हिरवे रान फायलं की मन हारखून जाये. मनालाच हिरवी पालवी फुटल्यावानी वाटे.''[८] वाघामाय, पोचमामाय, मरीमाय, खोकलामाय, मेस्कामाय, जरीमाय, मुंज्या इ. देवदेवतांना आंध जमातीत पूजल्या जाते. जंगलात शिकार न मिळाल्यामुळे संत्या वाघुरी (सावज पकडण्याचे साधन) ची द्रिष्ट काढण्यासाठी संत्या स्वत:चे शेटं उपटतो. पेटत्या गवरीवर त्या केसाचा बुचका टाकीत वाघूरीला धुपट देत द्रिष्ट काढल्यामुळे आपल्याला दोन ससे वाघूरीत सापडले असे वाटते. द्रिष्ट लागणे व काढणे त्यानंतरची फलप्राप्ती होते यावर आंध जमातीची श्रद्धा दिसते. भूत—भानामती वर त्यांचा प्रचंड विश्वास होता असे दिसते. भगतांच्या वैदूच्या हस्ते भूत उतरविण्यासाठी त्या बाईच्या डोळ्यात रिठ्याचा रस उगाळून टाकतात. भूताचं नाव सांग म्हणून प्रचंड मारहान करतात. ती झाडावर चढायला करते म्हणून, झाडाला भारलेले खिळे ठोकताना दिसतात. खंड्याजवळ माणसांना मारून टाकण्याची जादू आहे असे समजून ती जादू उतरविण्यासाठी शिक्षा म्हणून बायांचा विटाळ, चांभारकुडीतलं पाणी आणि गू या तिन्हीचा गरगोडा त्याला पाजतात. अमावस्येच्या दिवशी बाळंतिण बाई मेली की त्याच्या तिसऱ्या दिवशी, तिच्या अंगावरील कपडा काढून त्याची लंगोट शिवून घातली की कुठल्याच फडात पाठ टेकत नाही. असे तान्ह्याला खंड्याने सांगितल्यामुळे तान्ह्या खंड्याला मदत करतो. तीन दिवस मातीत दिवा लावायचा, चवथ्या दिवशी त्याची काजळी काढायची त्याच्या गोळ्या करायच्या आणि ज्याला मारायचे त्याच्या नावाने गोळी फेकायची की माणूस पटकन मरतो. अशी जादूविद्या (यातुविद्या) वर आंध जमातीचा विश्वास दिसतो असे चित्रण येते.

कॉ. नजुबाई गावित, 'तृष्णा' या कादंबरीत भिल्ल व मावची या आदिवासी जमातींचा यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे या दृष्टिकोनातून प्रचंड विश्वास असलेला दिसतो. गावातील फल्यू या साथीचा संबंध ते सलाबाईच्या कोपामुळे आलेली मानमोडी समजतात. सलाबाईच्या नावाचा नवस फेडण्याचे कबूल केले जाते. मृत माणसाच्या नावाने शेतीत भात, तूर, मिरची, शेंगा पेरतात. इसरी तिच्या वडीलांच्या व काकांच्या नावाने अशीच शेती पेरते व त्यांना म्हणते,''आबा, काका शेती पिकेल तेव्हा पोट भरून खा; अन् आमच्या करताबी बांधून ठेवा!.''[९] माणसाला जिवंतपणी नाही पण मेल्यानंतर खाता येईल हि श्रद्धा त्यांची असते. मृतांच्या स्मृतिपित्यर्थ खांब उभारले जातात. म्हातारे मरतात त्यांच्या खांबावर चंद्र काढतात. साप चावून मरतात त्यांच्या खांबावर साप काढतात. वाघदेव, कणसरा, घाटादेव, याहामोगी, सलाबाई या देवीदेवतांना पूजल्या जाते. कणसरा हिला मातृदेवता मानतात. रोप शेताच्या मध्यभागी लावतात. त्याला कुंभ म्हणतात. रोपाच्या बुध्याजवळ नारळ फोडून पूजा करतात. नागली पिकल्यावर कुंभाला नारळ फोडून कापणीला सुरवात करतात. कापणी झाल्यावर त्या ठिकाणी बोकडं किंवा कोंबडा कापून भंडारा करतात. अन् नागली खळ्यावर आणतात. नागलीला 'कणसरा' म्हणतात. पाऊस पडायच्या आत घटादेवाची पूजा, काळ्या ढगाची पूजा करताना दिसतात. याहामोगी ही आदिवासींची कुलदेवता आहे.

मृत्यू नंतर माणूस कोणत्या योनीत गेला हे पाहिल्या जाते. आंबूच्या निधनानंतर चुलीमागे गाळणीने पिठ गाळून, त्यावर वाटीभर भात व कपभर दारू ठेवून टोपल्याने झाकून ठेवतात. सकाळी त्या पिठावर सापाचा वरखडा पडलेला व साप दारू भात खाऊन पिवून निघून गेला असे मानतात. मृत माणसाच्या नावाने सण—उत्सवाला

जेवाडतात. (चुलीत अन्न व दारू टाकल्या जाते.) आदिवासींचा भगत मांत्रिकावर प्रचंड विश्वास असलेला दिसतो. कुठल्याही छोट्या –मोठ्या आजारावर इसरी इसऱ्याकडून गंडे–दोरे करून घेताना दिसते. आदिवासींचे सण–उत्सव प्रामुख्याने त्यांच्या देवदेवतांच्या नावानेच असतात. त्यांना शांत करून सुखी जीवन जगण्यासाठी ते धडपडताना दिसतात.

'भिवा फरारी' या कादंबरीत नजुबाई गावित निसर्गाचे वर्णन करताना दिसतात. झाड तोडण्यापूर्वी झाडाच्या बुध्याशी तांदळाची भगुली ठेवून हात जोडून नमस्कार करताना भिवा दिसतो. लग्नात उंबर व जांभळाच्या फांद्यांचा मंडप टाकला जातो. विवाहात नवऱ्या मुलाकडे उंबराची व नवरीकडे पिंपरीची बेळी गाडतात. जंगलाच्या वनस्पतीचा औषधयुक्त वापर करताना दिसतात. आदिवासींच्या आदिम देवदेवतांचे वर्णन येताना दिसते. सेंड्या देव, ढग्या देव, विजन देवी, गरजदेवी, इमलादेवी, धसळ्या देव, मुसळ्या देव, तिखाळ्या देव, वाकड्या देव, बध्या देव, हरण्या देव, जिबली देवी तसेच याहामोही ही कुलदैवत व वाघदेव, डोंगरदेवाचेही वर्णन करताना दिसते. बऱ्याच देवतांची नावे निसर्गावर व मानवी प्रवृत्तीवर आधारीत वाटतात. स्त्रियांना डाकीण मानण्याची प्रथा समाजात प्रचलित असलेली दिसते. देवी–देवतांचा शुभसंकेत समजण्यात येतो. सीताच्या स्वप्नात इमलादेवी लहान मुलगी होऊन येणे, दिव्यात तुपाचा गोळा ठेवणे व दिव्यापुढे हात जोडून आरतीतील कुंकवाचा टिळा कपाळावर लावल्या जाणे. भिवाच्या सासऱ्याला भक्ती विद्येत करपावली विद्या (बोटाच्या इशाऱ्याची भाषा) गुरूने शिकविली असे सांगण्यात येते.

'टाहो' या बाबाराव मडावीच्या कादंबरीत आदिवासी जीवनात निसर्ग प्रेम खोलवर रूजलेले दिसून येते. आदिवासी जंगलात स्वच्छंदी पक्षाप्रमाणे आनंदी राहतात. एखादं जरी तोडल्या गेल तर त्याचा घाव त्यांच्या मनावर बसलेला दिसतो. त्यांना झाडे, फांदी तोडायची असेल तर झाडाची माफी मागत दुसरं झाड लावून वाढविण्याची प्रतिज्ञा घेत फांदी तोडतात. या जंगलावर त्यांची श्रद्धा असते. व त्यासाठी आपला प्राण देण्याची तयारीही ते दाखवितात. एकेकाळचा भिवसन या आदिवासी राजाने आदिवासीसाठी भरीव कार्य केले व त्याचे पूजा करण्याच्या प्रथेला पुढे अंधःश्रद्धेचे स्वरूप लोकांनी प्राप्त करून दिल्याचे दिसतात. अंगात देव आला असे म्हणणाऱ्या म्हादूला भिवा अनेक प्रश्न विचारीत, पोलिसांच्या हवाली करतो. आदिवासींना खुळ्या समजूतीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो.

## • आदिवासी कथासंग्रहातून आविष्कृत होणारे घटक :–

(निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे)

आदिवासी कथासंग्रहातून या घटकांचा अविष्कार होताना दिसतो. 'अहेर' या कथासग्रहातील उषाकिरण आत्रामच्या 'अहेर' या कथेतून आदिवासी माणसाचे सौंदर्य निसर्गप्रतिमातून दाखविले आहे.'' सोमा ताडामाडासारखा उंच धिप्पाड, रमीही चिकण्यामातीसारखी सावळी, मोठ्या डोळ्यांची, लाल ओठ पिकल्या कलिंगडासारखे, उडणारे भुरके केस तिखाडी गवत फुलासारखे, रानजुईसारखी लाजरी व इंद्रायणी सारखी सदैव खळखळ हसणारी.''[१०] 'परिवर्तन' या कथेत निग्री गावच्या गोंड समाजात. हरीकिशन, राधाकिशन व देवनाथ सारखी हिंदू धर्मिय माणसे हिंदू धर्माचा प्रचार करण्यासाठी त्यांच्या गळ्यात जाणवे अडकवितात. गोंडाना त्यांच्या धार्मिक प्रतिमांचा विसर पडू लागतो. घराघरात बडा देवपूजा, रावणपूजा, बिदरी पूजा व गौरापूजा बंद होऊन रामकृष्णाचे फोटो लावल्या जातात. भोळ्या–भाबड्या अज्ञानी लोकांचा फायदा घेत हिंदू धर्मिय माणसे सोयीस्करपणे त्यांना हिंदू धर्माच्या जाळ्यात ओढतात. पण गोंड जमातीचा शिकून कलेक्टर झालेला मुलगा पुढे गावात परिवर्तन घडवून आणतांना दाखविले आहे. आदिवासी मातृदेवता व गुरूंचा उल्लेख होताना दिसतो. शिंगा–शिंगी (माता–पिता स्वरूपात वंशवृद्धी करणारी देवता) लाकडी प्रतिकांच्या स्वरूपात पूजल्या जाते चेलिक हा गोटूलातील गुरू असतो तसेच ते चंद्र, सूर्य, नद्या, वृक्ष यांचीही पूजा करताना दिसतात.

प्रा. माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहात प्रस्तुत घटकातील काही भागांचा आविष्कार होताना दिसतो 'बरड' ही कथा आदिवासींच्या भगतगिरी व जादूटोणा (यातुविद्या) या अंधःश्रद्धेवर आधारलेली आहे. बरडाच्या रस्त्यावर जखीण आहे. असा भ्रम गावात आधिच रूढ असतो. त्यात शहरात शिकून घराकडे येणाऱ्या खंडूला बरडाच्या रस्त्यावर मानवी आकृती दिसते. तो घाबरून घरी पळत येतो. किसनु वैदुच्या हाताने पाण्यात राख टाकून व मंत्र पुटपुटुन त्याला पाणी देतो. दोन घोट पाणी त्याला पाजून, त्याच्या अंगावरून पाण्याचा गडवा उतरवून गडव्यातील पाणी गावाच्या शिवेवर नेवून टाकले जाते. खंडू जखीण समजून डोणगावच्या वेड्या स्त्रीला, जी बरडाच्या रस्त्यावर फिरत असते. सर्व गावासमोर जळत्या कोलीताचे चटके देत, मारझोड करीत तिच्या डोळ्यात

सुया–दाभणा टोचून मारल्या जाते. गावाची अंध:श्रद्धा एका निरपराध स्त्रीचा जीव घेताना दाखविले आहे. 'बैंगणदा' ही कथा आंध जमातीच्या इंगळी, विंचू याचे विष चढणे व उतरविणे या समजुतीवर प्रकाश टाकते. बैंगणदा कमरेच्या करदोड्यात दहा–बारा इंगळ्या बांधतो. व त्याची माळ गळ्यात घालतो. इंगळ्या त्याच्या छातीला डंख मारतात. व तो निर्विकार असतो. इंगळ्यातील विष त्याने काढून टाकले असावे.

'ताडमं' या कथासंग्रहातील 'मी मेलोच नाही' ही कथा राझीचा नवरा सणवाऱ्या एकाएकी अनेक महिणे घरी न आल्यामुळे तो मेला असे गृहित धरून राझी व तिची मुले जंगलात वाघाने फोडून खाल्लेले प्रेत सणवाऱ्याचे समजून त्याचा अंत्यविधीही करतात. शहरात कामासाठी गेलेला सणवाऱ्या जेव्हा घरी येतो तेव्हा घरचे लोक त्याला सणवाऱ्याचे भूत मानतात. 'करणी' या कथेत फकिऱ्या मांग जादू व करणी करणारा म्हणून सगळा गाव त्याला घाबरतो. पाटलाची गाभण गाय त्याने मारली. या संशयाखाली फकिऱ्याच्या गर्भार मुलीवर पाटलाचा मुलगा शेतात बलात्कार तर करतोच व घरी फकिऱ्याला मारझोड करताना मध्ये आलेल्या गर्भार देवकीच्या पोटावर लाथ मारून तिचा गर्भ पाडल्या जातो. व हिशोब बरोबर झाल्याचे सांगितल्या जाते. या दोन्ही कथा समाजाच्या अंध:श्रद्धेवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

बाबाराव मडावींच्या 'भाकर' या कथासंग्रहात सदर घटकांचा आविष्कार होताना दिसत नाही, नजुबाई गावित यांच्या 'नवसा भिलणीचा एल्गार' या कथासंग्रहात सदर घटकांचा आविष्कार होताना दिसतो. 'मी ह्येर ना, नदी सय!' या कथेत मावची जमातीत मृत हाडक्याचा दिवस करण्यासाठी मांगट्या घर विकून टाकतो. सोन्या पिंपळनेरला मिटरभर कापड आणतो मातीचा माणूस बनवून, त्याला तो कापड गुंडाळून खड्डा करीत जमीनीत त्याला पुरतात. दारू पिवून हाडक्याचा दिवस मनवतात. 'बांबूची मोळी' या कथेत वाघदेवाला पूजण्यासाठी बोकड कापला जातो. दिनकरला वाघदेव बनवतात. त्याच्या हातापायांना कांबळी बांधून तो वाघासारखा चालू लागतो. गावातील लोक त्याला मागून ढेकळं दगडं मारीत गाई–बकऱ्या यानंतर खाऊ नकोस असे सांगतात. शेंदूर फासलेल्या दगडाला वागदेव समजून त्याच्यासमोर नारळ फोडून बोकडं कापतात पेरण्यादेव व काळ्या मेघाची पूजा करताना कोंबडा कापून उत्सव साजरा करतात. शेतीच्या कामाला त्यानंतरच सुरवात करतात. खळ्यावर धान्य टाकण्या अगोदर खळ सारवून घेतल्या जाते. अंग धुवूनच खळ्याला बंधन घालतो. (जिचे रक्षण करायचे तिच्या भोवती राख व दारूची धार ओततात. अशुभता, दारिद्रय व मृत्यू येऊ नये म्हणून) गरी (धान्य) जवळ जाऊन गोमूत्र शिंपडतात. तुळशी (दिवा) तुपात लावून धूप दिल्या जातो. मगच गरी खळ्यात पसरवितात. खळ्यावरील धान्याची रास घरी आणतांनाही पळसाची फुलं व आपट्याची पानं राशीवर खोचतात. नारळ फोडून राशीजवळ कोंबडा कापतात. व राशीभर त्याचे रक्त शिंपडतात. दारूच्या साका (जमीनीपर थेंब) पाडल्या जातात. नागीलीची रास पायाने चेंदवून नागीली घरी नेल्या जाते. मेलेल्या माणसाचा तिसरा दिवस कोलाम जमात जमीनीत पुरलेल्या माणसाला बाहेर काढीत त्याला दागिणे, नवे कपडे घालतात. त्यासोबत त्याच्या बायकोला उभे करीत त्याच्या धोतराची गाठ तिच्या पदराशी बांधतात. बाया माणसं भेटून त्यांच्या खोळ (झोळीत) पैसा टाकतात. त्या दोघांना हळद कुंकू लावल्या जाते, गळ्यात हार घालून एकाच खाटेवर दोघांना झोपवितात व खाट उचलून पुढे चालतात. तुर थाळीवाले वाजवतात. मृत माणसाची आई खोळात रडत रडत पिठ व पिकलेले उंबर टाकते. अर्ध्या वाटेवरून बायकोला खाटेवरून उतरवितात. ती नवऱ्याच्या प्रेतावर पडून रडते. तिला घरी आणल्या जाते. 'जानकीची सिता' या कथेत बाळंतपण करणाऱ्या सुईणीचे दाम ज्याला 'रित' म्हणतात ते जोपर्यंत सुईणीला मिळत नाही तोपर्यंत सुईनीच्या तोंडात पोराची वार पडते असा समज आदिवासींचा दिसून येतो. 'कुत्तरखांब' या कथेत आदिवासी लोक रगडणी सुरू झाल्यापासून खळ्यात जेवण ठेवल्याशिवाय जेवत नाही. बायका कुंकू लावल्याशिवाय खळ्यात येत नाहीत. 'भूताळ्या' या कथेत जादुटोणा (यातुविद्या) या अंध:श्रद्धेवर भाष्य होताना दिसते.

अशा प्रकारे एकूणच आदिवासी साहित्यातील कविता, कादंबरी, कथासंग्रहात निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे याचे वर्णन थोडक्यात दर्शविलेले आहे.

## निष्कर्ष :–

१. आदिवासी साहित्यातील कविता, कादंबरी, कथासंग्रह या साहित्यप्रकारात निसर्ग, यातूविद्या, कुलदैवतपूजा, श्रद्धा धर्मतत्त्वे याविषयीचे वर्णन वस्तुनिष्ठ स्वरूपात चित्रित केले आहे. मात्र आदिवासी स्वकथनात याविषयीचे वर्णन फारसे होताना दिसत नाही.

२. आदिवासी साहित्य चित्रणातून आदिवासी समाजाची निष्ठा सदर जिवनतत्त्वावर असलेली दिसते.

३. मानवी मनाला अंतर्मुख करणारे हे चित्रण स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी समाजाची विदारक अवस्था प्रभाविपणे स्पष्ट करते.

## संदर्भ टीपा :—


१. डॉ. प्रमोद मुनघाटे (संपा.), आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, सुगाावाा प्रकाशन, पुणे, २००७,पृ.३४
२. विलास वाघ (संपादक), सुगावा, प्रेरणा विशेषांक, डिसेंबर ९९, अंक ४,पृ. ५
३. भुजंग मेश्राम, अभुजमाड,लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००८,पृ. ८५
४. भुजंग मेश्राम, ऊलगुलान, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आ. दु. १९९५,पृ.६८
५. डॉ. विनायक तुमराम, गोंडवण पेटले आहे, एकलव्य प्रकाशन,चंद्रपूर, १९८७ पृ. ५०
६. माधव सरकुंडे, मी तोडले तुरूंगाचे दार, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, २०११,पृ. २७
७. प्रभू राजगडकर, निवडुंगाला आलेली फुले, प्रणील प्रकाशन, चंद्रपूर, २०१२, पृ. ५५
८. माधव सरकुंडे, वाडा, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १९९६, पृ. ८९
९. नजुबाई गावित, तृष्णा, सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. १०
१०. डॉ. माहेश्वरी गावित, महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध, दास्ताने रामचंद्र प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ४१९ — ४२०


❖❖❖

# नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथा साहित्यातील पृथगात्मता

डॉ. अशोक भक्ते
प्राध्यापक
नगर परिषद शिवाजी महा., मोवाड
ता. नरखेड, जि. नागपूर, महाराष्ट्र (India)
इ मेल ashokbhakte00@gmail.com भ्रमणध्वनी ९२२६८५६७८८

## गोषवारा (Abstract)

१९६० चा कालखंड मराठी साहित्याात आशय आणि अभिव्यक्तिच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानला जातो. या काळात संस्कृतीसंबंधीचे नवे भान मराठी साहित्यातून प्रसिद्ध होऊ लागले. या काळात एकूणच मराठी साहित्य अंतर्मुख झाले. या काळात मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी असे प्रवाह उदयास आले. शिक्षणाचा विस्तार झाला. वंचिताचे होणारे शोषन हे या प्रवाह निर्मितीमागील कारण होते. परिणामी समाजाच्या प्रत्येक स्तरातून बहुजन समाजातून, तळागाळातून, खेड्यापाड्यांतून समोर आलेल्या नवशिक्षित वर्गातील नव्या दमाच्या अनेक कथाकारांनी समाजातील वेगवेगळे प्रश्न, समस्या, दु:ख, दैन्य, दारिद्रय शोषन, अत्याचार कथासाहित्यातून मांडले. या काळातील कथाकारांनी मराठी कथेची कक्षा रूंदावली. मानवी जीवनातील विविधांगी दर्शन या काळातील कथाकारांनी घडविले. याच स्वरूपाचे दर्शन नागनाथ कोत्तापल्लेंनी आपल्या लघु व दीर्घ कथेमधून घडविले.

संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, शाहु महाराज, कार्लमार्क्स, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून व प्रभावातून कोत्तापल्लेंचे वैचारिक व ललित साहित्य फुललेले दिसते. त्यामुळे शोषित, वंचित, श्रमिक, शेतकरी यांचे दु:ख, दैन्य, दारिद्रय आपल्या कथेच्या माध्यमातून मांडतात. कोत्तापल्लेंचे अनुभवक्षेत्र ग्रामीण आणि नागरी अशा संमिश्र स्वरूपाचे असल्यामुळे त्यांच्या लघु व दीर्घ कथेचे स्वरूप व्यामिश्र व बहुपेडी स्वरूपाचे आहे. कारण कोत्तापल्ले ग्रामीण भागात बालपणापासून अनेक ठिकाणी फिरल्यामुळे व तेथे शिक्षण घेत असतांना आलेले जीवनानुभव व १९७१ ला प्रथम बीड येथे प्राध्यापक असतांना पाणी न पडल्यामुळे पडलेला दुष्काळ व त्या दुष्काळग्रस्त भागात अरूण लिमये सोबत घेतलेले प्रत्यक्ष अनुभव कोत्तापल्लेंना अस्वस्थ करतात. दुष्काळग्रस्त भागातील जातीय तणाव व त्या तणावातून निर्माण झालेली ग्रामीण—नागरी भागातील दैनावस्था व तेथील वंचित व पिचलेल्या लोकांचे दु:ख व ग्रामीण—नागरी भागातील राजकीय, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, साहित्य, सहकार अशा विविध क्षेत्रातील अपप्रवृत्ती व भ्रष्टप्रवृत्ती कोत्तापल्ले कथेच्या माध्यमातून मांडतात.

## प्रास्ताविक

नागनाथ कोत्तापल्ले हे एक महत्वाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व. मराठी साहित्यक्षेत्रात त्यांच्या ललित साहित्यविषयक लेखनाने अमीट अशी छाप पडली. कोत्तापल्लेंनी ग्रामीण, दलित, नागरी अशा विविध संवेदनानुभवाने त्यांनी त्यांचे लेखनकार्य सतत केले असून त्यांनी सात कथासंग्रह, तीन कादंबऱ्या आणि एक कवितासंग्रहए एक ललित गद्य अशी लेखनाची देणगी मराठी ललितसाहित्यक्षेत्रास दिली आहे. त्यामधील त्यांच्या कथा साहित्याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

मराठी साहित्यात 'कथा' या वाङ्मयप्रकाराला महत्वाचे स्थान आहे. मराठी साहित्याचे दालन विविध साहित्यप्रकारांनी समृद्ध झालेले दिसते. त्यामध्ये कथा—साहित्य विशेष आकर्शित करून जाते. नागनाथ कोत्तापल्ले यांनी देखील साधारणत: १९७० पासून कथालेखनाला सुरूवात केली. त्यांची 'एककथा' ही पहिली कथा 'प्रतिष्ठान' डिसेंबर १९७० च्या अंकात प्रसिद्ध झाली. तेव्हापासून आजपर्यंत विपूल कथालेखन केले. एकूण कोत्तापल्लेंचे सात कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. लघुकथा आणि दीर्घकथा या दोन्ही प्रकारच्या कथा कोत्तापल्लेंनी लिहिल्या. 'कर्फ्यू आणि इतर कथा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९८० साली प्रसिद्ध झाला. याशिवाय

'काफिला', 'संदर्भ', 'राजधानी', 'रक्त आणि पाऊस', 'कवीची गोष्ट', 'सावित्रीचा निर्णय' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. उत्तम कथालेखनाचा पुरस्कारही त्यांना मिळाला.

## कोत्तापल्ले यांच्या कथा साहित्यातील पृथगात्मता

१९६० नंतरच्या कालखंडात मराठी वाङ्मयात जे लेखक झपाट्याने समोर आलेत त्यात नागनाथ कोत्तापल्ले यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. साठोत्तरी मराठी साहित्याची बहुआयामी, बहुप्रवाही आणि अनेककेंद्रित्व ही ठळक लक्षणे मानली गेली आहेत. समष्टीवादी लौकिकतावादी जीवनजाणिवांचा प्रभाव हेही या साठोत्तरी साहित्यप्रवाहाचे महनीय वैशिष्टये होय. या साठोत्तरी साहित्यप्रवाहाने एकूणच मराठी साहित्याला विलक्षण समृद्ध व संपन्न केले. वाङ्मयीन अभिरूचीचे, साहित्यसंस्कृतीचे आणि सशक्त आशयरूपांचे क्षितिज या साठोत्तरी साहित्यप्रवाहाने निश्चितपणे रूंदावले आहे. साठोत्तरी साहित्यातील दलित, आदिवासी, जनवादी, मुस्लिम, स्त्रीवादी आणि नवग्रामीण इ. ठळक साहित्यप्रवाह होत. अशा नव्या उमेदीच्या कालखंडात नागनाथ कोत्तापल्ले यांच्या साहित्यनिर्मितीला सुरूवात झाली.

१९७० ते १९८० च्या दरम्यान कोत्तापल्लेंनी साहित्यलेखनास सुरूवात केली. दरम्यानच्या काळात मराठी साहित्याने निरनिराळी वळणे घेतली. या काळात वाङ्मयाच्या विविध प्रवृत्ती आणि प्रवाहांचा परिणाम कोत्तापल्लेंवर झाला. अशा कालखंडात कोत्तापल्लेंनी कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, ललित गद्य, संशोधन, संपादन असे विविधांगी लेखन केले. स्वातंत्र्योत्तर भारतातील ऱ्हासमान समाजजीवन हा नागनाथ कोत्तापल्लेंमधील लेखकाला आतून अस्वस्थ करणारा एक ठळक विषय आहे. या समकालीन पतनशील जनवास्तवाने कोत्तापल्लेंच्या एकूणच वाङ्मयाला व्यापून टाकले आहे.

मराठी साहित्यातील विविध प्रवाहाला प्रतिष्ठा मिळवून देणारे लेखन अनेक लेखकांच्या माध्यमातून झाले. अनेक लेखक संप्रदाययुक्त होते. परंतु कोत्तापल्लेंची प्रतिभा एकाच जाणिवेतून, संप्रदायातून फुललेली दिसत नाही. व्यामिश्र अशा जाणिवेतून त्यांनी लेखन केलेले दिसते. कारण कोत्तापल्लेंच्या कथा, कादंबऱ्यांचा आढावा घेत असताना, कोत्तापल्लेंचे लेखन प्रत्यक्ष जीवनानुभवातून झालेले दिसते. साहित्यातून कलात्मक आविष्कार मांडला म्हणून त्यांचे लेखन व्यामिश्र व बहुपेडी वाटते.

१९६० चा कालखंड मराठी साहित्याात आशय आणि अभिव्यक्तिच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानला जातो. या काळात संस्कृतीसंबंधीचे नवे भान मराठी साहित्यातून प्रसिद्ध होऊ लागले. या काळात एकूणच मराठी साहित्य अंतर्मुख झाले. या काळात मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी असे प्रवाह उदयास आले. शिक्षणाचा विस्तार झाला. वंचिताचे होणारे शोषन हे या प्रवाह निर्मितीमागील कारण होते. परिणामी समाजाच्या प्रत्येक स्तरातून बहुजन समाजातून, तळागाळातून, खेड्यापाड्यांतून समोर आलेल्या नवशिक्षित वर्गातील नव्या दमाच्या अनेक कथाकारांनी समाजातील वेगवेगळे प्रश्न, समस्या, दु:ख, दैन्य, दारिद्रय शोषन, अत्याचार कथासाहित्यातून मांडले. या काळातील कथाकारांनी मराठी कथेची कक्षा रूंदावली. मानवी जीवनातील विविधांगी दर्शन या काळातील कथाकारांनी घडविले. याच स्वरूपाचे दर्शन नागनाथ कोत्तापल्लेंनी आपल्या लघु व दीर्घ कथेमधून घडविले.

संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, शाहु महाराज, कार्लमार्क्स, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून व प्रभावातून कोत्तापल्लेंचे वैचारिक व ललित साहित्य फुलले दिसते. त्यामुळे शोषित, वंचित, श्रमिक, शेतकरी यांचे दु:ख, दैन्य, दारिद्रय आपल्या कथेच्या माध्यमातून मांडतात. कोत्तापल्लेंचे अनुभवक्षेत्र ग्रामीण आणि नागरी अशा संमिश्र स्वरूपाचे असल्यामुळे त्यांच्या लघु व दीर्घ कथेचे स्वरूप व्यामिश्र व बहुपेडी स्वरूपाचे आहे. कारण कोत्तापल्ले ग्रामीण भागात बालपणापासून अनेक ठिकाणी फिरल्यामुळे व तेथे शिक्षण घेत असतांना आलेले जीवनानुभव व १९७१ ला प्रथम बीड येथे प्राध्यापक असतांना पाणी न पडल्यामुळे पडलेला दुष्काळ व त्या दुष्काळग्रस्त भागात अरूण लिमये सोबत घेतलेले प्रत्यक्ष अनुभव कोत्तापल्लेंना अस्वस्थ करतात. दुष्काळग्रस्त भागातील जातीय तणाव व त्या तणावातून निर्माण झालेली ग्रामीण—नागरी भागातील दैनावस्था व तेथील वंचित व पिचलेल्या लोकांचे दु:ख व ग्रामीण—नागरी भागातील राजकीय, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, साहित्य, सहकार अशा विविध क्षेत्रातील अपप्रवृत्ती व भ्रष्टप्रवृत्ती कोत्तापल्ले कथेच्या माध्यमातून मांडतात.

कोत्तापल्लेंनी ग्रामीण, स्त्रीप्रधान, दलित, सामाजिक, मनोविश्लेषणात्मक उपहासात्मक अशा अनेक आशयाच्या कथा लिहिल्या. त्यामध्ये ग्रामीण–नागरी भागातील शोषित–पिचलेल्या स्त्रीयांचे दु:ख तसेच वतनदार, पाटील, देशमुख, महाजन घराण्यातील स्त्रीयांवर होणारा अत्याचार, शिक्षण क्षेत्रातील अधिकारापासून वंचित स्त्री, शेतकऱ्यांचे दु:ख, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सहकार, साहित्य या विविध क्षेत्रातील भ्रष्ट व अपप्रवृत्ती, आदर्श शिक्षकाची व्यथा, हिंदू–मुस्लिम ऐक्य, अस्पृश्य, वंचित लोकांचा अधिकारासाठी चाललेला संघर्ष अश्या संमिश्र स्वरूपाचा आशय कोत्तापल्लेंच्या अनेक कथांचा आहे. यामध्ये रक्त आणि पाऊस, पराभव एका लेखकाचा, गुंता, राखन, दिवा, दाद, चक्र, अंतर, चक्रव्यूह, वारसा, कुंडली, काजवे, मुख्यमंत्र्याची भेट, कवीची गोष्ट, लव्हमॅरेज, पाणी, धुके आणि कुबड, दसरा उजाडला, उघड्या आभाळा खालची दिंडी, राजधानी, वंशज, पर्याय या सर्व समिश्र आशयाच्या कथा महत्वपूर्ण आहे.

विशेषत: कोत्तापल्लेंच्या कथांमधून तळागाळातील ग्रामीण स्त्रीयांच्या शोषणासोबत, दु:खासोबत तेथील देशमुख, देशपांडे, पाटील, वतनदार यांच्या घराण्यातील स्त्रीयांचे दु:ख, शोषन स्त्रीप्रधान कथांमधून चित्रित करतात, मांडतात. त्यामध्ये सावित्रीचा निर्णय, राखन, अहास्तांतरणीय, काळोख हुंकार, कुंडली, पीठ, वंशज, काळोख या कथा स्त्रीप्रधान आशयाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. भारतीय संस्कृती स्त्रीला श्रेष्ठत्व देते, स्त्री म्हणून तिचा मोठा गौरव करते आणि दुसरीकडे तिचे भावनिक, शारीरिक, मानसिक शोषन करते. व्यवस्थेने धर्मशास्त्राचा आधार देऊन पुरूषप्रधान संस्कृती निर्माण केली व तिला एखाद्या वस्तूप्रमाणे दान करण्यापर्यंत मजल गाठली आणि या आपल्या संस्कृतीच्या विरोधात तिने बंड करू नये म्हणून तिला जन्मापासून मरेपर्यंत पुरूषाच्या आधीन ठेवले. तिला मुक्तपणे आपले मत मांडण्याचा सुद्धा अधिकार धर्मशास्त्राने, पुरूषप्रधान संस्कृतीने नाकारला. कोत्तापल्ले आपल्या काही कथांमधून अशा अगतिक, हतबल स्त्रीयांचे दु:ख मांडतात. उदा. 'सावित्रीचा निर्णय' या कथेमध्ये सावित्रीचा पती सदानंद तारूण्यातच मरण पावतो आणि धर्मशास्त्राप्रमाणे मनात इच्छा नसतांनाही सुंदर तरूण सावित्रीला पती सदानंद सोबत सती जावे लागते. धर्मशास्त्राप्रमाणे विधिवत विधी होतो, मंत्रोच्चार होतो आणि अग्नीडाग दिल्या जाणार एवढ्यत सावित्री निर्णय घेते आणि चितेवरून उडी मारून जिवाच्या आकांताने ती सैरावैरा पडते आणि येथून स्त्री जीवनाच्या नव्या इतिहासाची क्रांती घडते. अशाप्रकारे कोत्तापल्ले आपल्या अनेक कथांमधून जाचक रूढी, परंपरा, अन्याय, अंधश्रद्धा, शोषण अशा अनेक गोष्टीपासून स्त्रीयांची मुक्तता करून नव्या उमेदीने जीवन जगण्याची प्रेरणा देते. अशाप्रकारे कोत्तापल्ले आपल्या अनेक कथांमधून अत्याचारित व मानसिकदृष्ट्या अपंग झालेल्या स्त्री मनाचा शोध कोत्तापल्ले घेतात..

'रक्त आणि पाऊस' ही ग्रामीण आशयाची आगळी–वेगळी महत्वपूर्ण कथा आहे. या कथेत दुष्काळाने हतबल झालेल्या शेतकऱ्याची व्यथा रेखाटली आहे. त्याच्या कुटूंबाची दैनिय अवस्था मांडली आहे. भीषण दुष्काळ पडतो. शेतकरी शिवाला गावामध्ये राहून कुटूंबाचे पोट भरणे कठीण झालेले असते. गरीब शिवा त्याची सुंदर पत्नी राधा व दोन मुले सुमन आणि माधव असं कुटूंब असतं. शिवा पत्नी राधा व दोन मुलांना गावामध्ये ठेवून तो कामाच्या शोधासाठी मुंबईला जातो. गावातील भोगलोलूप व धुर्त लोक तरूण राधाच्या गरिबीचा फायदा घेतात. गावचा शिक्षक तरूण राधाला मुलासह बायको म्हणून स्विकारतो. शिवा मुंबईवरून आल्यानंतर कुटूंबाची झालेली वाताहत त्याला बघवत नाही. तो अस्वस्थ होतो. पण अशा अवस्थेत तो काहीच बोलू शकत नाही. फक्त आतल्या आत पेट घेतो, पण तो काहीच करू शकत नाही. आपल्या बायको मुलांना न भेटणारा शिवा अचानक पाऊस पडताच बेभान होतो. त्याच्या चित्तवृत्ती फुलतात. शिवा पत्नी मुलासाठी तो मास्तरकडं बंडखोर बनतो. अशाप्रकारे कोत्तापल्ले आपल्या या कथेत शेतकऱ्यांच्या आशा, आकांक्षा पल्लवित करणारा पाऊस आणि पावसाअभावी शेतकऱ्यांच्या कुटूंबाची झालेली दुरावस्था कोत्तापल्ले चित्रित करतात. 'वारसा' ही दीर्घ कथा तर हिंदू–मुस्लिम ऐक्य दर्शविणारी कथा आहे. या कथेत आबेदचाचाच्या मुस्लिम घराण्यातील 'दर्गा आणि पंढरपूरची वारी' अशा दोन कट्टर परंपरेचा संगम साधून भारतीय समाजात राष्ट्रीय ऐक्य, धर्मनिरपेक्षता साधण्याचा प्रयत्न 'वारसा' या कथेद्वारे केला तर 'उघड्या आभाळाखाली दिंडी' ही कथा ग्रामीण भागामधील अस्पृश्य–दलित व सवर्ण यांचा भेद संपविणारी कथा आहे. अस्पृश्यांना हक्क–अधिकार प्राप्त करून देणारी ही ग्रामीण जीवनातील अस्पृश्यांचं आगळ–वेगळं जीवनदर्शन दर्शविणारी ही कथा आहे. अशाप्रकारे नागनाथ कोत्तापल्ले यांनी कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील वेगवेगळ्या वंचित घटकांच चित्र आपल्या कथेमधून रेखाटले आहे. कोत्तापल्ले स्वत: म्हणतात, ''१९७३ च्या दरम्यान पाऊस न पडल्याने अस्वस्थ होणाऱ्या प्राध्यापकाचे चित्र मी एका कथेत रेखाटले होते. पुढे 'रक्त आणि पाऊस' या कथेतही दुष्काळाने हतबल झालेला शेतकरी मी रेखाटला आहे. एवढेच नाही तर पावसाची

चाहुल लागताच तो कसा बंडखोर होतो याचेही चित्रण केलेले आहे. 'राजधानी', 'वारसा', 'कुंडली', 'वंशज', 'गुंता', 'दार', 'लेखकाचा पराभव' या आणि यासारख्या माझ्या अनेक कथांमधून येणारा भु–प्रदेश ग्रामीणच आहे. गमतीची गोष्ट अशी की रूढ ग्रामीण कथेपेक्षा हे वेगळे लेखन असूनही त्याचे वेगळेपण नोंदविले गेले नाही. अलिकडे मी एक कथा लिहली आहे. 'उघड्या आभाळाखालची दिंडी' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतरचा काळ आणि त्या काळातील शिकणाऱ्या दलित मुलांचे आयुष्य उभे करण्याचा मी प्रयत्न केला आहे. दलित ग्रामीण मुलांसाठी वस्तीगृह चालविणारा एक गृहस्थ आणि त्याची होणारी कोंडी हेही या कथेत येते. परंतु ही कथा ज्या भू–प्रदेशात घडते तो भू–प्रदेश आहे ग्रामीण महाराष्ट्राचा!''[१] अशाप्रकारे कोत्तापल्लेंनी ग्रामीण साहित्य आणि कृतिशीलता लेखात व्यक्त केलेल्या मतानूसार त्यांच्या ग्रामीण, व्यमिश्र आशयाच्या कथा असल्या तरी त्या कथांमधून येणारा भू–प्रदेश ग्रामीण महाराष्ट्र मराठवाड्यांचाच आहे. त्यांचा कथांचा आवाका व्यापक आहे. तो एकअंगी नसून बहुअंगी आहे. माणसाचा हरवलेला चेहरा देण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथेत आहे. त्यांनी ग्रामीण समग्र वास्तव रेखाटले आहे. माणसांच्या व्यथा, वेदना, दुःख, कष्ट, विसंगती माणसाचा झालेला मूल्यऱ्हास प्राप्त करणाऱ्या कथा आहे. म्हणून कृषी संस्कृतिशी निगडीत असलेल्या रूढ ग्रामीण कथेपेक्षा वेगळेपण नोंदविणाऱ्या कोत्तापल्लेंच्या ग्रामीण कथा आहे. म्हणून डॉ. शंकर राऊत म्हणतात, ''कोत्तापल्ले बदलत्या ग्रामीण भागातील दुःखाचे शोषणाचे आणि व्यथांचे केवळ निवेदन करीत नाहीत, तर या पिचलेल्यांची अंर्तविरोधाची किंवा एकूणच बदलाची राजकीय, सामाजिक व आर्थीक व्यवस्थेत असलेली कारणे शोधत जातात. म्हणूनच कोत्तापल्लेंचे लेखन वाचणाऱ्याला अंतर्मुख करते, विचार करायला भाग पाडते''[२] अशा कोत्तापल्लेंच्या अनेक वैशिष्ट्यांमुळे व ग्रामीण व नागरी भागातील झपाट्याने बदलत जाणाऱ्या समाजजीवनाचे वास्तव कथेच्या माध्यमातून ते मांडतात. म्हणून रूढ ग्रामीण कथेपेक्षा कोत्तापल्लेंची ग्रामीण कथा वेगळी वाटते.

रक्त आणि पाऊस, हकिकत : वास्तवातली, देवाचे डोळे, पाऊस, राखन, मया, कातिमिरे भेटली सूर्या जैशी, लव्हमॅरेज, काफिला, सावित्रीचा निर्णय, दसरा उजाडला, शिस्त, चक्र, पीळ, कुंडली, वारसा, राजधानी, मुख्यमंत्र्याची भेट, कवीची गोष्ट, दाद, दिवा, चक्रव्यूह या सर्व कथा वाचनीय असून मानवी मनाचे विविध कंगोरे दाखविणाऱ्या आहेत. कोत्तापल्लेंनी स्वतः ग्रामीण जीवन भोगलेलं आहे, तिथल्या समस्या ते जगलेले आहेत. म्हणून कोत्तापल्लेंचे समृद्ध अनुभवविश्व कथा वाचतांना जाणवत राहतांत.. वाचनीयता या कथांचा विशेष आहे जो कथेला आवश्यक असतो.

कोत्तापल्लेंच्या कथेची भाषा साधी, सरळ, सोपी, प्रवाहपूर्ण आहे. कथेला सौंदर्यप्राप्त करण्यासाठी प्रतिमा, प्रतीके म्हणी वाक्प्रचार याचाही वापर कोत्तापल्ले करतात. प्रसंगानुसार संवाद प्रधानता व नाट्यत्मकतेचाही वापर करतात. शैली कथेच्या आशय विषयानुसार दिसते तर कथांच्या कथानकामधून कोत्तापल्ले जीवनानुभवांच्या माध्यमातून समाजजीवनातील वास्तव जाणीव प्रकट होतांना दिसते. कथा साहित्यामधील व्यक्तिचित्रणामधून मानवी जीवनाच्या जीवंतपणाचा साक्षात्कारी अनुभव येतो. कोत्तापल्लेच्या व्यक्तिचित्रणाबाबतीत प्रा.डॉ. चांदोबा तलवारे म्हणतात, ''नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणे ही वास्तवाच्या पातळीवर स्थिर असून पात्राची अनेकविधता ही त्यांची खास खुबी आहे. त्यामुळेच त्यांच्या कथांतून प्रेमी पुरूष, आदर्श पुरूष, दार्शनिक चिंता दाखविणारा पुरूष, गृहस्थ पुरूष, खंबीर पुरूष, कर्मठ पुरूष, कामांध पुरूष असे पुरूषांचे विविध नमुने आलेले आहेत. तर स्त्रियांमध्ये सफल प्रेमिका, असफल प्रेमिका, सद्‌गृहस्थी स्त्री, फॅशन विलासिनी स्त्री, विधवा देहविक्रय करणारी नर्तकी, राजनिती, शेतकरी, मजूर, आधुनिक स्त्री अशा कितीतरी स्त्रिया या कथांतून आलेल्या आहेत.''[३] प्रा. चांदोबा तलवारे यांचे प्रस्तुत मत कोत्तापल्लेंच्या व्यक्तिचित्रांबाबतीत समर्थनीय आहे. त्यांच्या कथेतील पुरूष स्त्रिया व्यक्तिचित्र विविध स्तरांतील असून त्यांचे मानसविश्व भिन्नभिन्न स्वरूपाचे आहे. पात्रांना सजीव करणं हा कोत्तापल्ले यांच्या प्रतिभेचा एक विशेष होय. प्रसंग आणि संवाद यामधून ही पात्र जिवंत होतात. वाचकाला हे सर्व प्रसंग आपल्या डोळयांपुढं घडत असल्याचा प्रत्यय येतो.

एकूणच कोत्तापल्लेंच्या सर्व कथासंग्रहामधून बदलत्या ग्रामीण जीवनातील जगण्याचं धगधगतं वास्तव सांगणाऱ्या आहे. कोत्तापल्ले यांच्या कथा समाजातल्या तळागाळापर्यंत जाऊन तिथल्या भीषण वास्तवाचा वेध घेतात. एकूणच मानवजात दुःखाच्या भोवऱ्यात कशी गरगरत आहे हे दाखवित मानवाच्या अंतरंगाचा शोध घेतांना मानवाची वृत्तीही ते प्रकट करतात. आधीची ग्राम संस्कृती व आजची ग्राम संस्कृती यामध्ये झालेला बदल, शेतीतल्या सुधारणा, सहकार, राजकारण आणि त्यातूनच समाजात निर्माण होणाऱ्या अपप्रवृत्ती याचं भेदक चित्रण कोत्तापल्ले यांनी केलेलं आहे. नागनाथ कोत्तापल्ले ह्यांच्या कथा साहित्यात जीवनानुभवातील विविधता,

बहुआयामित्व, समष्ठीनिष्ठा, मनुष्य केंद्रित्व या बलस्थानामुळे त्यांच्यामध्ये विविधांगी वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे पैलू जाणवतात.

## निष्कर्ष

१. कोत्तापल्लेंच्या कथांचे प्रेरणास्त्रोत समाजजीवनातील शोषितांचे दु:ख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, शोषित स्त्रीयांचे दु:ख, शेतकऱ्यांचे जीवन,त्यांचे जगणे यांमधून कोत्तापल्ले यांना कथालेखनाची प्रेरणा मिळाली आणि त्यातून त्यांच्या कथालेखनाला वैविद्यता प्राप्त झालेली दिसते

२. कोत्तापल्लेंच्या बऱ्याच कथांचे स्वरूप व्यामिश्र,बहूपेढी अश्या स्वरूपाचे आहे.त्यांच्या कथांमधून सूक्ष्म विस्तारपूर्ण आशयाच्या छटा व्यक्त होतात.

३. कोत्तापल्लेंच्या कथा व्यामिश्र स्वरूपाच्या असून,ग्रामीण,दलित,स्त्रीवादी जाणिवांच्या केंद्रांना स्पर्श करणऱ्या आहे.

४. कोत्तापल्लेंचे समाजजीवनातील अनुभव सुक्ष्म आहे.विविध वृत्ती—प्रवृत्ती, मनोव्यापार, हतबलता, अगतिकता, स्वार्थलोलूपता,सुखाची लालसा अश्या अनेक पैलूंची गुंफन करून कोत्तापल्ले कथेचा आशय सशक्त करतात.

५. कोत्तापल्ले यांच्या कथेतील व्यक्तिचित्रे विविध स्तरांतील असून त्यांचे मनोविश्व भिन्न भिन्न स्वरूपाचे आहे.

## संदर्भ:

१. नागनाथ कोत्तापल्ले 'ग्रामीण साहित्य आणि कृतिशिलता'— लेख, 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही', (संपा. वासुदेव मुलाटे) औरंगाबाद, दु.आ. २००५, पृ. १०२

२. डॉ. शंकर राऊत : नागनाथ कोत्तापल्ले : साहित्य व समीक्षा', औरंगाबाद, २०१०, पृ. २०, २१

३. डॉ. संजय शिंदे (संपादक) : प्रा. चांदोबा तलवारे,'नागनाथ कोत्तापल्ले व्यक्ती आणि वाङ्मय,' औरंगाबाद, २०१०, पृ. ५६

४. नागनाथ कोत्तापल्ले :'साहित्याचा अन्वयार्थ', औरंगाबाद, दु.आ. २००८

५. वासुदेव मुलाटे 'ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा', औरंगाबाद, दु.आ. २००८

❖❖❖

# साहित्य प्रेरणा : संकल्पना व स्वरूप

प्रा. डॉ. नकुल जनार्दन धरमकर
'सार्थक', फ्रेण्डस् कॉलनी, व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती, दूरध्वनी : ०७२१–२५३१७१८

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. साहित्य जीवन निरपेक्ष असू शकत नाही. ''कोठलेही साहित्य म्हणजे जीवनातील त्रिवेणी संगमच. साहित्यिकाचे स्वत:चे जीवन, त्याच्या समाजाचे जीवन व मानवी जीवन या तीन प्रवाहाच्या संगमातूनच ललित वाङ्मयाचा जन्म होत असतो.''[१] व्यक्ती जशी समाजात वावरते तसाच कलावंत हा देखील समाजात वावरत असतो. त्यामुळे कलावंतावर सामाजिक व सांस्कृतिक वातावरण कळत व नकळत प्रभाव टाकत असते. हा प्रभाव अटळ असतो.

वस्तुत: वाङ्मयीन कलाकृती हे मानवी जीविताचे यथार्थ स्वरूपच असते. म्हणूनच साहित्य हे जीवनाचे भाष्य होय असे म्हटले जाते. जीवनाचे एक प्रकारे प्रतिबिंबित होणारे विचार सामाजिक जीवनातील आंतरविरोधाशीही निगडीत असतात. म्हणूनच जीवनातील संगती आणि विसंगती या दोहोंचाही आविष्कार साहित्यामधून घडत असतो. समाजजीवनात अनेक प्रकारचा कलहही असतो आणि समाजातील परिस्थितीनुरूप जीवनामध्ये इच्छा–आकांक्षा आणि गरजाही निर्माण होत असतात. इच्छा–आकांक्षा आणि गरजा यांची पूर्ती करण्यासाठी मनुष्य अनेक पराकाष्ठा व प्रयास करीत असतो. त्याचे प्रतिबिंब संवेदनक्षम कलावंताच्या कलाकृतीने उमटत असते, तेव्हा साहित्य आणि समाजजीवन यांचा संबंध अपरिहार्य असा असतो. तो अतर्क्य किंवा अमूर्त नसतो. म्हणूनच ''लेखनातून व्यक्त होणारा जीवनानुभव विशिष्टतेचे कवच फोडून सर्वस्पर्शी झाला पाहीजे. दुसरे असे की जे लेखन साहित्य म्हणून आपण विचारात घेतो, त्या लेखनावर लेखकाची मुद्रा असणारच.''[२] लेखक हा समाजात राहतो. समाजातच त्याला जीवनातील अनेक अनुभव प्राप्त होत असतात. त्याच अनुभवातून तो साहित्य निर्मिती करीत असतो. मग त्याच्या अनुभवाबरोबरच त्याच्या स्वत:च्या व्यक्तीमत्त्वाचा ठसा हा उमटणारच!

साहित्याचा उगम हा ईश्वरी प्रेरणेतून किंवा नैसर्गिक उर्मीतूनच होत असतो. असा एक विचार आहे. विधानातून समाज व साहित्याचा काहीही संबंध नाही, असेच प्रतिपादन करावयाचे असते. प्राचीन काळातील कवी सुद्धा अलौकिक दिव्यदृष्टी, प्रतिभा किंवा ईश्वरीय देणगी यावरच भर देत असत. थोर साहित्यिक गो. म. कुळकर्णी यांनी आपल्या मराठी साहित्यातील स्पंदने या ग्रंथात भारतीय साहित्यासंबंधी विचार मांडताना म्हटले आहे, ''भारतीय साहित्य विचार हा मूलत:च अलौकिकवादी आहे. या विचाराप्रमाणे साहित्यसृष्टी ही लौकिक सृष्टीहून पूर्णपणे वेगळी, अपार्थिव, नियतिकृत, नियमरहित अनन्य परतंत्र अशी मानली जाते.''[३] गो. म. कुळकर्णी यांनी भारतीय साहित्याविषयी मांडलेल्या विचारातून समाज आणि साहित्याचा काहीही संबंध नसतो असेच प्रत्ययाला येते. समाज हा लौकिक असून साहित्य हे अलौकिक परमेश्वरी शक्तीद्वारेच निर्माण होत असते. असे अनेक साहित्यिक, विचारवंत आणि समीक्षकही प्रतिपादन करीत असतात.

संत कवी तर आपल्या काव्यकर्तृत्वाचे श्रेय ईश्वरालाच देतात. भागवत धर्माचा पाया घालणारे श्रेष्ठ कवी श्री ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या प्रारंभी आध्यात्मिक रूपकाच्या आश्रयाने गुरूकृपेचे आवाहन करतात तसेच पहिल्या अध्यायात गणेश हे शब्द ब्रम्हाचे सगुण स्वरूप आहे असे मानले असून त्याला नमन केले आहे. हे शब्दब्रम्ह पूर्णपणे येथे अवतरले आहे. सर्व वाङ्मय हेच शब्द 'ब्रम्ह' तीच गणेशाची रेखीव मूर्ती होय. असे प्रतिपादले आहे.

''देवा तू चि गणेशु सकलार्थ प्रकाशु
म्हणे निवृत्ति दासू अवधारिजो।।२।।
हे शब्द ब्रम्ह अशेष ते चि मूर्ति सुरेख
जेथे वर्णवयु निर्दोष मिरवत असे।।३।।''[४]

''ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायाच्या प्रारंभी आध्यात्मिक रूपकाच्या आश्रयाने गुरूकृपेचे आवाहन करतात''[५] असेही लक्षात येते.

ज्ञानेश्वरांनी आपल्याला गुरू माऊलीनेच आज्ञा करावी, त्यांच्या आज्ञेनेच मी सगळी काव्यसृष्टी निर्माण करीन असे उद्‌गार काढलेले आहेत. विठ्ठलाच्या भेटीची सदैव आस लागलेल्या संत तुकारामानेही म्हटले आहे,

''माझीये मुक्तीचा नव्हे हा प्रकार, मज विश्वंभर बोलवितो''

किंवा ''आहे ऐसा देव वदवावी वाणी। नाही ऐसा मनी अनुभवावा''[६]

संत एकनाथ महाराज तर

''प्रतिपदी प्रतिपादावा परब्रम्ह । हाचि कवित्वाचा धर्म''

किंवा ''तिणे बोल बालणे मोडिले । समुळ मौनाते तोडिले,
त्यावरी निरूपण घडिले । न बोलणे बोल बोलती''[७]

असे स्पष्टपणे सांगतात. संत रामदास आपल्या संपूर्ण कार्याला परमेश्वराचेचे अधिष्ठान होते असे मानतात. ''सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे। परंतु येथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे''[८]

तेव्हा प्राचीन मराठी संत कविता सर्वार्थाने इहवादी नव्हती. तिने ईश्वर हाच सर्व मानवी व्यवहाराचा केंद्रबिंदू मानला होता, यात शंका नाही.

पंडित कवींची तर प्रेरणा काय आहे? महाभारत, रामायण, पौराणिक कथा आणि देवादिकांच्या वर्णनातच त्यांची लेखणी रंगलेली होती. कारण त्या काळात लोकांच्या जीवनाचे सारच ईश्वर भक्तीत सामावलेले होते.

शाहीरही ईश्वरी प्रेरणाच प्रमाण मानतात. उदाहरण म्हणून शाहीर हैबतीचा उल्लेख करता येईल. ''कवीराय हैबती अखंडित ध्याती नाथ पायाला, कृपाहस्त मस्तकी शिरावर आहे. कृपा छाया।।''[९] या ओळीमधून ईश्वरी कृपा–प्रसादाचा संदर्भ स्पष्ट होतो.

आधुनिक मराठी कवितेचा विचार पाहू जाता येथेही अनेक कवींनी आपली प्रेरणा ईश्वर किंवा तत्सदृश्य शक्ती हीच मानलेली दिसते.

आधुनिक क्रांतिकारी कवी केशवसुत– ''आम्ही देवाचे लाडके आहोत'' असेच उद्गार काढतात.''[१०] एवढेच नाहीतर त्यापुढे जाऊन कवी हे काव्य देवतेची भ्रमिष्ट बालके होत, असाही विचार ते मांडतात. मी काव्य लिहिले हे खरे आहे, परंतु शारदेने जसा कानमंत्र दिला तसे लिहिल्यामुळे ते काव्य तिचेच मानावे असे ते म्हणतात.''[११] भा. रा. तांबे शारदेलाच आपले स्फूर्तिस्थान मानतात. ''जय जय जननी देवी जय जय भगवती शारदे अनंत गत तू स्फुर्ति मूळ शक्ती, जय अंबिके''[१२] तर साहित्य सम्राट न. चि. केळकर साहित्याचा संबंध सविकल्प समाधीशी जोडतात– ''आत्म्याला सर्व जगाशी एकरूप व्हावे, एकाच क्षणी सर्व जगाचे आकलन व्हावे अशी महत्वाकांक्षा असते व तो अनुभवानंद प्रतिभाच घडवू शकते.''[१३] असे विश्लेषण करून वाङ्मय खरी सविकल्प समाधी उत्पन्न करू शकते असाही ते निर्वाळा देतात. कलावादाचे पुरस्कर्ते प्रा. ना. सि. फडके यांनी कल्पनेची साहित्याशी नाळबांधली आहे. ''प्रतिभा प्रगट होते ती अर्थातच लेखकाच्या कल्पनाशक्तीच्या द्वारे''[१४]

कलेचे आणि सौंदर्याचे पुरस्कर्ते बा. सी. मर्ढेकर आपल्या 'सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथात कलेविषयी आपले विचार मांडताना म्हणतात की, ''आधुनिक काळात कलेचे सांस्कृतिक महत्त्व काडी इतकेही नाही. आधुनिक युगाची जी जी म्हणून वैचारिक किंवा व्यावहारिक ध्येये आहेत, त्यांच्या साधनेला कलानिर्मितीचा यत्किंचितही फायदा नाही. ज्या युगाला किंवा संस्कृतीला रात्रंदिवस साध्य आणि साधने ह्यांचाच निंदिध्यास त्या युगात वा संस्कृतीला कलेला स्थान नाही,''[१५] मर्ढेकरांनी कलेला सांस्कृतिक महत्त्व नाही असेच स्पष्ट केले आहे. या उलट साहित्य आणि जीवनाचा संबंध आहे असे मानणाऱ्या प्रा. नरहर कुरूंदकरांना मात्र शारदेच्या शक्तीने साहित्यिकाला स्फूर्ती येते असे वाटत नाही. ते साधना व परिश्रम यावर भर देतात.[१६] तर वा. ल. कुलकर्णी ह्यांना जीवन आणि साहित्य ह्यांचे संबंध अधिक मूलग्राही, अधिक शाश्वत स्वरूपाचे आहेत असे वाटते. साहित्य हे एक साधन नव्हे किंवा ती एक वस्तू नव्हे की, जेव्हा गरज वाटली तेव्हा तिची निर्मिती केली. आणि गरज संपली की सांदी कोपऱ्यात फेकून दिली. साहित्याचे व जीवनाचे असे व्यावहारिक संबंध नाहीत. त्यांचे संबंध चिरकाल स्वरूपाचे शाश्वत आहे असे ते स्पष्ट करतात.[१७]

सुप्रसिद्ध विनोदी साहित्यिक व अष्टपैलू लेखक प्र. के. अत्रे यांना तर साहित्य म्हणजे जीवनच वाटते. जीवनाच्या आनंदामधूनच माझे वाङ्मयाचे वेड जन्मास आले आहे, असे ते म्हणतात.[१८] तर प्रा. गं. बा. सरदारांनी साहित्य व समाजाचा संबंध अपरिहार्य मानला आहे.[१९]

साहित्यावर अनेक घटकांचा परिणाम होतो. समाज बदलला की त्याचा साहित्यावरही परिणाम होत असतो. डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटले आहे, समाजाच्या प्रवाहाबरोबर लेखकाना राहता येणार नाही. सामाजिक णानुबंधाची जाणीव जेव्हा लुप्त होते, तेव्हा साहित्याची वाढ खुंटते व ते अत्यंत संकुचित व एकांगी होते. साहित्याची बांधीलकी एका मुलभूत क्रांतिकारक जीवननिष्ठेला असते.[२०] ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. आपल्यावर समाजाचे ऋण आहे. समाजात लेखकाला अनेक अनुभव मिळत

असतात. हे अनुभव साहित्याद्वारे सांगितले पाहिजे. सामाजिक बांधिलकी स्वीकारून हे समाजाचे देणे लेखकाने फेडले पाहिजे. साहित्य हे समाजनिरपेक्ष असूच शकत नाही. त्यात जीवनातील अनुभवांचा आढावा घेतला जातो.

मानवाच्या जीवनातील अनुभव हीच त्याची खरी प्रेरणा असते. तीच साहित्यनिर्मितीच्या मागची शक्ती असते. एकाच सामाजिक व्यवस्थेत अनेक लेखक निर्माण होत असतात, तरी त्यांचे विचार सारखे नसतात. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात फरक आढळतो. गो. म. कुळकर्णी म्हणतात, ''वस्तुत: विशिष्ट सामाजिक परिस्थिती व कलावंताचे व्यक्तित्व हे दोन्ही घटक साहित्य निर्मितीत कृतीप्रवण असतात. कलावंत हा समाजातील कोणत्याही वर्गाचा घटक असतो हे खरे असले तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य नाकारता येत नाही. म्हणूनच सामाजिक वास्तवाइतकेच कलावंताचे व्यक्तित्त्व, त्याची सृजनशिलता याला साहित्याच्या संदर्भात महत्त्व असते. एकाच सामाजिक परिस्थितीत एकाच वर्गातील कलावंत वेगवेगळ्या प्रकारच्या आशयाची साहित्यकृती निर्माण करतात. ही वस्तुस्थिती याचीच दर्शक आहे.''[२१]

समाजात अनेक वर्गाचे, धर्माचे, पंथाचे लोक राहतात व त्यानूसार त्या त्या लोकांचे आचार–विचार, राहणी ही वेगवेगळी असते. एकाच वर्गातील लोक सारख्या सामाजिक परिस्थितीत राहत असले तरी, सगळ्यांना येणारे अनुभव, सुख–दु:ख, इच्छा, आकांक्षा, जीवनातील प्रसंग, घटना ह्या वेगवेगळ्या असतात. आणि म्हणून सगळ्यांकडून होणारी साहित्यनिर्मिती ही सारखी असू शकणार नाही. त्यात व्यक्तीपरत्वे फरक आढळतो. कुणी ग्रामीण जीवनावर लेखन करेल. कुणी राजकीय, तर कुणी वैचारिक, तर कुणी स्वत:च्या स्वभावानूसार विनोदी साहित्य निर्माण करील. याला कारणीभूत प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव व येणारे अनुभव हे होय.

प्रा. रा. ग. जाधव यांनी साहित्यकृती आणि सांस्कृतिक घटकाचे संबंध विषद करताना समाजापुढे साहित्यकृती आली की, तिला अनेक सामाजिक संदर्भ प्राप्त होतात असे म्हटले आहे. नवजात बालकाला ज्याप्रमाणे कुटुंब, समाज, देश अशा घटकांनी क्रमाक्रमाने हळूहळू पण अटळपणे एक स्वत्व प्राप्त होत असते त्याचप्रमाणे अभिव्यक्त झालेल्या साहित्यकृतीलाही सांस्कृतिक घटकांनी स्वत्व प्राप्त होते. असे ते प्रतिपादीत करतात.[२२]

पाश्चात्य साहित्यिकातही कलेच्या प्रयोजनासंबंधाने निरनिराळे मतप्रवाह आहेत. वर्डस्वर्थची काव्यविषय– "Poetry is the spontaneous overflow of powerful feeling" ही कल्पना सर्वज्ञात आहे.[२३] कोलरिजने आशयापेक्षा उत्तम शब्दांना महत्त्व दिले आहे. "Poetry the best words in the best order"[२४]

हडसनने–"Poetry is interpretation of life through imagination and emotion"[२५] असे व्यक्त केलेले विचार आणि सी. एम. जोडने "Art is window a misty and blued, through which the mystic has seen direct"[२६] असे व्यक्त केलेले मत लक्षात घेतले की, ही विचारसरणी अलौकिकवादाची वाटते. मात्र पाश्चात्य जगातील ॲरिस्टॉटल, प्लेटो यांनी साहित्यावरील समाजाच्या प्रभावाचा विचार मान्य केला होता. फ्रेंच समीक्षक तेन याने तर म्हटले की, कोणतीही साहित्यकृती हा कल्पनाचा खेळ नव्हे. ती दैवी शक्ती नव्हे. समाज आणि साहित्याचा संबंध त्याने अपरिहार्य मानला. ते म्हणतात– "A literacy work is not a mere play of the imagination, the isolated capirice of an excited brain, but a transcript of contemporary manners and costumes and the sign of particular state of intellect. The conclusion derived from this is that through literary monuments we can retrace the way in which men felt and thought many centuries ago"[२७]

साहित्य हे दैवी स्वरूपाचे असते, या भ्रामक कल्पनेला तेनने धक्का देऊन त्याचा समाज व्यापाराशी निकट संबंध असतो, हे प्रथमच प्रभावीपणे प्रतिपादीले. कलाकार व कला यांचे व्यक्तीसापेक्ष अन्योन्य संबंध असतात. समाजाचा जसा साहित्यावर परिणाम होतो, तसा साहित्याचाही समाजावर प्रभाव पडतो. साहित्यनिर्मिती प्रक्रियेत समाज जीवनाचा प्रभावी भाग जरूर असतो. तो ज्या समाजात राहतो, ज्या वातावरणात वाढतो, ज्या संस्कृतीत जोपासला जातो, त्या त्या घटकाचा परिणाम निश्चितच लेखकावर पडत असतो.

समाज व साहित्याचा किती जवळचा संबंध आहे हे पटवून देण्याकरिता गॉर्कीने म्हटले आहे, The artist is the sensitive recipient of all that effects his country and his class its ear, eye and heart, his is the voice of his time"[२८] लेखक शेवटी समाजाचा कान, डोळा आणि हृदय असतो. तो प्रातिनिधीक आवाज असतो. भविष्यकाळ यशायोग्य जाणण्यासाठी त्याला भूतकाळाचे आकलन आवश्यक आहे. लोकांचा इतिहास, त्यांची सामजिक आणि राजकीय विचार पद्धती इ. ज्ञान लेखकांनी मिळविले पाहिजे. थोडक्यात, माणसाचे सर्वांगीण आकलन कलानिर्मितीला अनिवार्य आहे. गार्कीने तत्वात आणि प्रत्यक्ष साहित्यात सदैव माणूस केंद्रस्थानी ठेवले.

आतापर्यंतच्या विवेचनातून समाज व साहित्याचा अन्योन्य संबंध कसा आहे हे अनेक साहित्यिक, समीक्षक, लेखक, कवी यांच्या विचारातून आपण पाहिले. या संदर्भात मार्क्सवादी विचारसरणीही पाहणे योग्य ठरेल. कारण समाज व साहित्याचा परस्पर संबंध असतो. हा युक्तिवाद मार्क्सवादी विचारसरणीतून प्रथम पुढे आला.

मार्क्सवादी विचारसरणी समाज व साहित्य यांचा अन्योन्य संबंध आहे असे दर्शविते. मार्क्सवादाला एक सम्यक जीवनदृष्टी आहे. जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या साहित्याच्या केवळ आशयातच प्रतिबिंबित होत नाहीत तर, त्यांच्या रूपातही त्या वेळोवेळी आमूलाग्र बदल घडवून आणतात. शिवाय जीवनाच्या परिवर्तनाचा, प्रगतीचा साहित्यातील परिवर्तनाशी, साहित्याच्या प्रगतीशी निश्चितपणे संबंध असतो. त्याचे यशायोग्य संशोधन करण्याला मार्क्सवादाची ऐतिहासिक विचारधाराचा महत्त्वाची ठरते.

साहित्याच्या प्रेरणा आणि त्याचे स्वरूप यांचा आपण कलावादी आणि जीवनवादी अशा दोन्ही अंगाने शोध घेण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी आपल्या असे लक्षात येते की, कलावाद आणि जीवनवाद या दोन्ही भूमिका एककली पद्धतीने स्वीकारून चालत नाही. श्रेष्ठ साहित्याच्या निर्मितीसाठी या दोन्ही भूमिकांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. कलावादाने केवळ 'स्वान्त सुखाद' भूमिकेतून लेखन केल्यास ते साहित्य केवळ कल्पनाविलास ठरू शकते, कारण कलावादी लेखक आपल्या लेखनाचे आशयद्रव्य हे तो जगत असलेल्या जीवनाकडूनच घेत असतो. समाजाने आपले लेखन वाचावे ही त्याची देखील अपेक्षा असतेच. यासाठीच हा लेखक आपले लेखन प्रकाशित करत असतो. यासाठी त्यांच्या लेखनात सकस जीवनानुभव जसाच्या तसा आपल्या लेखनात मांडण्याचा आग्रह धरत असेल आणि यासाठी कला म्हणून असलेले साहित्याचे नियम नाकारत असेल तर हे देखील योग्य ठरत नाही. कारण जीवनवादी लेखकाचे साहित्य वाचणारा वाचक हा 'आनंदप्राप्ती' या प्रेरणेनेच त्याचे साहित्य वाचत असतो. या वाचकाला आपल्या वाचनातून कलात्मक आनंद अपेक्षित असतो. म्हणूनच कलावादी साहित्यात दमदार जीवनानूभव असणे आणि जीवनवादी साहित्यात धगधगीत जीवन वास्तवाला कलात्मक स्वरूप प्राप्त होणे अपेक्षित असते. यासाठीच साहित्याचे लेखन कलावादी आणि जीवनवादी या दोन्ही प्रेरणांचा समन्वय करत झाल्यास श्रेष्ठ साहित्याची निर्मिती होऊ शकते.

## संदर्भग्रंथ सूची :—

१. वि. स. खांडेकर, साहित्य आणि समाजजीवन, प्रस्तावना.
२. डॉ. भालचंद्र फडके, लेखिका : चिंता आणि चिंतन.
३. प्रा. गो. म. कुलकर्णी, मराठी साहित्यातील स्पंदने.
४. श्री. ज्ञानेश्वर महाराज, ज्ञानेश्वरी अध्याय—१, लेखक, प्रा. ग. मा. निरंतर, ओवी २,३
५. शं. गो. तुळपुळे, भक्तीचा मळा
६. श्री. तुकाराम महाराज, तुकाराम गाथा
७. के. मी. ढवळे, सार्थ श्री एकनाथी भागवत अध्याय—१
८. संत रामदास, दासबोध, ओवी २९
९. म. ना. सहस्त्रबुद्धे, मराठी शाहिरी वाङ्मय, हैबती
१०. आम्ही कोण म्हणूनी काय पुसता? आम्ही असू लाडके देवाचे, हरपणे श्रेय संपा. रा. श्री. जोग.
११. भा. रा. तांबे, समग्र कविता
१२. प्रा. ना. सी. फडके, प्रतिभा साधन
१३. बा. सी. मर्ढेकर, सौंदर्य आणि साहित्य
१४. प्रा. नरहर कुरूंदकर, रूपवेध
१५. प्रा. वा. ल. कुलकर्णी, साहित्य—शोध आणि बोध
१६. प्र. के. अत्रे, कज्हेचे पाणी, प्रस्तावना
१७. प्रा. ग. बा. सरदार, प्रबोधनातील पाऊलखुणा
१८. प्रा. रा. ग. जाधव, नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेय
१९. "Preface to lyrical Balladas" —वर्डस्वर्थ
२०. "Quoted by Shipley in Quest for literature" कोलरीज
२१. "Introduction to the study of Poetry", हडसन
२२. "Philosophical aspects of Modern Science", सी. एम. जोड
२३. "On Literature" (Moscow : Progress Publishers) — गार्की
२४. गो. म. कुलकर्णी, मराठी साहित्यातील स्पंदने

❖❖❖

# पर्यावरण संतुलन एक लोकचळवळ व्हावी

डॉ. रवींद्र मुरमाडे
मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकुम, चंद्रपूर, महाराष्ट्र (India)
इ मेल murmaderu06@gmail.com भ्रमणध्वनी ७६२०५२६८३४

## गोषवारा (Abstract)

मानवी जीवनाचा व आरोग्याचा पर्यावरणाशी अतिशय निकटचा संबंध आहे. मानवी आरोग्यावर पर्यावरणाचा परिणाम येन केन प्रकारे होत असतो. सुदृढ आरोग्यासाठी शुद्ध पर्यावरणाची नितांत गरज आहे. परंतु प्रदूषित पर्यावरणामुळे मानवाला कोणत्या ना कोणत्या दुर्धर रोगाने किंवा विकाराने ग्रासलेले दिसते. निरोगी पर्यावरण मानवी जीवनाचा मूलाधार आहे. तेव्हा ह्याचा ऱ्हास होणार नाही यासाठी समाजस्तरातून लोकचळवळ उभी होणे क्रमप्राप्त आहे.

सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करता प्रत्येकजण जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी धडपडताना दिसतो आहे. त्या दृष्टीने ही आल्हाददायी बाब आहे, पण त्यामुळे पर्यावरण संतुलन ऱ्हास पावत आहे. ह्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. ती आपली सामाजिक बांधिलकी आहे. ही दूरदृष्टी अंगीकृत करणे पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत आवश्यक आहे. सुदृढ आरोग्य केवळ पौष्टिक आहाराने मिळणार नाही त्यासाठी पर्यावरण समतोल आवश्यक आहे. ही जाणीव समाजात बिंबविणे अत्यंत गरजेचे आहे.

दैनंदिन गरजा भागविण्याच्या हव्यासापोटी कुठेतरी चिरंतन मूल्ये ढासळत चालली आहेत. दिवसागणिक पर्यावरणात मानवीय आक्रमण वाढून पर्यावरण समतोल बिघडत चालले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होऊन उलटपक्षी त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतांना अनुभवतो आहे.

ही जीवघेणी कृती कुठेतरी थांबविली गेली पाहिजे. 'आपण जगा व इतरांनाही जगू दया' ही सामाजिक बांधिलकीची भावना सर्वांमध्ये वृद्धिंगत व्हावी, यासाठी लोकचळवळ उभी व्हावी व पर्यावरण समतोल साधला जावा.

## बीजसंज्ञा :

पर्यावरण संतुलन राखणे, जंगलतोड कमी करणे, अनियंत्रित व अनावश्यक बांधकामे थांबविणे.

## प्रस्तावना :

मानवी जीवन आणि पर्यावरण यांचा आंतरसंबंध अनादिकाळापासून आहे. मानवी संस्कृतीचा ९९ टक्के कालावधी मानव हा निसर्गाचाच एक भाग म्हणून जीवन जगत होता. त्याचप्रमाणे आपले बौद्धिक सामर्थ्य, कल्पना शक्ती, वाचाशक्ती, आणि तंत्रकौशल्य यांच्या जोरावर मानवाने निसर्गात लहान मोठे बदल घडवून मानवी जीवन सुखी, समृद्ध व प्रगत करण्यासाठी प्रयत्न केलेले आपणास दिसतात. मानवी संस्कृतीच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास सुरुवातीपासूनच मानवावर निसर्गाचे वर्चस्व राहिले आहे. वर्तमानात जीवनाला पूरक व रक्षण करण्याच्या दृ ष्टीकोनातून समाजस्तरातून पर्यावरण– विषयक जनजागृती ही एक लोकचळवळ उभी करणे निकडीचे झाले आहे. खरं तर पर्यावरण रक्षण हे राष्ट्र कर्तव्य आहे. ही जाणीव सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून जनमानसात रुजावी.

## पृथ्वीवरील बदलते हवामान :

पृथ्वीतलावर वातावरणाची निर्मिती झाली तेव्हापासून अनेकदा हवामानात लहान मोठे बद्दल घडून आले आहेत. हे बदल दिवसागणिक झपाट्यने वाढत असल्याच्या अनेक नोंदी व पुराव्यावरून लक्षात येते. सद्यस्थितीत वातावरणातील बदल अजूनही वेगवेगळ्या पातळ्यांवर होतांना दिसत आहे. हवामानातील बदलांमुळे पृथ्वीवरील समुद्र, नद्या, वनस्पती, पशू, वन्यजीव, आणि मानवी जीवनावर दूरगामी परिणाम झाले आहेत.आजही जगभरात

होत असलेल्या हवामान बदलांमुळे अनेक नदी खोऱ्यात वेळी–अवेळी पूर सदृश्य स्थिती निर्माण होतांनाचे चित्र बघायला मिळते. हवामानातील बदलांमुळे शेती हा पूरक व्यवसाय दिवसेंदिवस कोलमडताना दिसतो आहे. ह्यामुळे शेतीवर उपजीविका करणाऱ्या घटकांना विपरीत परिणामांना सामोरे जावे लागत आहे. सद्यस्थितीत हवामानात झालेला बदल हा मानव आणि निसर्ग यांच्यात असलेल्या संतुलनाचा अभाव असल्याचे चित्र स्पष्ट होते.

एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाने वैश्विक क्रांती घडवून आणली; परंतु 'हवामानाचा' सर्वव्यापी परिणाम इतर छोटया–मोठया घटकांवर होतांना दिसतो आहे. हे नाकारता येणार नाही. आज वातावरणाशी व हवामानाशी विसंगत वाटणाऱ्या विविध घटना अनुभवास येत आहे. वर्तमानात पृथ्वीवरील सबंध मानव,प्राणी, पशू, यांची आपल्या अस्तित्वासाठी अनुकूल नसणाऱ्या परिस्थितीतही जिवंत राहण्याची धडपड सुरु आहे.

## बदलत्या हवामानाचे परिणाम :

दिवसागणिक बदलत्या हवामानाचे प्रारूप हे सबंध मानवी जीवनासाठी अत्यंत मारक आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे भारतातील विविध विपतींची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याचे संकेत वैज्ञानिकतेतून आणि संशोधनातून दिसू लागले आहेत. ह्यामुळे पूर सदृश्यस्थिती, दुष्काळ, अवर्षण, अतिवृष्टी, कोसळणाऱ्या दरडी, भूकंप यांसारख्या अघटीत घटना आपण अनुभवतो आहोत. शिवाय पर्यावरणाचा सर्वत्र ढासळणारा समतोल,त्यातच मनुष्याचा निसर्गात वाढणारा हस्तक्षेप, बदलते जागतिक व स्थानिक हवामान यांसारख्या अनेक कारणांमुळे दिवसेंदिवस आपत्तीची तीव्रता अधिकाधिक जाणवू लागली आहे.

भारतात दरवर्षी कोणत्या ना कोणत्या रूपाने भौगोलिक समस्या उद्भवताना दिसत आहेत. विविध आपत्तींमुळे होणाऱ्या जीवित व वित्त हानीची तीव्रता लक्षणीय असल्याचे निदर्शनास येते. कोट्यवधी लोकसंख्या असलेल्या भारत देशात शेतीवर उदरनिर्वाह करणारा शेतकरी मात्र हवालदिल झालेला दिसतो. वेळी अवेळी पर्जन्यमानात झालेला बदल ज्यामुळे एकूणच मानवी जीवनावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.या बदलांमुळे मानवी जीवित हानी व वित्त हानी या आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. ह्यामागची कारणमीमांसा म्हणजे माणसाने निसर्गात जो बिघाड केला, जी ढवळाढवळ केली, ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडून भूकंप ह्यासारख्या अनन्वित घटनांना तोंड द्यावे लागत आहे.

## पर्यावरण संतुलनासाठी केलेले उपाय :

पर्यावरण संतुलन राखण्यासाठी भारत सरकारने उपाय योजना म्हणून पर्यावरण संरक्षण विषयक कायदा, १९८६ मध्ये अमलात आणला. या कायद्यांर्गत राष्ट्रव्यापी कार्यक्रमाची योजना करून त्याची अंमलबजावणी करावी असे निर्बंध लावले गेले. त्याचबरोबर १९७४ मध्ये जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा पारित करण्यात आला. वनसंवर्धन कायदा १९८० मध्ये. वन्य जीवनसंरक्षण कायदा १९७२ मध्ये करण्यात आला. तर १९८१ मध्ये वायुप्रदूषण आणि नियंत्रण कायदा लागू करण्यात आला. ह्यामागे शासनाचा लोकजीवना विषयी असलेला उदात्त दृ ष्टीकोन दिसून येतो. लोककल्याणाची भावना दिसून येते.

वर्तमान काळात या सर्व बाबींकडे दृष्टीक्षेप टाकल्यास एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते की, शासनाने पर्यावरण पूरक वनसंवर्धन कायदा करूनही आज जंगलेच्या जंगले ओस पडलेली दिसतात. ज्यामुळे पर्यावरण संतुलन बिघडत आहे. वन्यजीव संरक्षण कायदा अमलात असूनही दिवसाढवळ्या प्राण्यांची शिकार केली जाते. थोडक्यात सांगायचे म्हणजे कायदा करूनही प्रत्यक्षात कायद्याची पायमल्ली होतांना दिसते आहे. यातून माणसाचे जीवन धोक्यात आले आहे. जगणे असह्य झाले आहे.

आजवरचा इतिहास सांगतो की, लोकसहभागातून, लोकचळवळीतून बरेच काही साध्य करता येतं. ज्याप्रमाणे संत गाडगेबाबा यांनी माणसाच्या मनातील अंधश्रध्देची धूळ साफ केली त्याप्रमाणे एक सुजान नागरिक या नात्याने सामाजिक बांधिलकी स्वीकारून, सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून आपण सर्वांनी पर्यावरण विषयी लोकचळवळ उभी केली पाहिजे. ज्यातून सर्व मानव प्राणी यांचे हीत साधले जाईल.

## निष्कर्ष :

१) काळाची पावले ओळखून पर्यावरण विषयक जाणीव जागृती जनमानसात रुजविणे.

२) सुदृढ समाजस्वास्थ्यासाठी पर्यावरण संतुलन काळाची गरज.

३) 'जगा आणि जगू द्या 'याला मूर्तरूप देण्यासाठी पर्यावरणविषयी आस्था सर्वांमध्ये रुजावी.

## संदर्भ ग्रंथ :


१) डॉ. विठ्ठल घारपुरे : पर्यावरणशास्त्र,
पिंपळपुरे आणि कंपनी पब्लिशर्स, महाल,नागपूर.
नोव्हेंबर २००७..

२) डॉ. श्रीकांत कार्लेकर : पर्यावरण समस्या निराकरण व क्षेत्र अभ्यास,
डायमंड पब्लिकेशन, पुणे –३०,प्रथम आवृत्ती २००६

३) प्रा. तु. मा. वराट : पर्यावरण, गाज प्रकाशन, अहमदनगर ,
प्रथमावृत्ती १ जानेवारी १९९५.


❖❖❖

# रवींद्रनाथ टागोरांची कविता

प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे
गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय,
उमरखेड, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
इ मेल jiwatode@gsgcollege.edu.in भ्रमणध्वनी ९४०४१३५८७०

रवींद्रनाथ टागोर हे एक बंगालमधील प्रतिभावान कवी आहेत. रवींद्रनाथ टागोर यांनी नाटक, कविता, गीते, कथा हे वाङ्मयप्रकार हाताळले आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत भारतीय आणि युरोपीय साहित्य, संगीत, धर्मविचार, लोकव्यवहार आणि जन्मजात लाभलेली बुद्धी यांचा सिंहाचा वाटा होता. रवींद्रनाथ टागोरांच्या कविता अभ्यासण्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा थोडक्यात वेध घेणे गरजेचे वाटते. 'शिक्षण, संस्कार, मनोविकार आणि शब्दाविष्कार या सर्वच दृष्टींनी रवींद्रनाथ हे जुन्या – नव्या कोणाही भारतीय कवीपेक्षा वेगळे होते'. रवींद्रनाथांची कौटुंबिक पार्श्वभूमी अशी होती की, त्यांची आर्थिक सुबत्ता होती. कुटुंबातील बहुतेकजन उच्चशिक्षित व ज्ञानसंपन्न असेच होते. त्यांच्यात रवींद्रनाथ हे अल्पशिक्षित. अबोल व बालपणी शाळा नको म्हणणारेच होते. पण वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच काव्यरचनेचा छंद त्यांना जडलेला दिसतो. रवींद्रनाथ हे आपल्या मातापित्याचे चौदावे अपत्य. त्यांच्या कुटुंबाकडूनच खऱ्या अर्थाने त्यांना चिंतनशिलतेचा, ज्ञानप्रियता, कलाप्रेम, अध्यात्मचिंतन यांचा वारसा मिळालेला होता. लहानपणी नदीप्रवाह, ऋतुसंक्रमण, मेघ, पर्जन्य या सारख्या गतिशील निसर्गाशी तदाकार होऊन प्रौढपणी आपल्यावर मातेसमान प्रेम करणाऱ्या व रवींद्रनाथाला लिहायला, वाचायला प्रोत्साहित करणारी वहिनी कादंबरी देवीच्या मृत्यूमुळे त्यांना 'मरणातले अमरणपण' कळून चुकले.

बंगाली वाङ्मयाचे इतिहासकार डॉ. सुकुमार सेन यांनी रवींद्रनाथ लिहित होते त्या काळाचा उल्लेख 'रोमॅंटिक कवींचा कालखंड' म्हणूनच करतात. बंगालीतील त्या काळाचा आद्यकवी बिहारीलाल चक्रवर्ती यांच्या कविता रवींद्रनाथांची प्रेरणा मानता येते. रवींद्रनाथांच्या वाङ्मयीन संस्काराविशयी एक मत घेण्यासारखे आहे. 'मुळच्याच संवेदनमय, आत्मकेंद्रीत, निसर्गपूजक आणि स्त्रीपूजक अशा रवींद्रच्या मनावर संस्कार करणारा हा पहिला आधुनिक कवी होय.' शतकात एखादाच कवी अशा शब्दसृष्टीचे 'ऐश्वर्य' लाभलेला जन्माला येतो. रवींद्रनाथांच्या कविता वाचताना त्यांच्या शब्दसृष्टीच्या ऐश्वर्याची साक्ष पटते.

रवींद्रनाथांची प्रभावी अभिव्यक्तीचे, त्यांच्या आवडीचे माध्यम म्हणजे कविता. प्रथम ते कवी होते. नंतर कादंबरीकार नाटककार, गीतकार, संगीतकार, चित्रकार होते. अर्थात या सर्व क्षेत्रात त्यांनी त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे व वेगळा ठसा उमटवला आहेच. म्हणून त्यांच्या 'गोरा' कादंबरीबद्दल शरदबाबू सारख्या श्रेष्ठ कादंबरीकारांनी जे गौरोद्गार काढले ते फार मौलिक आहे. ''ती मी साठ पासष्ठ वेळा वाचली आहे. मी लोकांसाठी लिहिणारा कादंबरीकार असलो तरी रवींद्रनाथ माझ्यासाठी लिहिणारे कादंबरीकार आहेत.'' तरीही रवींद्रनाथांचा जीव जडला कवितेवरच. रवींद्रनाथांनींच कवितेबद्दल आपल्या पुतणीला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. ''कविता माझी पूर्वीपासूनची प्रेयसी. मला वाटतं रथीच्या वयाचा होतो तेव्हाच माझा तिच्याशी वाङ्निश्चय झाला. तेव्हापासून आमच्या पुष्करणीचा काठ, वडाचा पार, बंगल्यातला बगीचा, मोलकरणीच्या तोंडून ऐकलेल्या कहाण्या, गाणी हे सारं माझ्या मनात एक प्रकारची जादूची सृष्टी उभी करीत असे. त्या वेळची माझ्या मनाची धूसर पण अपूर्व अशी अवस्था समजावून सांगणे कठीण आहे. एकमात्र मी नक्की सांगू शकेन की, त्या काळी कवितेबरोबरच माझं शुभमंगल झालं होतं. पण ह्या पोरीच लक्षण धड नाहीत हे मात्र मान्य केल पाहिजे. बाकीचं जाऊ दे पण मोठसं भाग्यही घेऊन आली नाही ती. सुख दिलं नाही असं नाही मी म्हणणार, पण स्वास्थ्य देण्याच नाव नको. ज्याला वरते त्याला भरपूर आनंद देते. पण कधी कधी तिच्या त्या घट्ट मिठीतून हृदयपिंडातील रक्त बाहेर काढते. एकदा तिने एखाद्याची निवड केली की घरदार सांभाळीत बसेन म्हणायची सोय नाही. तरीसुद्धा माझं खरं जीवन तिच्याशीच निगडीत आहे. 'साधने'त लिहितो, जमीनदारीही सांभाळतो. पण ज्या क्षणी कविता लिहायला लागतो त्या क्षणी मात्र माझं चिरंतन अस्तित्व माझ्यामध्ये प्रवेश करीत असतं. हे स्थान मी चांगलं ओळखतो. जीवनात माझ्या हातून कळत– नकळत खोट आचरण घडलं असेल पण कवितेशी मात्र कधी खोटेपणा करुन चालत नाही. माझ्या जीवनातल्या सखोल सत्याचं हे एकच आश्रयस्थान.'' कविता निर्मिती प्रक्रियेतील कवींचा एकून खऱ्या

खऱ्या भावावस्थेचे निखळ चित्र रवींद्रनाथांच्या या पात्रातील कवी व कविता यांच्या परस्परसंबंधाच्या विवेचनावरून स्पष्ट होते. त्यांच्या काही कवितातून जीवनाच्या चिरंतन सत्याचे मूल्य, निसर्गाशी एकरुप होण्याच्या भावस्थितीचा प्रत्यय फार सुंदरपणे अभिव्यक्त होतो.

जगण्यातल्या प्रत्येक क्षण इहलोकातलेही यात्रिक होता आणि चिरंतनाचेही प्रवासी होता. उत्पत्ती — स्थिती— लयाचे हे एक चक्र अनादी अनंत कालापासून फिरतयं त्याच्याकडे जत्रेतल्या त्या प्रचंड चाकाकडे पाहाणाऱ्या लहान मुलांच्या औत्सुक्याचा प्रत्यय रवींद्रनाथांच्या या दृष्टीवरून येतो. सभोवती हा निसर्ग दिसतो, हे जे वृक्ष आहे, त्यावरची पाने कधी झडतात, पुन्हा नवे अंकुर केव्हा येतात, मोहर कधी फुलतो, त्यातून हिरव्या मण्यासारखा आंबा कसा येतो, तो मोठा कसा होतो, कुठल्या ऋतूत कुठली फुलं येतात....हे उगवणं— फुलणं— कोमेजनं— गळून पडणं आपल्यालाही कसं लागू आहे याचे संस्कार कधी घडवितो? वसंत संपत आला की चाफ्याची आणि कव्हेरीची निरोपाची वेळ आली हे रवींद्रनाथच गाण्यातून सांगून जातात.

'एबार विदायबेलार सूर धरो धरो ओ
चांपा ओ करबी
तोमार शेष फुले आज शाजि— भरो'
चाफ्याला आणि कव्हेरीला सांगतात,
'बायांनो आता निरोपाची गाणी म्हणा —
तुमची दुरडी शेवटल्या फुलांनी भरून घ्या.'

पावसाच्या पहिल्या सरी कोसळायला लागल्यावर रवींद्रनाथांच्या मनात जो आनंद, कल्लोळ झालायं त्याची एक कविता आहे —

'शतेक युगेर कविदले मिली आकाशे
ध्वनिया तुलिछे मत्तमदिर बाताशे

म्हणजेच रवींद्रनाथांना यात खरे कवितेबद्दलच सांगायचे आहे. याचा अर्थच असा होतो की,

'शतयुगांच्या कविदलानी
शतशत युगांची गाणी
मत्तधुंद वाऱ्यावर
उचलून धरली आहेत.

रवींद्रनाथांनी या काव्यातून विलक्षण उत्कटतेने हा अनुभव घेतलाय, याची प्रचिती या कवितेतून होणाऱ्या आविष्कारातून जाणवते. त्यांच्या अशा काही कवितेत पाच — सहा साध्या शब्दातून उभ्या केलेल्या प्रतिमांनी काव्य फुलताना दिसते. रवींद्रनाथांच्या कवितेचा मुख्यविशेष म्हणून संगीतातील सूर हेही नमूद करावे लागते. त्यांनी आपल्या कवितेचा उल्लेख 'गीत' असाच केलेला आहे. आपल्याकडे गीत हा तुच्छतेने काव्यप्रांतात उल्लेखल्या जातो. मात्र त्यांच्या ज्या संग्रहाला जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक मिळाले ती 'गीतांजली' आहे. 'सुरांचं हे सामर्थ्य रवींद्रनाथा इतकं आधुनिक काळातल्या इतर फारशा कवींनी ओळखलेलं दिसत नाही. रवींद्रनाथांना संगीत हे सर्वव्यापी वाटत होत. जीवनातील सुख—दुःखाचे, हर्षशोकाचे सारे अनुभव प्रकट करताना शब्दांनी सुरांची साथ सोडणं हे त्यांच्या प्रकृतीला मानवण्यासारखं नव्हतं. गीत गाण्यासाठी मी या जगात आलो आहे असं त्यांनी म्हटलय.' त्यांची एक 'रंगिये दिये जाव' अशी कविता आहे.

'जाव,जाव,जाव गो एबार
जाबार आगे रंगिये दिये जाव'

याचा अर्थ म्हणजे जा नक्कीच जा पण जाण्यापूर्वी मला एकदा संपूर्ण रंगवून जा — मला जागवून जा. मात्र जागवून च्याबद्दल त्यांना अधिक सांगायचे आहे, म्हणून त्याच कवितेत ते म्हणतात —

'मेघेर बुके जॅमॉन मेघेर माद्र जागे
बिश्श नाचेर केंद्रे जॅमॉन छंद जागे'

म्हणजेच मेघांच्या हृदयात जसा मेघांचा मंद्र जागतो आाणी या विश्वाच्या नृत्यात छंद जागतो तसेच मला 'जागत ठेऊन जा. हा अर्थ त्यात अभिप्रेत आहे. रवींद्रनाथ स्वतःच्या तंद्रीत कधीच नव्हते. नव्या विचारांच्या, धर्मप्रबोधनाच्या, देशप्रेमाच्या अनेक स्वतंत्र जाणीवा त्यांच्यात दिसून येतात. नक्कीच. स्वतःच्या प्रकृतीपिंडाच्या खुणा

त्यात प्रकटताना समकालीन टीका व त्यांच्यावर होणाऱ्या मूल्यमापणाची पर्वा ते करत नाहीत. या संदर्भात त्यांची एक कविता लक्ष्यात घ्यावी लागते –

'जे पूजार बेदी रक्ते गियेछे भेसे
भांगो भांगो आजि भांगो तारि नि:शेषे
धर्म कारार प्राचीरे बज्र हानो
ए आभागा देशेर ग्यानेर आलोक आनो'

म्हणजेच जी पूजेची वेदी रक्ताने माखलेली आहे. ती फोडा, फोडा –शेवटपर्यंत फोडून टाका. धर्म कारागृहाच्या भिंती हाणून काढा आणि ह्या अभागी देशात ज्ञानाचा प्रकाश आणा. अशा उदात्त भावना रवींद्रनाथांच्या कवितेतून ओथंबून वाहतात. प्रेम, शरणभाव, मार्दव, कारुण्य यांच्या साहचर्यानंच ती उदात्तता कवितेतून प्रत्ययाला येते.

रविन्द्रांच्या राष्ट्रीय व देशभक्तीच्या भावनेने अनुप्राणित झालेल्या कविता हा त्यांच्या काव्याचा आणखी एक पैलू. त्यांच्या काव्यावर असा एक आक्षेप वारंवार घेतला जातो की ते प्रेरणादायी नाही, कार्यात उद्युक्त करणारे त्यात काही आढळत नाही, ते निवृत्तीवादी आहे, काहिसे अळणी आहे, त्यात जोम नाही, शक्ति नाही, ते विकल आहे, हळवे आहे वगैरे. रविन्द्रांनी आपल्या काव्यातील उतारे देऊन आपली बाजू एकदा मांडली होती. पण त्यांच्या संकल्प ओ स्वदेश मधील कविता वाचल्यावर, पलायनवादी वृत्तीचा किंवा आत्मरतवृत्तीचा आरोप त्यांच्यावर कोणी करुन धजावणार नाही. 'बंगमाता', 'भारतलक्ष्मी', 'हे दुर्भाग्य देश हते हे मंगलमय', 'शताब्धिर सूर्य आजि रक्तमेघमाझे', आमरा मिलेछि आज मायेर डाके' वगैरे गीतांतून त्यांची देशभक्ति ज्याप्रमाणे दिसून येते, त्याचप्रमाणे त्यांची कविता भावनानुकूल साज चढविते हे ही लक्षात येते. तांब्याच्या 'रुद्रास आवाहन' या कवितेची आठवण करुन देणारी 'वैशाख' ह्या कवितेत ते लिहितात.

'हे भैरव, हे रुद्र वैशाख कारे दाओ डाके
दु:ख सुख आशा ओ निराशा
तोमार फुत्कार क्षुब्ध घुलासम उड़ुक गगने'

जगापासून आपण दूर जाऊन बासरी वाजवीत बसलो. लोक लढत असताना, आपण भानमग्न होतो ही खंतही त्यांच्या मनाला लागते व मग ते 'एबार फिराओ मोरे' अशासारख्या कवितेतून आपले अंत:करण उघडे करतात. देशांत खळबळ माजली आहे. लोकांच्या जीवनात उत्पात घडत आहेत. कवि मात्र 'मला त्यांचे काय?' असे म्हणून आपल्या काव्य साधनेत मग्न आहे. ही उपेक्षा त्यांना जाचली. जगांत सर्वजण नाना कार्यात गुंगून गेले असतांना पळपुट्याप्रमाणे तूं दूर जाऊन वनांत बसून सारा दिवस बासंरी वाजविलीस. 'ओरे तुइ ओठ आजि /आगुन लगेछे कोथाय? कार शंख उठियाछे बाजि ....जागाते जगत जने? हे कवि, आज सर्वस्वाचे दान कर,' की गाहिबे, की शुनाबे ! बलो मिथ्या आपनार सुख, मिथ्या आपनार दु:ख /' त्यांची प्रभुचरणी प्रार्थना हीच आहे की, 'ए दुर्भाग्य देश हते हे मंगलमय /दूर करे दाओ तुमि सर्व तुच्छभय, लोकभय, राजभय, मृत्युभय आरं! 'भारततीर्थ', 'बंगमाता', 'अपमानित', यासारख्या कित्येक कविता त्यांनी लिहिल्या आहेत. परंतु स्वदेशावरील प्रेमामधून अन्य देशाबद्दल वैरभावना जागृत करणारी त्यांची कविता नाही. त्यांनी आपल्या समाजात दिसणारी व्यंगे, आढळणारे दोष, क्षुद्रता यासारख्यांवर कडाडून टीका केली आहे. हीन, रुढी आणि वाईट चाली यावर त्वेषाने हल्ले चढविले आहेत. त्यांच्या काव्यांत याचा पुरावा जागोजाग आढळतो.

त्यांची ही जीवनाभिमुख वृत्ती त्यांचे सर्व काव्य व्यापून राहिली आहे. हे जग खोटे आहे माया आहे, हे मानायला ते कधीही तयार होणार नाहीत आणि म्हणून ते मुक्तीचे पिपासु नाहीत. 'मायाबाद' या कवितेत ते म्हणतात, 'विश्व वसुंधरा ही माया आहे असे हे देशबांधवांनो तुम्ही कां मानता? युगानुयुगांपासून पशु, पक्षी, प्राणी विधात्याने दिलेल्या या जगताला मातृअंक मानून खेळताहेत हे सारे का खोटे?' जीवन हे क्षणभंगूर आहे, खोटे आहे असे म्हणणाऱ्यांना ते सांगतात की, हे जीवन म्हणजे 'मातेने, विनयाने, प्रेमाने दिलेला ठेवा आहे. हा स्वीकारा.'

ही सारी माती असेल तर असू द्या. या मातीला तुलना नाही. जीवन हे बंधन आहे. असे मानणाऱ्यांना ते म्हणतात., 'सारेच काही बंधनरुपी आहे. स्नेह, प्रेम, सुख, तृष्णा सारे सारें' पंडितांकडून जन्मरहस्य जाणण्याची मला इच्छा नाही. लक्ष कोटी प्राण्यांची जी गति तीच माझी असू दे. ही धरणी जर हीन दीन असेल तर असू द्या. मी तीचे संतान, मला काय त्याची तमा, माझी माता सर्व इच्छांची पूर्ती करु शकत नाही. म्हणून काय मी तिला सोडून

जाऊ? 'दरिद्रा, बलिया तोरे, बेशी, भालोबासी, 'हे धरित्री स्नेह तोर बेसी भालो लागे, या अवनीवरील सुखदु:खात कवि समभागी होऊ इछितो.

'तोमार आनंदगाने आमि दिब सुर
याहा जानि दुयेकटि प्रीतीसुमधुर
अंतरेर छंदोगाथा, दु:खेर क्रंद्रने
बाजिबे आमार कंठ विशाद विधुर तोमार कंठे
कारण–
'भालोबासियाछि आमिधूलिमाटि तोर
जन्मेछि ये मर्तकाले घृणा करि तारे
छुटिब ना स्वर्ग आर मुक्ति सुंजिबारे ....

थोडक्यात रवीन्द्रनाथांच्या काव्याचे एवढे विविध पैलु आहेत की, भिन्न भिन्न अभिरुचीच्या वाचकांना त्यांच्या अभिरुचीला रुचेल असे काव्य त्यांच्या संग्रहांतून मिळू शकते. या किंवा त्या प्रकारचेच त्यांचे काव्य आहे. असे म्हणणे धाडसाचे ठरेल. ते आनंदाचे कवि आहेत असे म्हणावे तर दु:ख, शोक, ताप, विषाद इत्यादी भाव त्यांच्या काव्यात आहेत. ते भक्तिमार्गी कवि आहेत असे म्हणावे तर सौंदर्याचे पुजारी, अगदी शारिरीक सौंदर्यावर लुब्ध झालेले असे रसिक, अशा स्वरुपात ते दिसतात.प्रेमविषयक एवढ्या कविता त्यांनी रचिलेल्या आहेत की त्यांना विरागी म्हणता येणार नाही. समाजातून निवृत्त होऊन दूर एकान्तवासांत राहून वैयक्तिक मुक्तीच्या मागे लागलेले साधक असे त्यांचे वर्णन करावे तो, शिंग फुंकिले आहे. तरवारीचा खणखणाट होतो आहे, रणधुमाळी माजली आहे आणि मध्ये आपल्या शौर्याने तळपत आहे अशा रणवेषात ते आपल्याला दिसतात. रविन्द्रनाथांचे काव्य कुठल्याही साच्यांत बसवितां येणार नाही. कारण त्यावर रवीन्द्रांचाच ठसा खोलवर उमटला आहे. ते विशाल आहे, धरती सारखे समृध्द आहे, विविधरंगी आहे, सर्वस्पर्शी आहे,थोडक्यात ते सागरासारखे आहे. कारण–

'द्यूलोक मधुमय, मधुमय पृथ्वीवर धूलि
अंतरे निएछि आमि तुलि
एई महामंत्र खानि
चरितार्थ जीवनेर वाणी /'

हीच अनुभूति त्यांना जीवनाच्या अंतापर्यंत आली होती.

'रुप नारानिरे कुले जेगे उठिलाम
जनिलाम ए जगत् स्वप्न नय '

'ए जीवन सुंदरेर पेऐछि मधुर आशीर्वाद' आपल्या काव्यसाधनेची सुरुवात करतांना त्यांनी जी उत्कट इच्छा व्यक्त केली होती,

'आमि ढालिब करुणाधारा
आमि भांगिब पाषाण कारा
आमि जगत प्लाबिया बेडाब गाहिया
आकुल पागल पारा'

तिचे पडसाद त्यांच्या काव्यांत अखेरपर्यंत ऐकू येतात. रवीन्द्रनाथांनी बंगाली भाषा समृद्ध केली. बंगाली साहित्यांत एक नवा रंग, नवा ढंग, एक नवजीवन आणले. संगीत हा रवीन्द्रकाव्याचा अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच बंगाली साहित्यात त्यांना एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे म्हटले तर ते खरेच आहे. परंतु त्यांची खरी थोरवी कवि म्हणून व गीत रचनाकार म्हणून जनमाणसांत त्यांनी जे स्थान मिळविले आहे. पूर्व बंगालमधील मुसलमान आणि पश्चिम बंगालमधील हिंदू सारख्याच प्रेमाने आणि आत्मीयतेने त्यांची गीते गातांना आढळतात. त्यांच्या गीतांचे सूर पूजेच्या वेळी, विवाहाच्या प्रसंगी, मृत्युशय्येजवळ, घाटावर आणि दिवाणखान्यात, कारखान्यात आणि शेतात सर्वत्र व्यापून राहिल्याचे दिसून येते. त्यांचे काव्य वाचून उठले म्हणजे विशाल महासागराचा गुरुगंभीर घोष घटकानुघटका कानांवर पडत राहावा असेच वाटते.

## संदर्भ:

१) आधुनिक राष्ट्रकवी – रवींद्रनाथ ठाकूर, क्षीरसागर, प्रा. श्री.के. – पुणे विद्यापीठ

२) रवींद्रनाथ : तीन व्याख्याने–देशपांडे, पु.ल. –, पुणे, श्री विद्या प्रकाशन १९८१
३) रवींद्रनाथ –खानोलकर, ग.दे. : व्हीनस प्रकाशन, पुणे
४) रवींद्रनाथ टागोर : यथार्थ दर्शन– संपादक , डॉ. धर्मराव, लोकविद्या प्रकाशन परभणी, प्रथमावृत्ती २०१२
५) रवींद्रनाथ टागोर विशेषांक, समाज प्रबोधनपत्रिका, क्र.१९५, जुलै – सप्टें. २०११
६) टागोर – साहित्य : कला: विचार, प्रंकाशक– मा. ना. गाडगीळ, डायमंड बुक स्टॉल, सांगली,पहिली आवृत्ती, ३० सप्टेंबर, १९६१

❖❖❖

# उच्च शिक्षणाच्या बदलत्या संकल्पनेत शिक्षकांची भूमिका

डॉ. सुवर्णा रा. गाडगे
सहयोगी प्राध्यापक मराठी,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
पत्ता : F.No. 3, रामानंद अपार्टमेंट, ख्रिस्त कॉलनी,
कलेक्टर कार्यालया जवळ, अमरावती, महाराष्ट्र (India)
इ मेल srgadge.1@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३१५२९१२

आज २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असतांना तंत्रज्ञान एवढे विकसित झाले आहे की, आपल्यासारखी विचार करणारी यंत्रे निर्माण करुन ज्ञानाच्या अधिकाधिक गरजा भागविण्यासाठी ते सज्ज आहे. आता जगाशी आपली देवाण—घेवाण प्रत्यक्ष न होता आपल्या प्रतिनिधी यंत्रामार्फत होते. जगाबरोबर भारतीय समाज फार झपाट्याने बदलत आहे. जगातील तिसऱ्या देशांच्या तुलनेत भारताचा विकास दर बरा आहे. आधुनिकतेच्या नावाखाली भारतीय समाजामध्ये अनेक बदल घडून येत आहेत. त्यामुळे समाजाच्या गरजेनुसार शिक्षणाचे स्वरुपही बदलत आहे. नवनवीन तंत्रज्ञान, नवीन संकल्पना, शैक्षणिक पध्दती शिक्षणाच्या प्रक्रियेत येत आहेत. अशा अवस्थेत शिक्षकाची भूमिका बदलली पाहिजे.

आधुनिकीकरण आणि सामाजिक बदलांमध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. “The teachers role will be as an agent of social change an innovator, organizer and communicutor – person He should be a radical reformer of society and education, a creative person and a good corrdinator of the various institutions and associations of the furture society, exploiting the new technology to the best advantage for the social purpose of education.”[1]

अनेक शतकांपासून भारतामध्ये गरीबी, लोकसंख्या विस्तार, निरक्षरता, बेरोजगारी अशा समस्या भेडसावत आहेत. या समस्यावर मात करण्यासाठी शिक्षक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. आजच्या शिक्षकाने या सामाजिक सुधारांच्या (social Reforms) दिशेने पावले उचलली पाहिजेत. आधुनिक मूल्ये आणि विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविली पाहिजेत. धर्मनिरपेक्षता, वैश्विकता, सामाजिकता या मूल्यांची जोपासना समाजामध्ये व्हावी, यासाठी शिक्षकाने मनापासून प्रयत्न केले पाहिजे.

आजच्या भारतीय समाजामध्ये बरीच परिवर्तने झाली आहे. विज्ञानाचे महत्त्व, विज्ञाननिष्ठ जीवन यामुळे भारतीय समाज यशाकडे वाटचाल करीत आहे. जॉन ड्युईच्या मते, “Education is recontration of experiences” सामाजिक बदल घडवून आणण्याच्या प्रक्रीयेत शिक्षणाचा सहभाग महत्त्वाचा आहे. शिक्षणामुळे विशिष्ट वैचारिक दृष्टिकोन बनतो.

आज होत असलेल्या सर्व स्तरातले बदल त्यामुळे जाणवणारे ताण, अस्वस्थता, अस्थिरता, भवितव्याची धुसरता ही सर्व युगांतर कालाची नांदी होय. भारतीय समाजाची जडणघडण करण्याची शिक्षकाची जबाबदारी आज कितीतरी पटीने वाढली आहे. समाजाला बदलविण्याचे कार्य आजच्या शिक्षकाला करावयाचे आहे. त्यासाठी त्याला स्वत:मध्ये अपेक्षित बदल करायचे आहेत. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत आजच्या शिक्षकाला दुहेरी भूमिका वठवायची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार शिक्षकाची भूमिका काय असावी ते यामध्ये सांगितले आहे.

“The status of the teachers reflects the sociocultral ethos of a society; it is level of its teacher. The government and the community should endeavour to create condition, which will help motivate and inspire teachers on constructive and creative lines. Teacher’s should have the freedom to innovate to the needs and caparituties and the concerns of the community.”[2]

आजच्या भारतीय समाजातील शिक्षकाच्या बदलत्या काळाची आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थ्यांची मनोभूमिका तयार करावयाची आहे. ती भारतीय राज्यघटनेच्या अनुषंगाने व जागतीक प्रगत देशांच्या वैज्ञानिक प्रगतीकडे लक्ष देऊन करावयाची आहे. सामाजिक बदलाच्या प्रक्रियेतून एक महत्त्वाचा घटक म्हणून शिक्षकाने लक्ष पुरविल्यास त्याला बदलत्या भूमिकेप्रमाणे कार्य करणे सोपे जाईल. उच्च शिक्षणाच्या बदलत्या संकल्पनेत शिक्षकांची भूमिका पुढीलप्रमाणे सांगता येते.

आजचा विद्यार्थी अधिक चौकस व चिकित्सक बुध्दीचा आहे. त्याची जिज्ञासा तीव्र आहे. अशा विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य वळण लावणारी शिक्षणपध्दती व शिक्षक ही आवश्यक आहे. यासाठी सर्वस्वी जीवन

वाहून घेणाऱ्या शिक्षकाची समाजाला गरज आहे. येत्या काळात शिक्षक हा निरंतर उपक्रमशील असला पाहिजे जाकतिकीकरणाच्या वेगवान प्रक्रियेमुळे आता सर्वच क्षेत्रातील स्पर्धेला एक जागतिक परिणाम प्राप्त झाले आहे शिक्षकाची वृत्ती ही स्वार्थापेक्षा कार्यास महत्त्व देणारी असावी तसेच त्या देशाविषयी अभिमान असावा. समाजातील प्रत्येक घटकामध्ये प्रत्येक व्यक्तीमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न करण्याचे कार्य शिक्षकालाच करावे लागते. ''आजच्या अस्थिर परिस्थितीत शिक्षकावर अभ्यास ज्ञान व विशेषत: विवके यांची फार मोठी जबाबदारी आहे''[३]

## भारतीय समाजाची संकल्पना :

भारतीय समाजाची सुधारणेकडे सतत वाटचाल चालू आहे. आजच्या भारतीय समाजामध्ये एक—दीड शतकापूर्वीच्या समाजाच्या तुलनेत बरीच परिवर्तने झाली आहे. परिवर्तनशिलता हा समाजाचा स्थायीभाव असतो. रानटी अवस्थेतून आजचा समाज सुसंस्कृत झाला आहे. वेदपूर्व काळापासून तर परकीय आक्रमणे ब्रिटीशापर्यंत या अनेक वर्षाच्या काळात संस्कृतीची नवी मूल्ये ही भारतीय समाजरचनेत प्रभावीत झाली. भारतीय समाजरचनेवर भारतीय संस्कृती वर पाश्चिमात्य ज्ञान—विज्ञान व पाश्चिमात्य संस्कृतीचा पुसटता ठसा उमटला आहे. अनेक वर्षाच्या कालक्रमणामुळे व परकीय आक्रमणामुळे भारतीय समाजात व संस्कृतीमध्ये अनेक रंग मिसळले असले तरी ती आपल्या वैशिष्ट्याने वेगळेपणाने आजही जगात नांदत आहे. या संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचे कार्य आजच्या शिक्षणातून व शिक्षकांच्या भूमिकेतून होत आहे. बहुविधतेत एकता हे भारतीय समाजाचे महत्त्वपूर्ण वैशिष्टे आहे. हा समाज उच्च जीवनमूल्यांनी प्रेरीत असलेल्या मूल्याधिष्ठित समाज आहे.

## वैज्ञानिक दृष्टिकोण व भारतीय समाज :

विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयांच्या अभ्यासक्रमाद्वारे वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण केला जाऊ शकतो. विज्ञानाचे महत्त्व व विज्ञाननिष्ठ जीवन यामुळे भारतीय समाज यशाकडे वाटचाल करीत आहे. आजच्या विज्ञानयुगात शास्त्रशुध्द माहिती व शास्त्रीय विषय यांची गरज आहे. शिक्षणातील आधुनिकीकरणाचा व शिक्षणातील वैज्ञानिक दृष्टिकोणाचा अतिनिकटचा संबंध आहे. शिक्षणाच्या आधुनिकिकरणाच्या प्रक्रियेत वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करणे ही बाब समाविष्ट आहे. जीवन समृध्द करण्यासाठी व प्रगतीचा पल्ला गाठण्याकरीता भारतीय समाजाला विज्ञानिष्ठ दृष्टिकोण अंगिकारण्याची आवश्यकता आहे.

## शिक्षणाची व्याप्ती :

शिक्षण ही एक व्यापक संज्ञा आहे. प्रत्येक विषयात विविध प्रकारच्या संशोधनामुळे ज्ञानाचा प्रस्फोट होत आहे. कला व विज्ञान यांच्या नवनवीन रुपामुळे आव्हाणे पुढे येत आहेत. विज्ञानयुगात ज्ञानाच्या कक्षा रुंदावत जाणाऱ्या असल्यामुळे शिक्षणाची व्याप्तीही वाढत आहे. अधिकाधिक तांत्रिक ज्ञान, नवनवीन कौशल्य आत्मसात करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. शाळेत जाणे म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षण हे अधिक व्यापक व सर्वसमावेशक होत आहे. कोणत्याही महाविद्यालयामध्ये न जाताही चांगले शिक्षण होऊ शकते ही कल्पना मूळ धरु लागल्यामुळे शिक्षणाची व्याप्ती ही अधिक विस्तारीत होत आहे.

"Schooling is not education, we may be in a school and not educated. We never have been in a school and have been genuinely educated. School buildings are not essential part of education."[4]

-Fitzpatric

शैक्षणिक नवीन उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, उत्साह ज्ञान व सृजनशीलता नवनिर्मितीची आवड, नैतिक मूल्यसंस्कार करण्याचे कार्य केले जात आहे. 'विद्यापीठाचे अस्तित्व मानवता, सहिष्णुता, बुध्दिप्रामाण्य आणि सत्यान्वेषण या मूल्यांच्या जपणुकीसाठीच आहे. विद्यापीठाने आपले हे कार्य यथायोग्य पार पाडले तरच समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टिने ते हितप्रद ठरेल.''[५]

## राष्ट्रविकासात शिक्षकाची भूमिका :

राष्ट्राचा विकास व त्याची पुरोगामित्व हे शिक्षणावर अवलंबून आहे. चारित्र्यसंपन्न व विवेकप्रधान पिढी निर्माण करण्याचे श्रेय शिक्षकाला दिले पाहिजे. ''शिक्षकाची गुणवत्ता हे परिणामकारी शिक्षणपध्दतीचे एक महत्त्वाचे अंग होय, यात शंकाच नाही. कमानीतील मध्ये चिऱ्याप्रमाणे त्याचे परिणामकारक शिक्षणातील स्थान असले तरी या शैक्षणिक मंदिराची रचना प्रमाणबध्द व डौलदार होण्यासाठी कित्येक अन्य घटकांनाही महत्त्व आहे. हे घटक जर जरुर त्या प्रमाणात उपलब्ध नसतील तर शिक्षणाची गुणवत्ता टिकवून धरता येणार नाही.''[६]

(नाईक अहवाल)

स्वार्थ, अंधश्रध्दा, भ्रष्टाचार, नितिमत्तेचा लोप, माणूसकीचा ऱ्हास होत असेल तर माणूसकी जागवून राष्ट्राचा विकास करण्याकरिता शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे.

## समाजिक बदल :

समाजिक बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेत शिक्षणाचा सहभाग महत्त्वाचा आहे. शिक्षणामुळे विशिष्ट वैचारिक दृष्टिकोण बनतो. शिक्षणामुळे सामाजिक बदलाकरीता योग्य पार्श्वभूमी तयार करणे. जातीयता, जातीभेद व धर्मभेद नाहिसे करण्यास पोषक वातावरण तयार करणे, स्त्री शिक्षणाद्वारे सामाजिक समता निर्माण करणे. लोकशाही जीवनमूल्ये प्रस्थापित करणे इत्यादीची जाणीव शिक्षणातून होते. सामाजिक बदल घडवून आणण्यात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. विचारातील, मनोवृत्तीतील, वागणुकीतील परिवर्तन आपल्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी स्वत:च्या व्यक्तीमत्वाच्या प्रभावाने शिक्षकाला करता येते. पण परिवर्तन आधी शिक्षकांच्या ठिकाणी झाले पाहिजे.

## उच्च शिक्षणाच्या बदलत्या संकल्पनेत शिक्षकाची भूमिका :

भारतीय समाजाची जडण–घडण करण्याची शिक्षकाची जबाबदारी आज कितीतरी पटीने वाढलेली आहे. समाजाला बदलविण्याचे कार्य त्याला करावयाचे आहे. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील दुहेरी भूमिका आजच्या अध्यापकाने समजुन घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये शिक्षकाच्या बदलत्या सामाजिक भूमिकेबद्दल मूलगामी स्वरुपाचे विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत. शैक्षणिक धोरण व शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याची शिक्षकाची प्राधान्याने जबाबदारी आहे. शिक्षक हा सर्व शिक्षणप्रक्रियेचा केंद्रबिंदू असून तो पाठीच्या कण्याप्रमाणे महत्त्वाचा आहे. शिक्षकाची बदलती भूमिका शिक्षकाने घेऊन त्याप्रमाणे कार्य करावे हे म्हणणे योग्य असले तरी एवढे महत्त्व देण्यात आलेल्या शिक्षकाच्या महत्त्वाच्या समस्याकडे लक्ष पुरविणे शासनाचे व समाजाचे कर्तव्य आहे. आजच्या भारतीय समाजातील शिक्षकाला बदलत्या काळाची आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थ्याची मनोभूमिका तयार करावयाची आहे. ती भारतीय राज्यघटनेच्या अनुषंगाने व जगातील प्रगत देशांच्या वैज्ञानिक प्रगतीकडे लक्ष देऊन करावयाची आहे. सामाजिक बदलाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक म्हणून शिक्षकाने लक्ष पुरविल्यास त्याला बदलत्या भूमिकेप्रमाणे कार्य करणे सोपे जाईल.

"Educational system all around the world is under increasing pressure to use the information and communication technologies (ICTs) to teach students to knowledge and skills they need in the 21$^{st}$ century. The 1998 UNESCO world Education Report, teaching in changing world decribes the radical implication information and communication technologies have for conventional teaching and learning. It predicts the transformation of teaching learning process and the way teachers and learners gain access to knowledge and information."[7]

राष्ट्रीयत्वाकडून आंतरराष्ट्रीयत्वाकडे व विश्वबंधुत्वाकडे वाटचाल करण्याकरीता व्यापक दृष्टिकोण तयार करण्याची आजच्या शिक्षकाची जबाबदारी आहे. आजही चांगल्या शिक्षकाला चांगला सामाजिक दर्जा आहे.शिक्षक ही समाजाची गरज असेल तर बोलघेवडेपणा कामाचा नाही. शिक्षकाला मानाचे स्थान प्राप्त करुन देणे समाजाचेही कर्तव्य आहे. शिक्षकाने स्वत:ला ओळखावे लागते ते स्वत:च्या विकासासाठी व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षण ही एक स्वाभाविक प्रक्रिया आहे. राष्ट्रविकासाच्या कार्यात शिक्षकाचे स्थान महत्त्वाचे आहे. आजच्या भारतीय समाजातील शिक्षकावर ही जडणघडणाची मोठी जबाबदारी आहे. देशाच्या प्रगतीच्या दृष्टिने आपल्या विद्यार्थ्यांची भूमिका तयार करणे व त्यांना राष्ट्रविकासाच्या मुख्य प्रवाहात आणून सोडण्याची जबाबदारी आजच्या शिक्षकाची आहे. एकविसाव्या शतकातील उच्चशिक्षणात यासाठी आवश्यक अशी कौशल्य विकसित करण्याची क्षमता

शिक्षकांमध्ये असावी लागेल. यासाठी चैतन्यशीलता व स्वप्रेरित सुधारणा घडवून आणण्याची वृत्ती जाणीवपूर्वक जोपासून विकसित करणे महत्त्वाचे वाटते. इंटरनेट, virtual class room, video conferencing, शैक्षणिक दृक–श्राव्य फिती, पेनड्राईव्ह, सी. डी. रोम सारख्या साधनांचा, तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण व्यवस्था अधिक प्रभावीपणे करण्याचे कार्ये शिक्षकालाच करावे लागेल, त्याशिवाय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दर्जेदार शिक्षणव्यस्था निर्माण करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. येथे फक्त अध्यापकाची भूमिका करुन चालणार नाही, तर त्याला व्यवस्थापक, समंत्रक, समुपदेशक, प्रशिक्षक, संशोधक, लेखक इत्यादी कार्य करावे लागेल. आंतरराष्ट्रीयकरणात विद्यार्थी ग्राहक असल्यामुळे शिक्षणाचा उच्च शिक्षणातील शिक्षकाच्या दर्जासह उच्च ठेवावा लागणार आहे. ''शिक्षकाची कार्यक्षमता व गुणवत्ता, त्यांची आपल्या कार्यावरील निष्ठा व स्वत: सतत अद्ययांवत राहण्याची तयारी त्याची ज्ञानलालसा व अध्ययनशीलता यांच्यावरच शिक्षणव्यस्थेचे यश अवलंबून आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या राष्ट्राची वैज्ञानिक व आर्थिक क्षेत्रात झपाट्याने प्रगती करण्याची नवी जबाबदारी सर्वांवर येऊन पडली आहे. पण ती शिक्षणावर विशेष प्रमाणात आहे.''[८] उच्च शिक्षणाच्या बदलत्या संकल्पनेत शिक्षकांची भूमिका पुढीलप्रमाणे सांगता येते. उच्च शिक्षणाच्या बदलत्या संकल्पनेत शिक्षकाची ग्रामीण, नागरी समाजाप्रती सामाजिक भूमिका महाविद्यालयीन शिक्षकाची वैशिष्ठपूर्ण मूलभूत भूमिका, व्यावसायिक, अनौपचारिक भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

शहरातील ज्ञानशक्ती व खेड्यातील श्रमशक्ती यांचा सेतू बांधण्याचे काम उच्च शिक्षण क्षेत्रातील शिक्षकालाच करावे लागणार आहे. श्रमशक्तीने डोळे द्यावे व ज्ञानशक्तीला श्रमशक्तीने हातपाय द्यावेत, अशी विनोबांची अपेक्षा होती. हे साध्यप्रत करणे म्हणजे भारत शाबूत ठेवणे होईल, आधुनिक तंत्रज्ञान, अद्ययावत ज्ञान सर्जनशीलता, गुणवत्तापूर्णता, क्षमताधिष्ठित कौशल्ये, विचारशक्तीचे आत्मभान जागविणारे कार्य आणि नवसहस्त्रकाच्या कालखंडात, बदलत्या समाजाची मानसिकता लक्षात घेऊन समाजाला सशक्त विधायक दिशा देणे, विधायत मानसिकता निर्माण करणे, हेच उच्च शिक्षणापुढील व शिक्षकांसमोर आव्हान आहे आणि भावी काळात याला शिक्षकाची कालसुसंगत भूमिकाच निश्चितपणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## संदर्भ सूची


1. Multifarious Role of the Teacher for National Development- Sing B. (University News)-42(44) Nov, 01-07-2004,P-16
2. University News, New Delhi Association of Indian Universities
3. भारतीय उच्च शिक्षण : कसे आहे? कसे असावे?, श्री. ल. पांढरीपांडे, उन्मेष प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९७२ पृ. क्र. १९३
4. उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण– ना. ग. पवार नूतन प्रकाशन, पुणे प्रतिरुप मुद्रण : एप्रिल १९९५ पृ. क्र. २३
5. आजच्या शिक्षण : आजच्या समस्या– लीला पाटील, विश्वंभर कुलकर्णी – श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७१ पृ. क्र. ११६
6. शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शिक्षणविकास – डॉ. भा. गो. बापट – व्हीनस प्रकाशन, पुणे –३०, आवृत्ती पहिली, मार्च १९७३, पृ. क्र. २६०
7. Ranjana Bhatia – ICT Enabled Teacher Education (University News 43(22) May 30 Jane 05-2005),P7
8. महाराष्ट्रातील शिक्षणाची वाटचाल– ग. वि. अकोलकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७४ पृ. क्र. ३६


❖❖❖

# भारतीय भटक्या—विमुक्त जमातींचा इतिहास

डॉ. विजयकुमार खंदारे
मराठी विभागप्रमुख,
इंद्रायणी महाविद्यालय,
तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे, महाराष्ट्र (India)
इ मेल hodmarathi@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२५६९२४९

## प्रास्ताविक :

'भटके' हा शब्द 'नोमड' या इंग्रजी शब्दाचे रुपांतर आहे. नोमड हा शब्द 'नेमो' या ग्रीक शब्दापासून तयार झाला असून 'नेमो' याचा अर्थ 'पशुपालक' असा होतो. युरोपिअन देशामध्ये दाट जंगलाच्या अभावामुळे व कुरणांच्या उपलब्धतेमुळे तेथील मानवी समूह दीर्घकाळ पशुपालक अवस्थेमध्ये होता. मात्र भारतामध्ये पशुपालक, शिकारी व अन्नशोधक या तिन्ही प्रकारचे समूह मानवी संस्कृतीच्या सर्व टप्प्यात दिसून येतात. भारतातील आदिम व भटक्या जमातींच्या उत्पत्तिविषयी फारसे संशोधन झालेले दिसून येत नाही. येथील संपत्तीच्या आशेने, अन्नाच्या आशेने या देशावर अनेक मानववंशानी आक्रमणे केली व हे मानववंश या देशात स्थायिक झाले व ते इथल्या जनजीवनामध्ये मिसळून गेले. त्यामुळे इथल्या जातीजामातीचा वांशिक निर्मितीबद्दल काही अंदाज बांधणे, हे धाडसाचे ठरते. इरावती कर्वे, मुजुमदार, रिस्ले यांसारख्या मानावंश शास्त्रांज्ञांनी याबाबत परस्पर विरोधी अनुमाने काढलेली आहेत. कपोलदर्शकांक व नाटिकादर्शकांक या वांशिक निश्चितीसाठी इतर देशात यशस्वी ठरलेल्या कसोट्या या देशातील शास्त्रज्ञांना मात्र गोंधळात टाकतात. या तिन्ही जमातीचा सामाजिक दर्जा मात्र भिन्न—भिन्न स्वरूपाचा आहे. भारतातील वर्णाश्रमपद्धती, अस्पृश्यता यामुळेही भारतातील जातीजमातीच्या संशोधनामध्ये पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या अनुमानाचा आधार घेणे धोक्याचे ठरते.

अर्वाचीन मानववंशशास्त्रज्ञांनी पाशचत्यांच्या अनुमानाचा आधार घेतल्याने भारतीय इतिहास व समाजशास्त्र यांच्यामधील सत्यशोधनात अनेक प्रश्नचिन्हे कायम असल्याचे दिसून येते. कारण भारतातील फार मोठ्या मानव समूहांना येथील ब्राम्हणी संस्कृतीने मानवी दर्जाच नाकारल्याने त्यांच्या इतिहासाबद्दल, संस्कृतीबद्दल, अन्यायाबद्दल, श्रमाबद्दल येथील लिखित वाङ्मयात अवाक्षरही काढलेले दिसत नाही. स्वातंत्र्यानंतरही ही परिस्थिती फारसी बदललेली नाही. त्यामुळे आजही संशोधकांना रसेल, रिस्ले आदींसारख्या पाश्चात्य संशोधकांनी जतन केलेल्या तुटपुंज्या सामग्रीवर अवलंबून राहावे लागते. या देशातील आदिम व भटक्या जमाती भारतीय व परकीय संस्कृतीच्या अनेक आक्रमणामुळे भितीग्रस्त, एकलकोंडा व अंतर्मुख बनलेला आहे. त्यामुळे बाहेरच्या संस्कृतीतील व्यक्तींना त्यांच्यात मिसळून काम करणे, माहिती मिळवणे अवघड असते. डॉ. व्ही. डी.देशपांडे, यशवंत ठाकर आदी अभ्यासकांनी तसा प्रयत्न केला असता त्यांना फारसे यश आले नसल्याने, प्रतिसाद मिळाला नसल्यचे सांगतात. पुढे लक्ष्मन माने हे अशा जमातीपैकी असल्याने व त्यांची भाषा अवगत असल्याने त्यांना मात्र हे काम करणे सुलभ झाले. हे त्यांनी लिहिलेल्या 'विमुक्तायन' या ग्रंथातून स्पष्ट झाले आहे. भारतातील आदिम व विमुक्त जमातींचा मूळ उगमाचा शोध घेत असताना लक्ष्मण माने हे त्यांचे प्रमुख तीन गटात वर्गीकरण करतात. ज्या जमाती हजारो वर्षापासून मानवी संस्कृतीपासून अलग पडलेल्या असून त्या अत्यंत दाट जंगलात राहतात.
उदा. संथाल, मिल, कोरकू, कोलम, गोंड इत्यादी.

अ. आपले वस्तीस्थान उद्ध्वस्थ झाल्याने नागर संस्कृतीच्या आसपास राहणाऱ्या परंतु भिक मागणे किंवा आदिम कौशल्याचा वापर करून उपजीविका करणाऱ्या जमाती, उदा. कैकाडी, माकडवाले, गारुडी, जोशी, कंजारभाट, पारधी इत्यादी.

ब. जाति व्यवस्थेच्या आधाराने पण गावाबाहेर राहणाऱ्या जमाती उदा. रामोशी, बेरड, वडार, घिसाडी, गोंधळी इत्यादी.

अशा प्रकारे लक्ष्मण माने यांनी भारतीय भटक्या विमुक्त जातीजमातींच्या वर्गीकरणावरून त्यांचे उगमस्थान, चालीरीती, रूढी, परंपरा, व्यवसाय, विवाहपद्धती, जातपंचायत आदी गोष्टींची सखोल संशोधनात्मक सिद्धतांची मांडणी प्रस्तुत ग्रंथात करताना दिसतात.

भटक्या विमुक्त जमातींचे विद्यापण ऐतिहासिक पार्श्वभूमी सुमारे पाच हजार वर्षापूर्वी भारतामध्ये आर्यांच्या टोळयांनी आक्रमणे करण्यास सुरुवात केली. हा प्रकार आठशे ते नऊशे वर्षे चालला असावा असे अभ्यासक मानतात. आक्रमणाच्या लाटा सिंधू तीरावर येऊन धडकत होत्या आणि येथील अनार्यांशी संघर्ष करून प्रसंगी समेट करून आर्यांनी आपल्या वस्त्या गंगेपर्यंत वाढवीत नेल्या. आपल्या मनुष्यबळाला अपुरेपणामुळे त्यांनी जीत अनार्यांच्या स्त्रियां व मुले पटविण्यास सुरुवात केली होती. याशिवाय सिंधू आणि गंगा खोऱ्यातील सुपीक प्रदेशामुळे येथे राहणारे मूळ अनार्य लोक कोण होते हे सांगताना कोसंबी म्हणतात, ''ज्यांना दास, दस्यू, अही, पनी, नाग, राक्षस, असूर, कालकेस, किरात अशा अनेक नावानी ओळखले जात होते. ते मूलतः सुसंकृत, शांतताप्रिय, कालवे काढून शेती करनारे, धरणे बांधणारे, नगरे बांधणारे, स्थापत्यविशारद, गो–पालक, शेतकरी व कारागीर होते.''

प्राचीन भारतीय समाज संस्कृती संवर्धन त्यांचा मोठमोठ्या धरणांच्या पाण्यामधून जलप्रवास आणि कारभार चालत असे. इजिप्त, मेसोपोटेमिया, बाबिलोनिया इ. तत्कालीन राष्ट्रांशी त्यांचा व्यापार चालू असल्याचे अनेक पुरावे आढळून येतात. त्यांनीच मोहेंदोजोडो व हडप्पा यासारखी व्यापारी शहरेही वसविली होती. हे उत्खननातील पुराव्यावरून सिद्ध झाले. परंतु भारतावर संपूर्णपणे अधिकार असणारे कोणतेही साम्राज्य असल्याचा पुरावा आढळत नाही. इतकेच काय तर फार मोठे सैन्य किंवा शस्त्र साठा असल्याचे पुरावे आढळत नाहीत. म्हणजे नद्यांच्या खोऱ्यांमध्ये बसलेली निरनिराळया जमातीची सुखी नगरे, याप्रकारचे स्वरूप तत्कालीन राष्ट्रांचे असावे असे दिसून येते. म्हणूनच आर्यांनी त्यांच्या पाणीपुरवठा तोडून, त्यांची घरे जाळून त्यांच्यावर सहज विजय मिळविला आहे. संरक्षणाच्या अपुऱ्या साधनामुळे मुठभर टोळ्यांच्या सहाय्याने असंख्य अशा अनार्य नगराचा, आर्यांनी विध्वंस केला, असे दिसून येते. परकियांच्या आगमनाबरोबर गावातील लोक आपली मालमत्ता व घरेदारे सोडून जंगलामध्ये परगंदा होत असत. आणि त्या नगराचा ताबा आर्य घेत असावेत. परंतु या टोळ्यांकडे भांडी तयार करणारे, शेती करणारे, इतर कला–कुसारीची कामे करणारे सेवाउद्योग करणारे लोक नसत, म्हणून परागंदा झालेल्या लोकांना काम धंद्याच्या उद्देशाने परंतु गुलामांच्या स्वरुपात गावाच्या बाहेर किंवा गावाच्या परिघाला लागून वरती राहायला परवानगी देत. म्हणजे आर्यांच्या आक्रमणानंतर इथे दोन महत्त्वाचे बदल झाले. एक म्हणजे सत्ताधारी वर्ग बदलला आणि दुसरे म्हणजे कामकऱ्यांची प्रतिष्ठा नष्ठ झाली. हे गावाच्या परीघाजवळ राहणारे लोक आपापल्या पूजाअर्चा व देवदेवता जपून ठेऊन अनुतागायात गुजराण करीत आहेत. याउलट, ज्यांनी मात्र आपली पुरोहित व्यवस्था आर्यसदृश्य बनविली व यज्ञसंस्थेचा स्वीकार केला असल्याचे दिसून येते. येथे राजेंद्र कुंभार यांचा आदिम जमाती विस्थापनाचा डबक्यामध्ये अचानक मागे दगड पडल्यास दोन प्रकारचे बदल घडून येतात. पहिल्या डबक्याबरोबर त्या डबक्यातून दूर उडून जाणारा चिखल तेथेच वळून जातो पण उरलेला चिखल मात्र त्या दगडाला वेधून राहतो, आणि दगड चिखालांशी एकरूप झाल्यासारखा वाटतो.'' याच पद्धतीप्रमाणे जे अनार्य लोक दूरवर जंगलामध्ये विस्थापित झाले ते फळे, कंदमुळे व शिकार यावर उपजीविका करून आपापल्या जमातींची फिरती राष्ट्रे बनवून आदिम टोळ्यांच्या स्वरुपात जगत राहिले व आजही जगत आहेत. एका अर्थाने या सर्व लोकांना भारतीय संस्कृतीचे जिवंत जीवाश्म असे संभोधता येईल. कारण पाच हजार वर्षापूर्वीची संस्कृती, जी नागर जीवनापसून दुरावलेली आहे. ती जशीच्या तशी चालू आहे. रूढी, परंपरा आणि न्यायव्यवस्थेवर या लोकांनी टिकून ठेवली आहे. तर त्यांच्यासारखी संस्कृती असलेल्या गावगाड्यातील शहरांचे मात्र संस्कृतीकरण होत गेलेले दिसते. दलदलीला दगड कितीही चिखलाने माखला तरी आपले अंतरंगातील दगडपण बदलू देत नाही. त्याच पद्धतीने या देशातील उच्चवर्णीय समाज अस्पृश्यतेसह आपले आर्यस्वरूप नष्ट होऊ देत नाही. बहुजन समाज मात्र आर्य–अनार्य संकरातून निर्माण झालेल्या प्रजेच्या परंपरेचा, धर्मविधीचा, देवदेवागांचा प्राणपणाने सांभाळ करीत राहतो आणि मनोभावे ही आर्यांची देणगी आहे असे मानीत राहतो.

आदिम जमातीच्या संस्कृतीच्या आणि विद्येचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, देवळे, देवदैवत, लग्नविधी, जन्मसंस्कार, मृत्युसंस्कर याबाबतीत विमुक्त जमाती या पूर्वापारपणे जमाती स्वरूपातच आहेत. गावगाड्यामध्ये किंवा बलुतेदारी व्यवस्थेमध्ये त्यांना काम व स्थान नाही, त्यांची स्वतंत्र जातपंचायत आहे. जी दिवाणी व फौजदारी दोन्ही स्वरूपाचे प्रश्न मिटवते. त्यांचा धर्म हिंदू किंवा मुस्लीम या स्वरूपाचा नाही तर आदिम

देवांची व शक्तीची ते पूजा करतात. नागर समाजातील कायदे कानून मानीत नाहीत. जमातींच्या बाहेर शरीरसंबंध बनवत नाहीत. जमातीबाहेरचे पुरोहित बोलावत नाहीत. अंगा–खांद्यावर गोंदावतात. धार दिव्य, तेल दिव्य यासारखी दिव्ये करतात. जनावरांच्या आणि गुन्ह्याच्या संख्येवर त्यांची प्रतिष्ठा असते. अनेक जमातीमध्ये मृत इसमाच्या पत्नीवर धाकट्या भावाचा हक्क पोहोचतो. पंचायतीकडून न सुटणाऱ्या गोष्टीवर वयोवृद्ध व्यक्तींचा सल्ला घेतला जातो. मातृकुलाला प्रतिष्ठा दिली जाते. मद्याला पुजाविधीमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. तुरुंगात जाणाऱ्या किंवा मरणाऱ्या माणसाच्या कुटुंबाची सर्व जमत मिळून काळजी घेते. लुटीचा अगर भिकेचा वाटा सक्षम, अक्षम, स्त्रियां व मुले या सर्वांनाच मिळतो. या सर्व बाबतीत विचार केल्यास विमुक्त जमाती या पूर्णपणे आदिम जमाती असून हजारो वर्षांपूर्वी येथील मूळ प्रवाहपासून त्या तुटलेल्या असाव्यात, हे सिद्ध होते.

भारतामध्ये जोपर्यंत जंगलाची विपुलता होती तोपर्यंत नागरी भागामध्ये एक संस्कृती संकर चालू होता. तर दुसऱ्या बाजूला जंगलामध्ये आदिम रोग्यांची बदल नाकारणारी, थिजलेली संस्कृती गुण्या गोविन्दाने नांदत होती. वाढत्या लोकसंख्येने जेव्हा नगरे अपुरी पडू लागली, शेतीसाठी व नगरे निर्माण करण्यासाठी नव्या भूभागाची गरज पडू लागली, तेव्हा मोठ्या प्रमाणात जंगले जाळण्यास व तोडण्यास सुरुवात केली. जंगलाचे नैसर्गिक श्वास हरवल्यानंतर अन्नाच्या अभावामुळे त्रस्त झालेल्या या टोळ्या कधी जंगलाचा माल घेऊन, कधी प्राण्यांची कातडी घेऊन एकट्या–दुकट्याने किंवा कारागिराच्या स्वरुपात नागर भागात प्रवेश करू लागल्या. राजासाठी शिकार करून पुरविणे व त्याबदल्यात अन्न मिळविणे या स्वरूपाचे संबंध या टोळ्या व नागरी समाज यांच्यामध्ये राहिले. त्यांच्या आदिम संस्कृतीमुळे त्यांच्यामध्ये 'साठा' करण्याची प्रवृत्ती नसते. म्हणून त्यांना मिळणाऱ्या मोबदल्याचे स्वरूप एखाद्या दुसऱ्या वेळचे अन्न किंवा भीक असेच असे. जमिनीवर झाडावर किंवा अन्नावर कोणाची व्यक्तिगत मालकी असू शकते, ही कल्पनाच आदिम कायद्यामध्ये नसल्याने, जेव्हा अन्न मिळणार नाही तेव्हा सापडलेली तेथील कंदमुळे, अन्नधान्य, लाकूडफाटा निसर्गाची देणगी म्हणून या जमिनींच्या मालकी संबंधात कायदे तयार झाले. या कायद्याची या जमातींना माहिती असणे शक्य नव्हते. किंबहुना निसर्ग हो कोण एकाची खाजगी मालकीची गोष्ट असू शकते, ही कल्पनाही त्यांना मानवण्यासारखी नसते. म्हणून या जमातीचे कायदे व ब्रिटीश सरकारचे कायदे यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला व त्यांचाच परिणाम म्हणून हे निसर्गाचे पुत्र नागर समाजात गुन्हेगार व चोर ठरले. व त्यांच्या वाट्याला दीर्घकाळ तुरुंगवास आला. पुढे या सर्व जमाती गुन्हेगार जमाती म्हणून ओळखला जाऊ लागल्या.

ब्रिटिश सरकारने 'गुन्हेगारी जाती कायदा' केला. या कायद्याने काही जातीची मानसे जन्मताच गुन्हेगार असतात असे ठरविण्यात आले. पोलिसी अन्याय–अत्याचाराला कंटाळून रानावनात लपून–छपून कोल्या–लांडग्याचे जीवन जगणे त्यांच्या वाट्याला आले. पुढे ब्रिटिश सरकारने केलेल्या गुन्हेगार वसाहतीकरण कायद्यामुळे तर त्यांच्यावर कडक निर्बंध लादून तारेचे कुंपण व पोलिसाचा कडक पहारा असलेल्या त्यांच्या वसाहती (सेटलमेंट कॉलनी) स्थापण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर आपल्या राज्यघटनेने कोणत्याही जातीतला माणूस जन्मत: गुन्हेगार असू शकत नाही. हे तत्त्व मान्य केल्याने तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी सोलापूर येथे येऊन या भटक्या जमातींच्याभोवतीचे तारेचे कुंपण कातरीने कापले आणि 'आजपासून तुम्ही 'विमुक्त' झालात असे जाहीर केले. तेव्हापासून या जाती 'विमुक्त जाती' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. त्यात बेरड, भामटा, कैकाडी, कंजारभाट, लमाण, पारधी, रामोशी, वडार वाघरी, छप्परबंद आदींचा समावेश आहे. अशा विमुक्त जातींना महाराष्ट्र शासनाने मागास व दुर्बल समाज घटक मानले आहे.

उपजीविकेसाठी सतत भटकत राहण्याची परंपरा असलेल्या काही जमाती आहेत. त्यात देवदेवांच्या नावे भिक्षा मागणाऱ्या, कसरतीचे, हातचलाखीचे, करमणुकीचे खेळ करून भिक्षा मागणाऱ्या, काही जमाती आहेत. बैल, साप, माकड, अस्वल, पोपट वगैरे पशुपक्ष्यांचा उपयोग भिक्षा मिळवण्यासाठी करतात. नाचगाणे, भविष्य सांगणे, करपल्लवी, नेत्रपल्लवीच्या आधारे निरोप ओळखणे. ताल–सूर शब्दांचा वेध घेत लपवलेली वस्तू शोधून काढणे, काही जमाती वनस्पतीची औषधे किंवा लहान मुलांसाठी पाना–फांद्यांची खेळणी तयार करून त्या विकून भिक्षा मागतात. या लोकांना गावगाड्यात कोठेच स्थान नाही. त्यांचा सारा संसार रस्त्यावरच. मी लोकांचा दयेवर अशीच त्यांची स्थिती. म्हणूनच बाळकृष्ण रेणके म्हणतात, ''या जमाती म्हणजे लाचारीचे आगर आहे'' (भटक्या विमुक्तांचा एल्गार येत आहे.) भटक्या प्रवृतीमुळे पराकोटीचे अज्ञान व दारिद्र्य बाळगणारा हा समाज 'आज इथं तर उद्या तिथं' अशा अवस्थेत पदोपदी मानवी अपेक्षांना तोंड देत विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर या पद्धतीने जीवन जगतो आहे. अशा

या बाबत, बैरागी, भराडी, गारुडी, घिसाडी,गोंधळी, जोशी, कोल्हाटी, डोंबारी, म्हसनजोगी, नंदीवाले, वासुदेव आदी अशा भटक्या जमातींना महाराष्ट्र शासनाने मागास व दुर्बल घटक मानले आहे.

## समारोप:

स्वातंत्र्यानंतर तरी या लोकांच्या आयुष्यात सुखाची पहाट येईल अशी आशा होती. त्या पहाटेचा सूर्य उगवतच नाही आणि पहाटेचा संकेट देणारा शासनाचा लोकहितोपयोगी कोंबडा काही आरवतानाही दिसत नाही. हे लक्षात मराठी साहित्याने विशेषत: दलित साहित्याने आगपाखड केली आणि भटक्या विमुक्तांचे वास्तव जीवन खऱ्या अर्थाने जगाच्या उगघडया व्यासपीठावर मांडले ते आत्मकथनांमधून. म्हणूनच त्यातील लक्ष्मण माने यांचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', रत्नेश पिंग्या काळे यांचे 'पारध्याचं जीणं' संतोष देवराव पवार यांचे 'चोरटा' आदींतून भटक्या विमुक्तांच्या व्यथा आणि कथा बाहेर आल्या. तर नामदेव ढसाळांसारखा कवी 'सांगा स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे...' हे पोटतिडकीने आणि जबाबदारीने का लिहितात या प्रश्नाचे उत्तर येथे सापडते.

आजही भटक्या–विमुक्तांच्या जीनाच्या व्यथा आणि कथेचे फारसा बदल झाला असे छातीठोकपणे आपण सांगू शकत नाही, आजही त्यांचे जीणे आज इथे तर उद्या तिथे असेच आहे, हे खेदाने सांगावे लागते. शिक्षणच्या प्रवाहात हा समाज आल्यास आणि त्याने फुले, शाहू, आंबेडकर, ताराबाई शिंदे जीवनात रूजविल्यास येत्या काही दिवसात त्यांचेही जातील दिवस, त्यांचे दैन्य संपेल अशी आशा करायला हरकत नाही.

❖❖❖

# डॉ. बाबासाहेबांचे साहित्यविषयक विचार

**प्रा. भारती दि रत्नपारखी / चिमूरकर**
**डॉ. आंबेडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर**
bhartichimurkar23@gmail.com 9665710173

## प्रस्तावना :

हिन्दुधर्मग्रंथ हिन्दु समाजाचा पाया आहे. वैदिक वाङःमयातील सहिता,ब्राम्हण्यके, आरव्यके, उपनिषदे,सुत्रे, शृत्ति,स्मृति,पुराणे आदीधर्मशास्त्राच्या धर्मग्रंथाच्या मूलभूत आधारावर हिन्दू समाजाची इमारत,आज शतकानुशतकांपासून उभी आहे.हिन्दुसमाज यालाच प्रामाण्य द्वितियावृत्ती मानून हजारोवर्षापासून जीवन व्यतीत करताना दिसतो. हिन्दू समाजातीलएका जातीने दुसऱ्या जातीशी कसे वागावे यांची नियमावली कायदेकानून स्वरुपात धर्मग्रंथात ग्रंथित केले आहे .याच धर्माचरणात बध्द झालेली समाज दिसतो.

बीजशब्द : साहित्यविचार, समाज, राजकीय, सांस्कृतिक, डॉ. आंबेडकर

## विषय विवेचन

प्राचीन काळापासून भारतात अनेक आक्रमणे,विचार, संघर्ष झालेत. राजकीय व सांस्कृतिक आक्रमणेही झालीत त्यामुळे येथे सामाजिक प्रबोधन झालेच नाही . परकीयांनी आक्रमणात आपली सांस्कृतिकमुल्यांचा व मुळरहवांशीच्या जीवनमुल्यांच्या तफावतीमुळे येथे वैचारिक वादळ आलीत.त्याचा परिणाम येथिल समाजकारण, धर्मकारण,अर्थकारण, राजकारण,कला वाङःमय,उद्योग व्यवसाय,ज्ञान विज्ञान यावर झाला. सामाजिक सर्वच क्षेत्र बंदिस्त,कोंडित सापडलेत. मानवी जीवनाला विवके व अनुभवातुन तारण्यापेक्षा धर्मग्रंथातील कथाकल्पित भ्रम वअज्ञान पाह लागले. भारतातील वैदिक सांस्कृतिचा विकास हा विषमता टिकविणे हे एकमेव ध्येय घेवुन जास्तीत जास्त प्रभावी साधने वापरत ती कायम ठेवणे यावरच त्यांची भिस्त होती .विषमता पुजनीय माननारी मने घडविणाऱ्या साधनांचा विकास,त्या जाणिवेंचा विकास घडविणाऱ्या वेद,उपनिषेद,गीता मनुस्मृती, ज्ञानेश्वरी ते दासबोध इ साहित्य निर्मिती हयाच उद्देशाने झाली. याचा समाजजीवनावर प्रंचड परिणाम झाला समाज सर्वच क्षेतात आर्थिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक क्षेत्रात बदिस्त होवून कोंडीत सापडला.

वेदकाळपासून तर स्वातंत्योत्तर काळापर्यंतच्या काळात सर्वच परपंराच्या केंद्रस्थानी वर्णव्यवस्था होती. वर्णव्यवस्थेत मानवाला समतेचा, न्यायाचा, स्वातंत्र्यांचा हक्क नाकारतो . माणुसकीला, मानवी मूल्यांना काळया पाण्यात पाहतो. भारतात वैदिक काळात मानवाच्या मुक्तीचा विचारच झाला नाही तर या देशातील समाजाने शेकडो जखामा दिल्या.

चार वर्ण, अस्पृश्यता आणि या सर्वात हजारो जाती बौध्द काळ हिदुस्थानाच्या इतिहासात अत्यंत महत्वाचा आहे. या बौध्द कालखंडातच अनेक उत्क्रांत्या झालेल्या दिसतात. बौध्दकाळापासूनच ऐतिहासिक काळाला सुरुवात झाली. मानवी नितिमुल्यांना बहर आली. करा जेणे करुण अंधार दूर होईल असे प्रवर्तीत व्हा आपल्या देशात माणसामाणसात बंन्धुत्व, समता स्वातंत्र्य,न्याय,माणूस खऱ्या अर्थात उपेक्षित दलित यांचा फार मोठा प्रवर्ग आहे त्यांच्या उत्थानाचे कार्य दुःखमुक्त व्हायला लागलीत . खऱ्या अर्थाने सुबत्ता आली. दुःख त्यांची व्यथा नीठसमजून आधारित साहित्य व संस्कृती निर्माण होवून भारत बुध्दमय झाला.साहित्यद्वारे त्यांच जीवन उन्नत करा व आपलेजीवन व राष्ट्रीयजीवन प्रगटीकरण होणारे

साहित्य निर्मीतीची आज उनिव की तिला पराभूत होऊ दयायचे नसेल तर तिला आचाराचे भक्कम दिसते पाठबळ मिळवून दयायचे असते. कोणताही नवा विचार आचारातून ___भारतात संविधान लागू होवून एकात्मतेची व बधुत्वाची आज साकार झाल्याशिवाय त्याला शक्ती प्राप्त होत नाही. बुध्दमय भारताची नितांत गरज आहे. एकात्मता व बधुत्व हे आपल्या साहित्याचा गाभा आहे. इ. स. ४ थे शतकात प्रतिक्रांतीत अस्पृश्यता निर्माण झाली. हे सारे झाले फक्त तो ग्रंथसंपदेच्या हत्यारांना म्हणूनच साहित्य व संस्कृतीचा साहित्य शास्त्रांचा तो निर्माण करणे काळाची गरज आहे डॉ बाबासाहेब निकट संबंध मानला जातो. या साहित्याने सामाजिक घडीचे पारडेच बदलवून टाकले.

साहित्याचा निकटचा संबंध असावा व यासाठी आंबेडकरी जनतेचा भाषा ही संवादाचे विचारविनिमयाचे प्रभावी माध्यम आहे. साहित्य हे मानवतावादी साहित्यशास्त्र म्हणून जो पर्यत संभाषण, वाचन व लेखन या भाषेशी निगडीत चार प्रमुख प्रक्रिया निर्माण होणार नाही, तोपर्यत राष्ट्रपयोगी क्रांतीची लाट उसळणार नाहीत. कथा,कविता, कांदबरी, नाटक, ललित, गद्य वैचारिक गद्य इ .साहित्य प्रकारचे विविधांग आहेत. व्यक्ती आपल्या अनुभवाची पेरणी साहित्यातून करत आहे. ज्ञानाच्या सर्वशाखांचे सत्व त्याने अभिव्यक्ती भाषेद्वारे करित असतो .भारत आज विश्वात विकसनशील देश म्हणून उभा आहे. महासत्ता होण्याचे बळ त्यांच्या पखांत आहे.

ज्ञानसत्वाची गरज पूर्ण झाली असली, तरी अनुभूतीपूर्ण डॉ आंबेडकर हे क्रांतीच्या तत्वज्ञानाचे शिल्पकार होते.आयुष्यात  सकल साहित्याची गोडी आम्हाला चाखता आली पाहिजे . शेवट पर्यंत त्यांनी गहन असे वैचारिक लेखन केले.समाजक्रांतीसाठी आपण आपल्याजीवनाकडे, कर्तव्याकडे. संस्कृतकडे दुर्लक्ष करित आंदोलने उभारलीत. द न कांबळे यांन लिहिले त्या १३ जून १९४१ च्या पत्रात ते म्हणतात मी रात्रदिवस कामात असतो. मरण,शौक,चैन, मूल्ये कशी करपून जात आहेत हे लक्षात येईल. ही भयान भेसूरुता आराम पाहत नाही .नाटक सिनेमात मी वेळ घालवितू नाही. माझा धंदा लक्षात घेवून अधपतनाच्या, अवनीतीच्या मार्गावरुन आपण चालले वाचून किंवा सार्वजनिक कार्य या व्यवसायात मी सतत गुंतलो आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, मी मनोरंजनासाठी काहीच वाचन केले नाही . जीवन व सांस्कृतिक मूल्ये जोपासली पाहिजे. डॉ आंबेडकर हे कथा,वाडमयापेक्षा मी इतर वाङ:मय वाचलेत. राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर मी साहित्य निर्माण करणार आहे.साहित्य हा जीवनाचा आरसा आहे. बाबासाहेबांचे साहित्य तात्कालीन सामाजिक अनेक वादळांना निर्माण भारताच्या एकूण इतिहास बघता वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था,अस्पृश्यता करणारे होते.अनेक विषमतावादी विचारांचा विध्वस देखील त्यांनी परकीय आक्रमणे माणूस दिवसागणीक अमानुष्य, पशुतुल्य,अस्पृश्य वैचारिक साहित्यातून केला. त्यांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोणातून विचार होतांना दिसतो. शुद्र माणूसाला व्यक्ती म्हणून किंमतच नव्हती म्हणून नवसमाज निर्मीती प्रक्रियेसाठी कालबाहय मूल्यांचा विध्वसं केला. हया राष्ट्राचे जीवन उन्नत करणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे. जीवनात विध्वसंक विचारातून नवसमाज निर्मीतीची शक्यता बळावते . कोणतेही भेद राहणार नाही असे साहित्य निर्माण झाले पाहिजे. मानवी नवसाहित्याची प्रेरणा बळावते.प्रस्थापित व्यवस्थेला शरणागती पत्करायला नितीमुल्यांची साक्ष देणारे साहित्य व तत्वज्ञान निर्माण करणारे साहित्य लावते. निर्माण झाले पाहिजे जीवनविषयक मूल्ये व सांस्कृतिक मूल्याची जोपासना ___तथागत भगवान बुध्द, म कबीर, म फुले, डॉ बाबासाहेबांच्या करणार साहित्य निर्माण झाले पाहिजे.

ज़शी संस्कृती तसे साहित्य किंवाप्रेरणेने जे साहित्य निर्माण झाले. दलितसाहित्याच्या नावाने पूढे आला जसे साहित्य तशी संस्कृती असे साहित्य आणि संस्कृतीच्या संदर्भात१९६० नंतर दलितसाहित्य शब्द जावून त्यालाच आंबेडकरी साहित्यअसे नामांतर झाले. डॉ आंबेडकरांच्या क्रांतीकारी तत्वज्ञानातून जम्माला येण शक्य आहे.. आंबेडकर म्हणतात, उदात्तजीवन वसांस्कृतिकमूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून

अविष्कत करा.आपले ध्येय संकुचित ठेवू नका ते विशाल बनवा. आपली लेखनी आपल्याच प्रश्नांऐवढी मर्यादित ठेवून बंदिस्त करु नका तिला तेजस्वी करा. जेणे करुण अंधार दूर होईल असे प्रवर्तीत व्हा. आपल्या देशात उपेक्षित दलित यांचा फार मोठा प्रवर्ग आहे. त्यांच्या उत्थानाचे कार्य आपले ध्येय बनवा हे विसरु नका. त्याचा दुःख त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्यद्वारे त्यांच जीवन उन्नत करा व आपले जीवन व राष्ट्रीयजीवन प्रगटीकरण होणारे साहित्य निर्मीतीची आज उनिव दिसते . भारतात संविधान लागू होवूनही एकात्मतेची व बधुत्वाची आज नितांत गरज आहे. एकात्मता व बधुत्व हे आपल्या साहित्याचा गाभा असल्यास शिवाय प्रबळ महाशक्ती म्हणून भारत उदयास येणार नाही. तो महाशक्ती होणार नाही त्यासाठी आधार स्तंभ हवा मानवतावादी साहित्य शास्त्रांचा तो निर्माण करणे काळाची गरज आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला जी नवी धम्मसंस्कृती दिली .तिचा आणि आमच्या साहित्याचा निकटचा संबंध असावा व यासाठी आंबेडकरी जनतेचा प्रयत्न असावे. साहित्य हे मानवतावादी साहित्यशास्त्र म्हणून जो पर्यत निर्माण होणार नाही तोपर्यत राष्ट्रपयोगी क्रांतीची लाट उसळणार नाही. भारत आज विश्वात विकसनशील देश म्हणून उभा आहे .महासत्ता होण्याचे बळ त्यांच्या पखांत आहे ज्ञानाच्या सर्वशाखांचे सत्व त्याने मिळविले आहे ज्ञानसत्वाची गरज पूर्ण झाली असली तरी अनुभूतीपूर्ण सकल साहित्याची गोडी आम्हाला चाखता आली पाहिजे .

आपण आपल्याजीवनाकडे कर्तव्याकडे, संस्कृतकडे दुर्लक्ष करित आहेत. थोड अंर्तमुख होवून विचार केला तर आपले जीवन व सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत हे लक्षात येईल. ही भयान भेसूरुता लक्षात घेवून अधपतनाच्या अवनीतीच्या मार्गावरुन आपण चालले आहोत याचे भान येईल.तेव्हा साहित्यिकांनी तत्परतेने सावध होवून जीवन व सांस्कृतिक मूल्ये जोपासली पाहिजे. डॉ आंबेडकर हे सर्जनशील विचारंवत होते. त्यांनी समाजच्या वेगवेगळया आघाडयावर आपले मत व्यक्त केले. प्रसगी अन्यायाविरुध्द आंदोलन लढे उभारलीत. अनेक विषमतावादी विचारांचा विध्वस देखील त्यांनी वैचारिक साहित्यातून केला. त्यांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोणातून नवसमाज निर्मीती प्रक्रियेसाठी कालबाहय मूल्यांचा विध्वसं केला हया विध्वसंक विचारातून नवसमाज निर्मीतीची शक्यता बळावते . नवसाहित्याची प्रेरणा बळावते प्रस्थापित व्यवस्थेला शरणागती पत्करायला लावते .

तथागत भगवान बुध्द, म कबीर, म फुले, डॉ बाबासाहेबांच्या प्रेरणेने जे साहित्य निर्माण झाले. ते दलितसाहित्याच्या नावाने पूढे आला १९६० नंतर दलितसाहित्य शब्द जावून त्यालाच आंबेडकरी साहित्य असे नामातर झाले. डॉ आंबेडकरांच्या क्रांतीकरी तत्वज्ञानातूनजन्माला आलेले साहित्य हे आंबेडकरी साहित्य होय डॉ आंबेडकराच्या प्रेरणेने १९६० च्या दशकात फुले,आंबेडकरी पर्वात स्त्री शुद्रातिशुद्रांच्या उध्द्रारासाठी, स्वसन्मानासाठी,लोकप्रबोधनकारी कलामाध्यमांनी, अक्षरश: रान पेटविले लोकजागृती व लोकशिक्षण लोकप्रबोधन,लोकसंघटन आणि अंतिमतालोककल्याणाच्या हेतुने जसा आणि जेवढया मोठया प्रमाणात लोककला, लोकगीत, लोकसंगीत, लोकनाटय आणि पदे, अखंड, पोवाडे, लावण्या फार्स इ . अविष्कार प्रकारांच्या वापर करुण घेण्यात आला. तसा आणि तेवढा स्वजनोउध्दाराच्या जागातिक इतिहासात अन्य कोठेही केलेले आढळत नाही.डॉ आंबेडकरी प्रेरणेने आंबेडकरी समाजाच्या प्रेरणा जागृत होवून आत्मउध्दाराचे भान आंबेडकरी साहित्यातून प्रकटताना दिसते.

## संदर्भग्रंथ :

१) सामाजिक चळवळीचा इतिहास -शंकरराव खरात
२) आंबेडकरी चळवळ आणि साहित्य -डॉ यशवंत मनोहर
४) समाज आणि साहित्यसमिक्षा - डॉ यशवंत मनोहर
५) आंबेडकरी साहित्य स्थिती -यशवंत मनोहर आणि स्थित्यंतर

❖❖❖

# लोकसाहित्य व वर्तमानकाळ

प्रा. शरद वाघोळे
मराठी विभाग प्रमुख
;शवंतराव चव्हाण कला, विज्ञान महाविद्यालय, मंगरूळ पीर
ता. मंगरूळ पीर, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४२१७४५३३५

## गोषवारा (Abstract)

पारंपरिक लोकजीवनात चालत आलेल्या रूढी, विधी, प्रथा, परंपरा, लोकगीत यांचा लोकसाहित्यात समावेश होतो. लोक परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रतिम होतात व याचा वापर आपल्या जीवन सुलभतेकरिता ग्रामीण व आदिम लोक करतात. काळाच्या प्रवाहाबरोबर शहरीकरण, आधुनिकीकरण, पाश्चात्यिकरण आले व ग्रामीण, आदिम पारंपरिक लोकसंस्कृती लुप्त व्हायला लागली. त्यांच्यातील लोककला,हस्तकला नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यांची बोली संपत आहे. अशा या संस्कृतीला जतन करणे, त्यातील व्यावसायिक संधी हेरून त्याद्वारे ग्रामीण व आदिमांना रोजगार कसा उपलब्ध होईल याचा विचार करणे गरजेचे आहे. संस्कृती जतन व अर्थाजन असे दोन्ही हेतू यातून साध्य होईल. केरळ, राजस्थानसरख्या राज्यांनी आपल्या पारंपरिक संस्कृती दर्शनातून पर्यटनाला चालना दिली. आज भारतात पर्यटक या राज्यात जातात, तेथील संस्कृतीचा प्रसार होतो व स्थानिकांना रोजगारही मिळाला व या राज्यांच्या संस्कृतीला जगभरात प्रसिद्धी मिळाली आहे. असे आपल्याकडे का करता येत नाही? महाराष्ट्र हा विविध कलांचा, प्रथा, परंपरांचा, लोकगीत, नृत्य व नाट्य यांनी समृद्ध राज्य आहे. अशा सर्व बाबींचा उपयोग करून जर रोजगार संधी उपलब्ध झाली तर लोकांचे स्थलांतर थांबेल. कलेचे संवर्धन होईल.

## विषय विवेचन

लोकसाहित्यात लोकवाङ्.मय, लोककला, प्रथा, परंपरा अशा सर्व बाबींचा समावेश होतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक पद्धतीने किंवा अनुकरणाने संक्रमित होणारे ज्ञान, प्रथा, परंपरा, कला यांचा समावेश लोकसाहित्यात करता येईल. लोकसाहित्य समाज मानसास वळण लावण्याचे, अर्थाजन करून देणारे महत्वपूर्ण माध्यम आहे. ग्रामीण व आदिमांनी आपल्या परंपरांना या आधुनिक युगातही टिकविलेले दिसते. 'डोंगरदऱ्यात आश्रयाने राहणाऱ्या आदिवासींनी आपले सांस्कृतिक वैभव टिकवून ठेवले आहे. त्यांच्या या सांस्कृतिक वैभवाची प्राचीनता त्यांच्या लोकसाहित्यातून दिसून येते'[१] आदिमांप्रमाणे ग्रामिणांचे लोकसाहित्य आहे. हे पारंपरिक साहित्य मानवी जीवनाचा आरसा होय. वर्तमानात माणूस भौतिकदृष्ट्या प्रगत होत आहे परंतु मानसिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या तो माघारत आहे. याचा विचार करणे आज गरजेचे आहे. लोकसाहित्य अशा जीवनप्रणालीला मार्गदर्शक ठरू शकते. ग्रामीण व आदिमांच्या विचारात सामाजिक व सांस्कृतिक बळ देण्याचे सामर्थ्य आहे तसा विचार अध्ययनात करणे आवश्यक आहे.

या आधुनिक युगात माणूस भौतिक सुविधांनी समृद्ध झाला. जागतिकीकरणाने सर्व भौतिक सुविधा माणसाच्या दारापर्यंत आणून ठेवल्या आहेत. बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदारांनी युक्त ग्रामप्रणाली उद्ध्वस्त होत आहे व गावातील कारागीर देशोधडीला लागलेला दिसतो. त्याच्यात असलेल्या कलेला आता किमंत राहली नाही, पोटासाठी तो शहरात येऊन कामगार, मजूर बनला. परंपरेने चालत आलेली कला नष्ट होत आहे. लोकपरंपरा, कला लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. गावातील लोककला जतन करून ग्रामीण लोककलावंताचा उदरनिर्वाह होऊ शकतो परंतु सरकारी धोरणे यासदर्भात कमी पडत आहे असे वाटते. केरळ, राजस्थानसारख्या राज्यांनी आपल्या पारंपरिक कलांना व्यावसायिक रूपाने सादर केलेले दिसते. तेथील कलावंतांना याद्वारे रोजगार तर उपलब्ध झाला सोबतच आपली पारंपरिक कलाही त्यांनी जतन केली व नवीन पिढीपर्यंत पोहचवत आहे. महाराष्ट्रात असा प्रयोग फार अल्प दिसतो. आधुनिक जीवनशैलीने आपल्याला वेढले आहे. परंतु हळूहळू का होईना ग्रामीण संस्कृती, जेवण यांचे आकर्षण वाढताना दिसत आहे. मोठमोठ्या हॉटेलमध्ये ग्रामीण देखावा उभा केलेला

दिसून येतो. कृषीपर्यटन व्यवसाय वाढताना दिसत आहे. या सर्व प्रकारात लोकसाहित्य उपयुक्त आहे. यासंदर्भात कृषीपर्यटन व लोकसाहित्य असा अभ्यासक्रम सुरू करून ग्रामीण भागातील लोककलावंतांना त्यांच्या कलेद्वारे आर्थिक स्तर कसा विकसित करता येईल यासंदर्भात प्रबोधन करणे योग्य राहील.

ग्रामीण भागात वासुदेव, नंदीबैल, कुडमुड्या जोशी, बहुरूपी असे लोककलावंत आपली कला विसरत आहे. यांना जर अशा पद्धतीच्या अभ्यासक्रमाद्वारे योग्य मार्गदर्शन लाभले तर निश्चितच फायदा होईल. गोंधळ हा विधी लग्नाच्या वेळेस केला जातो. काही प्रमाणात गोधळाचे गट निर्माण झालेले दिसतात. गोधळी लोकं आपल्या गोंधळातून काही प्रमाणात का होईना आर्थिक बळ प्राप्त करत आहे.

म्हणी, वाक्प्रचार हे शाब्दीक प्रकार ग्रामीण भागात रूढ आहेत. कमीत कमी शब्दातून जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य यामध्ये आहे. म्हणी म्हणजे अनुभवाची खाण असे म्हटले जाते. लोकसमुदायाच्या अनुभवातून निर्माण झालेले या शाब्दीक विचारांचा वाङ्.मयीन अभ्यास भरपूर झाला परंतु यांचा उपयोग कौटुंबिक समुपदेशनात कसा होऊ शकेल याचा विचार करणे गरजेचे आहे. या म्हणी किंवा वाक्प्रचार अनुभवाचे बोलं आहे. एखादी समस्या निर्माण होण्यापूर्वी त्यापासून सावधान करण्याचे सामर्थ्य या वाङ्.मयीन प्रकारात आहे. उदा. 'चादर पाहून पाय पसरावे' हा शब्दप्रयोग आपण नेहमी ऐकतो. वर्तमान युगात जे जवळ आहे त्याची किंमत नाही व जे जवळ नाही ते हवंहवंसं वाटते अशी मानसिकता झाली आहे. अनेक वेळा सामाजिक प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आवश्यक नसलेल्या बाबी खरेदी केल्या जातात. त्यातून कर्जबाजारी होऊन गृहकलह निर्माण होऊ शकतो. अशी अवस्था येण्यामागे आपली मिळकत व खर्च याचा ताळमेळ न साधणे हे कारण आहे हे सर्व 'चादर पाहून पाय पसरावे' यातून व्यक्त होते. समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात म्हणी व वाकृप्रचारांचा समावेश करून 'सामाजिक समस्येवरील उपाययोजना व म्हणी व वाक्प्रचार' असा अभ्यासक्रम आणल्यास निश्चितच फायदा होईल.

लोकगीते, लोककथा, लोकनाट्य हे लोककला प्रकार मनोरंजनातून प्रबोधन करण्याचे कार्य करतात. त्यातून आपल्या धार्मिक प्रथा, दैवदैवते यांची माहिती, स्थानिक ईतिहास, समस्या समोर येतात. काळाच्या ओघात या कला लुप्त होत आहे. सिनेसृष्टीत किंवा दुरदर्शन सारख्या माध्यमावर अशा बाबींवर अनेक कार्य होत असतात. अनेक लोकगीतं गाण्याच्या रूपात प्रकाशात आले आहे. या लोकगीतांचे संकलन करून यांचे गायन, वादन केले तर त्यातून अर्थाजन होऊ शकते. वर्तमानात माणूस कृत्रिम बाबीला कंटाळला असून त्याला अस्सलची ओढ लागलेली दिसते. मोठमोठ्या शहरात लोककलापथक आपले कार्यक्रम सादर करताना दिसतात. यात लोककथा, लोकनाट्य, लोकगीते यांचा समावेश असतो. असे लोककला पथकांची निर्मिती करून शासनाने त्यांना कार्यक्रम उपलब्ध करून दिले तर ग्रामीण भागातील या कलांचे संवर्धन होईल. लोकनाट्यातून समाजमानसातील असलेल्यया कुप्रथा किंवा शासनाच्या लोककल्याणकारी योजना यांच्या माहितीचा प्रसार उत्तमरित्या करता येऊ शकतो. या दृष्टीने लोकनाट्य अभिनय यासंदर्भातील लोककलाकारांना सामील करून घेतले तर लोकनाट्य चळवळ समृद्ध होईल. काळानुरूप नवीन संहिता निर्माण होईल व त्यातून या लोकनाट्य कलावंतांना बळ मिळेल.

वस्त्र, माती, काष्ट, शिल्प, बांबूकला अशा विविध कला लोकपरंपरेत आढळतात. यंत्रयुगात या हस्तकला मागे पडत आहे. या कलेवर आधारित अनेक लोकांनी आपली कला आर्थिक टंचाईमुळे सोडली आहे. परंतु आता या सर्व कलांचे महत्व कळायला लागले. पत्रावळी, द्रोणाचे महत्व आता कळायला लागले. यात झाडे मुळापासून तोडण्यात येत नाही, ग्रामीण लोकांना रोजगार मिळतो व प्लॅस्टीकपासून मुक्तता अशा बाबी घडतात. त्यामुळे अशा रोजगारांना बळकटी देणे गरजेचे आहे. वर्तमानात मातीच्या भांड्यांना महत्व येताना दिसत आहे. माठ, मडके, गंज अशा मातीच्या वस्तूची पर्यावरण पुरकता व आरोग्यास होत असलेला फायदा यासंदर्भात लोकांमध्ये जागृती होत आहे. म्हणून अशा कलांद्वारा आर्थिक सुबत्ता वाढताना दिसत आहे.

ग्रामीण मानसात निसर्गातील वनस्पती ज्ञान परंपरेने मिळालेली देणं आहे. आजीबाईचा बटवा किंवा स्वयंपाक घर हे पारंपरिक ग्रामीण भागातील दवाखाना होते. आधुनिक वैद्यकीय ज्ञान हे खूप पुढे गेले आहे. याबरोबर त्याची तुलना करता येणार नाही. परंतु प्राथमिक उपचार म्हणून किंवा निसर्गातील घटकांची औषधी उपयुक्तता या दृष्टीने या ग्राममानसातील वैद्यक ज्ञानाचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला तर घरातील औषधी वनस्पती कोणत्या व त्या कशा वापराव्यात यासंदर्भातील ज्ञान सामान्य आरोग्यविषयक तक्रारीवर उपायकारक ठरू शकेल. या दृष्टीने ग्रामीण भागात असलेल्या या ज्ञानाला संकलित करून त्याचा वर्तमानात फायदा होऊ शकतो काय? याचा विचार योग्य राहील.त्याचप्रमाणे आदिमांत असलेल्या बाबींचा विचार उपयुक्त ठरू शकतो'आदिवासी संस्कृतीला स्वावलंबन, सहकार, निसर्गवाद,स्वतंत्र जीवन जगण्याची पद्धती, साम्यवाद, समृद्ध समाजव्यवस्था,

उत्तम संस्कृतीचे मूल्य, आदर्श तत्वज्ञान व गौरवशाली इतिहास आहे' [२]अशा बाबींचा अभ्यास करून वर्तमान समाजव्यवस्थेतील त्यांची उपयुक्तता शोधणे गरजेचे आहे.

आपल्या लोककला अर्थाजनाचे साधन कसे बनविता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे. यातून आपली संस्कृतीही टिकविता येईल आणि ग्रामीण, आदिम भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल. ग्रामीण व आदिमांमध्ये नत्यकला, शिल्पकला, वस्त्रकला अशा विविध कला परंपरेने चालत आलेल्या आहेत. या गतिमान आधुनिक काळात शहरीकरण, पाश्चात्यिकरणाच्या प्रभावाने या कला लुप्त होत आहे. या कलांना जतन करायचे असेल तर या कलावंतांच्या कलेला आर्थिक बळ देणे गरजेचे आहे. ग्रामीण व आदिमांमधील कलांचे जतन, संवर्धन करून त्यांच्या आर्थिक उन्नतीचे मार्ग शोधणे गरजेचे आहे.

केरळ,राजस्थान सारख्या राज्यांनी आपल्या संस्कृतीला जतन केले, त्यांची विरासत त्यांनी देश विदेशापर्यंत पोहचविली आणि त्यातून आर्थिक मिळकत करत आहे. महाराष्ट्र निसर्ग, गड किल्ले, संस्कृती, नाट्य, लोककला यांनी समृद्ध आहे. परंतु या समृद्ध वारश्याची उपयुक्तता आपण पूर्णपणे ओळखू शकलो नाही. सातपुड्यात वसलेले गोंड, कोरकू यांची सुंदर संस्कृती आहे. त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटत नसल्यामुळे ते शहरात मजूर म्हणून येतात. आपल्या संस्कृतीपासून ते दूर जात आहे. त्यांच्या संस्कृतीतील बाबींना त्यांच्यामार्फत जगासमोर कसे आणता येईल व त्यातून त्यांना कसा रोजगार देता येईल याचा विचार करून जर कार्य केले तर निश्चितच त्यांची सांस्कृतिक जोपासना होईल. निसर्ग ज्ञानाबरोबर प्राणिजीवनाचेही ज्ञान त्यांना असते. या ज्ञानाची उपयुक्तता तपासणे गरजेचे आहे. त्यातील योग्य ते स्वीकारून समाजव्यवस्थेला त्याचा फायदा होऊ शकेल. लोकसाहित्य हा लोकज्ञानानी समृद्ध विषय आहे. काळाच्या ओघात हे ज्ञान लुप्त होत आहे. जग आधुनिक होत आहे. मानव हा यंत्रावर आधारित जीवनशैलीत मग्न दिसत असला तरी या यांत्रिक जीवनाला तो कंटाळत असल्याचे दिसून येते. तो पुन्हा निसर्गाकडे, साध्या सरळ जीवनाकडे वळण्याचा प्रयत्न करत आहे. हे साघे सरळ जीवन, त्यातील सर्व बाबी लोकसाहित्यात दिसतात म्हणून अशा बाबींची जोपासना करून आपले गतकालीन वैभव आजच्या पिढीपर्यंत लोकसाहित्याच्या रूपाने नेणे गरजेचे आहे. ग्रामीण, आदिमांना यातून चांगला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. शासन आदिवासी कल्याणाच्या कार्यक्रमांतर्गत त्यांना भजन मंडळीचे पेटी, तबला असे साहित्य पुरविते त्यापेक्षा त्यांचे परंपरागत वाद्य उदा. टिमकी असे वाद्य जतन करणे आवश्यक आहे. त्यांच्यावर ग्रामीण संस्कृती न लादता त्यांच्या संस्कृतीतील चांगलं काय ते जतन करून लोकांपर्यंत आणणे गरजेचे आहे. तसे प्रयत्न शासनाने करणे अपेक्षित आहे. आदिमांच्या लोककलांचे फक्त प्रदर्शन भरवू नये, त्यांना शोभेची वस्तू म्हणून उभे करू नये तर त्यांच्या लोककला प्रदर्शनातून त्यांना योग्य मोबदला मिळाला तर ते आपली संस्कृती टिकवून ठेवेल. त्यांची संस्कृती ही सामाजिक, सांस्कृतिक समुद्धतेची आहे. त्या संस्कृतीत आपल्या आधुनिक संस्कृतीला दिशा देण्याचे बळ आहे. निसर्गाशी एकरूप असलेली ही संस्कृती निसर्ग व मानव यांच्यातील संबंध उलगडते. अशा संस्कृतीचा सर्वांगीण अभ्यास गरजेचे आहे.

## निष्कर्ष

१. ग्रामीण व आदिम जीवनात निसर्गाला महत्वपूर्ण स्थान आहे. त्यातील ज्ञानाचा फायदा त्यांनी आपल्या जीवनात करून घेतला आहे. या ज्ञानाला वस्तुनिष्ठ कसोटीवर पारखून वर्तमान जीवनप्रणालीत त्याची उपयुक्तता शोधली तर ग्रामीण व आदिम लोकांना उपयुक्त वनस्पतींच्या माहितीद्वारे आर्थिक फायदा होÅ शकतो.

२. ग्रामीण व आदिम कलांचे पथक तयार करून केरळ,राजस्थानप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर त्यांच्या कलांना अनुदानातून प्रोत्साहन दिल्यास त्याचा फायदा या लोकांना होईल.

३. ग्रामीण व आदिम परंपरेत असलेले सामाजिक व कौटुंबिक आचार विचार आपल्या शहरी संस्कृतीस पोषक आहेत काय याचा विचार करून त्याचा अभ्यास झाला पाहिजे. वर्तमानातील ढासळत असलेल्या सामाजिक जीवनास हे विचार तारक ठरू शकतात.

४. ग्रामीण व आदिमांमध्ये असलेल्या प्रथा, आचार, विचार हे मानवी जीवन मूल्यांच्या कसोटीवर पारखून त्याचा वापर आपल्या जीवनप्रणालीत कसा करता येईल आणि दोन संस्कृतीच्या समन्वयातून विकास करता येईल काय याचा अभ्यास योग्य राहील.

## संदर्भ

१.डॉ. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य,स्वरूप आणि समिक्षा, विजय प्रकाशन नागपूर, आवृत्ती पहिली १९९४, पान ०९

२. डॉ. मुनघाटे प्रमोद संपादित, आदिवासी मराठी साहित्य, प्रतिमा प्रकाशन,पुणे, आवृत्ती पहिली २००७, पान ६८

## संदर्भ ग्रंथ

१. लोकसाहित्य अभ्यास क्षेत्र, डॉ. गंगाधर मोरजे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.

२. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, प्रभाकर मांडे,गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.

३.ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, लेखक – मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन.

४.स्त्री जीवन, साने गुरूजी, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर

५.लोकरंग, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. गंगाधर पानतावणे, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर

६.गाव गाडा, त्रिंबक अत्रे,समन्वय प्रकाशन,कोल्हापूर

७.आदिवासी लोक, संपादक रमणिका गुप्ता, बालवाणी प्रकाशन, दिल्ली

❖❖❖

# कवयित्री बहिणाबाई चौधरी

प्रा. डॉ. प्रियदर्शनी वसंतराव देशमुख
(मराठी विभाग)
गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय चांदूर बाजार, अमरावती, महाराष्ट्र (India)
ई–मेल deshmukhpriyadarshani22@gmail.com भ्रमणध्वनी ९०९६२६६८१६

## गोषवारा (Abstract) :

आपल्या कवितेने मराठी काव्यप्रातांत जगणं मांडणारी कवयित्री बहिणाबाई चौधरी. त्यांची कविता रसिक मनावर गोंदण करणारी आहे.मन हा त्यांच्या कवितेचा विषय असून अगदी सहजपणे ओठावर रेंगाळणारी बहिणाबाई चौधरी यांची कविता मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय ठरते.निसर्गासोबत चाललेला निरंतर संवाद म्हणजे बहिणाबाईंच्या कविता. भक्ती, प्रेम,सुख,दु:ख, वेदना सगळचं त्यांनी कुठेही तक्रार न करता अहोरात्र कष्ट केले.काळ्या मातीत बी रूजाव आणि अंकुर फुटावा तशी त्यांची कविता अलगद मनाच्या खोलखोल तळ्यातून सहज ते शब्द काव्यरूप धारण करते.बोलीभाषेतील शब्द, म्हणी अगदी सहजपणे त्यांनी कवितेतून अभिव्यक्त केल्या.माहेर,सासर,शेती ,निसर्ग, पशूपक्षी इ.हे सगळ सूक्ष्म निरिक्षण आणि रोजच्या जगण्यातून मांडणारी कवयित्री बहिणाबाई चौधरी आहे. 'बहिणाईची गाणी' रसिक मनाच्या हृद्यावर कायम कोरलेली कविता. अहिराणी, खानदेशी कवयित्री म्हणून त्यांची ओळख त्यांच्या कवितेतून अक्षय ठरली.

बीजशब्द : गोंदण, निरंतर संवाद, अंकुर, तळ्यातून.

## प्रस्तावना :

निसर्गकन्या, भूमिकन्या बहिणाबाई चौधरी मराठी कवयित्री, निरक्षर, अडाणी परंतु जिभेवर प्रत्यक्ष सरस्वती नांदत. निसर्गदत्त काव्यरचनेची प्रतिभा लाभलेल्या, व–हाडी खानदेशी– अहिराणी या त्यांच्या बोलीभाषेतील रचना. 'बहिणाबाईची गाणी' या नावाने त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. बहिणाबाई चौधरी त्यांच्या आयुष्यातील सुख–दु:खाचे चित्रण अतिशय मनाला भिडणाऱ्या शब्दात करतात.

दि. ८ ऑगस्ट १८८० ला या कवयित्रीचा जन्मदिवस, दैनंदिन जीवनातील कृषि जीवनातील प्रसंग, आयुष्यातील वास्तव मांडणाऱ्या बहिणाबाई त्यांच्या काव्यातून चिरंतन ठरल्या आहेत. आयुष्यात येणारे सुख– दु:ख म्हणजे ऊन सावली. शेतीत कष्ट करतानाही ईश्वरभक्तीही त्यांच्या काव्यातून जाणवते. प्रत्यक्ष परमेश्वर म्हणजे त्याचे रुप. आकार कसा आहे, हे सांगतांना बहिणाबाई म्हणतात,

"माझ्यासाठी
तुझं गीता, भागवत
पावसात समावतं
मातीमधी उगवतं"

पांडुरंगाच दर्शन त्यांना खऱ्या अर्थाने निसर्गाच्या विविध रुपात जाणवते कारण ती कष्टकरी स्त्री आपल्या शेतात दिवस–रात्र रावते आहे. परमेश्वराविषयी असलेली व्यापक भक्ती, त्यांच्या शब्दातून प्रगटते. कुठेही मंदिरात देव शोधण्यापेक्षा ती कष्ट करते. त्या तिच्या कष्टातून डोलणार पिकं म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच! हा परमेश्वर त्यांना कसा जाणवतो. तो त्याच्या सोबत कसा असतो याविषयी भूमिकन्या बहिणाबाई लिहीतात,

"तुझ्या पायाची चाहूल, लागे पानापानामधी
देवा तुझे येनं जानं, वारा सांगे कानामंधी।"

ईश्वराचे दर्शन निसर्गात एवढे सुंदर त्यांना भासत की,प्रत्यक्ष ईश्वराचे येण, त्याची चाहूल त्यांना सतत लागते. हा सुद्धा बहिणाबाईच्या सोबतीला कारण कष्टालाच पूजा मानणाऱ्या बहिणाबाई मग ईश्वराच्या गुजगोष्टीच जणू बारा त्यांना सांगतो आहे.

माहेर, संसार, शेतीची साधने, कापणी– मळणी, निसर्ग, धरती–काळी माय, शेती रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या गोष्टींचा वापर करुन त्यांनी काव्यनिर्मिती केली. त्यामुळे ते सुख–दुःख मनाला स्पर्शन जाते. पहाट होताच पर आणि शेतात त्या सतत गुतलेल्या तरीही परमेश्वराचे नाव मुखीं मोह माया, संसार अडकलेल्या जीवाला सावध करताना,

"नाही सरलं सरलं । जीवा तुझं येन जान ।
जसापडला मुकामात्याले म्हनतीरेजीनं।"

मन कसं आहे? माणसाच मन कसं आहे? प्रत्यक्ष ईश्वरालाच बहिणाबाई प्रश्न विचारतात. माणसाच मन असंचंचल कशाला घडवलं? असे अनंत प्रश्न कवयित्रीला भेडसावतात.

"मन वढाय वढाय । उभ्या पिकातलं ढोर ।
किती हाकला हाकला । फिरी येत पिकांवर ।"

मनाची चंचलता विविध रुपे कधी मन म्हणजे ओढाळ जनावरासारखे, मन लहरी–लहरी, मन पाखरु –पाखरु, मन चप्पय मनाला त्यांनी इथे काव्यातून अभिव्यक्त केले. संसार मन असचं गुंतून जाते. मनाच्या रुपाविषयी,

"मन एवढं एवढं । जसा खाकसाचा दाना ।।
मन केवढं केवढं आभायात बी मायेना ।।"

सासरच्या गोतावळ्यात रमलेल्या बहिणाबाई संसाराचे चित्रही तेवढेच वास्तवदर्शन घडविणारे आहे. हा संसार कसा सुख–दुःखाने भरलेला आहे. संसाराची गोडीही त्या दुःखात कशी असते.

"अरे! संसार संसार । जसा तवा चुलीवर।
आधी हाताले चटके। तवा मिळते भाकर ।।"

संसार बहिणाबाईचा असाच फुलत होता. त्या कष्टकरी जीवनातील चढ–उतारही त्यांच्या शब्दातून प्रगटतात तेव्हा ते त्याच्या आयुष्यातील सुख–दुःखे त्यांनाच भोगावी लागते.

स्त्री असो की पक्षी–पक्षिणी तिचे घर–घरटे असणारच नाही का? घरट्यची ओढ सुगरणीला तशीच बहिणाबाईला. शेतात राबताना झाडावरच्या वाऱ्यासह डोलणाऱ्या त्या खोऱ्याकडे त्याचे लक्ष जाते. अतिशय सुंदर सुगरणीचा खोप्याकडे पाहून त्यांना सुचलेल्या त्या ओळी म्हणजे सुगरणीच्या कलाकुसरतेचे कौतुकच!

"अरे! खोप्यामंधीखोपा । सुगरणीचा चांगला ।
देख पिलासाठी तिनं । जीव झाडाले टांगला ।।"

अडाणी, निरक्षर स्त्री कुठल्याही चार भिंतीच्या शाळेत न गेलेली... पण प्रत्यक्ष अनंत, विशाल अशा निसर्गाची शाळा त्यांच्या आयुष्यात त्यांना सतत लाभली–भेटली. विशाल आभाळाखाली काळ्या मातीत राबणाऱ्या बहिणाबाई मग निसर्गाशी बोलू लागतात. संसाराच स्वप्न रंगवितांना अचानक नशिबाची चक्रे बदलतात. कपाळभर कुंकू तिच्या संसाराचं सुख... पण दैवाच्या फेऱ्यातून कुणाचीही सुटका नाही. पतीनिधनानंतर आभाळभर दुःख अन् मुले घेऊन ती आपले दुःख घेऊन काळ्या मातीत राबते. नशिबाच्या या रुपाने ती गहिवरुन येते. लपे करमाची रेखा' या कवितेतून त्यांचे दुःख आणखीच गडद होते.

"लपेकरमाची रेखा। माझ्या कुंक्रवाच्या खाली ।
पुशीसनी गेलं कुकु । रेखा उघडी पडली ।।"

आयुष्यातील दुर्दैव. "पुसीसनी गेलं कुकुं." ह्या ओळी मनाला हेलावून टाकणाऱ्या... अशावेळी स्वतःच्या हिंमतीर, विश्वासावर त्या काळ्या मातीत राबतात. बहिणाबाईचा देवावर, ज्योतिषावर विश्वास नव्हता. आपले भविष्य तळहातावरच्या रेषा आपणच बदलू शकतो हे त्यांना माहित होते. दुःखाने त्यांचे जीवन तुडुंब भरलेले. अशावेळी दूर गेलेले सगे–सोयरे... कुणीही धाऊन येत नाही. मग कमरेला पदर खोचून ती शेतात कष्ट करते. लेकराच्या सुखाचं सपनं बघते. पण त्याचवेळी दारात आलेला ज्योतिष बहिणाबाईच्या आयुष्याचा पाढा वाचणार... तेव्हा त्या ज्योतिषाला सांगतात,

"नको नकोरे ज्योतिषा । नको हात माझा पाहू ।
माझंदैव माले कये । माझ्या दारी नको येऊ ।।"

नवऱ्याचा मृत्यू कसा चटका लावून जातो, स्त्री कशी एकटी पडते हे ज्योतिषा तुला कसं रे कळेल? असं त्याला म्हणणारी ही कवयित्री भूलथापा याला बळी पडली नाही हेही त्यांचे धाडस, मोठेपण उल्लेखनीय ठरते.

माहेरची आठवण सासरी गेल्यावर कासाविस करणारी. "असं माहेर सुरेख बाई..." अगदी प्रत्येकीच! माहेरचं घर, अंगण, मैत्रिणी, भातकुलीचा खेळ सगळं कसं डोळ्यापुढे मूर्तिमंत उभं राहते. डोयीवर अक्षदा पडताच सासरची वाट संसार यात गुंतलेलं बहिणाबाईच जीवन... पण अचानक त्यांच मन माहेरच्या आठवणीने भरुन येते. एक दिवस दाठ्यत त्या उदासपणे बसलेल्या... नेहमीसारख्या दारावर जोगी भिक्षा मागण्यास येतो. बहिणाबाईकडे पाहून तो म्हणतो, "बाई, उदास दिसते..." त्यावर ती म्हणते"हो, माहेरची आठवण आली...." तिचे डोळे भरुन येते "मग लग्न का केलसं तू..." जोग्याचा हा प्रश्न ऐकून कवयित्री सावरते आणि त्यावेळी त्यांनी दिलेलं ते काव्यातील उदाहरण,

"अरे अरे जोग्या । तुझ्या कानात सांगते ।
लेकीच्या सुखासाठी। माय सासरी नांदते ।।"

अरे! तू जोगी तुला कसं कळेल 'माहेर' काय असते. लेकीला माहेर म्हणजे आयुष्यातील मोठी शिदोरी, खजिना... तिच्या माहेरपणासाठी प्रत्येक स्त्रीला लग्न करावंच लागेल नाही का? माहेरच्या आठवणीने हेलावून टाकणारे शब्द...

आयुष्यात रडत बसण्यात गंमत नाही. अकाली आलेलं वैधव्य, पोटी असलेली दोन मुले, मनगटात जोर आहे तोवर कष्ट करणारी ही स्त्री... येणाऱ्या संकटाला सामोरं जानांना आयुष्यातील या वळणावर स्वत:ला, स्वत: धैर्य, हिंमत देतात. आयुष्यकडे बघताना त्या म्हणतात,

"रडू  नको माझ्या जीवा, तुला रडण्याची रेसवय।
रडू हासवरे जरा, त्याला संसाराची चव ।।"

रडून प्रश्न मिटणार नाही. कपाळावरचं कुंकू हरवलंय... सगळं कस रित–रित... पण तरीही,

"जरी फुटल्या बांगड्य। मनगटी करतूत।
तुटे मंगय सुतर। उरे गयाची शप्पथ ।।"

अगदी शेवटच्या क्षणापर्यंत स्वकर्तृत्वावर विश्वास असणारी निसर्गकन्या. कर्म करणारी गीताई बहिणाबाई चौधरी. मृत्यू शाश्वत असून त्याला सामोरे जाताना,

"आला सास गेला सास । जीवा तुझं रे तंतर ।।
अरे जगनं मरन। एका सासचं अंतर।।"

मृत्यूला सामोरं जाण्यापूर्वी ईश्वर आणि कर्म–कष्ट यांची सांगड त्यांनी घातलेली जाणवते. जात्यावर दळताना त्यांच्या मुखात प्रगटणारे काव्य–भक्तीचा पाझर फुटून आत्मज्ञान होणे. परमेश्वराचं सुंदर रुप शब्दशब्द करतांना त्या म्हणतात,

"अरे घरोटा घरोटा। दळतांना पडे पीठी ।
तस माझं गाणं । पोटातून येते होठी।।"

त्याचं आयुष्याच गानं मराठी चित्रपटातून अभिव्यक्त होताना त्यातील सहज ओठावर रेंगाळू लागतात. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याचा हा प्रवास सतत सुरु आहे. ऋतूचक्रासारखा. मराठी काव्यप्रांतातील आपल्या ग्रामीण बोलीभाषेतून चिरंतन राहील. त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या काव्यातील चिरंतन प्रवासातील या आठवणी सतत स्मृतीगंध घेऊनच!

## निष्कर्ष :

१) निसर्गकन्या या शब्दातून निसर्ग व कवायत्री यांचे अन्ट नाते प्रगटने.
२) अहिराणी, खानदेशी भाषेतील विपूल शब्दसंग्र गोंडवा.
३) मन हा त्यांच्या काव्यातील अतृट धागा
४) निसर्गचित्र, चित्रमयता समपंक शब्दकळा
५) पर्यावरणचे चित्रण – कवतेचे विषय
६) जीवनातील विविध प्रसंगाचे चित्रण कवतंतून झाले.
७) रंग संवेदना, स्पर्शसंवेदना, मधसंवेदना जाणवते.
८) साधी सरळ काव्यरचना.
९) निसर्गाची बोली, निसर्गाशी केलेला अखड संवाद

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) 'बहिणाईची गाणी' — बहिणाबाई चौधरी
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ८४, प्रथमावृत्ती १९५२

२) 'काव्यधारा' — संपादक — डॉ. केशव फाले,
प्रशांत पब्लिकेशन्स,
जळगाव, प्रथमावृत्ती जून २०१०

३) बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा — डॉ. पवन मांडवकर, सेवा प्रकाशन, अमरावती
तृतीयावृत्ती, २०१८


❖❖❖

# कोरोना आणि साहित्य

# Corona and Literature

डॉ. सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर, रिसर्च सेंटर, कळंब, जि. यवतमाळ,
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India) ४४५ ४०१
E mail: veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा

कोरोना विषाणूच्या संकटामुळे डिजिटलायझेशनच्या नव्या रूपाची ओळख जशी जगाला झाली, तशी साहित्यक्षेत्रालाही झाली. नवीन डिजिटल कंटेंट तयार करण्याची व सोशल मिडियाच्या माध्यमातून आपले साहित्य जगभर पोचविण्याची संधी साहित्यिकांना प्राप्त झाली. अमिताभ बच्चन, सुनिल बर्वे, संकर्षण कऱ्हाडे, अदिती येवाळे अशा पडद्यावरील कलाकारांपासून अनेक नामवंत आणि नवोदित साहित्यिकांनी इ कंटेंटच्या नवनव्या प्रयोगांतून आपले साहित्य जगापुढे ठेवले. कोरोनावरील साहित्याची संख्या प्रचंड नसली तरी बऱ्यापैकी रेलचेल होती. काव्यमैफिली, संमेलने, वेबिनार यांद्वारे साहित्य आणि संशोधनाचा प्रवास सुरू राहिला. अनेक कलावंत, साहित्यिक समूहांनी 'लाइव्ह'च्या माध्यमातून सांस्कृतिक भूक आणि उपासमार शमवण्याचा केलेला प्रयत्न उल्लेखनीय आहे.

## Abstract

As the Corona virus crisis introduced a new form of digitalization to the world, so did literature. Writers have the opportunity to create new digital content and spread their literature around the world through social media. From screen actors like Amitabh Bachchan, Sunil Barve, Sankarshan Karhade, Aditi Yewale, many well-known and budding writers have put their literature before the world through new experiments in content. Although the material on the corona was not huge, there was a lot of rails. The journey of literature and research continued through poetry concerts, conventions, webinars. The efforts of many artists and literary groups to alleviate cultural hunger and hunger through 'Live' are noteworthy.

बीजशब्द : कोरोना, लॉकडाऊन, सोशल मिडिया, काव्यमैफिली, लाइव्ह

## प्रस्तावना

कोरोना विषाणूच्या आगमनाला आता एक वर्ष पूर्ण झालं आहे. जगभर या रोगाने थैमान घातलं. या काळात लॉकडाऊन हा शब्दप्रयोग प्रथमच इतका प्रचलित झाला. एका बंद खोलीत, घरात काही काळ व्यतीत करणाऱ्या मनुष्यप्राण्याला मनोरंजनाची जी द्वारे उघडी झाली, त्यात साहित्याचेही एक महत्त्वाचे माध्यम होते. साहित्यिकांनाही नवीन डिजिटल कंटेंट तयार करण्याची व सोशल मिडियाच्या माध्यमातून आपले साहित्य जगभर पोचविण्याची संधी या काळात प्राप्त झाली.

## विषय विवेचन

कोरोनासारखी संकटे ही काही ठरावीक कालानंतर पृथ्वीतलावर येत राहतात. त्यावर मनुष्यप्राण्याने नेहमीच संशोधनाद्वारे मात केली आहे. हे संकटसुद्धा काही काळानंतर नाहीसे होईल किंवा त्याचा उपद्रव कमी होईल.

ब्रिटिश लेखक डेनियल डेफो यांनी यांच्या 'ए जर्नल ऑफ द प्लेग इअर' या पुस्तकात 1665 साली ब्रिटनची राजधानी लंडनमध्ये पसरलेल्या प्लेगच्या साथीबाबत विस्तृत लिहिलं आहे. तेव्हा लंडनमध्ये कडक नियम लागू झाले होते. भारतातही 100 वर्षांपूर्वी प्लेगची साथ आली होती. त्यावर भाष्य करणारी ग्रंथसंपदा विविध भाषांमध्ये निर्माण झाली होती.

कोरोना व्हायरसनं साहित्यसृष्टीला धडक दिली तसे साहित्यातून आणि विविध कलांमधून त्याचे चित्रण होत गेले. छपाईची कामे बंद झाल्याने सोशल मिडियाच्या माध्यमातून साहित्य निर्माण होत होतं. नियतकालिके आणि वृत्तपत्रांच्या ऑनलाईन आवृत्त्या निघणे सुरू झाले आणि साहित्यिकांना नवीन माध्यम उपलब्ध झाले.

साहित्यिकांनी फेसबुक, व्हॉट्सअप, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट, यू ट्युब, ट्विटर, ब्लॉग्ज या माध्यमांचा अधिक वापर केला. मार्च महिन्यात बिग बी अमिताभ बच्चन यांनी भोजपुरी भाषेत कोरोना व्हायरसवर एक कविता लिहिली होती. त्याचा व्हिडीओ त्यांनी त्यांच्या ट्विटरवरून शेअर केला होता, ज्याचं मराठी व्हर्जन अभिनेता सुनिल बर्वे यांनी सादर केलं. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.

राज्यातील पहिले कोरोनाबाधित रुग्ण असलेल्या दाम्पत्याला डिस्चार्ज दिल्यानंतर राज्य सर्वेक्षण अधिकारी प्रदीप आवटे यांनी आपल्या भावना कवितेच्या माध्यमातून मांडल्या. लग्नाच्या 25 व्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनसाठी हे पुण्याचे दाम्पत्य दुबईला गेले होते. नायडू हॉस्पिटलमधून पोलीस बंदोबस्तात कोरोनामुक्त झालेले दाम्पत्य घरी गेले. पोलीस बंदोबस्त का तर परिसरातील लोकांचा विरोध होऊ नये म्हणून.

*सहजीवनाची पंचविशी साजरी करायला तो तिच्यासवे दुबईला गेला*
*आणि जगभर थैमान घालत असलेला करोना*
*या जीवनधराचा हात धरुन इथवर आला*

अशा शब्दांत आवटे यांनी कवितेचा प्रारंभ केला आहे.

मराठी अभिनेता संकर्षण कऱ्हाडेनेही आपल्या फेसबूक पेजवर एक सुंदर कविता सादर करत सर्वांना या काळात घरीच राहण्याचा सल्ला दिला. जास्तीत जास्त वेळ घरात राहून आपण सरकारी यंत्रणांना मदत करू असं आवाहन संकर्षणने केलं आहे.

अभिनेत्री अदिती येवाळे हिनेसुद्धा कोरोनाव्हायरस आणि लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर रचलेली कविता सोशल मिडियातून वाचकांच्या पसंतीस उतरली.

लॉकडाऊनच्या काळात कष्टकऱ्यांचे खूप हाल झाले. ‘धुरळा’ चित्रपटाचे दिग्दर्शक समीर विद्वंस यांनी ‘तुझं बाबा बरंय’ या कवितेतून नाक्यावर फुलं विकणाऱ्या एका महिलेची व्यथा मांडली.

कोरोनाकाळात दिवाळी आली आणि दिवाळी अंकांच्या वाचकांसाठी कोणता पर्याय देता येईल यासाठी दिवाळी अंकांचे निर्माते व साहित्यिक उपाय शोधत होते. अक्षर दिवाळी साजरी करणाऱ्यांची संख्या विपुल आहे. दिवाळी अंकांच्या परंपरेला यंदा 113 वर्षे पूर्ण झाली. राज्यात सुमारे 3000 दिवाळी अंक प्रकाशित होतात. कोरोनामुळे सुमारे 100 अंक यंदा निघाले नाहीत. अनेक अंक ऑनलाईन आवृत्तीच्या स्वरूपात प्रकाशित झाले. ललित, वैचारिक आणि पुरोगामी साहित्याच्या अंकांपेक्षाही ज्योतिष, आरोग्य, आध्यात्मिक साहित्याच्या दिवाळी अंकांचा खप अधिक असतो. त्यानंतर रहस्यकथा, चित्रपट, पर्यटन या विषयांना वाहिलेल्या दिवाळी अंकांना मागणी असते. साप्ताहिक सकाळ, लोकसत्ता, सामना, सरकारनामा, चित्रलेखा, आवाज, लोकमतचा दीपोत्सव या दिवाळी अंकांचा खप अधिक होतो. यंदा ऑनलाईन अंकांवरच जोर अधिक असल्याने साहित्यिकांचा आणि रसिकवाचकांचा काही प्रमाणात हिरमोड झाला.

कोरोनामुळे एक प्रकारची दहशत आणि अनिश्चितता निर्माण झाली. लॉकडाऊनच्या काळाचा आणि या काळात घेतलेल्या निर्णयांच्या परिणामांचा आणि भविष्याचा विचार करण्याची वेळ आली. 'लॉकडाऊनने काय कमावलं, काय गमावलं?' या संदर्भातील प्रश्न किती अस्वस्थ करणारे आहेत, हे गौरी कानेटकरांच्या, 'जग थांबतं तेव्हा.. लॉकडाऊन काळातील नोंदी' या पुस्तकातून लक्षात येतं. या पुस्तकाचे मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांनी रेखाटले आहे आणि ते अत्यंत बोलके आहे. पांढराशुभ्र रंग, त्यावर काळ्या रेघोट्यांनी चितारलेली, हातपाय आक्रसून, दुमडून घेऊन बसलेली एक मानवाकृती आणि तिच्या शरीरावरून एका रेषेत चाललेल्या मुंग्या, पार तिच्या मेंदूतही घुसलेल्या. घराबाहेर पडून मनाजोगतं वावरण्याची सवय असणाऱ्या लोकांना घराच्या चार भिंतींमध्येच कोंडून ठेवल्यावर येणारा शारीरिक-भावनिक ताण या चित्रातून प्रतिबिंबित होतो. लेखिकेने अतिशय अनौपचारिक शैलीत लिहिलेल्या मनोगतात म्हटल्याप्रमाणे हे पुस्तक म्हणजे लॉकडाऊनच्या चार महिन्यातल्या नोंदी आहेत. मात्र या नोंदी नेहमीच्या रोजनिशीसारख्या नाहीत. या कठीण परिस्थितीत घडणाऱ्या आणि जाणवणाऱ्या गोष्टींचा तो परिपाक आहे. लेखिका या माध्यमक्षेत्राशी संबंधित असल्यामुळे त्यांना सातत्याने पडणारे प्रश्न त्यात आहेत, त्यांची उत्तरं मिळत नाहीत याबद्दल एक उद्विग्नता आहे आणि इतक्या भयानक परिस्थितीतही आपण काहीच करू शकत नाही याबद्दल एक चमत्कारिक हतबलताही आहे.

या नोंदींना वैयक्तिक मतं आणि विचारांच्या पलीकडे जाऊन एक व्यापक आयाम देण्याचं काम पुस्तकाच्या प्रस्तावनेने केलं. काहीशा अनौपचारिक आणि सहजसुंदर मांडणी असलेल्या या पुस्तकाला सुहास पळशीकर यांची प्रस्तावना एक विश्लेषणात्मक चौकट घालून देते. ते म्हणतात की, 'या पुस्तकातल्या नोंदी वाचून फक्त त्या काळात पुन्हा जाणं आणि त्याचा पुनःप्रत्यय घेणं पुरेसं नाही, तर या अनुभवांकडे डोळसपणे पाहणं गरजेचं आहे.' प्रस्तावनेच्या शेवटी लॉकडाऊनने दिलेले तीन मोठे धडे ते मांडतात- दमनकारी राज्याची दमदार पावलं, संशयी समाजाच्या निर्मितीला हातभार आणि गरिबांच्या हद्दपारीवर झालेलं शिक्कामोर्तब. लेखिकेची शैली आणि भाषा वेगळी असली तरी लिखाणातून हेच तीन मुद्दे पुन्हापुन्हा अधोरेखित होत राहतात.

२००४-०५च्या सुमारास भारतात एचआयव्ही-एड्सच्या समस्येने कहर माजवला होता. एक प्रकारची हतबलता, नैराश्य आणि अगतिकता पत्रकार शेखर देशमुखांना जाणवली आणि या सगळ्याची नोंद तेव्हा त्यांनी 'पॉझिटिव्ह माणसं' या पुस्तकाद्वारे घेतली होती.

कोरोना लॉकडाऊन काळाच्या लाखो स्थलांतरित मजूर, कामगार शेकडो-हजारो मैल रस्ते तुडवत आपापल्या गावी परतू लागल्याचे दृश्य या देशाने पाहिले. पत्रकार शेखर देशमुख यांनी गेली जवळपास १५ वर्षे या प्रक्रियेचा माग काढला आहे. या काळातली त्यांची निरीक्षणे, त्यांचे अनुभव आणि नोंदी असलेले 'उपरे विश्व' हे संशोधनपर पुस्तक 'मनोविकास प्रकाशना'तर्फे प्रकाशित झाले आहे. 'उपरे विश्व' या पुस्तकात कोरोना लॉकडाऊन काळात देशाने अनुभवलेल्या स्थलांतरितांच्या कुतरओढीची सविस्तर मांडणी करणारे दीर्घ टिपण आहे. एक प्रकरण स्थलांतराशी निगडित आजचे वास्तव मांडणारे आणि भविष्याचे सूचन करणारे आहे.

लॉकडाऊनमध्ये ज्या विभिन्न ऑनलाइन लाइव्ह सांस्कृतिक कार्यक्रमांची निर्मिती आणि प्रस्तुतीकरण झाले, त्यांची दखल सर्व साहित्यरसिकांनी घ्यायला हवी. या चर्चा-संवादांचे चित्रीकरण जपले पाहिजे. या सगळ्यांचे संकलन आणि संहितीकरण केले, तर सांस्कृतिक संचितात नक्कीच भर पडेल.

अनेक कलावंत, साहित्यिक समूहांनी या 'लाइव्ह'च्या माध्यमातून सांस्कृतिक भूक आणि उपासमार शमवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याच माध्यमातून वाहरू सोनवणे, बाबाराव मडावी यांसारखे आदिवासी लेखक, कार्यकर्ते भारतीय आदिवासी समुदायाशी जोडले गेले. 'कविता', 'पुरखा कथन'मधून भारतीय आदिवासी समूहातील म्हणी, वाक्प्रचार, लोकोक्ती; 'बाँखड़ी गमना'मधून आदिवासी कथांचे वाचन अशा विविध साहित्य प्रकारांतून आदिवासी साहित्यिक, कलावंतांमध्ये अखिल भारतीय स्तरावर संवाद साधण्याचे कामही घडून आले. मुंबई विद्यापीठाच्या ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्टच्या माध्यमातून डॉ. मंगेश बनसोड यांनी अनेक नाट्य कलावंतांना 'लाइव्ह' बघण्याची संधी दिली. ग्वाल्हेरच्या रंगकर्मी गीतांजली गीत यांनी राजा मानसिंह तोमर संगीत आणि

नाट्य विश्वविद्यालया'च्या माध्यमातून बन्सी कौल, सीमा कपूर, रघुवीर यादव, रणजित कपूर, आनंद मिश्रा, वसंत काशीकर, अजहर आलाम अशा नावाजलेल्या रंगकर्मींना नाटकाच्या विभिन्न पैलूंवर बोलते करण्याबरोबर, वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकसंगीताच्या शंभर भागांचे प्रत्यक्ष सादरीकरण केले. 'नाट्यगंगा' या छिंदवाडा येथील संस्थेने चर्चासत्रांचे आयोजन करून, अशोक मिश्रा, गिरिजा शंकर, हरीश इथापे यांच्यासारख्या रंगभूमीशी संबंधित मान्यवरांचे विचार रसिकांपुढे आणले.

'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे फेसबुक लाइव्ह व्याख्यानमाला', 'सत्यशोधक मुक्ता साळवे साहित्य व संस्कृती संमेलन' या कार्यक्रमांमधून अण्णा भाऊ साठे, मुक्ता साळवे यांच्या आणि एकूणच उपेक्षित घटकांच्या साहित्यावर प्रकाशझोत टाकला गेला. लॉकडाऊन स्पेशल डिजिटल फोरमच्या माध्यमातून प्रकाश जाधव यांच्यासारख्या कवीच्या कविता सुदाम राठोड यांच्याकडून समजून घेता आल्या. 'मेरा रंग संवाद', 'बतकही' आणि इतर हिंदी फेसबुक वापरकर्त्यांमुळे कवी असंगघोष, कथाकार कैलाश वानखेडे, कौशल पंवार, हिरालाल राजस्थानी यांसारख्या हिंदी पट्टीतील लेखकांचा आणि त्यांच्या साहित्याचा परिचय साहित्यविश्वाला होऊ शकला.

अनेक प्रकाशन संस्थांनी अनेक लेखकांना बोलते केले. 'झिम्माड काव्यसमूह', 'आम्ही मनमुक्ता', 'मनसा काव्यमाला', 'काव्यहोत्र', 'परिवर्त परिवार', 'मराठी साहित्यवार्ता' यांनी विविध लाइव्ह उपक्रम सादर केलेकवी चित्रकार सुनील अवचार यांनी 'कोव्हिड-१९' ही चित्रमालिका साकार करून, या संकटकाळातील लोकांच्या वेदना, यातना, कुचंबणा आपल्या कुंचल्यातून उतरवल्या. महाराष्ट्रातील कितीतरी महाविद्यालयांनी विविध विषयांवर वेबिनार आयोजित करून मराठी साहित्य आणि संशोधनासंदर्भातील कार्य कोरोनाकाळातही सुरू ठेवले.

या काळात राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयानेसुद्धा काही विभिन्न ऑनलाइन लाइव्ह सांस्कृतिक कार्यक्रमांची निर्मिती केली आणि त्याचे प्रस्तुतीकरणही केले. अशा रीतीने साहित्य आणि सांस्कृतिक संचितात भर पडत गेली आहे.

## समारोपीय निष्कर्ष

कोरोनासारख्या साथी याआधीही या जगाने पाहिल्या आहेत. पण कोरोनाची साथ वेगळी आणि अधिक विश्वव्यापी ठरली याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे दळणवळणाचा वेग आणि माहितीच्या प्रसारणाचा वेग हे दोन्ही वेग आजवरच्या मानवी इतिहासातील सर्वोच पातळीवर आहेत. या दोन्ही वेगात आणखी बदल होणार आहेत.

कोरोनानंतर माणसाच्या आयुष्याची दिशा जशी बदलणार आहे, तसाच भाषाव्यवहारही बदलणार आहे. कोरोनानंतरचे जग वेगळे असणार आहे. जगभरातील कंपन्या आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांनी या नव्या जगाचा अंदाज बांधण्यास सुरुवात केली आहे. माणसामाणसातील नात्यांपासून, देशादेशांमध्ये असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संबंधांपर्यंत अनेक समीकरणे कोरोनानंतरच्या जगात हळहळू बदलत जातील, असे संकेत मिळू लागले आहे. या सगळ्या बदलत्या जगाचा व्यवहार ज्या भाषेत चालणार, तीपण काहीशी बदलणार आहे.

प्रमाण कमी झाले असले तरी साहित्यनिर्मिती आणि मराठी भाषा तसेच वाङ्.मय संशोधन होत आहेच, मात्र त्याचे माध्यम बदलत चालले आहे. सोशल मिडियाचा यथायोग्य वापर करीत साहित्यिकांनी जशी एक वाट धरली तशी संशोधक अभ्यासकांनीही या कोरोनाकाळात एसएसआरएन, रिसर्च गेट यांना जवळ केले. सेमिनारची जागा वेबिनारने घेतली, मात्र संशोधन आणि साहित्याचा हा प्रवास थांबू दिला नाही, हे मान्य करावेच लागते. कोरोनाच्या संकटाला न जुमानता साहित्याची निर्मिती होत होती आणि होत आहे, भले मग माध्यमे बदलली असतील. आता लॉकडाऊनचा कालावधी जवळपास संपुष्टात आला आहे. पुन्हा जोमाने साहित्यनिर्मिती होत आहे. त्यात कोरोना विषयाचा समावेश अधिक आहे, यात मात्र संशय नाही.

## संदर्भ साहित्य

1. Mandavkar, Pavan, Coronavirus: Basic Information and Precautionary Measures (April 12, 2020). Available at SSRN: https://ssrn.com/abstract=3573881 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.3573881
Researchgate:
https://www.researchgate.net/publication/340583863_Coronavirus_Basic_information_and_precautionary_measures
Indira Mahavidyalaya:
http://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=608

2. मांडवकर, डॉ. पवन, मराठी साहित्य आणि वैश्विक महामारी (Language, Literature, Culture and Pandemic), स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य, व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथील राष्ट्रीय वेबिनारमधील भाषण, दि. 19 डिसेंबर, 2020

❖❖❖

# संत चोखामेळा कुटुंबकवींचे वाङ्मयीन योगदान

डॉ. प्रवीण घारपुरे
मराठी विभाग प्रमुख
जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम
ता. नरखेड, जि. नागपूर, महाराष्ट्र (India) ४४५ ४०१
E mail: pgharpure76@gmail.com भ्रमणध्वनी ९७६४५७२७७१

## गोषवारा (Abstract)

वारकरी संप्रदायाच्या संतांच्या मांदीयाळीमध्ये विठ्ठलाच्या भक्तीने ओलेचिंब झालेल्या अनेक संतांपैकी एक संत चोखोबांचे कुटुंब देखील आहे. संत चोखामेळा आणि त्यांचे कुटुंब हे विठ्ठलाच्या भक्तिसरितेचा मनमुराद आनंद घेत जीवनातील असंख्य प्रश्नांचा वेध घेताना दिसतात. आपण केवळ प्रमुख संतांचे कार्यच लक्षात घेत असतो. परंतु येथे संतांनी निर्माण केलेल्या पाऊलवाटेने त्यांचे संपूर्ण कुटुंबच मार्गक्रमण करताना दिसते. तेव्हा प्रमुख संतांच्या पाठीशी वैचारिकतेचे पाठबळ घेऊन कुटुंब देखील किती ठामपणे उभे आहे हे दिसून येते. जसे एखाद्या स्थळी दोन नद्यांच्या संगम होतो. तेव्हा दोन्ही नद्यांमधील पाणी कुठेही कुरकुर न करता एकमेकांत मिसळून पुढच्या प्रवासाला लागते, तसेच हे कुटुंबकवी आहेत.या कुटुंबाच्या अंतरंगात ज्या विठ्ठल भक्तीच्या उकळ्या फुटत होत्या, जो विठ्ठलाविषयीचा कृतज्ञाभाव होता.या संसाररूपी भवसागरातून तरून जाण्यासाठी जे नामतत्व त्यांना कळले होते. हे सर्वच प्रकारचे आत्मिक भाव प्रकट करण्यासाठी आणि विठ्ठलाच्या रूपाला शब्दरूप देण्यासाठी संत चोखामेळ्याच्या कुटुंबाने 'अभंग' या काव्यरचना प्रकाराचा उपयोग केला. त्यातूनच त्यांनी त्यांचे सर्व मनोभाव प्रकट केले आहे. कुठेलेही शिक्षण नसताना इतकी सुंदर अभंगरचना त्यांनी केली. हे तेव्हाच होऊ शकते, जेव्हा देव आणि भक्त यांच्यातील द्वैत नष्ट होते आणि ते एकरूप होतात. असे एकरूप झालेल्या चोखामेळांच्या कुटुंबाने केलेल्या काव्यरचनेतील काव्यसौंदर्याचा वेध पुढीलप्रमाणे घेता येतो.

## संत चोखामेळा कुटुंबकवींचे वाङ्.मयीन योगदान

चोखोबांचे सर्व कुटुंबच विठ्ठलभक्तीत रंगून गेले होते. त्यांची पत्नी सोयराबाई, बहीण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा असे सर्व काबाडकष्ट उपसत नित्य नियमाने व मोठ्या भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण करीत होते. जणू पांडुरंगाची भक्ती किंवा पांडुरंगाच्या दर्शनाने या सर्वाचा शीण नाहीसा होत होता. त्यात त्या सर्वांना एक आगळेच समाधान लाभत हाते. 'सुखाची मिराशी। आमुची हे पंढरीशी।।' असाच त्यांचा अनुभव होता. अशा या कुटुबाचे संत साहित्यातील वाङ्.मयीन योगदानाचे स्वरूप पुढीलप्रमाणे बघता येईल.

संत सोयराबाई

'चोख्याची महारी' म्हणून घेणारी सोयराबाई ही संत चोखोबांची धर्मपत्नी होय. चोखोबाप्रमाणेच त्यांच्या कुटुंबातील सर्वांनाच पांडुरंग भक्तीचा ध्यास होता. चोखोबांच्या भगवदभक्तीचा परिणाम सोयराबाईच्या मनावर झाला. चोखोबाच्या सहवासातून सोयराबाईचे मन पांडुरंग भक्तीने बहरून आले. संत चोखोबांच्या सहवासाने तिच्यात उपजतच असलेल्या हरिभक्तीला पुन्हा अधिकच बहर आला. ही पांडुरंग भक्ती तिच्या मुखातून अभंगरूपाने गोचर झाली. पंढरपुरात मेहुणपुरीत राहणाऱ्या सोयराबाईचे एकूण सकलसंतगाथेत ६२ अभंग उपलब्ध आहेत. तिची कल्पनाशक्ती, कवित्व, भावनाशील वृत्ती, समर्पणभाव इत्यादी गुण तिच्या अभंगवाणीतून प्रत्ययास येतात. सर्वच संतांचे पंढरपुरचे श्रीविठ्ठल हे दैवत आस्थेचा आणि प्रेमाचा विषय आहे. तेच प्रेम सोयराबाईच्या अभंगवाणीतून अभिव्यक्त होताना दिसते. सोयराबाईने विठ्ठल माहात्म्यपर,विटाळपर, आत्मनिवेदनपर, नाममाहात्म्यपर अशा अभंगाची रचना केली. सोयराबाई विठ्ठल माहात्म्य वर्णन करताना सोयराबाई म्हणते,'येई येई गरूड ध्वजा। विटेसहित करीन पूजा।। धुप दीप पुष्प माळा। तुज समर्पू गोपाळ।।(अभंग क्र.१) तसेच सोयराबाई विठ्ठलाला माऊली कल्पून एक आपुलकीचं नातं निर्माण करते.'माय तू माऊली अनाथाची देवा। धावे देवाधिदेवा लंवलाहे।। १।।...मज अव्हेरिता कोण म्हणेल थोरी। म्हणतेसे महारी चोखीयाची।। ४।।'(अभंग क्र.७)अशा प्रकारच्या अनेक अभंगातून सोयराबाईने श्रीविठ्ठलाविषयीचे प्रेम आपल्या रसाळ वाणीने साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. विटाळाच्या नावाखाली तिला जे कटू अनुभव आले. सोयराबाई त्याच अनुभवाचे कथनकरताना म्हणते, 'देहासी विटाळ म्हणती

सकळ। आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध।।..देहाचा विटाळ देहीच निर्धारी। म्हणतसे महारी चोखियाची।।' (अभंग क्र. ६)प्रत्येक मानसाचा जन्म हा विटाळातच होतो आणि मृत्युही विटाळातच. आत्मा हाच निर्मळ असतो. असा कोणताही देह नाही की जो विटाळा वाचून जन्माला आलेला आहे. हा विचार ती अभिव्यक्त करते.सोयराबाई आत्मनिवेदनपर अभंगातून पांडुरंगाजवळ आपल्या वाट्याला आलेल्या जीवनानुभवाचे भाष्य करताना 'उदारा पंढरीराया अंत पाहू नको। कोठवरी मी पाहू वाट तुझी।' हे परमेश्वरा तुझ्याशिवाय आम्हाला कोणीही नाही. तुच आमचा मायबाप आहे, तूच आहे बहीण आणि तूच आहे आमची आशा पुरविणारा धन्वंतरी' ही भावना पांडुरंगाजवळ प्रकट करून तिने आपल्या भावनेला वाट मोकळी करून दिली आहे.सोयराबाईने नाममाहात्म्यहीसांगितले आहे.'नामेचि तरले नर आणि नारी। तरले दुराचारी हरिनामे। ...नामापरते सार नाही हो निर्धारी। म्हणतसे महारी चोखीयाची।।'या संसाररूपी भवसागरातून तारून जायचे असेल तर नामस्मरणाशिवाय दुसरा मार्ग नाही. नामस्मरणानेच नर, नारी आणि दुराचारी देखील तरून गेले आहेत. नामामुळेच मुक्ती आणि सुखशांती लाभत असते. म्हणून नामस्मरणापरते दुसरे साधन नाही. असे ती पटवून देते. संताने जसा गूढ अनुभव गुढभाषेत व्यक्त करावा तशा शैलीत ती आपल्या अनुभवाचे कथन करते, 'अनंता जन्मांचे फिटले साकडे। कोंदाटले पुढे रूप त्याचे' या स्थितीचे वर्णन करताना ती पुढे म्हणते, 'आनंद न समाये मनाचे अंतरी' तिची अभंगवाणी उत्स्फुर्त असून त्यातून स्त्री मनाचा आविष्कार घडतो.

## संत बंकाची अभंगवाणी

बंका हा चोखोबांचा मेव्हणा आणि सोयराबाईचा भाऊ होता. बंका यांचा विवाह चोखोबांची बहीण निर्मळाशी झाला होता. बंका व त्याची पत्नी निर्मळा हे दोघेही चोखोबाप्रमाणे भक्तिपरायण होते. बंका महार चोखोबांचा मेहुणा, सोयराचा भाऊ आणि निर्मळाचा पती, अशा तीन नात्यांनी बंधनात असला तरी तो चोखोबाचा शिष्य होता. बंकाची ३९ अभंगाची मालिका सकलसंतगाथेत उपलब्ध आहेत. परंतु अभंगातील रसवत्ता आणि चित्रमयता लक्षणीय स्वरूपाची आहे.पांडुरंग माहाम्य, नाममहात्म्य आणि संतपर अभंगरचना बंकाने केली आहे.

संत बंकाने पांडुरंगाचे माहाम्ये वर्णन करताना 'पांडुरंगावाचानी दुजा कोण सखा' अशी त्याची भावना आहे. म्हणूनचत्यांनी आपल्या साध्या सोप्या आणि चित्रमयी अभंगातून पंढरीच्या पांडुरंगाच्या सावळ्या मूर्तीचे सुंदर वर्णन केले. 'सावंळे सगुण उभे कर कटी। मुर्ति हे गोमटी बाळरूप।। (अभंग क्र. २९)अशा विविध भावछटा बंकाच्याअभंगातून व्यक्त झालेल्या आहे.

तसेच भवसागरातून तरून  जाण्यासाठी आणि जडमूढ जीवांचा उद्धार करण्यासाठी नामस्मरणासारखे, सोपे साधन नाही, असे त्यांना वाटते. 'सुलभ सोपारे नाम आठविता। न पडेचि गुंता कर्म धर्म। बंका म्हणे मज नामाचा आधार। उतरेन पार भव नदी।।' (अभंग क्र. २६) भक्तियुक्त अंत:करणाने त्यांनी आपल्या भावना साध्या सोप्या भाषेत व्यक्त केल्या आहेत.बंकाने यापूर्वी होऊन गेलेल्या संताची महती वर्णन करताना संतांच्या व्यवसायाचे विशेष सांगितले आहेत. विठोबा आपल्या आवडत्या भक्तांसाठी काय काय करतो तर नामदेवाकडून वाटीने दुध पितो, मीरेचा विषाचा प्याला पितो, जनीसंगे दळूकांडू लागतो, चोखामेळ्यासंगे दोरे ओढतो, गोराकुंभाराच्या कल्लाळात स्वत: विठोबा आला, सेनान्हाव्याची धोपटी घेऊन स्वत: हजामत करतो, राका कसायाचे मांस विकतो, विदुरा घरच्या कण्या खातो, अंबऋषीसाठी दहा जन्म घेतो. हे संतपर वर्णन बंकाने अभंग क्र. ३२ व ३३ मध्ये केलेले आहे. बंकाचे अभंग म्हणजे त्यांचा आत्मोद्‌गार आहे.

## संतनिर्मळाची अभंगवाणी

संत निर्मळा ही संत चोखोबांची बहीण होती. बंका तिचा पती होता. मेहुणपूर या गावी ती राहत होती. हे गाव बहुधा मंगळवेढ्या जवळचेच असावे. चोखोबांकडूनच तिने उपदेश घेतल्यामुळेचोखोबाच निर्मळाचे गुरू होते. आपल्या भावाप्रमाणेच तिही भगवद्‌भक्त होती. तिचे सकलसंतगाथेत एकूण २४ अभंग उपलब्ध आहेत.

चोखोबांनीच निर्मळेला भक्तिमार्ग दाखविला. निर्मळाचे अभंग अत्यल्प असले तरी तिचा आध्यात्मिक अधिकार फार मोठा आहे. ईश्वर भेटत नाही म्हणून ती कष्टी होते. 'चहुकडे देवा दाटला वणवा। का नये कणवा तुजलागी।। .... निर्मळा म्हणौनि पायी घाली मिठी। परते न लोटी मायबाप।।' (अभंग क्र. १) आपल्या हातून पंढरीच्या पांडुरगांची सतत सेवा घडावी हीच तिची अपेक्षा होती. तिला परमार्थाची गोडी इतकी लागलेली होती की आता तिला संसाराचा छंद नकोसा झाला होता. (अभंग क्र. ७) निर्मळा हिने नाममाहात्म्यही वर्णन केले आहे. प्रत्येकच माणूस

परमेश्वराचे नामस्मरण करीत नाही. ज्यांचे अनंत जन्माचे पुण्य असेल तेच हरिनाम उच्चारतात. याची साक्ष पटवून देताना, 'अनंता जन्मांचे सुकृत पदरी। तोचि उच्चारी हरिनाम।।...निर्मळा म्हणे अनंता जन्मांचे। उच्चरितां वाचे पाप जाय।।'(अभंग क्र. ९)निर्मळाची कविता अशी साधी सरळ, मनाचे भाव प्रकट करणारी आहे. तिला संसाराचा कंटाळा आला आहे. हा संसाराचा फास तुम्ही सोडवा म्हणजे 'आनंदे वोविया तुम्हांसी गाईन। जीवभावे ओवाळीन पायावरी।।'(अभंग क्र. २४) अशी अपेक्षाही ती व्यक्त करते. संत चोखोबाप्रमाणेच श्रीविठ्ठलाच्या सान्निध्यात मग्न झाले होतेत्याचप्रमाणे त्यांचे कुटुंबही कुठे मागे नव्हते. ज्या मार्गाने चोखोबा प्रवास करायला निघाले त्याचमार्गाने निर्मळाही वाटचाल करताना दिसते.

## संत कर्ममेळाची अभंगवाणी

कर्ममेळा हा मंगळवेढ्यास राहणाऱ्या चोखोबा आणि सोयराबाई यांचा एकुलता एक मुलगा होता. नामदेव—चोखामेळा—कर्ममेळा अशी त्यांची गुरूपरंपरा होती. त्याचे एकूण २६ अभंग सकलसंतगाथेत उपलब्ध आहेत. परंतु त्यातही कर्ममेळाने आपल्या स्वभावाचे प्रतिबिंब उमटविले. नामदेवांसारखे चोखोबांच्या घरातही विठ्ठल भक्तिचे वातावरण होते. त्याचा परिणाम कर्ममेळावर झालेला दिसतो. संत चोखोबांच्या सानिध्यात तयार झालेला कर्ममेळा वैचारिक दृष्ट्या आपले वेगळेपण सिद्ध करणारा आहे. आपल्या वाट्याला आलेल्या जीवनाविषयीची किळस आणि त्यातून व्यक्त होणारी भावनिक तळमळ व्यक्त करण्यासाठी त्याने अभंगरचना केली. त्यांच्या अभंगरचनेत आपल्याला विविधतेचे दर्शन घडते. बंकाने श्रीविठ्ठल भक्तिपर, नाममहात्म्यपर, आत्मनिवेदनपर आणि संवादशैलीपर अभंगरचना केली आहे.

कर्ममेळा चोखोबांच्या संगतीत विठ्ठलभक्तीमध्ये रममान झाला हे आहे. विठ्ठलाचे वर्णन करताना, 'साधनाच्या काही न पडे कचाटी। जावोनी कपाटी काय पाहू।। १।। ...कर्ममेळा म्हणे सर्व सुखाचे आगर। तो हा विटेवर उभा असे।। ४।।'(अभंग क्र. २७)अशाप्रकारे विठ्ठलाचे सुंदर वर्णन कर्ममेळा करतो. केवळ विठ्ठलाच्या स्वरूपाविषयी कर्ममेळाला ओढ नाही. तर विठ्ठलाच्या चरणी समर्पित होण्याकरीता कर्ममेळा तत्पर दिसते. कर्ममेळा म्हणे लोटांगण पायी। मागणे ते देई हेचि एका।। ४।।' (अभंग क्र. १८)संत चोखोबांनी ज्या विठ्ठलचरणी स्वत:ला समर्पित केले त्या प्रभावातून त्यांचे कुटुंबीय निर्माण झाले.

परमेश्वराच्या नामस्मरणाचे बाळकडू जन्मत:च चोखोबांच्या सहवासाने प्राप्त झाले. म्हणूनच कर्ममेळाने परमेश्वराच्या नामस्मरणाचे महत्त्व विशद केले आहे. 'नामाची आवडी सर्वकाळ वाचे। दुजे साधनचि नेणे काही।।कर्ममेळा म्हणे ही माझी वासना। पुरवा नारायणा सर्वभावे।।'(अभंग क्र. २०)नामस्मरणामुळे संसाररूपी भवसागरातून तरून जाण्याची शक्ती प्राप्त होते. यावर कर्ममेळाचा विश्वास आहे, कर्ममेळा म्हणे सुलभ सोपारे। साच हेचि खरे वर्म एक।। ८।।'अशाप्रकारे नामस्मरणाचे वर्म संत कर्ममेळाला गवसले आणि त्यामध्ये समर्पित होण्यासाठी कर्ममेळा तत्पर होते.

संत कर्ममेळा यांनी अभंगरचनेतून आपला जीवनानुभव प्रकट केला आहे. आपण हीन जातीत जन्माला आल्याची दु:ख देणारी जाणीव त्यांच्या आत्मनिवेदनपर अभंगातून रोखठोकपणे मांडतो. 'आमची केली हीन याती। तुज का न कळे श्रीपती।।जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता।।आमुचे वरी भात दही। खावोनि कैसा म्हणसी नाही।।म्हणे चोखियाचा कर्ममेळा। कासया जन्म दिला मला।।'आपला जन्म अस्पृश्य जातीत झाल्याबद्दलचे दु:ख आणि सामाजिक क्लेश कर्ममेळाने विठ्ठलासमोर अतिशय परखड शब्दात व्यक्त केला. यावरून कर्ममेळाला विठ्ठलाविषयीचे प्रेम, श्रद्धा नव्हती किंवा त्याचा परमेश्वरावर विश्वास नव्हता असे मुळीच नाही. तर तत्कालीन सामाजिक परिस्थितीत त्यांच्यावर होणारा अन्याय व त्या अन्यायातून आपल्याला केवळ परमेश्वरच मुक्त करू शकतो. हा श्रद्धाभाव कर्ममेळाच्या ठिकाणी दिसते. कर्ममेळाच्या मनातील सल व्यक्त करताना तो देवाला प्रश्न विचारतो, देवा! तुझे भक्त आम्ही म्हणवितो खरे, मग आम्ही हीन का? तुझ्या या भक्तीचा उपयोग तरी काय? 'तुमच्या संगतीचे काय सुख आम्हा। तुम्हा मेघश्यामा न कळे काही।। हीनत्व आम्हासी हीनत्व आम्हासी देवराया।। गोड कधी न मिळेची अन्ने। सदा लाजिरवाणे जगामध्ये।। तुम्हासी आनंद सुखासी सोहळा। आमुचे कपाळी वोखटपणा। चोखियाचा म्हणे कर्ममेळा देवा। हाचि आमुचा ठेवा भागभाग।।'कर्ममेळ्याच्या आत्मनिवेदनातून तो असहायतेने त्रस्त झाल्याची जाणीव होते. 'कशासाठी पोसियेते। हे तू सांग बा विठ्ठले।। मज कोण आहे गणगोत। न दिसे बरी तुझी नीत।।'हीन जातीविषयीचे दु:ख, त्यांच्या बऱ्याच अभंगात उमटलेले आहेत. कर्ममेळाच्या या अभंगाविषयी डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, 'दु:ख कारणांच्या आघातांच्या मळभामुळे कर्ममेळ्याच्या अंत:करणरूपी

आकाशातील प्रसन्नवृत्तीची चंद्रिका मात्र झाकळून गेलेली आहे. त्यामुळे निर्भेळ, निर्मल प्रसन्नतेने, प्रफुल्ललेले असे त्याचे अभंग सापडणे कठीण आहे. हे डॉ. अ. ना. देशपांडे यांचे विधान यथार्थ आहे. परंतु सुखाचे आगर असलेला व भक्तांना अभय देणारा असा जो विटेवर उभा असलेल्या पांडुरंगावरील श्रद्धेचे सूत्र मात्र त्याच्या अभंगरचनेत कायम असल्याचे दिसून येते.

संवादात्मकता हा तर कर्ममेळ्याच्या अभंगवाणीचा विशेष वाटतो. त्यांचे संपूर्ण अभंगच विठ्ठलाशी साधलेल्या संवादाने ओतप्रोत भरलेले आहेत. त्यांचे ते संवाद तत्कालीन समाजजीवन व समाज वास्तवाची खरी जाणीव करून देणारी अभंगवाणी आहे. विठ्ठलाशी केलेल्या सुखसंवादातून व्यक्त होणारी भक्ताच्या अंत:करणाची आर्तता अस्सल असली तरी कर्ममेळा आपल्या सामाजिक विषमतेची, अवहेलनेची जाणीव विसरू शकला नाही, हे तितकेच खरे आहे. 'आमुचे घरी भात दही। खावोनी कैसा नाही म्हणसी।।' यात तो विठ्ठलाला म्हणजेच विषमतेने ग्रासलेल्यासमाजाला जाब विचारतो आहे हे विसरता येत नाही.

अशाप्रकारे संवादशैलीने विठ्ठलाशी संवाद साधून आपल्या मनातील वेदना, दु:ख, विठ्ठलापर्यंत पोहचविले. अर्थात एकप्रकारे समाजापुढे आपल्या मनातील सल व्यक्त करून परमेश्वराविषयीचा भक्तिभावही व्यक्त केला. शेवटी कर्ममेळाच्या अभंगवाणी म्हणजे, आजच्या दलितांच्या सामाजिक जाणिवांची सातशे–आठशे वर्षापूर्वीची नांदी होती, असेच म्हणावे लागेल.

चोखोबांची पत्नी सोयराबाई, बहीण निर्मळा, मेव्हणा, बंका व मुलगा कर्ममेळा हे सर्व काबाडकष्ट करून नित्य नियमाने व मोठ्या भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण करीत असत. .म्हणूनच या कुटुंबकवींमध्ये संत सोयराबाईचे ६२ अभंग, बंकाचे ३९ अभंग, बहीण निर्मळाचे २४ अभंग, तर मुलगा कर्ममेळा यांने २६ अभंगाचे वाङ्मयीन योगदान मराठी साहित्यात दिले. ही अतिशय महत्त्वपूर्ण बाब आहे. ही अभंगवाणी विविध रसाने युक्त आहे. त्याचप्रमाणे अलंकारवैभव आणि गुणवैभव देखील त्याच्या अभंगवाणीतून सहजपणे साकार होताना दिसते. हे विशेष.

## निष्कर्ष

- संत चोखोबा कुटुंबकवींची अभंगवाणी म्हणजे त्यांचा आत्माविष्कार आहे.
- संत चोखोबासारख्या कुटुंबप्रमुखाने दाखविलेल्या पाऊलवाटेने त्यांचे संपूर्ण कुटुंब जात असताना या कुटुंबप्रमुखाच्या पाठीशी वैचारिकतेचे पाठबळ घेऊन कुटुंब देखील ठामपणे उभे आहे हे दिसून येते.
- संत चोखामेळा कुटुंबकवींची अभंगवाणी म्हणजे उत्कट भक्तीचा आविष्कार आहे.
- वारकरी संप्रदायाच्या या मांदीयाळीमध्ये विशेषत: स्त्रीयांना स्थानच नाही तर मानाचे स्थान आहे.
- वारकरी संप्रदायाने सामाजिक विषमतेला कुठेही थारा दिलेला नाही.
- संत चोखामेळा कुटुंबकवींच्या वारकरी संप्रदायातील स्थान आणि कार्य हे मानवतावादी दृष्टीचे द्योतक असल्याचे दृष्टीस येते.
- संत चोखोबा कुटुंबकवींनी अभंगरचना करून मराठी साहित्यात मोलाचे योगदान दिलेले दिसते.
- त्यांची अभंगवाणी अलंकारवैभव, रसवैभव आणि विविध गुणांनी युक्त आहे.
- कर्ममेळाची अभंगवाणी म्हणजे, आजच्या दलितांच्या सामाजिक जाणिवांची सातशे–आठशे वर्षापूर्वीची नांदीच होती असे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ


१. संपा. गोसावी र. रा. –'सकलसंतगाथा' खंड १, सोयराबाईचे अभंग, सारथी प्रकाशन, पुणे

२. संपा. गोसावी र. रा. –'सकलसंतगाथा' खंड १, बंकाचे अभंग, सारथी प्रकाशन, पुणे

३. संपा. गोसावी र. रा. –'सकलसंतगाथा' खंड १,निर्मळाचे अभंग, सारथी प्रकाशन, पुणे

४. संपा. गोसावी र. रा. –'सकलसंतगाथा' खंड १,कर्ममेळाचे अभंग, सारथी प्रकाशन, पुणे

५. डॉ. अ. ना. देशपांडे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड–२


❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका (MPSP)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre**, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401





☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983



| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 500/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR coe** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |



**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



p- ISSN 2454-7409

9 772454 740009

e-ISSN 2582-5305

9 772582 530008



digitalblasphemy.com